नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका


मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास


राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

युगवाणी

ऑक्टो./नोव्हें./डिसें. '८९





डॉ. ग. त्र्यं. देशपांडे

भारतीय साहित्यशास्त्राचे श्रेष्ठ भाष्यकार डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांचे हा अंक मुद्रणावस्थेत असतांना निधन झाल्याचे वृत्त आले.

भारतीय साहित्यशास्त्रीय विवेचनाच्या क्षेत्रातील या ज्ञानतपस्वी महापुरुषाच्या उत्तुंग कार्याने वैदर्भी परंपरेच्या थोरवीत अधिकच मोलाची भर घातली गेली आहे.

जागतिक दर्जाच्या या विद्वानास संपादक, युगवाणी परिवार व विदर्भ साहित्य संघाची ही आदरपूर्वक विनम्र श्रद्धांजली.

युगवाणी

॥ विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र ॥

संपादक : श्रीपाद भालचंद्र जोशी

प्रबंध संपादक : केशव जोशी

वर्ष पंचेचाळीसावे / अंक १०-११-१२ ऑक्टो.-नोव्हें.-डिसें. १९८९

मूल्य-१० रु. / वार्षिक वर्गणी : ३५ रु.

त्रैवार्षिक वर्गणी : ९० रु.

अनुक्रम

■ संपादकीय / श्रीपाद भालचंद्र जोशी . . २ ■ साहित्यवाचस्पती डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांची साहित्यसाधना [लेख] / डॉ. वि. भि. कोलते . . ३ ■ कै. ग. त्र्यं. देशपांडे एक ज्ञानव्रती [लेख] / डॉ. मधुकर आष्टीकर . ९ ■ (कविभूषण) बलवंत गणेश तथा अण्णासाहेब खापर्डे : एक नोंद [माहिती] . . ११ ■ कविभूषण खापर्डे [लेख] / राम शेवाळकर १२ ■ ज्ञानदेवांचा कालखंड : काही नवी समीकरणे [लेख] / डॉ. सु. वा. कुळकर्णी १४ ■ समाजवादी यथार्थवाद : एक अल्पसा परिचय [परिचय] / प्रसन्नकुमार भावे २३ ■ स्वामी आनंद आणि नगरोळ [लेख] / दुर्गा भागवत २५ ■ तार्किक प्रत्यक्षार्थवादाचे उद्गाते-ए. जे. एअर [टिपण] / सु. वा. बखले ३२ ■ हजार हातांचा ऑक्टोपस [संग्राह्य-लेख] / सुधीर वेडेकर ३६ ■ मार्क्सवादी समीक्षा : एक निरीक्षण [समीक्षा लेख] / स. त्र्यं कुल्ली ४३ ■ नवी समीक्षा, नवे प्रश्न : एक चिंतन [समीक्षा लेख] / डॉ. भास्कर गिरधारी . ५१ ■ टिपणांचे विषय [यादी] / ५३ ■ लेखकाचे कलात्मक व्यक्तिमत्व [निर्मितीय] जीवन तत्ववादी . . ५४ ■ दोन कविता / सुधाकर नेर्लेकर ५८ ■ तीन कविता / ज्योती लांजेवार ५९ ■ दोन कवी एक साहचर्य संबंध [शोध] / प्रा. अविनाश देशपांडे ६० ■ आशा बगे एक नवे अस्तित्व [टिपण] / डॉ. श्रीनिवास रामचंद्र सिरास . . ६४ ■ गोष्ट : राजाची : भिकाऱ्याची; किंवा मेलेल्या कुत्र्याची [एकांक] / दिनकर वेडेकर ६८ ■ ग्रांथिकी / मधु जामकर ७७ ■ मंथन / म. द. हातकणंगलेकर ८० ■ कार्यवृत्त / मनोहर म्हैसाळकर . ८१

[महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अंशतः अनुदान प्राप्त]

संदर्भ सेवा : चंद्रकांत कुळकर्णी, आमंत्रक, श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालय, वि. सा. संघ, नागपूर

आवरण पृष्ठ / रेखाटने : भाऊ समर्थ

मुद्रित शोधन / संकलन / प्रतिलिपी इ. सहकार्य : सौ. शोभा उबगडे / श्यामकांत कुळकर्णी

संपादकीय पत्रव्यवहार : संपादक / युगवाणी, विदर्भ साहित्य संघ

झाशी राणी चौक / नागपूर-४४० ०१२

✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ संपादकीय

जीवनातील प्रत्येकच बाब ही आकलन करून घेण्याचे कष्ट पडू न देता वर्तमानपत्रीय पद्धतीची सोपी, सुलभता असणारी, सुटसुटीत, थोडक्यात आणि तरीही परिणामकारक वाटण्याची किंवा जाहिरातींसारखी घोषणात्मक, सुखद, भडक करून मांडल्या जाण्याची अपेक्षा केली जाऊ लागलेली आहे. जीवनातील सर्वच क्षेत्रांकडून व सर्वच क्षेत्रात परस्परांकडून, मग तो कलावंत, लेखक असो अथवा शिक्षक किंवा तत्वज्ञ यांचेकडूनही अशा अपेक्षा व्यक्त करण्यापोटी व्यक्ती व समाजजीवनाचे केवळ वरवरचे तेवढे थर उथळपणे हाताळल्या जाण्याचा व त्यातून जीवनविषयक दृष्टीकोनही उथळच कायम टिकण्याचा धोका स्पष्टच आहे.

काही सन्मान्य अपवाद वगळता एकूणच समकालीन जीवन, सामूहिक मन हे सोपे, सुटसुटीत, किंचितही काठिण्य सहन करण्याची ताकद नसणारे, सखोलताविहीन, 'फ्लर्ट' असे झालेलेच आहे.

हे वरवरचे, उथळ, व्यक्तीगत व सामाजिक-सांस्कृतिक जीवन आपल्या अंगवळणी पडलेले असून त्यात आपण समाधानी देखील आहोत. अशा समाजाची काहीही निर्मिण्याची शक्तीच खच्ची झालेली असण्याची ही स्थिती असल्याने निर्मितीच्या, आस्वादाच्या व्यवहाराचे देखील खच्चीकरण होऊन चांगल्या कलेची, सत्यनिष्ठेची, मूल्यांची कदर करण्याच्या गोष्टी करणे हे हास्यास्पद ठरते आहे. त्यामुळे अशा धारणांची व्यक्ती काही लिहू-बोलू लागली की ते देखील तसे सुबोध नसल्याने; दुर्बोध, अनाकलनीय, कठीण वगैरे वाटू लागलेले आहे.
जीवनातील या जीवघेण्या सुबोधतेच्या आकर्षणाने गुदमरणारे मन वाळगून या साऱ्या व्यवहाराकडे बघायला शिकणे त्यामुळे अगत्याचे झाले आहे.

वरवरचे, उथळ असे हे समकालीन जीवन जगत असणे जनमाध्यमांच्या, माहितीच्या प्रस्फोटाच्या या युगात अपरिहार्य झालेले आहे. असे वरवरचे उथळ जीवन जगत असतांनाच जीवनाचे सखोल दर्शन देखील शक्य आहे काय हा खरा प्रश्न असल्याचे जे. कृष्णमूर्तींनी देखील म्हटले होते.

त्याकरिता उर्जेचा, चेतनेचा साठा, तशी तीव्र इच्छा व ही उर्जा कशी प्राप्त करावयाची याची सतत केलेली विचारणा यांची गरज असल्याचे जे. कृष्णमूर्ती एका चर्चेत सांगतात.

जीवनातील अगाधतेला कसा स्पर्श करता येऊ शकेल ?

जीवनातील अधोगती, विकृती, भ्रष्टता थोपविता कशी येईल ?

समग्रतेचा अनादर करून, ठराविक चाकोरीबद्धतेचा स्वीकार करणारे मनच अधोगत, विकृत, भ्रष्ट होण्याकडे झुकलेले असते. ही अधोगतता उर्जेची असून ती उर्जा निर्मितीस असमर्थ ठरणाऱ्या मेंदुच्या पेशीत दडलेली असते व या अवस्थेदरील जीवशास्त्रीय उपाय म्हणजे मेंदुची स्वच्छता.

शरीराच्या स्वच्छतेप्रमाणेच मेंदुच्या स्वच्छतेचेही केवळ महत्त्वच जाणणाऱ्या नव्हे तर ते अंमलात आणणाऱ्या संस्कृतीकडे होणारे अवस्थांतर हेच जीवनात नवनवे मार्ग धुंडाळण्याची इच्छाशक्ती निर्मिणारे व ती प्रबळ करणारे सांस्कृतिक परिवर्तन ठरू शकते.

असे होऊ शकेल काय ?

श्रीपाद भालचंद्र जोशी

अनुक्रमणिका

साहित्यवाचस्पती डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांची साहित्यसाधना

डॉ. वि. भि. कोलते

गेल्या महिन्यात डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांच्या आकस्मिक निधनाची बातमी ऐकली आणि फार दुःख झाले. अखिलभारतीय कीर्तीच्या विद्वानाला, विशेषतः साहित्यशास्त्रज्ञाला महाराष्ट्र मुकला हे तर खरेच, पण त्यापेक्षाही, महाविद्यालयीन दिवसांपासूनचा माझा जिवलग स्नेही गेला याचे दुःख मला विशेष जाणवले. आमच्या स्नेहसंबंधातील हास्यविनोदाचे, सुखदुःखाचे, हर्षामर्षाचे अनेक प्रसंग आठवले. त्यातही एक विशेष उत्कट आनंदाचा प्रसंग मनश्चक्षूसमोर उभा राहिला व त्याच्या चिंतनात क्षणभर मी स्वतःला हरवून बसलो.

प्रा. ग. त्र्यं. देशपांडे यांचा 'भारतीय साहित्यशास्त्र' हा ग्रंथ सिद्ध होऊन त्याला महाराष्ट्र शासनाचा जसा पुरस्कार मिळाला होता तसाच अखिलभारतीय कीर्तीचा साहित्य अकादमी पुरस्कारही मिळाला होता. त्या वेळी साहित्य अकादमीचा मी एक सभासद होतो. पुरस्कार वितरणाच्या समारंभानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी एक विशेष सभा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी प्रत्येक भाषेतील पुरस्कार–विजेत्याने आपल्या पुरस्कारप्राप्त ग्रंथाचा थोडक्यात परिचय करून द्यायचा होता. याही सभेला मी उपस्थित होतो. अकादमीचे अध्यक्ष म्हणून पंडित जवाहरलाल नेहरू अध्यक्षस्थानी होते. त्यांच्या बाजूला त्या वेळच्या वक्त्यांत प्रा. ग. त्र्यं. बसलेले होते. आधीच्या पुरस्कार–विजेत्यांच्या भाषणानंतर प्रा. ग. त्र्यं. उभे राहिले आणि आपल्या पुरस्कारप्राप्त ग्रंथातील विषयाचे रहस्योद्घाटन करू लागले. त्यांची बोलण्याची गती मंद, एकेक शब्द, एकेक वाक्य ते संथ गतीने पण स्पष्ट आवाजात ठाशीवपणे उच्चारीत होते. त्यांचे हे भाषण श्रोत्यांप्रमाणेच पंडित नेहरूही लक्षपूर्वक ऐकत होते. या देखाव्यानेच माझे अंतःकरण भरून आले होते. एका मराठी विद्वानाने सर्व उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले होते म्हणून तर मला आनंद झालाच होता; पण तो विद्वान महाविद्यालयीन जीवनापासुन माझा स्नेही होता, इतकेच नाही तर त्याच्या या पुरस्कारप्राप्त ग्रंथाच्या निर्मितीत निमित्तमात्र का होईना पण माझाही थोडासा वाटा होता या कल्पनेमुळे माझा तो आनंद द्विगुणित झाला होता. या निमित्त कारणाचा, नंतरच्या काळात ग. त्र्यं. यांनी अनेकदा तोंडी उल्लेख तर केला होताच, पण १९६० साली नागपूर महाविद्यालयाचा अमृत महोत्सव आम्ही साजरा केला त्या वेळी काढलेल्या स्मारक ग्रंथातील 'माझ्या वेळचे मॉरिस कॉलेज' या आपल्या स्मरणवजा लेखातही त्यांनी ते सूचित केले होते. म्हणूनच केवळ त्याचा आज मला उल्लेख करावासा वाटतो. त्यांनी लिहिले होते :

"स्वभावाने मी आळशी आहे, गर्दे व कोलते यांनी ते ओळखले. माझ्या संमतीची वाट न पाहताच ते माझ्यावर काम लादून देत. गर्द्यांनी मला संस्कृत मंडळाचे चिटणीस केले व कोलत्यांनी संस्कृत विभागाचे संपादन माझ्यावर लादले ते असेच. आजही माझा तो गुण कायमच आहे व कोलत्यांचा लकडाही तसाच कायम आहे. कोलते 'महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचे' संपादक झाले, त्यावेळीही साहित्यशास्त्रावर त्यांनी माझ्याकडून असेच लिहवून घेतले. म्हणूनच माझी महाराष्ट्राला ओळख झाली..."

होय, १९५२ ते १९५५ पर्यंत, पुणे येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या 'साहित्य–पत्रिका' या त्रैमासिकाचा मी संपादक होतो. हे संपादकत्व माझ्याकडे आल्यावर विदर्भातील अनेक विद्वानांकडून मी 'पत्रिके'साठी लेख लिहून घेतले. मित्रवर्य प्रा. ग. त्र्यं. यांच्या मागे लकडा लावून त्यांच्याकडूनही लेख लिहून घेतले. माझ्या संपादकत्वाखाली प्रसिद्ध झालेल्या एप्रिल-जून

१९५२ च्या पहिल्याच अंकात 'साहित्य-शास्त्रातील साहित्य' या त्यांच्या लेखांचा पूर्वार्ध व त्या पुढील अंकात उत्तरार्ध प्रसिद्ध झालेला आहे. या लेखांनी महाराष्ट्रातील रसिकांचे व विशेषतः साहित्यशास्त्रज्ञांचे लक्ष वेधून घेतले. हे लेख वाचूनच प्रा. ग. त्र्यं. यांना मुंबई येथील मराठी साहित्य संघाने १९५३ मध्ये 'वामन मल्हार जोशी व्याख्यान माले'त व्याख्याने देण्यासाठी आमंत्रित केले. त्यावेळी त्यांनी भारतीय साहित्य शास्त्रावर पाच व्याख्याने दिली. त्यांतूनच त्यांचा हा ग्रंथ तयार झाला. तो प्रसिद्ध होताच महाराष्ट्रात त्याचे अपूर्व स्वागत झाले. केवळ योगायोगाने मी कारणीभूत झालेल्या निमित्ताला असे गोड फळ आलेले पाहून माझे अंतःकरण आनंदाने भरून आले होते.

'भारतीय साहित्यशास्त्र' हा डॉ. देशपांडे यांचा प्रमुख ग्रंथ होय. त्याचा परिचय करून देताना आपल्या 'पुरस्कारा'त डॉ. वा. वि. मिराशी लिहितात : "...या ग्रंथाचे दोन भाग आहेत. पूर्वार्धात भरताचार्यांच्या नाट्यशास्त्रापासून जगन्नाथ पंडितांच्या रसगंगाधरापर्यंतच्या ...काळात साहित्यशास्त्राचा विकास कसकसा होत गेला हे त्या त्या कालखंडात होऊन गेलेल्या ग्रंथकारांच्या ग्रंथातील विषयांचे चिकित्सक पद्धतीने पर्यालोचन करून दाखविले आहे. या विभागात अनेक ठिकाणी प्रा. देशपांडे यांच्या स्वतंत्र प्रज्ञेचा प्रत्यय येतो. उदा. भरताने उल्लेखिलेल्या लक्षणांचा उत्तरकालीन अलंकाराशी त्यांनी जोडलेला संबंध पाहावा. तसेच भरत, भामह, वामन, आनंदवर्धन, कुन्तक हे ग्रंथकार भिन्नभिन्न संप्रदायांचे (Schools चे) प्रवर्तक नसून त्यांनी 'सिद्ध-परमतानुवाद' पद्धतीने आपापल्या ग्रंथातील विषयांचे विवेचन केले आहे, हेही प्रा. देशपांडे यांनी दाखविले आहे.

उत्तरार्धात शब्दांचे स्वरूप, अभिधा, लक्षणा व व्यंजना या शक्ती, व्यंग्यार्थ किंवा ध्वनी, रस-प्रक्रिया इत्यादि साहित्यशास्त्रातील विषयांचे विवेचन आकर ग्रंथास अनुसरून केले आहे. त्यातील 'रसप्रक्रिया' हे प्रकरण या ग्रंथाचा गाभा आहे..."

आपल्या ग्रंथाच्या पूर्वार्धाचा समारोप करताना 'संप्रदाय नव्हेत : विकासाचे टप्पे' असा स्वतंत्र परिच्छेदच डॉ. देशपांडे यांनी लिहिला आहे. हे टप्पे नीट लक्ष्यात येण्यासाठी कोणत्याही शास्त्रीय ग्रंथाच्या अभ्यासाला लागणारी 'चतुःसूत्री', त्यांनी 'विषयप्रवेशा'त विषद केली आहे. ही चतुःसूत्री अशी :

(१) लक्ष्यानुसारि लक्षणम् : म्हणजे काव्य-लक्षण करताना काव्यमीमांसकांनी, त्यांचे लक्ष्य म्हणजे त्यावेळी अस्तित्वात असलेली काव्ये व त्यातील काव्यप्रपंच लक्ष्यात घेतला होता, हे ध्यानात ठेवले पाहिजे.

(२) प्राधान्येन व्यपदेशा भवन्ति : "शास्त्रात अनेक गोष्टींची प्रक्रिया सांगितलेली असते. ज्या गोष्टीच्या बाबतीत संपूर्ण प्रक्रिया सांगितलेली असते ती प्रधान वस्तु होय. नंतर हीच प्रक्रिया कमी-जास्त फरकाने ज्या इतर वस्तूंना लागते त्या वस्तु प्रधानवस्तूच्याच वर्गात घालतात व त्या वर्गाला प्रधान वस्तूचेच नाव देतात. शास्त्रातील प्रधानवस्तुव्यपदेश तो हाच." हे सूत्र लक्षात न घेतल्यामुळे डॉ. मा. गो. देशमुख यांचा गैरसमज होऊन त्यांचे 'भावगंधा'विषयीचे विवेचन कसे सदोष झालेले आहे, हे दाखवताना डॉ. देशपांडे म्हणतात :

"सारांश, काव्यात्मा म्हणून रसाबद्दल बोलत असताना शास्त्रज्ञांनी भावादिकही एक-जातीय म्हणून गृहीत धरले आहेत व त्या सर्व विवेचनाला रसविवेचन किंवा रसप्रक्रिया हे नाव प्राधान्यव्यपदेशाने दिले आहे. पण संस्कृत ग्रंथातील ही शास्त्रीय पद्धति कित्येक आधुनिक पंडितांच्या लक्षात आली नाही, आणि संस्कृत ग्रंथांनी भाव-काव्याची योग्य ती दखल घेतली नाही असा त्यांनी आपला समज करून घेतला. (डॉ. मा. गो. देशमुख यांचे 'भावगंध' या प्रमेयाचे विवेचन पाहा.)"

(३) यथोत्तरं मुनीनां प्रामाण्यम् हा व्याकरणशास्त्रातील नियम साहित्यशास्त्रालाही लागतो, विशेषतः साहित्य-शास्त्राचा विकास ज्याला अभ्यासावयाचा आहे त्याला तर उत्तरोत्तर प्रामाण्य लक्षात घ्यावेच लागते. 'उत्तरोत्तर प्रामाण्य' म्हणजे उत्तरकालीन शोधाला प्रामाण्य.

उदा. दंडीने काव्यमार्गाचे विवेचन केले. त्यानंतर झालेल्या वामनाने दंडीच्या विवेचनातील दोष वगळून गुणांचे अधिक चांगले विवेचन केले व आपली रीतीची उपपत्ति बसवली; तर कुंतकाने या दोहींच्या मतांचा आढावा घेऊन त्यातील अपुरेपणा दाखवून रीतीचे विवेचन सुकुमार, विचित्र आणि मध्यममार्ग या नावांनी अधिक शास्त्रशुद्ध केले, इत्यादि. रीतीचा हा उत्तरोत्तर विकास लक्षात न घेता 'कित्येक विद्वान आजही वामनाचे रीतिविवेचन अखेरचे मानतात व त्यावरून आपले सिद्धान्त बनवितात' असे, डॉ. देशमुख यांच्या 'मराठीचे साहित्यशास्त्र' या ग्रंथातील 'रीति व रेखा' या प्रकरणाला अनुलक्षून डॉ. ग. त्र्यं. देशपांडे म्हणतात.

(४) सिद्धपरमतानुवाद : हा चौथा नियम फार महत्त्वाचा आहे. एका शास्त्राचे विवेचन चालू असता लक्ष्यसिद्धीकरिता दुसऱ्या शास्त्रातील सिद्ध मताचा अनुवाद करणे, याला 'सिद्धपरमतानुवाद' म्हणतात. 'संस्कृत काव्याचे पंचप्राण' या आपल्या ग्रंथात 'संस्कृत ग्रंथकारांनी महाकाव्याच्या वर्णनात त्याच्या अंतरंगाचे स्वरूप सांगितले नाही, केवळ बाह्य वर्णन केले' असे डॉ. वाटवे यांनी म्हटले आहे. 'शास्त्रलेखनातील सिद्धपरमतानुवादाचा नियम लक्षात न घेतल्याने त्यांचा असा समज झाला आहे' असे डॉ. देशपांडे दाखवून देतात.

डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांनी सांगितलेली ही चतुःसूत्री महत्त्वाची होय. ती लक्षात घेऊनच त्यांनी आपल्या 'भारतीय साहित्यशास्त्रा'तील विवेचन केले आहे, हे विसरता कामा नये.

प्रा. ग. त्र्यं. यांची मुंबई साहित्यसंघातील साहित्यशास्त्रावरील व्याख्याने खूपच गाजली होती. त्याचे एक प्रत्यंतर असे की, त्याच्या पुढील वर्षी त्यांना वाई येथील प्राज्ञपाठशाळेच्या सरस्वत्युत्सवात व्याख्यानासाठी आमंत्रित करण्यात आले. त्यावेळी त्यांनी 'साहित्यशास्त्र व पूर्वमीमांसा' या विषयावर व्याख्याने दिली. ही व्याख्याने पुस्तकरूपाने प्रसिद्ध झालेली नाहीत. साहित्यशास्त्राच्या अभ्यासात पूर्वमीमांसा शास्त्राचा उपयोग कसा होतो, विशेषतः पूर्वमीमांसा शास्त्र हे साहित्यशास्त्राचेही 'ज्यूरिस्प्रूडन्स' कसे आहे याची मीमांसा त्यांनी केली होती. त्यात साहित्यशास्त्र व मीमांसाशास्त्र या दोन्ही शास्त्रातील त्यांचे प्राविण्य श्रोत्यांच्या प्रत्ययाला आले होते. ते असे की, त्यांची ही व्याख्याने ऐकून 'ब्रह्मीभूत स्वामी केवलानन्द सरस्वतीसारख्या महापंडितांनाही यांची विद्वत्ता कौतुकास्पद वाटली.' असे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लिहून ठेवलेले आहे. त्यानंतर प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या 'भारतीय साहित्यशास्त्र' या ग्रंथाने तर अनेक पुरस्कारांच्या रूपाने व विशेषतः नागपूर विद्यापीठाने तो ग्रंथ डी. लिट साठी मान्य करून त्यांच्या विद्वत्तेवर शिक्कामोर्तबच केले.

त्यानंतर पुढच्याच वर्षी म्हणजे १९५९ साली, यापूर्वी आकाशवाणीकडून सुरू करण्यात आलेल्या के. पु. मं. लाड व्याख्यानमालेत व्याख्याने देण्यासाठी डॉ. देशपांडे यांना पाचारण करण्यात आले. ही व्याख्याने पुणे येथे झाली. त्यावेळी त्यांनी 'भारतीय साहित्यशास्त्रातील सौंदर्य कल्पना (The concept of Beauty in Indian Poetics) या विषयावर दोन व्याख्याने दिली. अध्यक्षस्थानी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी होते. ही व्याख्याने पुढे पुस्तकरूपानेही प्रसिद्ध झाली. सौंदर्य या कल्पनेला मध्यवर्ती स्थान देऊन सामान्यतः पाश्चात्य तत्त्वदर्शनात चर्चा करण्यात येते, पण सौंदर्यकल्पनेला भारतीय शास्त्रातही स्थान आहे हे या व्याख्यानात डॉ. देशपांडे यांनी दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. ही चर्चा त्यांनी आनंदवर्धन व अभिनवगुप्त यांना प्राधान्य देऊन केली आहे. भामह, वामन, उद्भट, दंडी, रुद्रट इत्यादिकांनी शब्दार्थाच्या विशिष्ट योजनेत किंवा रचनेत सौंदर्य निर्माण होते असा दृष्टिकोन सांगितला, असे त्यांनी म्हटले आहे. 'सौंदर्यमलंकार:' या वामनाच्या व्याख्येच्या अनुषंगाने, भारतीय साहित्यशास्त्राच्या मते अलंकारांचे अलंकारित्व चारुत्वात व चारुत्व हे रसाभिव्यक्तीत असते, हे साहित्य शास्त्रज्ञांचे मत उकलून दाखवून काव्यातील 'रस' म्हणजेच सौंदर्य होय असे प्रतिपादन त्यांनी केले आहे. याच

दृष्टीने त्यांनी या व्याख्यानातही रसचर्चा विस्ताराने केलेली आढळते.

वरील ग्रंथ व व्याख्याने यात डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांचे साहित्यशास्त्रावरील प्रभुत्व प्रामुख्याने व्यक्त झाले आहे. त्यांच्या या क्षेत्रातील कार्याच्या थोरवीविषयी लिहिताना वरील व्याख्यानांच्या उपोद्‌घातात तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी म्हणतात :

"श्री. देशपांडे यांचे भारतीय साहित्यशास्त्रविषयक चिंतन पाश्चात्य चिंतनाच्या इतके उच्च पातळीवरचे आहे. भारतीय साहित्यशास्त्राची अनेक वैशिष्टये आहेत ती त्यांनी अधिक स्पष्ट रीतीने व विस्ताराने मांडली आहेत. यामुळे पाश्चात्य व भारतीय समीक्षेची व सौंदर्यमीमांसेची मूलगामी साम्येही दृष्टिपथात येऊ लागली आहेत. भारतीय साहित्यशास्त्र भारतीयांच्या नवसाहित्य–समीक्षेच्या कक्षेतून लुप्त झाल्यासारखे आहे. पुराणवस्तुसंग्रह व संशोधन खात्यातच ते जणू जमा झाले आहे. श्री. देशपांडे यांच्या व्यासंगामुळे आता अशी अपेक्षा उत्पन्न होऊ लागली आहे की, नवसाहित्य–समीक्षेत पाश्चात्य समीक्षा–पद्धतीबरोबरच प्राचीन भारतीयांची साहित्य–समीक्षा-पद्धति नवा उजळा मिळून पाश्चात्य समीक्षेच्या दर्जाला प्राप्त होईल. गेल्या शतकात अध्यात्म-दर्शनाला असा दर्जा मॅक्समुलर, डायसेन, विवेकानंद, अरविंद घोष, रवीन्द्रनाथ, राधाकृष्णन् यांनी आणला; तेच कार्य श्री. देशपांडे यांच्या प्रगल्भ विवेचनांनी भारतीय साहित्यशास्त्राला प्राप्त होईल, अशी आशा उत्पन्न होऊ लागली आहे"

तर्कतीर्थांसारख्या प्रकांडपंडितांनी डॉ. देशपांडे यांचे नाव जागतिक कीर्तीच्या विद्वानात गोवले आहे, हे लक्षात यावे म्हणूनच हा उतारा या ठिकाणी उद्धृत केला आहे !

डॉ. देशपांडे यांचे साहित्यविषयक चिंतन सतत चालू होते. १९६४ साली लाड स्मारक व्याख्यानमालेत व्याख्याने देण्यासाठी त्यांना पुन्हा आमंत्रित करण्यात आले. त्यावेळी त्यांनी 'राष्ट्रीय उत्थानात साहित्याचे स्थान' या विषयावर प्रा. अनंत काणेकर यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे दोन व्याख्याने दिली. व्यास, वाल्मिकी, कालिदास, भवभूती, ज्ञानेश्वर, रामदास, हे आपले मोठे राष्ट्रीय कवी, राष्ट्रीय उत्थानाचे फार मोठे प्रवर्तक होते, हे अनेक उदाहरणांनी या व्याख्यानात त्यांनी पटवून दिले. राष्ट्राचा आत्मा त्यांच्या साहित्यात व्यक्त झालेला आहे. त्यांच्या साहित्याने राष्ट्राचा आत्मा घडविला आहे, म्हणून ते त्यांच्या काळाचे किंवा आजच्या काळाचेच नव्हे तर अनंत काळाचे राष्ट्रीय कवी होत, हे त्यांच्या या व्याख्यानातील प्रतिपादन अत्यंत महत्त्वाचे होय.

याच सुमारास त्यांनी नागपूर येथील 'विश्व–संत–साहित्य प्रतिष्ठाना'त प्रज्ञाचक्षु संत श्री गुलाबराव महाराज यांच्या काव्यशास्त्रावर तीन व्याख्याने दिली होती. त्यात त्यांनी 'अनध्यस्तविवर्त' या महाराजांच्या सर्वस्वी नवीन संकल्पनेच्या अनुषंगाने काव्यशास्त्राचे विवेचन करून त्यांच्या 'काव्यसूत्रसंहिते'च्या आधारे संताचा भक्तिरस हा काव्यशास्त्राला धरून कसा आहे हे सोदाहरण दाखविले होते.

याच सुमारास, १९६८ साली 'डॉ. कोलते गौरवग्रंथांत डॉ. देशपांडे यांनी लिहिलेला 'जग्राह पाठ्यम् ऋग्वेदात्' हा लेखही साहित्याच्या सदरातच घालायला पाहिजे. 'चार वेदांची जी आपापली वैशिष्टये ती...नाटयवेदात एकत्रित झाली आहेत, एवढेच नव्हे तर वेदाला जी काही चतुर्वर्गाची शिकवण द्यावयाची आहे तीही नाटयामधून अनायासाने मिळू शकते'... 'तेव्हा तो संपूर्ण अर्थ रसचर्वणेत परिवर्तित होतो. रसाभिव्यक्तीच्या एकाच व्यापारातून प्रीति आणि व्युत्पत्ति या दोन्ही गोष्टी साध्य करण्याचे एकमेव साधन नाटच हेच आहे. आणि हेच नाटयाचे वैशिष्टच होय...काव्याचा कान्तासंमितोपदेश तो हाच !' हे या लेखाचे सार होय.

डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांचे नाव भारतीय साहित्यशास्त्राचे विद्वान पंडित म्हणून प्रामुख्याने घेतले जाते हे खरे असले तरी तेवढाच त्यांच्या अभ्यासाचा विषय होता असे नाही. उमरावती येथे असताना त्यांनी विठ्ठल कवीचे रुक्मिणी स्वयंवर सांख्यकारिका, किरातार्जुनीयम् काव्याचे काही सर्ग–हे ग्रंथ संपादन केले होते. श्री. निजसुरे यांच्या

सहकार्याने 'अलंकारप्रदीप'ही प्रसिद्ध केला होता. पण हे सर्व शालेय स्वरूपाचे होते. नागपूर येथे आल्यावर येथील विद्यापीठात प्रथम प्रपाठक व नंतर प्राध्यापक म्हणून ते काम करू लागले. आपले अध्यापनकार्य करीत असतानाच त्यांनी भारतातील अनेक विद्वन्मान्य ग्रंथात व नियत-कालिकात सतत संशोधनपर पांडित्यपूर्ण लेखन केले. वैदिक वाङ्मय, संस्कृत व्याकरण, नाट्य आणि अलंकार, तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र इत्यादि अनेक विषयांवरील त्यांचे हे लेख इंग्रजीत असून 'इंडॉलॉजिकल पेपर्स खंड १' या ग्रंथात ते एकत्रित केलेले आहेत, अथर्व वेदातील शाला सूक्ते, पाणिनीची पद, प्रगृह्य, क्रम–संधि इत्यादि-संबंधीची मते, पाणिनीय व्याकरणातील आर्ष प्रयोग, रीति आणि गुण यांविषयीची वामनाची मते; भारतीय तत्त्वज्ञानातील षड्दर्शने, पूर्व मीमांसा म्हणजे भारतीय विधितत्त्वमीमांसा, प्रायश्चित्त–एक शिक्षा शास्त्र, शैव आणि शाक्त संप्रदाय, 'देवानां प्रियः'चा अर्थ, पाणिनीच्या अनेक सूत्रांचे अर्थ–ही विषयांची नुसती नामावली पाहिली तरी डॉ. देशपांडे यांच्या विविध क्षेत्रातील पांडित्याची कल्पना येईल. वाई येथील प्राज्ञपाठ-शाळेत त्यांनी पूर्वमीमांसेसंबंधी जे विवेचन केले होते तेच त्यांच्या 'पूर्वमीमांसा : भारतीय विधि-तत्त्व मीमांसा' या उपरोक्त इंग्रजी लेखात अंतर्भूत झालेले आहे. 'चोदनालक्षणोऽर्थो धर्मः' या पूर्व-मीमांसेतील धर्मकल्पनेचे स्पष्टीकरण देऊन डॉ. राधाकृष्णन यांनी जैमिनीची पूर्वमीमांसेतील सूत्रे म्हणजे आधुनिक काळातील विधितत्त्व-मीमांसाच होय असे म्हटल्याचे सांगून, के. एल. सरकार यांनी जैमिनी आणि आधुनिक विधितत्त्व-मीमांसक ऑस्टिन यांचे साम्य प्रतिपादन केल्याचेही डॉ. देशपांडे यांनी निदर्शनास आणले आहे.

या संग्रहातील 'देवानां प्रियः' या संज्ञेच्या अर्थासंबंधी विवेचन करणारा त्यांचा निबंध अनेक दृष्टींनी महत्त्वाचा आहे. अशोककालीन शिला-लेखात सन्मानाची पदवी म्हणून वापरण्यात येणाऱ्या या संज्ञेचा, 'देवानां प्रिय इति च (मूर्खे)' या अर्थाने प्रयोग का व कसा होऊ लागला याचे, या संबंधीची सर्व मते उद्धृत करून डॉ. देशपांडे यांनी जे विवेचन केले आहे ते त्यांच्या अनेक विषयातील पांडित्याचा प्रत्यय आणून देणारे आहे. या संग्रहातील त्यांच्या इतर लेखातही याचा प्रत्यय येतो. हे बहुतेक लेख विद्यार्थ्यांसमोर अध्यापन करीत असताना निर्माण झालेल्या प्रश्नांच्या व समस्यांच्या चिंतनातून व त्यासाठी कराव्या लागणाऱ्या अध्यापनातून लिहिले गेले आहेत हे महत्त्वाचे होय. अध्यापनाबरोबरच सतत अध्ययन करीत असणाऱ्या उत्कृष्ट अध्यापकाचा आदर्श म्हणजे डॉ. देशपांडे हे त्यावरून लक्षात येते.

'इंडॉलॉजिकल पेपर्स, व्हॉल्यूम १' हा ग्रंथ १९७१ मध्ये प्रसिद्ध झाला. तोपर्यंत डॉ. देशपांडे यांचे अध्ययन, अध्यापन, चिंतन, भाषण, लेखन–सतत चालू होते. त्यानंतर पुढच्याच वर्षी ते विद्यापीठातून सेवानिवृत्त झाले, पण त्यांच्या व्यासंगात खंड पडला नाही. निरनिराळ्या विषयांवरील त्यांचे लेखन निरंतर चालूच राहिले. दुर्दैवाने या वर्षी त्यांचा एक पाय मोडला. एके दिवशी डॉ. मुंजे यांच्या पुतळ्याजवळ मोदी लाइन समोरील सडकेवर उभे असताना मागून येणाऱ्या सायकल–रिक्षाने त्यांना अकस्मात धडक दिली. ते पडले, आणि त्यातच त्यांच्या पायाचे हाड मोडले. अनेक महिने पाय प्लॅस्टरमध्ये घालून पडून राहावे लागले. त्यावेळी त्यांना होणाऱ्या वेदना मी पाहिल्या आहेत. पुढे पाय बरा झाला तरी चाल-ण्यात कायमचे अपंगत्व आले. अशाही स्थितीत आपल्या अध्ययनासाठी पुस्तके आणण्यास ते विद्यापीठाच्या ग्रंथालयात हातात काठी घेऊन हळूहळू जात असताना त्यांना मी पाहिले आहे. त्यांचे अध्ययन व लेखन चालूच होते. १९७२ ते १९८० या काळात विदर्भ संशोधन मंडळाच्या वार्षिकात त्यांचे संशोधनपर लेख दरवर्षी नियमाने येत. त्यांची यादी येथे देणे अप्रस्तुत होणार नाही. १. व्याकरणातील परिभाषा आणि अर्थनिश्चितिशास्त्र (१९७२); २. 'त्व' या वैदिक सर्वनामासंबंधी काही विचार (१९७३); ३. उपनिषदातील विचारांची पूर्वपरंपरा (१९७४); ४ 'भूवादयो धातवः' या सूत्रावरील काही विचार (१९७५); ५. संस्कृत व्याकरणा-तील संहितेच्या कल्पनेचा विकास : ऐतरेय आरण्यक

ते पाणिनि (१९७६); ६. वेदातील ज्ञान आणि विज्ञान (१९७७); ७. श्रीदुर्गासप्तशतीविषयक एक चिंतन–पूर्वार्ध (१९७८); ८ सहजीवनाचा वैदिक उपदेश (१९७९); आणि ९. अष्टाध्यायी-तील संहिताधिकाराबद्दल थोडेसे. (१९८०). यातील बहुतेक लेख पाणिनी–व्याकरण आणि वेदोपनिषदे यांच्या अध्ययनातून निर्माण होणाऱ्या प्रश्नासंबंधीचे आहेत, हे लक्षात घेतले म्हणजे शरीराने किंचित् अपंगत्व आले असले तरी डॉ. देशपांडे यांचे मन कसे तरतरीत होते याची कल्पना येते. यातील श्रीदुर्गासप्तशतीवरील त्यांचा लेख अपूर्ण आहे. १९६१ मध्ये 'युगवाणी'त 'कलामार्ग' या मथळ्याखाली त्यांनी सुरू केलेली लेखमालाही अपूर्ण राहिलेली आहे.

या काळात धार्मिक विषयाकडे त्यांचे लक्ष विशेष वेधले होते, हे मला अनुभवाने माहीत आहे. एकनाथी भावार्थ रामायण, तुलसीरामायण इत्यादी ग्रंथांचे वाचन ते सतत करीत. जबलपूरचे डॉ. रानडे यांच्या 'तुलसी–मंजिरी' या पुस्तकाला ग. त्र्यं. नी लिहिलेली सुंदर प्रस्तावना ही या अभ्यासातूनच निर्माण झाली. संस्कृत ग्रंथांच्या पार्श्वभूमीवर या ग्रंथांच्या अध्ययनातूनच या सुमारास त्यांनी, माझ्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने प्रसिद्ध झालेल्या 'संशोधनाची क्षितिजे' या ग्रंथासाठी आपला "दैवी वाक्, स्वरूप, सामर्थ्य, प्रयोजन,हा अत्यंत विचारपरिलुप्त लेख लिहिला. वाणीचे प्रमुख प्रकार दोन. एक दैवी वाक् आणि दुसरा मानुषी वाक्. दैवी वाक्च्या ठिकाणी मंत्रसामर्थ्य असून त्यात प्रचोदकता म्हणजे प्रेरक शक्ती असते. मंत्रांच्या ठिकाणी प्रेरकत्व येते ते मंत्रद्रष्टयाच्या तपःसामर्थ्यामुळे. असे तपःसामर्थ्य असणाऱ्या साधुसंतांची वाणी ही दैवी वाक् होय, हे डॉ. देशपांडे यांनी तुकाराम, ज्ञानेश्वर, तुलसीदास इत्यादिकांच्या काव्यातील उदाहरणांच्या द्वारे दाखविले आहे. या सुमारास मला लिहिलेल्या एका पत्रात त्यांनी लिहिले होते : "दैवी वाणीवरील लेख व ही प्रस्तावना यांनी माझ्या मनावर मोठा परिणाम केला. माझे मन विश्वविद्यालयीन विद्वत्तेमधून पूर्ण बाहेर पडले आणि वाचनही अधिक अंतर्मुखी व चिंतनशील बनले, अधिक आध्यात्मिक बनले, असे म्हणा ना."

ओघानेच आले म्हणून सूचना करावीशी वाटते की डॉ. देशपांडे यांचे, विदर्भ संशोधन मंडळ वार्षिके, कोलते गौरवग्रंथ, संशोधनाची क्षितिजे व इतर ग्रंथ यात विखुरलेले हे सर्व लेख संग्रहरूपाने एकत्रित प्रसिद्ध होणे अवश्य आहे. विदर्भ संशोधन मंडळाने हे कार्य हाती घेतल्यास ती त्यांची विनम्र श्रद्धांजली म्हणून शोभून दिसेल.

आपल्या आयुष्याची शेवटची काही वर्षे त्यांनी मुंबई व पुणे येथे असलेल्या आपल्या मुलांकडे राहून काढली. तेथेही रामायण–भागवतावर काही मोजक्या विद्वानांच्या समोर ते व्याख्याने देत असत. त्यांच्या रामायणवाचनाचा परिणाम, त्यांची अत्यंत काळजीपूर्वक निरंतर सेवा करणाऱ्या सौ. वहिनीवर झाल्याशिवाय कसा राहील ? ग. त्र्यं. बरोबर त्याही भावार्थ रामायण नित्यनेमाने वाचीत. इतकेच नाही तर त्याचे सुबोध मराठीत रूपांतर करीत. अशा रीतीने रामकथा त्यांनी अनेक खंडात लिहून ठेवली आहे. ग. त्र्यं. नी आपल्या आचरणाने अप्रत्यक्षपणे घडविलेल्या संस्काराचेच हे फळ नाही काय ? दुर्दैवाची गोष्ट अशी की, पुणे येथे आपल्या मुलाकडे असताना, एके दिवशी पायऱ्या चढताना त्यांचा पाय निसटला व तो पुन्हा मोडला. त्यामुळे ते अंथरुणावर पडल्यासारखेच झाले. ते दुःख पचवून त्यांनी आपले चिंतन चालूच ठेवले. या चिंतनातूनच 'अभिनवगुप्ता' वरील त्यांचा ग्रंथ लिहून झाला. साहित्य अकादमीनेच तो गेल्या जुलैमध्ये प्रसिद्ध केला. हा ग्रंथ मला अजून पाहावयास मिळाला नाही. त्यामुळे त्याविषयी काही लिहिता येत नाही. हा ग्रंथ प्रसिद्ध होऊन तीनचार महिने उलटत नाहीत तोच तापाचे निमित्त होऊन १८ नोव्हेंबर रोजी सकाळी या ज्ञानसूर्याचा अस्त झाला. आणि महाराष्ट्र एका अखिलभारतीय कीर्तीच्या विद्वानाला मुकला.

■

कै. ग. त्र्यं. देशपांडे : एक ज्ञानव्रती

डॉ. मधुकर आष्टीकर

कै. डॉ. ग. त्र्यं. उपाख्य नानासाहेब देशपांडे ह्यांनी भारतीय साहित्यशास्त्राचा यथार्थ परिचय मराठी अभ्यासकांना करून दिला आहे. नाट्यशास्त्रातून काव्यशास्त्राची उत्पत्ती झाली. 'लोकधर्मी' आणि 'नाट्य-धर्मी' ह्या संज्ञांचे यथोचित स्वरूप आणि त्यांचा नाट्यशास्त्र व काव्य शास्त्र ह्यांच्याशी असणारा अच्छेद्य संबंध त्यांनी स्पष्ट केला. रस व भाव ह्यांचे स्वरूप, त्यांच्या उत्पत्तीची प्रक्रिया आणि रसाचा रसिकसापेक्ष अनुबंध सोदाहरण व स्वच्छपणे मांडला. संस्कृत साहित्यशास्त्र सहजगत्या समजण्यासाठी नानासाहेबांचा 'भारतीय साहित्यशास्त्र' हा ग्रंथ अत्यंत मोलाचा ठरतो.

संस्कृत पंडितात देखील नानासाहेबांचा हा ग्रंथ प्रकाशित होईपर्यंत एक फार मोठा गैरसमज होता की संस्कृत साहित्यशास्त्रात 'काव्याचा आत्मा काय ?' ह्याबद्दल विविध मते आहेत आणि त्या मतानुसार साहित्यशास्त्रकारांचे विविध गट आहेत. अलंकारवादी, रीतीवादी, ध्वनीवादी, वक्रोक्तीवादी, रसवादी असे ठप्पे साहित्यशास्त्रकारांवर मारले जात. नानासाहेबांनी हे वाद बाद केले. भामहापासून जगन्नाथ पंडितांपर्यंत सर्वच केवळ रसाला काव्याचा आत्मा मानणारे होते. संपूर्ण संस्कृत काव्यशास्त्रात एक ऐतिहासिक क्रम असून सर्वांच्या विवेचनात एकसूत्रीपणे पण प्रगतीपर आलेख आढळतो हे त्यांनी सप्रमाण दाखवून दिले.

अभिनवगुप्ताची अभिनवभारती आणि लोचन ह्या टीकांचे, काव्यशास्त्रातील अनन्यसाधारण महत्व व रसविवेचनातील त्यांचे अग्रगण्य स्थान प्रथम दाखविले ते नानासाहेबांनीच.

चारही वेदांच्या वैशिष्ट्यातून नाट्यसंकल्पना आणि व्युत्पत्ती व आनंद देण्याचे एक नवे नाट्यसंज्ञक कलातत्व कसे उदयाला आले हे नानासाहेबांनी डॉ. कोलते गौरव ग्रंथातील आपल्या प्रदीर्घ संशोधर लेखात अत्यंत चातुर्याने आणि सखोल अभ्यासाने नव्यानेच प्रतिपादित केले आहे. स्वरप्रक्रियेवर अवलंबून असलेला ऋग्वेद आणि नाटकातील 'पाठ्य' कसे समान आहेत, चतुर्वेदातील अध्वर्यूंचा अभिनय आणि नाटकातील चार प्रकारचा अभिनय यात कसे साम्य आहे, सामवेदातून गान कसे नाटकात शिरले आणि अथर्ववेदाने सात्विक भावातून रसांचा परिपोष करण्याचे तत्व कसे नाट्याला अर्पण केले, हे वाचले की नानासाहेबांच्या रसिकतेची आणि तर्कशुद्ध विचारशैलीची उत्तम खात्री पटते.

नानासाहेब उत्तम शिक्षक होते. शिक्षकाची त्यांची भूमिका वेदकालीन शिक्षणशास्त्रावर आधारलेली होती. ते आपल्या शिष्याला, स्वाध्याय करायला लावीत, मग प्रवचनाद्वारा ते पक्के करवून घेत. पोपटपंची त्यांना चालेना. शिक्षक म्हणजे केवळ वाटाड्या असे ते मानीत, वाट दाखवायची, पुस्तकं सांगायची, अडले तर अध्ययनातील उणीव दाखवायची पण स्वतःचे मत लादायचे नाही. माझ्या 'पी. एच्.डी'च्या पदवीसाठी ते माझे 'गाईड' होते. त्यावेळी हा अनुभव मी घेतला.

माझें संशोधन नवे आहे; ते परंपरेला धक्का देणारे आहे हे मान्य असले तरी त्यातील तर्कशुद्धता आणि प्रामाण्य मी जोवर मूळ आधार देऊन त्यांना पटवून देऊ शकलो नव्हतो तोवर त्यांनी माझा प्रबंध मला सादर करू दिला नाही. पण त्यांच्या ह्या पद्धतीमुळेच माझ्या प्रबंधाची भरपूर स्तुती आणि 'एक क्रान्तीवादी विचार' म्हणून संस्कृत साहित्यशास्त्रात त्याचे मोल मानले गेले.

नानासाहेब कायद्याचेही पंडित होते. ते अमरावतीला कायदाही शिकवीत. 'मीमांसा' ह्या अर्थ लावण्याच्या शास्त्रात ते पारंगत होते. 'Law of Interpretation' असा मीमांसेचा उपयोग नानासाहेब करीत. आजच्या कायदा शास्त्रातील 'Jurisprudence' आणि 'मीमांसा-शास्त्र' ह्यांचा तौलनिक अभ्यास करून मीमांसेचे उजवेपण दाखविणाऱ्या नानासाहेबांच्या कुशाग्र आणि तल्लख बुद्धिमत्तेमुळे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी देखील सानंद चकित झाले होते. वाईला त्यांनी दिलेली व्याख्याने ह्या दृष्टीने मोलाची ठरली.

आजकाल अज्ञानाचाही अनेकांना मद चढतो. मग ज्ञानाबद्दल काय बोलावे! पण नाना-साहेबांच्या ठिकाणी प्रचंड ज्ञान सामावलेले असूनही ते अत्यंत विनम्र होते, अनाग्रही होते. एखाद्या लहान बालकाप्रमाणे त्यांचा निरागसपणा मोहून टाकणारा होता. परिस्थितीशी सतत झगडण्यात उमेदीचा काळ गेला. त्यापायी त्याचे शरीर थोडे कमजोर असले तरी मनोबल आणि आत्मशक्ती दांडगी होती.

ते भारतीय साहित्याचे उपासक होते तसेच भारतीय संस्कृतीचेही आचारक होते. ब्रह्मचर्या-श्रमात विद्याध्ययन त्यांनी केले. गृहस्थाश्रम नीट सांभाळला. सानन्द घर, बुद्धिमान मुले, मृदुभाषिणी सुस्मितवदना पत्नी, सतत शिवपूजन, निरंतर आतिथ्य–ह्यालाच "धन्यो गृहस्थाश्रमः।" असे म्हटले आहे. ती धन्यता नानासाहेबांनी मिळविली होती. आणि अखेरीस त्यांनी वानप्रस्थाश्रम स्वीकारला होता. पदे वा मानसन्मान ह्यांच्या मागे ते लागले नाहीत. चालून आले ते त्यांनी सहजतेने स्वीकारले एवढेच. गेल्या आठ दहा वर्षात ते कधी समाजात फिरकलेच नाहीत.

संस्कृत साहित्यशास्त्र हे एक सौंदर्यशास्त्रही कसे आहे हे दाखविणारे सूत्र मांडताना शब्दार्थाची औचित्यपूर्ण ऐट आणि ध्वनिगर्भतेने प्राप्त होणारे लावण्य कसे रसस्रोत देखणे पण देते–हे सांगणारे नानासाहेब जीवनातले सौंदर्य जाणून जगले, जीवन सुंदर आहे हे शिष्यांना पटवून गेले.

नानासाहेबांनी कुणाचा द्वेष केला नाही. लोकांनीही त्यांचे कधी उणे पाहिले नाही. आनंद, असूया उद्वेग त्यांना कधी शिवला नाही. गीतेत भगवंत म्हणतात की–

> यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नो द्विजते च यः।
> हर्षामर्षभयोद्वेगै मुक्तो यः सच मे प्रियः॥

असा अजातशत्रू मला आवडतो. नानासाहेब तसे होते. म्हणूनच देवाला ते प्रिय झाले. ■

अंबाझरी ले. आऊट, नागपूर

(कविभूषण) बलवंत गणेश तथा अण्णासाहेब खापर्डे : एक नोंद

खापर्डे, (कविभूषण) बलवंत गणेश तथा अण्णासाहेब – [जन्म–६ नोव्हेंबर १८९०, एलिचपूर (विदर्भ)–मृत्यु–२५ जून १९७७, अमरावती] अमरावतीचे खापर्डे घराणे प्रसिद्ध असून लोकमान्य टिळकांचे समकालीन, विदर्भातील त्यांचे राजकारण सांभाळणारे मित्र दादासाहेब खापर्डे ह्यांचे अण्णासाहेब चिरंजीव होत. घटखर्पर नामक संस्कृत कवीच्या वंशातील म्हणून त्यांचे खापर्डे आडनाव पडले असे म्हटले जाते.

ह्यांनी हायस्कूलच्या शिक्षणानंतर वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेतला होता. पण प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे हे शिक्षण त्यांना मध्येच सोडावे लागले. मात्र वाचनाद्वारे त्यांचा चौफेर अभ्यास व व्यासंग चालूच होता. साहित्याबरोबरच तत्वज्ञान व थिऑसफी ह्या विषयांचाही त्यांनी चांगला परिचय करून घेतला. खापर्डे ह्यांची ही ज्ञानलालसा पाहून पं. मालवीय ह्यांनी त्यांना बनारस हिंदू विद्यापीठात मराठीचे प्रमुख प्राध्यापक नेमले. व्यवसाय–अध्यापन हे काम ह्यांनी १९२९ ते १९५१ पर्यंत फार यशस्वीपणे केले. विदर्भ साहित्य संघाच्या संस्थापकांपैकी हे एक होते. १९६१ सालच्या विदर्भ साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मानही त्यांना मिळाला होता.

खापर्डे ह्यांची मूळ लेखनप्रकृती कवीची त्यामुळे त्यांनी काव्यरचना बरीच केली, अनुवाद-चरित्रात काही गद्यलेखनही त्यांनी केले आहे. काव्याशिवाय नाट्य व अभिनय हाही त्यांचा एक आवडीचा विषय होता. ह्यांना काव्य लेखनाची प्रेरणा अध्यात्मापासून मिळाली असून अनंताशी तादात्म्य पावण्याची दुर्दम्य इच्छा ह्यांच्या बहुतेक काव्यात प्रगट झाली आहे. "काव्यकांतार" (खंडकाव्य व इतर स्फुट कविता, १९१८), "सर्वस्वाची गद्य गाणी" भाग १, २ (गद्यकविता, १९२५), "काव्यकांतारातील फुले" (१९२५); "विदर्भगीत" (१९३०), "अनंताची हांक" (१९५२) इ. त्यांची कवितेची पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. शीघ्र कवित्व व प्रगल्भता हे त्यांच्या काव्यलेखनाचे विशेष गुण आहेत. त्यांचे हे काव्य प्रतिभेचे स्वयंभूषण लक्षात आल्यामुळे जगद्गुरू शंकराचार्य ह्यांनी त्यांना "कविभूषण" ही बहुमानाची पदवी दिली.

पुणे विद्यापीठातील केळकर व्याख्यान मालेसाठी "साहित्याचा संसार" हा विषय त्यांनी निवडला होता. त्यांत साहित्याच्या उद्देशापासून नववाङ्मयीन प्रवृत्तीपर्यंतच्या अनेक साहित्यविषयक प्रश्नांची चर्चा केली आहे. ही व्याख्याने पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाली आहेत (१९६२). ह्याखेरीज "मौल्यवान वस्तूंचा मोडका बाजार" (कथा), "योगी अरविंद व अंतर्ज्ञान", "भगवद्गीतेचे अंतरंग" (अॅनी बेझंटच्या पुस्तकाचा अनुवाद) अशीही काही साहित्यनिर्मिती त्यांनी केली आहे.

■

–प्रा. कृ. सावळापूरकर

संदर्भ :

[चरित्र, चर्चा, अभ्यास : १. केचे, मधुकर, कविभूषण अण्णासाहेब खापर्डे, मनोहर, सप्टेंबर १९६२]

कविभूषण खापर्डे :

उषासूक्ते आळवणाऱ्यांच्या कूजनातील एक स्वर

: राम शेवाळकर

अण्णासाहेबांना मी विद्यार्थी दशेतच पाहिले. ते त्या वेळी काशीच्या हिंदू विद्यापीठात मराठीचे प्राध्यापक होते. तो पर्यंत खापर्डे घराण्याबद्दल व खापर्डेबंधूंबद्दल बरेच ऐकून होतो. "वऱ्हाडचे नबाव" श्रीमंत दादासाहेब खापर्डे हे लोकमान्यांचे सहकारी होते. त्यांचे ज्येष्ठ पुत्र बाबासाहेब खापर्डे हे त्या वेळी हिंदू महासभेचे पुढारी होते. एकेकाळी ते वऱ्हाड मध्यप्रांतात मंत्रीही होते. अण्णासाहेब हे "कविभूषण" म्हणूनच ओळखले जात. पंडित मदन मोहन मालवीय यांनी त्यांना मुद्दाम हिंदू विद्यापीठाच्या स्थापनेपासूनच मराठीचे अध्यापन करण्यासाठी नेल्याचे अभिमानाने व कौतुकाने सांगितले जात असे. जुन्या पिढीचे थोर कवी म्हणूनही त्यांचे त्या वेळी नाव होते. राजकमल चौकातील खापर्डे यांचा भव्य वाडा, व त्याच्या तिसऱ्या मजल्यावरील गच्चीवर फडफडणारा भगवा झेंडा हे त्यावेळी अमरावतीतील वैशिष्टय-पूर्ण दृश्य होते. खापर्डे घराणे अचलपूरचे, म्हणूनही त्यांच्याबद्दल मनामध्ये सुप्त आपुलकी होती. पुढे शेवाळकर व खापर्डे घराण्याचे तीन पिढ्यांचे ऋणानुबंध कळले, तेव्हा ही सादर आपुलकी अभिमानाच्या विणीने अधिक दृढ झाली. तो पर्यंत फक्त बाबासाहेबांनाच पाहिले होते. अचलपूरच्या राम मठात त्यांचे भाषण ऐकले होते. अण्णासाहेबांना कुठल्यातरी लग्नात पहि-त्यांदा पाहिले. गोरापान वर्ण, सरळ धारदार नाक, निर्धार व्यक्त करणाऱ्या भुवया, इतिहासाशी अनुबंध राखणाऱ्या झुपकेदार मिश्या, आणि तीक्ष्ण नजर असे त्यांचे व्यक्तिमत्व पाहताक्षणीच मनावर ठसले. डोक्यावर काळ्या रंगाची उंच टोपी, अंगात शेरवानीवजा बंद गळ्याचा लांब कोट, व गळ्याभोवती जरीचे उपरणे, असा त्यांचा वेष होता. त्यांचे चालणे–बोलणेही त्यावेळी खानदानी व रुबाबदार वाटले. त्यांचा वेष, भुवया, नजर व मिश्या यामुळे त्यांच्याबद्दल वचकही निर्माण झाला. सहजासहजी जवळ जाण्याचे धैर्य होऊ नये, असाच त्यांच्या अस्तित्वाचा एक अबोल दरारा होता.

पुढे अण्णासाहेबांची भाषणे ऐकली. बाबा-साहेबांचे तेजस्वी व वक्रोक्तीप्रधान वक्तृत्व त्यांच्याजवळ नव्हते. पण त्यांच्या वाणीला एक मधुर व सुरेल अशी लय होती. मुळात त्यांचा आवाज या सर्व बहिरंगाशी विसंवादी वाटण्या-इतका मऊ व मुलायम होता. अलिकडे रविंद्रनाथ टागोरांच्या काव्यगायनांची एक ध्वनिफीत ऐका-यला मिळाली. त्यावेळी मला अण्णासाहेबांची आठ-वण झाली. तसेच मुलायम माधुर्य, बाबासाहेबांनी आपल्या पहिल्या व्याख्यानातच मला जिंकले. कडव्या राष्ट्रीय वृत्तीचा पुरस्कार करणारे बाबासाहेब उमरखय्यामच्या काव्याचेसुद्धा अतिशय रसाळ विवेचन करीत असत. अण्णासाहेबांचे वक्तृत्व तसे मला प्रभावित करू शकले नाही. पुढे खापर्डे कुटुंबाचा घरोबा वाढला. भेटीही वेगवेगळ्या निमित्याने वरचेवर होऊ लागल्या. त्यावेळी त्या सर्वांचे अगत्य, वात्सल्य, गाढ स्निग्धता, वागण्यातील कुलीन व अभिजात सुसंस्कृतता, चतुरस्र व्यासंग, व विदग्धता यांचा जवळून परिचय झाला. पुढे यवतमाळला प्राध्यापक असताना मी अण्णासाहेबांचे गूढवादी काव्यांवर आमच्या विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान ठेवले. विषय आवडीचा असल्यामुळे ते व्याख्यान अप्रतिम रंगले. त्या वेळी त्यांच्या व्यक्तित्वातील व्युत्पन्नता, नाट्य व वक्तृत्व या तिन्ही गुणांचा प्रत्यय आला. विषय दुर्बोध असूनही अण्णासाहेबांनी वाढावू वयातीत विद्यार्थ्यांनाही व्याख्यानात तल्लीन

करून सोडले होते. मूकनाट्य या कलाप्रकारातील अण्णासाहेबांचा अधिकारही त्यावेळी सर्वमान्य होता. केवळ निःशब्द मुद्राभिनयाने ते नवरसांचा अविर्भाव अत्यंत प्रभावीपणे साक्षात करीत असत. नाट्यकला तशी खापर्डे कुळात होतीच. नाट्य व्यावसायिकांच्या संघटनेचा जन्मही खापर्डे-वाड्यांच्या पुढाकारानेच शक्य झाला. स्वतः दादासाहेब खापर्डे हे मराठी रंगभूमीचे व बाल गंधर्वा सारख्या कलावंताचे एक मातब्बर आश्रयदाते होते.

'कविभूषण' ही पदवी अण्णासाहेबांना तशी शंकराचार्यांकडून मिळालेली; 'काव्यकांतार' व 'सर्वस्वाची गद्यगाणी' हे त्यांचे काव्यसंग्रह त्यावेळी कविमंडळात दबदबा वाळगून होते. अण्णासाहेबांची कविता ही खापर्डे वाड्याप्रमाणेच कुलीन, अभिजात असे जुने वळण सांभाळणारी होती. तिचे गोत्र हे साक्षात्कारी संतांचे होते. व्यक्ताच्या व ज्ञाताच्याही क्षितीजापलिकडे सूत्र चालन करणाऱ्या अव्यक्ताच्या अगाध व अबोध लीलांनी तिला आकर्षून घेतले होते.

मानवी व्यवहार, परस्पर संबंध, त्या मागील मनोविश्व, त्यातील अनाकलनीय गुंतागुंत, हे विषय तसे प्रतिभावंतांच्या अखंड कुतूहलाचे याचा एकएक पदर उलगडला तरी आयुष्यभराच्या साधनेचे सार्थक व्हावे. नैष्ठिक कलावंतांनाही पहिला "सा" अचूक लागण्यासाठी जिवाचा किती आटापिटा करावा लागतो. त्यात उमेदीची अनेक वर्षे निघून जातात. तर सप्त स्वरांच्या सिद्धीची यात्रा किती दिवस चालणार ? त्याच्या मुळाशी असणाऱ्या नादाच्या मूळस्पंदाचा शोध घेण्याची तहान किती जणांना लागणार ? सुरांच्या पल्लेदार तारेवरून सरसरत ते उत्तुंग आकाशात जाणार, त्याही पेक्षा वेगाने खाली घेऊन षड्जाच्या आरंभविंदूपाशी थवकणार. त्याच्याही पुढे ध्वनीचा मुलकंद आहे. त्यातूनच नादाचा प्रकाशमय पिसारा सृष्टीमध्ये विस्तारत जातो.

आकर्षण पिसाऱ्याचे की मयूराचे ? की फुलवण्याची व आवरण्याची क्षमता राखणाऱ्या मयूराचे बेभान नृत्य ज्याच्या सादाने व दर्शनाने उत्स्फुर्त होते, त्याचे ? की मोह घालणाऱ्या सौंदर्याला प्रेरक ठरणाऱ्या आद्य सौंदर्याचे ? ही आद्यता ठरवावयाची कशी ? तिचा निश्चित उगम कुठे ? तिचा शोध घेणाऱ्या मानवी बुद्धीची पोच कुठपर्यंत ? अतींद्रियाची उपलब्धी इंद्रिय-निष्ठांना कशी होणार ? जे पाहता पाहता कोमेजून जाते, विटून जाते, वाळून जाते, गळून पडते, नष्ट होते, ते मिठीत घेण्यासाठीही प्राणांतिक आटापिटा करावा लागतो. तेव्हा कुठे ते मिठीत आल्यासारखे वाटते. पण असे वाटते न वाटते, तोच ते मिठीतून निसटूनही जाते. पुढे मिठीही सैल नि निःस्त्राण होते. त्यापेक्षा सृजन; विकास व विनाश या खेळामध्ये गढलेल्या अनंताला शोधण्याचे, प्राप्त करून घेण्याचे प्रयत्न का करू नयेत ? हे कधी दिसणार नाही, कधीच हाती लागणार नाही, याची मनोमन खूणगाठ बांधूनच त्याच्या शोधयात्रेसाठी प्रस्थान ठेवावे लागते. या यात्रेचे साफल्य प्राप्तीत नसते. प्रयत्नांतच असते. जन्मोजन्म असे प्रयत्न करावे लागतात तेव्हा कुठे एखादा प्राप्तीचा तेजोमय क्षण प्रगट होतो. त्याच्या एका उन्मेषानेही नाशिवंताचा अविनाश होतो. भंगुराचा भगवंत होतो. हा हव्यास हजारातून एखाद्यालाच. ज्ञाताच्या कुंपणावरून धीरत्व धरून उड्डाण करणारा सनदी 'मनुष्याणां सहस्रेषु' एखादाच, पण तो एखादाच नश्वरांच्या विश्वाचे अखंड स्फुरणदायी प्रकाशकेंद्र होतो. युगायुगातून ज्ञानेश्वर एकदाच होणार. त्यानंतरच्या अनंत पिढ्या ज्ञानेश्वरीच्या रसिकांची व वाचकांची पैदास वाढवणार. अशा एखाद्या ज्ञानेश्वराच्या उदयासाठी उषासूक्ते आळवण्याऱ्यांच्या कूजनात एक स्वर कविभूषणांचा होता !

अण्णासाहेब विदर्भ साहित्य संघाचे संस्थापक होते. आपल्या विदर्भाच्या प्राचीनतेची अभिमानास्पद परंपरेची, पृथगात्मकतेची, व अस्मितेची ओळख जपण्यासाठी विदर्भ साहित्य संघासारखे वेगळे संघटित व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या या थोर सारस्वतकाराचे त्याच्या जन्मशताब्दीनिमित्त हे पुण्यस्मरण. ■

ज्ञानदेवांचा कालखंड : काही नवी समीकरणे

सु. वा. कुळकर्णी

"पारंपारिक श्रद्धांना तडा जाईल या भीतीने संशोधक पुढे सरसावत नाहीत, परिणामतः संतसाहित्याच्या क्षेत्रात सत्यान्वेषकांपेक्षा सोम्यागोम्यांचीच वर्दळ वाढलेली आहे." असे सोबतच्या प्रस्तुत लेखकाचे मत असून असे खरोखरच असल्यास अथवा झाल्यास संतसाहित्याच्या क्षेत्रातील अध्ययन-संशोधनाकडे बघण्याचा दृष्टिकोन हा सत्यान्वेषक, अभ्यासक अथवा संशोधकापेक्षा भक्तिभावाचाच तेवढा उरेल. असे होऊ नये. अभ्यासक-संशोधकांना त्यांची मते चुकीची वाटली तरीही ती निर्भीडपणे सप्रमाण व्यक्त करण्याचे आश्वासन देऊन ती ज्यांना सप्रमाण खोडून काढावयाची असतील त्यांनाही ती संधी प्रदान करणाऱ्या मानसिकतेचा समाज हा लोकशाही तत्त्वविचाराचा पाया आहे.

डॉ. सु. बा. कुलकर्णी यांचा सोबतचा लेख ज्ञानेश्वरीच्या सप्तशताब्दी-समयी काही वेगळी प्रमेये मांडू इच्छित असून त्याकडे उपरोक्त दृष्टीनेच बघितले जाणे आवश्यक आहे.

या लेखावरील अभ्यासपूर्ण प्रतिक्रिया देखील आमंत्रित आहेत. त्यांनाही यथावकाश उचित प्रसिद्धी दिली जाईल.

'नवभारत' मासिकाच्या एप्रिल, १९८९ च्या अंकातील 'ज्ञानदेवांच्या आयुष्याचे कोडे' या निबंधात मी ज्ञानदेवांच्या कालखंडाचा नव्याने विचार होणे आवश्यक आहे असा विचार मांडला होता. तेच सूत्र हाती धरून काही नवी समीकरणे प्रस्तुत निबंधात सादर केली आहेत.

ज्ञानदेव कालखंडाच्या संदर्भात मुख्य अडचण ज्ञानेश्वरीचे लेखनवर्ष ही होय. शके १२१२ मध्ये ज्ञानेश्वरीचे लेखन पूर्ण झाले, ही घटना स्वयंसिद्ध प्रमेय मानून या वर्षाभोवती ज्ञानदेवांच्या कालखंडाची उभारणी करणे अनेक कारणांनी अतार्किक व अडचणीचे ठरते हे संशोधकांना कळून चुकले आहे. या गृहीतकामुळे ज्ञानदेव आणि समकालीन संतमहंतांच्या आयुष्यातील अनेक घटनांचे पौर्वापर्य न समजल्याने कूट प्रश्न होऊन राहतात.

वि. का. राजवाडे यांनी संपादिलेल्या ज्ञानेश्वरीत आणि ज्ञानेश्वरीच्या अन्य काही हस्तलिखितांतून शके १२१२ हा कालनिर्देश करणारी ओवी आढळून येते.

'शके बारा शतें बारोत्तरें ।
तैं टीका केली ज्ञानेश्वरें ।
सच्चिदानंद बाबा आदरें ।
लेखक जाला ॥'

प्रस्तुत ओवी ज्ञानेश्वरीच्या ग्रंथसंहितेचा भाग नाही. राजवाडे यांना प्राप्त झालेल्या हस्तलिखितात ग्रंथसमाप्तीनंतर अंतर्भूत केलेल्या भिन्न हस्ताक्षरांतील तीन समाप्तिलेखांपैकी एक आहे. प्राचीन हस्तलिखितांत ग्रंथांची प्रतिलिपी बनविणाऱ्यास 'लेखक' अशी संज्ञा होती. सामान्यतः ग्रंथलेखनाचा काळ ग्रंथपाठात अंतर्भूत केलेला असतो. प्रतिलिपीचा काळ ग्रंथसीमेनंतर तसा स्वतंत्र निर्देश करून लिहिला जातो. ज्ञानेश्वरीच्या काही पोथ्यांत ही ओवी आढळत नाही. डॉ. म. रा. जोशी आपल्या 'श्री ज्ञानदेव चरित्र संशोधन' या ग्रंथात सांगतात (पृ. ६९); की आपल्या संग्रहा-

तील ज्ञानेश्वरीच्या एका पोथीत शके १२१२ चा निर्देश असलेली परंतु सच्चिदानंदबावांचा उल्लेख नसलेली ओवी आहे. ज्ञानदेवांच्या अन्य ग्रंथांतही ग्रंथसमाप्तीचा काल नमूद केलेला नाही. सच्चिदानंदबावांच्या प्रस्तुत ओवीत संवत्सर, मास, तिथी, नक्षत्र, वार हा प्राय: अंतर्भूत होणारा तपशीलही नाही. ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी सांगितली व सच्चिदानंदबावांनी ती लिहून घेतली अशी वस्तुस्थिती असती तर या ओवीचा अंतर्भाव ग्रंथसंहितेत झाला असता व तिच्यामध्ये ग्रंथसमाप्तिकालाचा सर्व तपशील नोंदला गेला असता.

तात्पर्य, ज्ञानेश्वरी केव्हा लिहिली गेली याचा अस्सल पुरावा अजून उपलब्ध झालेला नाही. शके १२१२ मध्ये ज्ञानेश्वरीची निर्मिती झाली, हे एक चुकीचे गृहीतक होय. शके १२१२ हा ज्ञानेश्वरीचा रचनाकाल नसून प्रतिलेखनकाल आहे हे सत्य स्वीकारून ज्ञानदेव कालखंडाच्या मंडनासाठी अन्य एखादे आधार वर्ष धुंडणे म्हणूनच अपरिहार्य आहे.

ज्ञानदेव ऐंशीं वर्षांचे होते

अर्धशतकापूर्वी, संतसाहित्याचे गाढे अभ्यासक' महाराष्ट्र–भाषा–भूषण वै. ज. र. आजगांवकर यांनी आपल्या 'संतशिरोमणि श्रीनामदेव आणि त्यांचे समकालीन संत' या ग्रंथात (पृ. १३१–३२) म्हटले होते,

'मला असें वाटतें कीं, ज्ञानदेव आणि नामदेव हे जरी समकालीन होते, तरी त्यांच्या जन्ममृत्यु-कालाचे जे शक हल्ली प्रसिद्ध आहेत ते खरे नसावेत...ज्ञानेश्वरीरचनाकाली ज्ञानदेव हे चांगले प्रौढ असले पाहिजेत...माझ्या मतें, या कोड्याचा उलगडा करण्यास एकच मार्ग आहे व तो कोणता म्हणाल तर या सत्पुरुषांचे जे जन्मशक हल्ली प्रसिद्ध आहेत ते आणखी काही वर्षे मागे ढकलणे हा होय.'

वै. आजगांवकरांप्रमाणे अन्य अनेक अभ्यासकांनीही अशाच स्वरूपाचे विचार मांडले होते; परंतु नवीन प्रमाणें प्राप्त होत नव्हती व ही कोंडी काही फुटत नव्हती.

काही वर्षांपूर्वी, प्राचीन मराठी साहित्य आणि संस्कृतीचे थोर संशोधक, डॉ. रा. चिं. ढेरे यांना विसोबा खेचराचा 'शडूस्थळी' (षट्स्थल) हा ग्रंथ प्राप्त झाला. या ग्रंथाच्या निमित्ताने ढेरे यांनी आपल्या 'चक्रपाणि' (१९७७) या प्रबंधात ज्ञानदेव कालखंडाचे पुनरावलोकन केले, अनेक समस्या मांडल्या व समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या लेखनावर खूप चर्चा झाली. प्रल्हानंद देशपांडे यांनी 'चक्रपाणि–चिंतन' (: १९७९) या आपल्या ग्रंथात ढेरे यांच्या संशोधनाची परखड विचिकित्सा केली. परंतु ज्ञानदेव कालखंडाची कोंडी सुटण्याऐवजी त्यांची संख्या मात्र वाढली.

ज्ञानदेवांचे प्रश्न सोडविण्याची आणखीही एक तऱ्हा आहे. तिच्यामध्ये ज्ञानदेव एक की दोन इतक्यावरच न थांबता, ज्ञानदेव हे ऐतिहासिक व्यक्तिमत्व नसून ती एक कपोलकल्पित व्यक्ती आहे; विठ्ठलपंतांच्या मानसिक उत्क्रांतीची ती एक अवस्था आहे, असे प्रस्ताव मांडण्यापर्यंत संशोधकांची मजल गेली आहे.

ज्ञानदेव कालखंडाचे प्रश्न न सुटण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे ज्ञानेश्वरीच्या लेखन कालासंबंधीचे चुकीचे गृहीतक हे होय. दुसरे एक तितकेच चुकीचे गृहीतक म्हणजे ज्ञानदेवांची आयुर्मर्यादा बावीस वर्षांची होती हे होय. ज्या 'बाळछंद' अभंगावरून ज्ञानदेवांनी वयाच्या बावीसाव्या वर्षी संजीवन समाधी घेतली असे आजवर समजले जाते त्या अभंगाचे अर्थलापन दिशाभूल करणारे असून त्याचे पुनरीक्षण करणे आवश्यक आहे. मी माझ्या उपरिनिर्दिष्ट निबंधात या अभंगातील शेवटच्या चौकाकडे संशोधकांचे लक्ष वेधले होते.

बाळछंदो बावीस जन्में ।
तोडिली भवाब्धीचीं कर्में ।
चंद्रार्क तारांगणें ।
रश्मीं दान घेतला हरी ॥१२॥

(आवटे गाथा अभंग क्र. ७५४, गोंधळेकर गाथा अभंग क्र. ४२६)

अभंगातील या पंक्तींमधून ज्ञानदेवांनी बावीसाव्या वर्षी समाधी घेतली असा अर्थ बिलकूल निघत नाही. ज्ञानेदवांच्या संजीवन समाधीचे शेवटचे क्षण टिपणाऱ्या या अभंगाचे ९ ते १२ हे चार चौक उपस्थितांपैकी कोणीतरी मागाहून

जोडलेले दिसतात. (कदाचित् समाधिसमयी उपस्थित असलेल्या संतमंडळींसमोर पहिले कीर्तन करणाऱ्या कान्हो पाठकांचे हे सत्कृत्य असावे. ज्ञानदेवांनी आपली सर्व चीज वस्तू यास बहाल केली होती.) बाराव्या चौकात ज्ञानदेवांचा जन्म-शक, (अकरार्शे) 'बावीस' हा अंकात सांगितलेला असून समाधिशक, 'चंद्रार्क' (दोन), 'तारांगण' (शून्य); 'रश्मी' (बारा) या सांकेतिक शब्दांनी निर्दिष्ट केला आहे. 'अंकाना वामतो गतिः' या पद्धतीने त्यांची गणना १२०२ अशी येते. 'रश्मीं' हा शब्द सप्तम्यन्त असून तो 'रश्मिराज'चा पर्याय म्हणून आलेला दिसतो. ज्ञानदेवांच्या काळात सांकेतिक शब्दांनी वर्ष निर्दिष्ट करण्याची पद्धती सर्रास वापरली जाई. त्याचप्रमाणे शतकाचा निर्देश न करता फक्त चालू वर्ष सांगण्याची प्रथाही होती. उदा. 'इतुकी-यानंतर तुरकान जालें तै सकु १६ मन्मथ संवत्सरे' (भा. इ. सं. मं, इतिवृत्त. शके १८३४. पृ. १३५). 'बाळछंद' अभंगांतील कालनिर्देशा-नुसार ज्ञानदेवांची आयुमर्यादा, शके ११२२ पासून शके १२०२ पर्यंत, म्हणजे ८० वर्षांची होती, हे महत्त्वाचे सत्य हाती लागते.

ज्ञानदेवांच्या जन्ममृत्यूचे खरे शक प्राप्त झाल्याने त्यांच्या जीवन चरित्रातील अनेक भ्रामक समजुतींना फाटा मिळतो. त्यांचे अफाट कर्तृत्व बावीस वर्षांच्या सीमित कालमर्यादेत कोंबण्याचा उद्योग बंद पडतो. अन्य समकालीन संतांच्या जीवन आणि कार्याशी असलेले त्यांचे अनुबंध स्पष्टपणे जुळून येतात. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव-पासष्टी या ग्रंथांतील तात्त्विक विचारांची प्रगल्भता, आठनऊशे अभंगांतील भक्तिभावपूर्ण भगवच्चिंतन, सूक्ष्म सामाजिक निरीक्षण, भाषेचा सुरम्य विलास ज्ञानदेवांसारख्या ज्ञानी आणि प्रतिभासंपन्न व्यक्तीच्या प्रौढ वयालाच शोभून दिसतो.

ज्ञानेश्वरीचा लेखनशक

ज्ञानदेवांचा निर्वाणशक १२०२ असल्याने ज्ञानेश्वरीचे लेखन शके १२१२ मध्ये झाले ही समजूत सोडून द्यावी लागते. ज्ञानेश्वरीची मूळ प्रत किंवा तिची सत्यप्रतिलिपी आजवर उपलब्ध न झाल्याने तिचा निश्चित लेखनशक ठरविणे कठीण झाले आहे. सुदैवाने, ज्ञानेश्वरीच्या समाप्तिलेखात ज्ञानदेवांनी समकालीन नृपती श्रीरामचंद्र यादव यांचा आदरपूर्वक उल्लेख केलेला आहे.

'तेथ इंदुवंशविलासु ।
जो सकळकळा निवासु ।
न्यायातें पोखीत क्षितीशु ।
श्रीरामचंद्रु ॥'

(राजवाडे ज्ञानेश्वरी १८.१७८३)

रामदेवराव हा आपला चुलत भाऊ आमणदेव यास कपटाने ठार करून शके ११९३ मध्ये देवगिरीच्या गादीवर बसला. शके १२१६ मध्ये अल्लाउद्दिनाने देवगिरीवर स्वारी करून रामदेवरावास आपला मांडलिक बनविले. रामदेवरावाचे शके १२३४ मध्ये निधन झाले. यावरून असे दिसते की ज्ञानदेवांच्या निर्वाणानंतर रामदेवराव बरीच वर्षे हयात होता. रामदेवरा-वाचे राज्यारोहण आणि ज्ञानदेवांचे निर्वाण या दरम्यानच्या नऊ वर्षांच्या कालखंडात ज्ञानेश्वरीचे लेखन झाले असावे. हा काळ म्हणजे शके ११९३ ते शके १२०२ हा होय. लीळाचरित्राचे लेखन शके १२०८ मध्ये पुरे झाले. डॉ. वि. भि. कोलते त्याची मराठीचा आद्य ग्रंथ म्हणून करतात. परंतु ज्ञानेश्वरीचे लेखन लीळाचरित्रा-पूर्वीच झालेले असल्याने त्यांना ही आद्यत्वाची समीकरणे बदलणे भाग आहे.

ज्ञानदेवां झोटींग प्रसन्न

ज्ञानदेवांचा कालखंड पाऊण शतक मागे गेल्याने डॉ. कोलते यांनी संपादिलेल्या लीळाचरित्रातील 'ज्ञानदेवां झोटींग प्रसन्न' ही ८६ क्रमांकाची अज्ञात लीळा ज्ञानेश्वरीकर्त्या ज्ञानदेवासंबंधी असावी; असे निःशंकपणे म्हणता येते. ही लीळा पुढीलप्रमाणे आहे :—

'महदाइसीं गोसावीयांपुढां सांघितलें : "जी जी : ज्ञानदेव नावें महात्मे : ते रायाचे गुरू : जी जी : ते खापरखुंटी घरीति तरि आसु होए । माती घरीति तरि सोने होए : आणि त्रिकाळ ज्ञान : अतित अनागत वर्तमान जाणति : यां

एसणी जाणीव काइसी जी ?" मग सर्वज्ञें म्हणीतलें : "बाइ : तया झोटींग प्रसन्न जाला : त्यांसि पुसति तें सांघति : ते जें भाखीति तें साच : ऐसें तेयिचें सामर्थ्य : या नवल नाहीं कीं बाइ :एकएकां एकेक सामर्थ्य असे कीं बाइ :" ॥'

प्रस्तुत लीळेमधून ज्ञानदेवांसंबंधी बरीच ऐतिहासिक माहिती प्राप्त होते. श्रीचक्रधरांचे 'उत्तरापंथे गमन' होण्यापूर्वीची घटना या लीळेचा विषय झालेली आहे. परंपरेप्रमाणे शके ११९४ मध्ये, तर डॉ. कोलते यांच्या मताप्रमाणे शके ११९६ मध्ये चक्रधरांचे 'उत्तरापंथे गमन' म्हणजे निधन झाले. यापूर्वीच ज्ञानदेव हे 'महात्मे' या पदवीला पोहोचले होते. त्यांच्या त्रिकालज्ञानाची आणि चमत्कारांची कीर्ती सर्वदूर पसरली होती याशिवाय महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते 'रायाचे गुरू' होते. हा 'राया' कोण ? कोलते-संपादित लीळाचरित्राच्या पूर्वार्धा-मधील २०३ क्रमांकाच्या लीळेवरून कळते की ब्रह्मसान नावाचे कोणी पंडित महादेवराव यादवाचे राजगुरू होते. यांनी चक्रधरांवर दोनदा विषप्रयोग केला होता. ज्ञानेश्वरीच्या समाप्तीच्या ओव्यांत ज्ञानदेवांनी रामदेवराव यादवाची केलेली स्तुती ध्यानात घेता ते त्याचे 'राजगुरू' असावेत. रामदेवराव शके ११९३ मध्ये गादीवर आला; म्हणजे यानंतर केव्हा तरी हे पद ज्ञानेदेवांस प्राप्त झाले. तुका विप्र याच्या 'ज्ञानेश्वरी चरित्र' या ग्रंथात या घटनेस पुष्टी मिळते.

सामान्य जनांना भगवद्भक्तीकडे ओढण्यासाठी संतांना चमत्कार करावे लागतात. ज्ञानदेवांच्या संदर्भात, भिंत चालविणे, म्हैशामुखी वेद म्हणविणे, पाठीवर मांडे भाजणे हे चमत्कार सुप्रसिद्ध आहेत. परतु खापरापासून आसू (एक सुबर्णाचे नाणे) निर्माण करणे, मातीचे सोने बनविणे हे त्यांचे चमत्कार आजवर अज्ञात होते. प्रस्तुत लीळेच्या पाठभेदामध्ये ज्ञानदेवांच्या आणखी काही हस्त-लाघवांचे वर्णन येते.

'रायासि सामर्थ्य दाखवीति : हांडिया धुव-वीति : तौलिया पाटिया : पाळी : काठवटी : धुवटें वस्त्रें : मग आकर्खीति : पाहिजति तवं षड्रस पक्वानें : वडे मांडे : खीरि : साकव-तिया : कुसंत्रीरी : अमर्याद : सकळही पाहिजें तेतुलेंहीं काढितां अन्नमयचि होए रावो जेविला सपरिवारीं : परि पुरौनि उरलें :'

चक्रधरांनी ज्ञानदेवांच्या या अद्‌भुत शक्तीची मीमांसा, 'तया झोटींग प्रसन्न जाला' या निवेद-नाने केली आहे. ज्ञानदेवांच्या अतिमानवी सामर्थ्याची वर्णने एकनाथांच्या अभंगांतही आढळून येतात. (अभंग क्र. ३५२८-३०, श्रीसकलसंतगाथा खंड २, संपा. का. अ. जोशी)

वीठलु वीरु कथन

लीळाचरित्राच्या उत्तरार्धातील ५१९ व्या लीळेत विठ्ठलाच्या उत्पत्तीची कथा आलेली आहे.

'एकु दीं महदाइसीं गोसावीयांतें पुसिलें : "जी जी : एव्हडा नडनाचु पांढरीये काइसा ? हें काइ जी ? एसणी उपाधि काइसी जी ?" सर्वज्ञें म्हणीतलें : "बाइ : हा वीरु गाइचां काजीं पडिला : तया नाव वीठलु : तयाचेनि नावें हा मांडिला भडखंबा : तेथ देवता अभिमानु घेतला : तो हे मनोर्थ पुरवीतु असे :" ॥'

प्रस्तुत लीळेत विठ्ठल देवतेचे मूळ गाईंचे रक्षण करताना वीरमरण प्राप्त झालेल्या कोणी विठ्ठलाच्या स्मरणार्थ उभारलेल्या भडखंब्यात आहे असे निवेदन आले आहे. लीळाचरित्राच्या काही पाठांत वीरगती प्राप्त झालेला हा विठ्ठल मंगळ-वेढयाचा दरोडेखोर ब्राह्मण होता अशी माहिती आलेली आहे. या सर्व पाठांतील कथांचा मूळ आशय सारखा असला तरी काही पाठांत या विठ्ठलवीरासंबंधी थोडी अधिक माहिती येते. 'तयाचीए स्त्रीए नांव लाखाइ : एकी वासना : लखमाइ : तयाचे पुत्र जातिपर्दे करीति : ते वीठलु रखुमीणि अभंगीं घालीति :'

अभंगांमध्ये 'वीठलु रखुमीणि' घालणारे हे कवी कोण ? या कर्तृत्वाचे धनी 'बापरखुमा-देविवरु विठ्ठलु' अशी नाममुद्रा वापरणारे ज्ञानदेव अभिप्रेत असणार हे उघड होय. आजपर्यंत ज्ञानदेवांचा काळ चक्रधरोत्तर मानला गेल्याने चक्रधरांच्या तोंडी हे उल्लेख येणे शक्य नाही असे समजून ही सर्वच लीळा प्रक्षिप्त मानण्याकडे संशोधकांचा कल होता. ज्ञानदेवांचा कालखंड

मागे ओढला गेल्याने आता तशी आवश्यकता राहिलेली नाही.

प्रस्तुत लीळेमधून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाशी निगडित अशी काही तथ्ये हाती लागतात. त्यातील पहिले तथ्य म्हणजे पंढरपूरचा श्रीविठ्ठल हा विठ्ठल नावाच्या ब्राह्मणाच्या स्मरणार्थ उभारलेल्या वीरगळाचे दैवतीकरण होय. दुसरे तथ्य म्हणजे विठ्ठलाच्या मंदिराचा विध्वंस झाला असला तरी मूर्ती अभंग असावी. सांप्रतच्या मूर्तीच्या शिरस्थानी उंच टोपीसारखे दिसणारे शिल्प हा मुकुट नसून शिवलिंग आहे, याची खात्री या लीळेतून मिळते. (ते तेहीं भडखंबा केला: माथां लींगस्थापना केली :) तीच प्राचीन मूर्ती आजही विद्यमान आहे असे अनुमान काढता येते. ज्या विठ्ठलभटाच्या स्मरणार्थ हा भडखंबा उभारला गेला त्याची स्त्री 'लाखाइ' त्याच्या मृत्यूनंतर जीवंत असल्याने त्याची एकटयाचीच मूर्ती बनविली गेली. विठ्ठला शेजारी रखुमाई का नाही याचे रहस्य या घटनेत शोधता येते.

शेवटचे अनुमान महत्त्वाचे आहे. ज्ञानदेवांच्या पित्याचे नाव विठ्ठलपंत व मातेचे नाव रखुमाई असे परंपरा मानते. ज्ञानदेव हे आपल्या काव्यलेखनासाठी 'बापरखुमादेविवरु विठ्ठलु' अशी नाममुद्रा वापरतात. प्रस्तुत लीळेमध्ये उल्लेखिलेल्या विठ्ठलभटाची पत्नीही 'लखमाइ' आहे व त्यांचे पुत्र जातिपदांची रचना करून त्यात विठ्ठल-रखुमाईचे नाव घालतात. मग ज्ञानदेव (व त्यांची भावंडे) या वीरगती प्राप्त झालेल्या विठ्ठलभटाची संतती होते काय ? तसेच मानावे लागेल. परंतु यात काही अडचणी संभवतात.

श्रीचक्रधरांनी सिंघण यादवाच्या राजवटीत, शके ११३५ मध्ये अवतार-स्वीकार केला व व त्यांचे शके ११९६ मध्ये निधन झाले. ज्ञानदेवांचा जन्म शके ११२२ मध्ये झाला व त्यांनी शके १२०२ मध्ये समाधी घेतली. डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी संशोधिलेला पंढरपूर येथील विठ्ठलदेवाचा शिलालेख (प्राचीन मराठी कोरीव लेख, क्र. १७) शके ११११ इतका प्राचीन आहे. याचा स्पष्ट अर्थ असा की विठ्ठलभक्ती आणि विठ्ठलाची मंदिरे श्रीचक्रधर किंवा ज्ञानदेव यांच्यापूर्वी अस्तित्वात होती. म्हणून ११२२ मध्ये जन्मलेले ज्ञानदेव विठ्ठलभटाचे पुत्र असू शकत नाहीत. तसेच, विठ्ठलभटाच्या भडखंब्याचे दैवतीकरण विठ्ठलदेवामध्ये होणे ही घटना श्रीचक्रधरांच्या आयुष्यात घडलेली नाही. ती तत्कालीन लोकश्रुतीवर आधारलेली असल्याने कितीही शतके प्राचीन असू शकते. माझ्या मते, ही सर्वच लीळा प्रक्षिप्त मानण्याची गरज नाही. 'मनोर्थु पुरवीतु असे' यानंतर येणारी 'एकी वासना', जिच्यामध्ये विठ्ठल-रखुमाईसंबंधी अभंगांचा उल्लेख आहे, तीच तेवढी प्रक्षिप्त मानावी. अर्थात या पाठभेदात ऐतिहासिक सत्य आहेच. फक्त क्षेपककाराच्या मनात विठ्ठलभट वीरु व ज्ञानदेव-जनक विठ्ठलपंत यासंबंधी गोंधळ आहे.

मुक्ताबाईचे कोडे

कोलते-संपादित लीळाचरित्राच्या पूर्वार्धात लीळा क्रमांक २२, २३ आणि २४ यामध्ये योगिनी मुक्ताबाईची कथा आलेली आहे. शके ११६७ च्या सुमारास रिधपुरास श्रीगोविंदप्रभूंकडून शक्तिस्वीकार केल्यापासून शके ११८९ च्या सिंहस्थापर्यंत बावीस वर्षांच्या कालखंडात श्रीचक्रधरस्वामी भ्रमंती करीत असता बारा वर्षे त्यांचा मुक्काम 'पर्वतीं' होता. 'पर्वतीं' भ्रमंती चालू असता श्रीचक्रधरांची मुक्ताबाई (मुगुताबाई) नावाच्या योगिनीशी वारंवार भेट होई.

'कैसी बाइ नीन्हां तापस ! आंगिची लोंव पाहाळीं गेली: हातांपायांचीं नखें चुंभाळि वळलीं : माथांचीया जटा भूइंसी काढति : सेवाळैले दांत : तीएं बैसति तरि तेयांचीया जटा भुइं पुंजा होति : उभीं ठाकति तरि तेयांचीया जटे भूइंसी काढति :'

मुक्ताबाई ही अळजपुरीच्या राजाची कन्या. राज्यावर परचक्र आले आणि त्यात झालेल्या धावपळीत ही परागंदा झाली व गोरक्षनाथांची शिष्या बनली. तपस्याकाळात हिचा आश्रय 'पर्वतीं' होता. महानुभाव परंपरेप्रमाणे हा पर्वत म्हणजे सालवर्डीचा डोंगर होय. 'सालबर्डी' हा मुळात एक गोंडी शब्द आहे. साल किंवा साले म्हणजे त्रिशूळ किंवा त्रिशूळधारी शिव होय. शिव

ही गोंडांची सर्वश्रेष्ठ देवता. बद्दी किंवा वर्डी म्हणजे डोंगर किंवा पर्वत. 'सालवर्डी' या शब्दाचा अर्थ महादेवाचा डोंगर वा शिवशैल असा होतो. सीतावर्डी हा शब्दही मुळात सित्ताबद्दी म्हणजे चिंचेचा डोंगर असा आहे. विदर्भातील शेकडो ग्राम नामे मुळात गोंडी आहेत. 'सालेकसा' म्हणजे शिवसरोवर. 'पैनगंगा' म्हणजे देवगंगा; 'वैनगंगा' म्हणजे लोकगंगा. असो. ढेऱ्यांनी आपल्या 'चक्रपाणि' या ग्रंथात या 'पर्वता'चा शोध आंध्र–तमिळनाडूमध्ये घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. तो अनावश्यक वाटतो.

मुक्ताबाई ही प्रारंभी गोरक्षनाथाची शिष्या असली तरी पुढे ती ज्ञानेश्वर–मंडळात सामील झालेली दिसते. निवृत्तिनाथांनी तिला योगमार्गाकडून भक्तिमार्गाकडे वळविले. ज्ञानदेवांचा वास्तव कालखंड ज्ञात झाल्याने ही ज्ञानदेव–समकालीन असावी ही वस्तुस्थिती ध्यानात येते व ज्ञानदेव-समकालीन मुक्ताई ही योगिनी मुक्ताईचा अवतार होय असे कल्पिण्याची आवश्यकता राहत नाही. मुक्ताबाई ही ज्ञानदेवांहून वयाने लहान असावी. चांगा वटेश्वरास हिने दीक्षा दिली. नामदेवांनाही एकदा हिने चांगलेच चापले होते. तापीतीरी एदलाबादजवळ वीज पडून हिचे निर्वाण झाले. हिच्या जीवनकथेला, वेश्या असुनी पतिव्रता, विक्रम राजाकडून पाणिग्रहण, नग्न होऊन भिक्षा मागणे यांसारखे लोकप्रिय कल्पनाबंध असलेली लोककथा जोडून दिलेली काही पाठांत आढळते. ती पूर्ण अनैतिहासिक होय.

मुक्ताबाईच्या संदर्भात एका महत्त्वाच्या प्रश्नाचा निर्णय संशोधकांनी घ्यावयास हवा. त्याचे सूतोवाच प्रा. नरहर कुरुंदकरांनी ढेरे यांच्या 'चक्रपाणि' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत (पृष्ठ ३५) केले आहे. प्राचीन मराठी वाङ्मयात सुत, पुत्र, कुमर, दुहिता, कन्या हे शब्द शिष्य या अर्थाने वारंवार वापरले जातात. ज्ञानेश्वरीत ज्ञानदेव स्वतःला निवृत्तिसुत म्हणवितात. तात, पिता हे शब्द गुरू या अर्थाने वापरले जातात. एकाच गुरूचे शिष्य परस्परांचे बंधू व शिष्या भगिनी होतात. या पार्श्वभूमीवर विचार करता, निवृत्ति–ज्ञानदेव–सोपान–मुक्ताबाई ह्या 'चार भावंडां'च्या संकल्पनेविषयी साशंकता निर्माण होते. परस्परांपासून शेकडो मैल दूर राहणारी ही संतमंडळी विठ्ठलभक्तीच्या धाग्यांनी एकमेकांस जोडलेली होती. त्यांची जन्मस्थाने माहीत नाहीत; कर्मस्थाने माहीत नाहीत; निधनस्थाने भिन्न आहेत. त्यांची जवळीक सहोदरत्वापेक्षा गुरुपरंपरासंबंधातूनच उद्भवलेली दिसते. सुमारे तीन शतके विस्मृत झालेल्या ज्ञानदेव कालखंडाची पहिली जुळवा-जुळव एकनाथ आणि समकालीन पंडितांनी केली. परंतु अस्सल साधनांचा अभाव असल्याने त्यांनी कल्पनाशक्तीवरच भर दिलेला दिसतो. यांतूनच चमत्कार–कथांचा व आदि–समाधि–तीर्थावळी-सारख्या कादंबऱ्यांचा जन्म झाला. सात शतकांनंतरही ही परिस्थिती बदललेली नाही.

नामदेव गाथ्यातील गौडबंगाल

ज्ञानदेवांच्या कालखंडाचे आज जे चित्र उभे आहे, त्याचा प्रमुख आधार नामदेव आणि त्यांच्या कुटुंबियांनी रचलेल्या अभंगांचा गाथा आहे, ही वस्तुस्थिती आहे. दुर्दैवाने, हे साधन असावे तितके विश्वसनीय नाही, हे अनेक संशोधकांनी दाखवून दिलेले आहे. या गाथ्यात नामा, नामदेव इ. समरूप नाममुद्रा असलेल्या अनेक कवींचे काव्य कोंबण्यात आल्याने मोठाच गुंतवळा निर्माण झाला आहे. त्यातही यात्रेकरूंची उपस्थिती हेच केवळ ज्यांच्या उपजीविकेचे साधन आहे अशा परमेश्वराच्या प्रतिनिधींनी आळंदी, पैठण, पंढरपूर इत्यादी क्षेत्रांचे माहात्म्य वाढविण्यासाठी क्षेपकांचा नको तेवढा उपद्व्याप करून ठेवला असावा असे दिसते. नामदेव–गाथ्यातील गुंतवळा सोडविण्याची आवश्यकता वारंवार प्रतिपादिली गेली आहे; परंतु पारंपरिक श्रद्धांना तडा जाईल या भीतीने संशोधक पुढे सरसावत नाहीत. परिणामतः संतसाहित्याच्या क्षेत्रात सत्यान्वेषकांपेक्षा सोम्या-गोम्यांचीच वर्दळ वाढलेली आहे.

नामदेव–गाथ्यात प्रामुख्याने आद्य नामदेव, विष्णुदास नामा व शिंपी नामा या तीन वेगवेगळ्या कालखंडांत होऊन गेलेल्या नामदेवांचे काव्य ग्यामिश्रित झाले आहे. आद्य नामदेव हे ज्ञानदेवांचे समकालीन होतेअसे मानले जाते. या

उभय संतवरांनी एकत्रितपणे तीर्थाटण केले, विठ्ठलभक्ती केली व भागवतधर्माचा पुरस्कार आणि प्रसार केला. ज्ञानदेव आणि इतर अनेक संतांच्या समाधिसमयी नामदेव उपस्थित होते. या सर्व घटनांना लोकश्रुती आणि उत्तरकालीन संतांच्या काव्यात पुष्टी मिळते.

बाळछंद अभंगाचा चुकीचा अर्थ लावून व जनाबाईच्या नावावर मोडणाऱ्या एका प्रक्षिप्त अभंगाच्या आधारे ज्ञानदेवांचा जन्मशक ११९३ वा ११९७, आणि निर्वाणशक १२१८ असा ठरविला गेला आहे. नामदेवांचा जन्म केव्हा व कोठे झाला यासंबंधीही अनेक वाद आहेत. नामदेव-गाथ्यातील चरित्रपर अभंगात त्यांची जन्मतिथी सांगणारा पुढील अभंग आहे,

'माझें जन्मपत्र बाबाजी ब्राह्मणें ।
लिहिलें त्याची खूण सारूं ऐका ।। १ ।।
अधिक ब्याण्णव गणित अकरा शतें ।
उगवतां आदित्य रोहिणीसी ।। २ ।।
शुक्ल एकादशी कार्तिकी रविवार ।
प्रभव संवत्सर शालिवाहन शके ।। ३ ।।
प्रसवली माता मज मळमूत्रीं ।
तेव्हां जिव्हेवरी लिहिलें देवें ।। ४ ।।
शत कोटी अभंग करील प्रतिज्ञा ।
नाम मंत्र खुणा वाचुनी पाहे ।। ५ ।।
ऐशीं वर्षे आयुष्य पत्रिका प्रमाण ।
नामसंकीर्तन नामया वृद्धी ।। ६ ।।
(–चित्रशाळा गाथा अभंग क्र. १२५०)

या अभंगाच्या आधारे नामदेवांचा जन्म, रविवार कार्तिक शुद्ध ११ शके ११९२ असा ठरविला गेला. शके ११९२ मध्ये प्रभव संवत्सर येत नाही; प्रमोद संवत्सर येते. कार्तिक शुद्ध एकादशीला सूर्योदय समयी रोहिणी नक्षत्रही नाही. यामुळे जन्मतिथीचे अनेक काल्पनिक पाठ सुचविले गेले. पत्रिकेतील 'ऐशीं वर्षे आयुष्य' गृहित धरून व लाडाईच्या एका अभंगाचा (तत्रैव क्र. २८३०) आधार घेऊन नामदेवांची निर्वाणतिथी आषाढ वद्य १३ शके १२७२ अशी ठरविण्यात आली.

नामदेवांच्या जन्मस्थानाप्रमाणे निधनस्थानाबद्दलही अनेक वाद आहेत. ज्ञानदेवांच्या समाधिसमयी नामदेव उपस्थित होते; तेव्हा प्रस्थापित जन्मतिथींप्रमाणे ते २६ वर्षांचे असावेत. एवढ्या लहान वयात तीर्थाटणे करून, नाना चमत्कार दाखवून, संत म्हणून नाव कमावून, अलोट विठ्ठलभक्ती करून, कोटयवधी अभंगाचे लेखन करून, करून, समाधीची स्थाने झाडण्यासाठी व विडे वाटण्यासाठी नारा-विठा – महादा – गोंदा या सुपुत्रांची चमू निर्माण करणे ही अशक्यप्राय गोष्ट होय लाडाईच्या अभंगानुसार ऐशीं वर्षांच्या नामदेवांच्या समाधिकाली लेक, लेकी, सुना यांच्याबरोबर त्यांचे वडील दामशेटी व आई गोणाई ही मंडळीही सांघिक समाधी घेण्यासाठी उपस्थित होती! तात्पर्य, नामदेव-गाथा हे विसंगतींचे मोहोळ आहे. त्यातून ऐतिहासिक सत्ये हुडकून ज्ञानदेवांचा कालखंड सुसंगतपणे उभा करणे हे दीर्घ व्यासंगाचे व कष्टाचे काम होय.

नामदेवांची संभाव्य जन्मतिथी

ज्ञानदेवांच्या जन्म-निर्वाणाचे नवे शक मान्य करून ज्ञानदेव-नामदेव यांचे परंपरामान्य समकालीनत्व सिद्ध करावयाचे झाल्यास नामदेवांच्या प्रस्थापित जन्म-मृत्यूच्या तिथींचा त्याग करणे क्रमप्राप्त होय. प्राचीन संतसाहित्याच्या अभ्यासकांनी काही चुकीची प्रमेये गृहिते म्हणून धरल्याने त्यांची अवस्था चक्रव्यात सापडल्याप्रमाणे झाली आहे. वस्तुतः नामदेवांची जन्मतिथी सांगणारा उपरोल्लिखित अभंग हे ज्ञानदेव-नामदेव समकालीनत्व सिद्ध करण्याचे एक बळकट प्रमाण होय.

प्रस्तुत अभंगात नामदेवांचा जन्मशक अभुग्नपणे न सांगता 'अधिक ब्याण्णव गणित अकरा शतें' असा अंकी परंतु सांकेतिक पद्धती सांगितलेला आहे. 'ब्याण्णव' अधिक शकनिर्देशक अंक 'अकरा' यांची गोळाबेरीज ९२११ अशी येते. 'अंकानां वामतो गतिः' या सूत्रानुसार या संख्येची मांडणी उलटया क्रमाने केल्यास ११२९ ही संख्या प्राप्त होते. हाच नामदेवांचा जन्मशक होय. पिल्ले जंत्रीप्रमाणे शके ११२९ मध्ये प्रभव संवत्सर येते. याशिवाय, सौर पंचांगाप्रमाणे कार्तिक शुद्ध एकादशीच्या दिवशी सूर्योदयसमयी रोहिणी नक्षत्रही लागते. इसवी सनाच्या गणने.

नुसार हा दिवस ७ नोव्हेंबर १२०७ असा आहे. या परिगणनेत एकच उणीव दिसून येते, की या तिथीला रविवार न येता बुधवार येतो. तिथी व वारांचा समन्वय ही प्राचीन कालगणनेतील नेहमीचीच डोकेदुखी आहे. तरी पण 'कार्तिक शुद्ध ११ शके ११२९' ही नामदेवांची संभाव्य जन्मतिथी म्हणून तिचा आदर करण्यास हरकत नसावी. ही तिथी स्वीकारल्याने ज्ञानदेव व नामदेव या महान संतांचे समकालीनत्व सिद्ध होते. ज्ञानदेव हे नामदेवांहून सात वर्षांनी ज्येष्ठ ठरतात.

नामदेवांचा खात्रीलायक निर्वाणशक उपलब्ध नाही. जन्मपत्रिकेतील अनुमानाप्रमाणे ते ऐंशी वर्षे जगले असतीलच असे म्हणता येत नाही. कदाचित कमी जगले असतील वा कदाचित अधिकही. परिसा भागवताच्या नावावर असलेल्या केवळ दोन अभंगांपैकी एकामध्ये नामदेव 'आषाढ शुद्ध एकादशीच्या दिवशी मला समाधी द्यावी' असे विठ्ठलापाशी मागणे मागतात. या अभंगाच्या आधारे व जन्मपत्रिकेतील भविष्यवाणीवर विसंबून नामदेवांचे निर्वाण आषाढ शुद्ध ११ शके १२७२ मध्ये व्हावयास पाहिजे. परंतु लाडाईच्या अभंगात नामदेवांसह त्यांच्या कुटुंबियांनी 'द्वादश बाहात्तरी कृष्ण त्रयोदशी । आषाढ हे मासीं देवद्वारीं ॥ सर्वांनी हा देह अर्पिला विठ्ठलीं' अशी साक्ष असल्याने ही तिथी आषाढ वद्य १३ शके १२७२ अशी झाली आहे. पंजाबातील परंपरे-प्रमाणे नामदेवांनी घुमान येथे माघ शुद्ध २ संवत १५०७ मध्ये, म्हणजे शके १३७२ मध्ये समाधी घेतली. एकूण, नामदेवांच्या अंत:काळासंबंधी फारशी विश्वसनीय माहिती उपलब्ध नाही. घुमान, नरसी आणि पंढरपूर या तीन स्थानांपैकी कोठेतरी त्यांचे निधन झाले व निधनसमयी ते ज्ञानदेवांप्रमाणेच बरेच वृद्ध असावे एवढेच म्हणता येते. ऐंशी वर्षांचे प्रमाण ताणूनच धरावयाचे झाल्यास नामदेवांचा निर्वाण शक १२०९ मानता येईल.

ज्ञानदेव मंडळ

जन्माला आलेले मूल पुढे काय दिवे लावणार आहे याची यत्किंचितही कल्पना करता येत नसल्याने जन्मतिथीच्या नोंदीविषयी सार्वत्रिक बेफिकीरी आढळून येते. जन्मतिथीपेक्षा निधनतिथी अधिक विश्वासार्ह असते. कर्तबगार व्यक्तीच्या कारकीर्दीचा तो अंतिम क्षण असतो. तो दीर्घ काळ स्मरणात राहतो व कोठेतरी त्याची नोंद होत असते. जन्मस्थळ आणि कर्मस्थळ यांचेही असेच आहे. निधन अनैसर्गिक नसेल तर प्राय: ते कर्मस्थलीच होत असते. या दृष्टीने ज्ञानदेवांच्या कालखंडाचे अवलोकन केल्यास असे आढळेल की संतमंडळींच्या जन्मशकांपेक्षा त्यांचे निर्वाणशकच अधिक विश्वासार्ह आहेत. तसेच त्यांच्या जन्म-स्थलापेक्षा निधनस्थलासंबंधी अधिक एकवाक्यता आहे. या कालखंडातील प्रमुख संत व संबंधित व्यक्तींचे संभाव्य निर्वाणशक व निर्वाणस्थले खालीलप्रमाणे आहेत :–


संत, इ.	निर्वाण शक	निर्वाण स्थल
श्रीचक्रधर	११९६	देवगिरी
ज्ञानदेव	१२०२	आळंदी
हेमाड पंडित	१२०७ नंतर	?
नामदेव	१२०९ ?	पंढरपूर ? घुमान ?
सावता माळी	१२१७ ?	अरण्यभेंडी
सोपानदेव	१२१८	सासवड
मुक्ताबाई	१२१९	तापी तीर (माणगांव ?)
निवृत्तिनाथ	१२२१	त्र्यंबकेश्वर
कान्हो पाठक	१२२१ नंतर	केंदूर
कूर्मदास	१२३० चा सुमार	लहुळ
विसोबा खेचर	१२३१	बार्शी ? आळंदी ?
रामदेवराव	१२३४	देवगिरी
नरहरी सोनार	१२३५	पंढरपूर ?
गोरा कुंभार	१२३९	तेरढोकी
बंका महार	१२४०	मंगळवेढे ?
चांगदेव	१२४७	पुणतांबे
जगमित्र नागा	१२५२ ?	परळी–वैजनाथ
चोखामेळा	१२६० ?	मंगळवेढे
जोगा परमानंद	१२६०	बार्शी
जनाबाई	१२७२ ?	पंढरपूर ?

ज्ञानदेवांचा कालखंड हा विठ्ठलभक्तीचा परमोत्कर्ष बिंदू होय. नाथ संप्रदायाकडून वारकरी संप्रदायाकडे वळलेल्या या प्रवाहाचा प्रारंभ निवृत्तिदेवांपासून होतो. हे ज्ञानदेवांचे गुरू होत.

ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध व वयोवृद्ध ज्ञानदेवांनी उभ्या महाराष्ट्रात विठ्ठलभक्तीचा सुकाळ करून सोडला. त्यांच्या प्रभावळीतील नामदेवांनी या प्रवाहाचे पाट पंजाबपर्यंत पोहोचविले. निवृत्तिदेव, ज्ञानदेव, नामदेव व श्रीचक्रधर ही या कालखंडाच्या पूर्वार्धी-तील ज्येष्ठ व श्रेष्ठ संत मंडळी होत. शके ११२२ मध्ये जन्मलेल्या ज्ञानदेवांच्या कर्तृत्वाचा प्रारंभ यादृच्छिकपणे शके ११७२ पासून गृहित धरल्यास तो त्यांच्या निर्वाणाबरोबर, म्हणजे शके १२०२ मध्ये संपतो. हा या कालखंडाचा पूर्वार्ध होय. या काळात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतूनच नव्हे, तर कर्नाटक, आंध्रमधूनही भक्तगण पंढरीच्या दर्शनासाठी येत याची साक्ष चौऱ्यायशींच्या शिलालेखात (शके ११९५ ते शके १२००) मिळते. याच काळात शके १२३० नंतर निधन पावलेली सर्व संत मंडळी त्यांची शिष्यप्रशिष्य झाली. त्यांनी 'दीपे दीपु लाविजे' या सूत्रास अनुसरून, शके १२७० पर्यंत म्हणजे महाराष्ट्रात बहामनी राजवट सुरू होईपर्यंत, विठ्ठलभक्तीची ज्योत तेवत ठेवली. शके १२०२ ते शके १२७० हा ज्ञानदेव-कालखंडाचा उत्तरार्ध होय. ज्ञानदेव परिवारातील या संत मंडळींचे निधनसमयीचे वय अंदाजें ६० ते ७५ वर्षे धरल्यास, त्यांच्या प्रौढ वयात, म्हणजे शके ११९० पूर्वीच त्यांनी ज्ञानदेव मंडळात प्रवेश केला असावा असे दिसते. दरवर्षी आषाढी आणि कार्तिक एकादशीला पंढरपूर येथे या मंडळाची बैठक भरे.

रामदेवराव यादवासारख्या धुरंधर नृपवराने-देखील ज्ञानदेवांचे शिष्यत्व पत्करले होते, याची साक्ष लीळाचरित्रात, तुका विप्र याच्या 'ज्ञानेश्वर-चरित्रा'त व सच्चिदानंदांच्या परंपरेतील बाळाबोवांच्या 'भक्तितत्त्वामृतरहस्या'त मिळते. ज्ञानदेवांचा जन्मशक ११९३ वा ११९७ असा मानल्यास, शके ११९३ मध्ये गादीवर बसलेल्या रामदेवरावास ज्ञानदेवांनी पाळण्यात बसून गुरुमंत्र दिला असे होते. महदायिसेच्या कथनातील 'रावो जेविला सपरिवारे' हा भोजनाचा कार्यक्रमही पाळण्यात बसून झाला असे समजावे लागेल. संतांचे जीवन, कार्य, शिकवणूक यापेक्षा त्यांच्या चमत्कार-कथात अधिक रस घेणारी आमची भक्त मंडळी हा एक नवीनच चमत्कार ज्ञानदेव-चरित्रास जोडून देतील व तीर्थक्षेत्रातील यात्रेकरूंची उपस्थित हेच उप-जीविकेचे साधन असणारे लोक हा पाळणा यात्रेकरूंच्या दर्शनार्थ खुला करतील असे तेवढे होऊ नये ! ■

विभाग प्रमुख/ भाषाशास्त्र, परकीय व भारतीय
भाषा विभाग, विद्यापीठ ग्रंथालय, नागपूर
विद्यापीठ आवार, नागपूर



समाजवादी यथार्थवाद : एक अल्पसा परिचय

प्रसन्नकुमार भावे

समाजवादी यथार्थवाद आणि कलावंताची निर्मितीप्रक्रिया यांच्या संबंधातील आकलन हे निर्मिती व आस्वाद प्रक्रियेशी कर्तव्य असणाऱ्या समकालीन निर्मात्यांना व आस्वाद व्यवहारात सजगपणे वावरणाऱ्यांना दुर्लक्षित करता येणारी बाब उरलेली नाही.

पुराणतेपासून मुक्तता, वास्तवाचे क्रांतीकारक अशा सातत्यपूर्ण प्रक्रियेंतर्गत होणारे बोधन व कलावंताची सक्रिय अशी वृत्ती तसेच स्वातंत्र्य, सौंदर्य व सन्मान–स्वाभिमान यावर आधारित अशी अखिल जगताची पुनर्रचना करण्याची दृष्टी हा यथार्थवादाचा तात्त्विक पाया आहे.

मॅक्झिम गोर्की म्हणतो की, "लेखकाचा सामाजिक अनुभव जेवढा दांडगा तेवढी त्याची दृष्टी-कोनाची उंची; तेवढी व्यापक त्याची बुद्धिमत्तेची क्षितिजे." तटस्थता ही त्याच्या मते विकारहीनता ठरते. गोर्की हा सामाजिक यथार्थवादाचा जनक मानला जातो. मानवतेच्या कलात्मक विकासाला आलेले तार्किक फळ म्हणजे सामाजिक यथार्थवाद असे सामाजिक यथार्थवादाबाबत म्हटले जाते.

माणसावरील अविचल निष्ठा व त्याच्या अंतिम विजयावरील विश्वासाच्या पायावर सामाजिक यथार्थवाद उभा आहे. "आम्ही निव्वळ माणसाची जीवनाची चांगली बाजूच तेवढी रंगवायची आहे असे नसून जीवनातील वाईट असेही सारे नोंदवायचे आहेच. परंतु त्या वाईटास (भारतीय अर्थाने ज्याला अशिव म्हणता येईल) शरण मात्र जायचे नाही" असे गोर्कीने म्हटलेले होते.

वास्तव हे सतत बदलणारे, वाढणारे, विकास पावणारे व सतत घडत असणारे असे तत्त्व आहे. त्यामुळेच वास्तवाच्या सीमारेषा देखील सतत बदलत रहाणार हे गृहीतच आहे. फक्त या सीमारेषांचे नसणे मात्र येथे गृहीत नाही. या यथार्थास लागणारे 'समाजवादी' हे विशेषण बदलाची द्वंद्वात्मक प्रक्रिया ध्वनित करते. कलेबाबतची विशिष्ट भूमिका या विशेषणाने दर्शविली जाते. जीवनाचे विकृत दर्शन मान्य नसणे, तसेच अतिसुबोधीकरण किंवा भ्रामकता यांनाही अवरोध करणे त्यात गृहीत आहे.

वास्तववाद किंवा यथार्थवाद हे व्यक्ती व समाजाच्या आत्मिक व्यामिश्रतेचा शोध इतर कोण-त्याही सौंदर्यपूर्ण पद्धतीपेक्षा अधिक प्रभावी व सखोलपणे घेऊ पहाणारे साधन आहे. संपूर्ण वास्तव, यथार्थ, संपूर्णपणे जाणून घेऊन त्याला कल्पनांकित करून त्याचे कलेत रूपांतरण करणे हे अतिशय गुंतागुंतीचे वेळखाऊ, थकविणारे व तरीही वास्तवाचा योग्य बोध होईलच याची कोणतीच खात्री नसणारे असे कार्य असल्याने वास्तवाच्या वरवरच्याच तेवढ्या थरावर वावरणारेच अधिक असतात.

बदलत्या तंत्रज्ञानासोबत, विज्ञानातील क्रांतीसोबत, माणसाचे ऐंद्रिय, भावनात्मक व बौद्धिक परिप्रेक्ष्य देखील सतत बदलाच्या प्रक्रियेत असते. ही प्रक्रिया समाजवादी जगतापुरतीच तेवढी मर्या-दित आहे असे समजण्याचे कारण नाही. भांडवलदारी समाजव्यवस्थेतही हे बदल घडत असतातच.

मानवी संस्कृतीला आजवर अज्ञात अशा कितीतरी वेगवेगळ्या ताणतणावातून जीवनाचा प्रवास आज सुरू आहे. या साऱ्यातून, हे सारे ताणतणाव पारदर्शक करून त्या पल्याडच्या मानवाच्या नियतीचा शोध घेणे व तो सौंदर्यशास्त्रीय नियमात बसेल असा मांडणे हे अतिशय कठीण होऊ लागले आहे. माणसाचे जसजसे अवमूल्यन होत जाईल तसतसा कलावंताचा त्याचावरचा विश्वास अधिकाधिक दृढ होत जाईल. गोंधळ, गुंता जसजसा वाढत जाईल तसतसे लेखक कलावंतास अधिक तीक्ष्ण नजरेचे होत जावे लागेल.

मर्ढेकरांच्या ज्या (स्ट्रीम ऑफ कॉन्शसनेस) संज्ञाप्रवाहाचा काही भारतीय अलौकिकवाद्यांनी गेले पाव शतक पुरस्कार करून संज्ञाप्रवाहीत्ववाद्यांवर अलौकिकतावादाचा रंग चढवून बघण्याचा प्रयत्न केला त्या संज्ञाप्रवाहास यथार्थाचे, वास्तवाचे अविष्कार साधन म्हणूनच जेम्स हार्टने गौरविले असल्याचे सर्वज्ञात आहेच.

टी. एस. इलिएट देखील जे 'नवीन' नाही त्याला कला मानावयास तयार नाही. नव्या वास्तवाचा, बदलत्या वास्तवातील नव्या ताणतणावाचे नवमानवतावादी चित्रणाचा पुरस्कार, करणारा हा यथार्थवाद समाजवादी तत्त्वज्ञानावरच तेवढा आधारलेला आहे असे नव्हे, तर तो असा आधार-लेला असण्याला विरोधच अधिक झालेला आहे.

वास्तव, समाजवादी वास्तव आणि समाजवादी तत्त्वज्ञान यातील संकल्पनात्मक फरक जाणून घेण्याचा कोणताच प्रयत्न न केलेल्यांनीच समाजवादी यथार्थवादाबद्दल 'कम्युनिस्ट भयगंडाने' पछाडून जाऊन केलेल्या केवळ विरोध व अपप्रचारी वृत्तीमुळेच तेवढे सामाजिक यथार्थवादाचे पुरेपूर आकलन होण्यात अडथळे निर्माण झालेले आहेत. ■

द्वारा / संवाद प्रतिष्ठान
गरूडखांब रोड, महाल, नागपूर-२

स्वामी आनंद आणि नघरोळ

दुर्गा भागवत

[विदर्भ साहित्य संघाच्या अन्य भाषा साहित्य विभागाचे कार्य इतर भाषातील वाङ्मयविषयक घडामोडी, कार्य इ. मराठी भाषिकास ज्ञात करविणे तसेच मराठीतीलही असे काही इतर भाषिकांपर्यंत पोहचविण्याचेही आहे.

हिंदीतील व्यंग्यलेखनाची थोडी ओळख गेल्या अंकात करून दिलेली होती. यावेळी गुजरातीभाषेतील एक नामवत, चोखंदळ लेखक, विचारवंत स्वामी आनंद व त्यांचे लेखन याची ओळख मराठीतील नामवंत श्रेष्ठ लेखिका दुर्गा भागवत यांच्या सोबतच्या लेखाच्या निमित्ताने होत आहे.]

स्वामी आनंद हे गुजरातीतले एक नामवंत, चोखंदळ लेखक व विचारवंत. फार जिद्दीचे. सर्वोदयी कार्यकर्ते म्हणून त्यांना मी प्रथम ओळखू लागले. गांधींच्या चळवळीचा मला एक फायदा झाला, तो म्हणजे स्वामी आनंद यांची ओळख व थोडा परिचय. १९२९ साली कॉलेज–बिलेज सोडून गांधींच्या चळवळीत उडी घेणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांपैकी आम्ही तिघी बहिणीही होतो. माझी धाकटी बहीण विमल (गोडबोले) पिकेटिंगचे काम करायची. प्रथम कमल (सोहोनी) देखील देशसेविका होती. पुढे ती मेहेर अल्लींच्या बरोबर काम करू लागली. मला खादीकाम आवडायचे. सूत कातण्याचा प्रचार मी करायची. सूत कातण्यासाठी टकळ्या, चरखा, कापूस, पेळू वगैरे साहित्य लागे. चरखा घरी होता. पण पिंजण्याचे धनुष्य, पेळू करायला लागणारी साधने नव्हती. ती आणायला मी प्रथमच प्रिन्सेस स्ट्रीटवर असलेल्या नवजीवन कार्यालयात गेले. मला उत्तम सरकीचा कापूसही हवा होता. मी दुसऱ्या मजल्यावर गेले. तिथे प्रशस्त दालनात एक गोरटेले कुरळ्या केसांचे चाळिशी उलटलेले गृहस्थ पुस्तक वाचीत होते. तेच स्वामी आनंद. डोळे मोठाले आणि बोलके. पण उदासी भरलेले. मी गेल्यावर आदबीने ते उठले नि म्हणाले "या. काय हव तुम्हाला ?" गुजराती गृहस्थ इतकं चांगलं मराठी बोलतो याचेच मला कौतुक. मी म्हटलं. "मी सूत काढते. मला चांगला सरकीचा कापूस हवा आहे. पिंजायला धनुष्य नि पेळू करायला पाटला हवा आहे."

"पेळू का घेत नाही."

"मला पेळू करता येतात. घरी केले तर स्वस्त पडतात नि चांगले होतात."

"तुमचं नाव काय ?"

मी नाव सांगितले. त्यांनी विचारले "काय शिकता ? मी कॉलेज सोडल्याचे सांगितले." ते म्हणाले, "तुम्ही नावावरून ब्राह्मण आहात पण दिसता सारस्वता-सारख्या."

इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या. मला लागणारे सामान त्यांनी दिले. जाताना म्हणाले, "पेळू मला दाखवायला घेऊन याल का ?"

"आणीन."

पुढे मी माझे पेळू त्यांना दाखवले. ते पाहून ते फार खूष झाले. "हे पेळू की पक्षाची पिसं ? छान, छान." ते म्हणाले. त्यानंतर मी अनेकदा त्यांच्याकडे कामानिमित्त गेले. नवजीवन कार्यालयात सर्वोदयी लोकांना लागणारे हातसडीचे तांदूळ, घरी दळलेली कणीक वगैरे मिळत असे. आमच्याकडे शंकरराव देव येत, बरोबर दोघे चौघेजण असत. त्यांच्यासाठी गायीचे दूध मी खेतवाडीतून आणायची. पण तूप ? तांदूळ ? कणीक ? त्यासाठी मी नवजीवन कार्यालयात जायची.

प्रत्येक वेळी स्वामी आनंदाचे एक पालुपद, "तुम्ही ब्राह्मण वाटत नाही. सारस्वतच दिसता." आणि हसयाचे.

मी सर्वोदयी खाद्य वस्तूंची मागणी केली की ते म्हणायचे, "सारं देईन पण तुम्ही माझ्याकडे जेवून गेलं पाहिजे." कबूल करण्याशिवाय गत्यंतरच नव्हते. त्यांनी केलेला स्वैंपाक मी किती वेळा जेवले कुणास ठाऊक.

आता सर्वोदयी पदार्थांपैकी एक गंमत आठवली ती सांगते. एकदा मी बाईला साहित्य संस्कृती मंडळाच्या कामासाठी गेलेली होते. तेव्हा लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या पत्नी सतीबाई यांच्याशी गोष्टी करता करता सर्वोदयी शंकरराव देवांच्या आहाराच्या गोष्टी निघाल्या; मी सडलेले तांदूळ, गाईचे दूध-तूप कसे आणायची ते सांगितले. सतीबाई ते ऐकून हसत हसत म्हणाल्या, "दुर्गाताई, उगीच श्रम घेतलेत. अहो, ते आमच्याकडे नेहमी येतात. मी म्हशीच्या दुधातुपात थोडी हळद टाकते. त्यांना काही कळत नाही," पण हे ऐकूनही मला तसे करवले नाही. अजूनही मी तसे करणार नाही. असो.

पुढे काही वर्षांनी–साल आता आठवत नाही–स्वामी आनंदानी मुंबई सोडली. पुढे १९७५ पर्यंत त्याची भेट झाली नाही.

पण एक सांगते, या भेटी–गाठीत स्वामी आनंद इकडचे तिकडचे खूप बोलत पण त्यांनी मला आपण लेखन करतो याचा सुगावाही लागू दिला नाही. आणि ते तरी कसे सांगतील ? मी एक अंडर-ग्रॅज्युएट, सामान्य मुलगी, मला गुजराती वाचताही येत नव्हते. मी एक अर्धवट शिकणे सोडलेली मुलगी होते. तेव्हा ते तरी साहित्याच्या वार्ता माझ्याजवळ कसे करतील ? १९५० नंतर मला त्यांच्या लिखाणाबद्दल काही चोखंदळ गुजराती वाचक स्नेह्यांनी सांगितले. तोपर्यंत मी गुजराती बरेच वाचले होते. पण तेवढेच. कुणा गुजराती साहित्यिकाचा प्रत्यक्ष परिचय नव्हता. आता माझा पहिला परिचय स्वामी आनंदशीच झाला याचे मोठे अप्रूप वाटते. त्यांचे साहित्य मी वाचले ते मात्र याच वर्षी. १९८९ साली. त्याचीच ही पावती.

स्वामी आनंदची भेट १९७५ साली (कै.) वाडीलाल डगली या अर्थशास्त्रज्ञ व गुजराती साहित्यातले नामवंत लेखक यांच्या घरी झाली. वय ऐंशीच्या वर गेलेले. काळाकुरळा केशभार, तुरळक पांढऱ्या केसात परिवर्तन पावलेला. दंतपंक्तीही पूर्वीसारखी राहिली नव्हती. डोळ्यावर चष्मा, खांदे वाकलेले, पण डोळ्यातले नि ओठांवरचे स्मित तसेच. पूर्वीची ओळख देणारे. मला पाहून त्यांना फार आनंद झाला, माझे हात हातात घेऊन म्हणाले, "व्यासपर्व छान आहे हो. मी भाषांतर करणार आहे गुजरातीत."

" याहून आणखी काय हवं ?" मी म्हटले. पण तो योग यायचा नव्हता. कारण १९७६ च्या जानेवारीतच त्यांचे निधन झाले. व्यासपर्वाचे गुजरातीत पुढे भाषांतरही झाले. पण स्वामी आनंद यांचा हात त्याला लागायचा योग नव्हता हेच खरे.

स्वामी आनंद मूळचे कच्छचे. दवे त्यांचे आडनाव. गुजराती मित्र त्यांना स्वामी दादा म्हणून ओळखतात. स्वामी आनंद, रामकृष्ण परमहंस व महात्मा गांधी यांना पूज्य मानीत. लोकमान्य टिळक त्यांचे आराध्यदैवत होते.

त्यांच्या 'कुळकथा' या पुस्तकाला १९५६ साली साहित्य अकादमीने पारितोषिक जाहीर केले पण अकादमीचे आभार मानून स्वामी आनंदनी कळवले की मी साधू आहे. मला पारितोषिक घेता येत नाही.

स्वामी आनंद यांची लेखनशैली वाचकांना भुरळ टाकणारी आहे. भाषा साधी सरळ वाटली तरी तिच्यात अनेक शब्द आधुनिक गुजराती शहरी वाचकाला समजत नाहीत. त्यासाठी स्वामी आनंदानी या आगळ्या ग्रामशब्दकळेचा एक कोश केला आहे. त्याचे नाव 'जूनी मुडी.' म्हणजे जुनी मोडणी. हा बोलीभाषेतला एक आदर्श कोश आहे. पहिलाच असेल असे वाटते. त्यांचे शब्द वेचणे व नेमका वापर करण्याचे कौशल्य अपूर्व आहे. त्यांच्या या शब्दांपैकीच 'नघरोळ' हा एक, अनेक पर्याय असलेला, अनेक अर्थछटा असलेला शब्द. 'नघरोळ' हे त्यांच्याच एका पुस्तकाचे नाव. त्यात त्यांनी या शब्दाचे विविध अर्थ दिले आहेत. ते असे–डफ्फर, निगरगट्ट, हुणगोबा. बेपर्वा, चेंगट, रेम्याडोक्या, गबाळ, ओंगळ इत्यादि.

स्वामी आनंद यांनी लिहिलेली पुस्तके अशी; कुळकथा; अनंतकला, धरती नु लूण, संतोना अनुज, मोतके हंकाव नारा, जूनी मूडी, इशुनुं बलिदान, उत्तरापथनी यात्रा, बरफ रस्ते बदरिनाथ, भ्रमण अने संशोधन, बचपणनां बार वरस, धर्मचिंतन अने बीजा लेखो समाज–चिंतन अने बीजा लेखो, नघरोळ, हिमालयना तीर्थस्थानो, गांधीजीना संस्मरणो, ईशु भागवत, संतोनो फालो, मानवताना बेटी, नवलां दर्शन, धरतीनी आरती (मूलशंकर भट्ट यांचे संकलन), सर्वोदय विचारणा (शिवाजीराव भावे यांच्या बरोबर). भगवान बुद्ध (शिवाजीराव भावे यांच्याब रोबर) अजून काही पुस्तके प्रसिद्ध व्हायची आहेत.

अशा या जुन्या पिढीच्या लेखकाची, कार्यकर्त्याची आणि विशिष्ट स्वतंत्र वृत्तीच्या लेखकाचा सुंदर परिचय १ ऑगस्ट १९८९ च्या महाराष्ट्र टाइम्समधे मृणालिनी देसाई यांनी करून दिला आहे. सोबत लोकमान्यांच्या अंतकालाच्या दर्शनावरचा स्वामी आनंद यांचा हृदयस्पर्शी लेखही त्यांनी दिला आहे. मृणालिनीबाईंचे अनुवादाचे कसब माझ्याजवळ नाही. तरी पण या दिवंगत परिचिताला साद न देऊन मला चालण्यासारखे नाही. कारण स्वामी आनंद माझ्यापुढे प्रश्नार्थक हसरी मुद्रा करून उभे आहेत. आता 'नघरोळ'कडे वळू या.

'नघरोळ'च्या लहानशा प्रास्ताविकात स्वामी आनंद म्हणतात :–" 'जसे नाव तसे गुण' ही म्हण या पुतकाच्या नघरोळ या नावावरून समजावी. मुद्रक व प्रकाशकाना आणि मलाही ते छापून प्रकाशित होईपर्यंत केवढा त्रास झाला, किती काळ त्यात गेला ही सारी कहाणी मी वाचकांना सांगत नाही. अखेर हे पुस्तक वाचकांच्या हाती पडले आहे हेच समाधान मी मानतो. प्रभूची कृपा. या पुस्तकात पाच व्यक्तिचित्रे आहेत. ती जे इंग्रजी वाचन केले त्यातून मला उपलब्ध झाले. वर्षानुवर्षे प्रसंगाप्रसंगाने वाचलेल्या मूळ पुस्तकांची माहिती इतके वर्षांनी मिळणे दुरापास्त आहे. परंतु मी त्या सर्व लेखकांचे नि प्रकाशकांचे ऋण नम्रपणे मान्य करतो. नि पुढे जातो.

कुणा सद्गृहस्थानी मी लिहिलेल्या 'जीवन–चरित्रां 'बद्दल लिहिलेला लांबलचक लेख श्री. अश्विन मेहतानी मला वाचून दाखवला. लिहिणाऱ्याची तक्रार अशी की या माझ्या चरित्राला मी कल्पनेचा सढळ वापर करून व्यक्तीचे गुणच गायिले आहेत. दोष, उणीवा वगैरे दाखवल्या नाहीत. पण माझी रेखाचित्रे ही जीवनचरित्रे समजण्याची चूक मुळात त्या गृहस्थानी केलेली आहे. मी तर ती अशांचीच दिली आहेत. की त्यांच्या गुणांमुळे मी ओढला गेलो. ही रेखाचित्रे काढण्यात मी कल्पनेचा जरा सुद्धा वापर केलेला नाही. त्या लेखनात व्यक्तीच्या सर्व बाजू लक्षात घेणे अत्यावश्यक असते. रेखाचित्र आकृतीच्या अनुसारेच तयार होतात. त्यात हाड–मांस नसते. या पुस्तकात मानवी चरित्रातला त्यांना हवा असलेला बारीकसा अंश इथे सहज आलेला त्यांना दिसेल."

'नघरोळ'च्या उगमाची कथा, 'उगमकथा' म्हणून स्वामी आनंद सुपूर्त करतात. इथे हे सांगणे आवश्यक आहे की त्यांना मराठी येत असे. वाचनही खूप होते. प्रस्तुत लेखात त्यांनी संभाषणात अनेक मराठी वाक्ये दिलेली आहेत. स्वामी आनंदांच्या विनोदी वृत्तीची ओळख या लेखावरून होते.

यानंतर आपण पुढच्या भागाकडे म्हणजे 'मूळ कथे'कडे वळू या. 'नघरोळ'चा अनेक पर्यायासकट अर्थही त्यात दिलेला आहे. स्वामी आनंद सांगताहेत :

: २ :

मूळ कथा

गोष्ट जुनी. इंग्रजी अमदानीच्या काळातली. १९०८ साली लोकमान्य टिळक दादांच्या वर राजद्रोहाचा खटला सरकारने भरला नि त्यांना सहा वर्षांची हद्दपारीची शिक्षा ठोठावून ब्रह्मदेशातल्या मंडालेच्या तुरुंगात डांबण्यात आले. त्याच्या आधी दादांनी जहाल म्हणजेच स्वातंत्र्याचा जोरदार प्रचार करण्यासाठी मुंबईत 'राष्ट्रमत' हे मराठी दैनिक काढले. ते एका पैशास विकले जाई. घरोघरी चारचौघे एकत्र बसून ते आवडीने वाचायचे.

पुण्याचे कोकणस्थ ब्राह्मण ते पत्र चालवीत. हे सारे प्रखर बुद्धी असलेले आणि पट्टीचे विद्वान आणि विचारवंत होते. पण भांडखोर. दादा मंडालेला गेल्यावर थोड्याच महिन्यात सतत भांडणे करून वृत्तपत्र फुंकून टाकून, ३,४२,००० रुपये एवढे कर्ज ठेवून ते चालते झाले.

बेळगावचे (दिवंगत) गंगाधरराव देशपांडे हे दादांचे परमभक्त आणि मित्र. त्यांचा पेशा वकिलीचा. पण वकिलीचा व्यवसाय ते क्वचितच करायचे. घरचे सुखी. मोठे जमीनदार.

दादानी काढलेले दैनिक बंद कसे करायचे ? सरकारला त्यावर जप्ती आणावयाची तर आणू दे. गंगाधरराव तावडतोब मुंबईला आले. त्यांनी थोडी विद्वान मंडळी, देशभक्त सहकारी आणि माझ्यासारखे तरुण पण जमवले. एका वर्षातच इंग्रज राजवटीने हुकुम काढून प्रेसचा कायदा केला आणि ते दैनिक जप्त केले.

या वर्षभरात चाळीस–एक तरुण कार्यकर्त्यांचा गट प्रार्थना समाजजवळच्या इमारतीत तिसऱ्या मजल्यावर भाड्याने बिऱ्हाड करून राहात होता. लहान मोठा

वगैरे कसलाही भेद न करता महिन्याला ५ रुपयात जेवू घालणाऱ्या सखुबाईंच्या खानावळीत आम्ही जेवीत असू व आपआपल्या चटईवर झोपत असू. वृत्तपत्राचे गठ्ठे, फाइलींचे ढीग उरलेल्या जागेत असायचे. काम तसे चोवीस तास अखंड चालायचे. या बिऱ्हाडाला 'मठ' हे नाव आम्ही दिले.

पण पुढे दोन वेळच्या जेवणासाठी, मुळ्याच्या पाल्याच्या पुळकावणीसाठी खाणावळवाल्या सखुबाईला चांदीचे नगद पाच रुपये चुकते करणे जड वाटू लागले. आम्ही रत्नागिरीचा एक कोकणस्थ ब्राह्मण भटजी शोधून काढला. स्वैपाक करणे नि भांडी घासणे वगैरे साठी साडे तीन रुपये पगार ठरवून आम्ही जेवणाची तरतूद केली. पण तरी सारे काम आम्हीच करीत होतो. अंतोबा, चुलीवरून उतरून ठेवणे, स्वैपाकात मीठ तिखट घालणे, फोडणी देणे एवढेच काम करायचा. चपात्या लाटायच्या आम्ही, शेकायच्या त्याने.

या अंतोबाने शंकर नावाच्या आपल्या धाकट्या भावाला 'देशा'वरून आणले. चाळीसजणात एकजण सहज खपून जातो. खरकटी भांडी तो घासायचा. बाकीच्या वेळी दिवसा वृत्तपत्राच्या डिस्पॅचसाठी दोरा तो तयार करायचा. संपादक खात्यातल्या लिहिलेल्या कागदांची भेंडोळी तो कंपोज खात्यात पोचवायचा.

आमच्या स्टाफ मेंबरांपैकी एका भारदस्त संपादकांना दुपारी तीन वाजता सिंगल चहा आणि लिमजी बिस्किट घ्यायची सवय होती. त्यांच्या टेबलाच्या बाजूलाच पॅडवर लिहिलेला मजकूर कंपोज खात्याला नेऊन देण्यासाठी बसलेला शंकर दोर वळीत असायचा त्याला ते फर्मावीत :

"शंकर, समोरच्या हाटेलातून सिंगल चहा आणि एक लिमजी बिस्कूट घेऊन ये बघू. धावत जा अन् पळत ये. तेवढ्यात दोन तीन पानं सहज लिहून काढतो."

आमच्या गोटातल्या एका भल्या गृहस्थांनी शंकरने बिस्किट आणताना पाहिले आणि ते म्हणाले, "गोपाळराव, या हुणजोबाला तुम्ही बिस्किट आणावयास पाठवता खरे; पण तो ते कसं आणतो ते तुम्ही कधी पाहिलेत कां?"

"त्यात काय पाहायचं? समोरच्या हॉटेलातूनच तर आणतो."

दुसऱ्या दिवशी शंकर समोरच्या हॉटेलातून बिस्किट कसे आणतो ते गॅलरीत उभे राहून त्यांनी स्वतःच्या डोळ्यांनी पाहिले. सिंगल चहाचा कप हातात नि पुरी एवढे पिवळे धम्म पण नरम पडलेले लिमजी बिस्किट काखेत मारून शंकरराव रमत गमत येत होते! तसे म्हटले तर हा कोकण्या (इतर कोकण्याप्रमाणे) सदाच उघडा असलेला. वाटेल तो ऋतू का असेना. चीज वस्तू बगलेत मारून चालायची शंकरची सवय!

हा शंकर सह्याद्रीच्या घाटातल्या कोकणातल्या तळातून काढून आणलेले एक बिनडोक पायच होते. पण तसे पाहिले तर तो अगदी हाडामांसाचा डेमोक्रॅट होता. अगदी असली ब्रँडचा. दुपारच्या वेळी संपादक खात्याच्या खिडकीत बसून तो दोरे वळत असला की तोंडाने त्याची काही तरी बडबड चाललेली असायचीं. "बघा तर? हे आरामात खुर्चीवर बसून खरडणार आणि तंगडतोड मात्र आम्ही करायची! 'शंकर, एवढी पानं कंपोज खात्यात देऊन ये. सुपारी घेऊन ये–हॉटेलातून सिंगल चाय आण–' सगळेच एक सारखे. पण ह्यातल्या एकाला एक दिवस तरी असं म्हणायचं सुचतं का की 'शंकर, आण तुझ्या दोऱ्या मी वळतो. तुझी भांडी मी घासतो.'

आम्ही त्याची मस्करी करीत त्याला आमच्या विनोदाचे लक्ष्य बनवायचो.

"काय शंकर भाऊ? तू कधी बोरीबंदर बघितलस का? राजाभाई टावर पाहिलेस काय?"

तर तो उलट म्हणायचा काय? "बोरीबंदर होय? अहो ते कशाला विचारतात आमच्या सारख्याला न् आणि आमचं देखील काय अडलंय त्यांच्या भेटीला गेल्याशिवाय? मोठे असले तर त्यांच्या घरचे आम्हाला काय त्यांचं? हं?"

आम्ही खदखदून हसायचो; त्या बापड्याला ते काहीच कळायचे नाही.

: ३ :

या शंकरचाच सख्खाभाऊ शोभेल असा बोर्डीचा लंगोटी लावलेला नीरा काढणारा नि विकणारा कोळी. ठार बहिरा. त्याला आम्ही बहेरामजी म्हणत असू.

१९४८ चे साल. (चि.) नारायण देसाई गुजरातच्या उत्तर भागातल्या खेड्यात खांद्यावर अंथरुणाची वळकटी आणि बगल-थैलीत चणे कुरमुरे खायला घेऊन खेड्या-पाड्यात प्रचार कार्यासाठी हिंडत होता. तिथे त्याला टायफाईड झाला. अमदाबादेस मला ही बातमी कळताच मी ताबडतोब निघालो; त्या गावात पोचलो. पुढे ताप उतरल्यावर समुद्रकाठी असलेल्या बोर्डीला त्याला हवा पालटासाठी घेऊन आलो.

उन्हाळ्याचे दिवस आणि बोर्डीच्या दर्याकिनारी जुहूप्रमाणेच खेड्यातल्या माळी लोकांच्या वाड्या. तेवढ्यात मी आल्याची खबर मिळताच डझन-दीड डझन मित्र कुटुंबे बोर्डीला टपकली.

महात्मा गांधीनी सुरू केलेला खजूरीचा रस म्हणजेच नीरा. तिचा प्रचार त्या वेळी नव्यानेच सुरू झाला होता. ठाणे जिल्हा तर खजूरी नि ताडांचे माहेरघरच आणि मी तर दुधाप्रमाणे तो नीरा गॅलनच्या प्रमाणातच घटाघटा प्यायचो.

आम्ही तर 'सग्या सोयऱ्यांना' बरोबर घेऊन झुंजूमुंजू झाले की पहाटेच्या अंधारात सूर्योदयापूर्वी नीरा घटाघटा प्यायचो. तिथे विनोदाची सामग्री आयतीच उपलब्ध व्हायची, दररोज न चुकता आम्ही मोठ्या उत्साहाने जायचो. त्यामुळे, बेहरामजीची गिऱ्हाइकी भलतीच वाढली होती.

या बहिरामजी कोळ्याची सारी हयात ताडी प्यायला आलेल्यांबरोबर माथेकूट आणि शिव्यागाळी करण्यात गेलेली. त्याच्या ती संवय अंगातच मुरलेली. तो आम्हाला पण त्यातलेच समजू लागला. तो आम्हाला 'लवाड' म्हणायचा. तो पेले कमी भरायचा आणि माप खूप हलवायचा. नीरेची मडकी धुवायचा नाही. मापाची कल्हई गेलेली असायची.

"भुईवर ठेवू नको. माती लागते." असे म्हटले की तो मापाचे बूड उघड्या अंगावर दोन वेळा पुसून मग नीरेने भरलेल्या घड्यात बुचकळी.

: ४ :

तिसरा नमुना आहे तो जन्मजात पंतोजीचा. हाताला खरूज, डोकीला शेंडी-डोळ्याना चिपडे, नाकातून वारंवार गळणारा शेंबूड, हातपाय नि तोंड अगदी ओंगळ, अतिशय मळके कपडे, कधी न धुतलेली वर्षानुवर्षांची जुनी मळकट आणि घाणेरडा वास येणारी गांधी टोपी किंवा तसाच कळकट फेटा. दहा बारा पोरांना

सुदामजीच्या वैराग्यवृत्तीने जीव तोड तोडून शिकवणारा हा मास्तर. पण लिहायचा इतके सुंदर की पुसूच नका. पण काना–मात्रा यांची जुळणी करताना 'काका आज मेला आणि काकी कुटते आहे' असा घाट! पण त्यावर कडी करून वर म्हणतो "ई तर जुळवून सुधारून वाचतलच. 'ई' मध्येच डोळयाना चोळावं लागतं. डोळे फोडून कोण घेतो ? अशाच एका वावया लेखकाला मी ओळखतो. त्याचे लिखाण पाहून तर चकित व्हावे. पहिल्या प्रतीचे–पण पानोपानी पंधरा चुका ठरलेल्या. तो स्वतः असाच घट्ट गेंडयाच्या कातडीचा म्हणावा असा. म्हणतो, 'हे तर वाचक सुधारून वाचतो. अशी वाळंती कोण घुतो ? जाणत्यांची वचने अवतरणात देण्याची त्याला हौस. पण मुळातला पाठ शोधून काढून मग लिहायचा तर वांधा! म्हणतो, "वचन प्रसिद्ध आहे. सर्वांना ठाऊक आहे. खोदाखोदी करायचा खटाटोप कशाला करायचा ?"

आता मी 'नघरोळ' शब्दाचा अर्थ चालू शतकाच्या (विसाव्या शतकाच्या) पहिल्या दशकात शिकलो. "कुवाडियो, उट्टर, नींकर, हाडोहाडनो बेपरवा, नकोर, रीढो, अघोरी, ओघराला, दीर्घसूत्री."

याचे हे तऱ्हेवाईक थोडे नमुने स्वतः अनुभव घेऊन मी अधून मधून जमवीत आलो आहे."

■

जव्हेरी व्हिला
११, गिल्डर लेन, मुंबई ८

तार्किक प्रत्यक्षार्थवादाचे उद्‌गाते ए. जे. एयर : एक टिपण

मु. वा. बखले

[आधुनिक तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात अग्रगण्य समजले गेलेले ब्रिटिश तत्त्वज्ञ ए. जे. एयर यांचे नुकतेच–जून १९८९ मध्ये–निधन झाले 'तार्किक प्रत्यक्षार्थवाद' (Logical Positivism) या नावाने प्रसिद्ध झालेली एक जी अत्यंत प्रभावी चळवळ या शतकाच्या दुसऱ्या दशकाच्या शेवटी युरोपमध्ये – ऑस्ट्रियातील व्हिएन्ना याठिकाणी – सुरू झाली त्या चळवळीची मुहूर्तमेढ इंग्लंडमध्ये करण्याचे श्रेय हे एयर यांचेच ! त्यांच्या तत्त्वज्ञानाची ही तोंडओळख मराठी वाचकांना करून देण्याचा हा अल्पसा प्रयत्न.]

विद्यापीठीय शिक्षण ऑक्सफोर्डमध्ये १९३२ साली पूर्ण केल्यानंतर एयर यांची क्राईस्ट चर्च येथे तत्त्वज्ञानाचा व्याख्याता म्हणून नेमणूक करण्यात आली. ती स्वीकारण्यापूर्वी केंब्रिज विद्यापीठात त्या काळी अतिशय बोलवाला असलेल्या विट्गेन्स्टाईन या तत्त्वज्ञाच्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा असा विचार एयर करीत होते. परंतु त्यांचे शिक्षक असलेले प्रा. राईल यांनी त्यांना केंब्रिजपेक्षा व्हिएन्ना येथे जाण्याचा उपदेश केला. कारण विट्गेन्स्टाईन काय करताहेत, त्यांचे विचार काय आहेत हे राईल म्हणालेत, आपल्याला माहित आहे. तेव्हा तू व्हिएन्नाला जा, तेथे काय चालू आहे ते बघ, ऐक, आणि परत येथे येऊन आम्हाला ते सांग. आपल्या गुरूच्या आज्ञेनुसार एयर व्हिएन्नाला गेले. त्यांच्या सोबत राईल यांनी श्लिक् (Schlick) या जर्मन तत्त्वज्ञाच्या नावे लिहिलेले ओळखपत्रही त्यांनी नेले होते.

१९२२ साली मॉरिट्झ श्लिक् यांची व्हिएन्ना विद्यापीठात विज्ञानाच्या तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली होती. त्यांच्या प्रयासाने त्यांनी व्हिएन्ना मंडळ (Vienna Circle) या नावाचे एक मंडळ स्थापन केले. त्यात तत्त्वज्ञांपेक्षा शास्त्रज्ञ आणि गणितज्ञच अधिक होते. हे जरी खरे असले तरी त्या शास्त्रज्ञांना आणि गणितज्ञांना आपल्या विषयांच्या तत्त्वज्ञानात अत्यंत रुची होती. कार्नाप, वाईझमान, नॉयराथ (Neurath) ग्योडेल (Godel), आणि स्वतः श्लिक् या मंडळाचे अत्यंत प्रसिद्ध असे सदस्य होते. या शिवाय, मंडळाचे सदस्य नसलेले परंतु ज्यांच्या विचारांचा प्रभाव या मंडळातील सदस्यांवर पडला होता असे विट्गेन्स्टाईन आणि कार्ल पॉपर. एयर जेव्हा या मंडळात शिरले तेव्हा त्यांच्या शिवाय त्यांच्याहून एक–दोन वर्षांनी मोठे असलेले आणि एक अग्रगण्य मानल्या जाणारे, क्वाईन, हेही त्या मंडळाचे सदस्य होते. त्याकाळी व्हिएन्नातील वातावरण कसे असेल याची कल्पना ज्यांना या वरील नावांचा केवळ ओझरता जरी परिचय असेल त्यांनाच करता येईल. त्यातील एक एक तत्त्वज्ञ हा व्यासंगी आणि प्रतिभासंपन्न असा होता. आणि तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात स्वतःचे असे योगदान करणारा होता. अशा वातावरणात एयर यांनी वयाच्या २२ व्या वर्षी प्रवेश केला. आणि परत इंग्लंडमध्ये येऊन वयाच्या २५ व्या वर्षी व्हिएन्ना मंडळात जे काही त्यांनी ऐकले समजून घेतले ते सर्व ग्रंथ रूपाने प्रसिद्ध केले. त्या ग्रंथाचे नाव होते : 'Language, Truth and Logic.' व्हिएन्ना मंडळात जे विचार एयर यांनी ऐकले होते ते सर्व 'Logical Positivism' (तार्किक प्रत्यक्षार्थवाद) या नावाने ओळखल्या जात होते. एयर यांनी आपल्या ग्रंथात या मताचा

हिरिरीने पुरस्कार केला आणि तारुण्यसुलभ जोमाने त्याचे समर्थनही केले. वर म्हटल्याप्रमाणे तार्किक प्रत्यक्षार्थवादाची ओळख इंग्रजी वाचकांना सर्व प्रथम एयर यांनी करून दिली ती त्यांच्या या ग्रंथाच्या माध्यमातून.

१९३६ साली हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. कोणत्याही नवीन विचारप्रवाहाचे 'स्वागत' जसे होते तसेच याही ग्रंथातील विचाराचे झाले ! प्रस्थापितांनी त्याचा धिक्कार केला आणि, एयर यांच्या सांगण्यानुसार, त्यांना ऑक्सफोर्ड विद्यापीठात नोकरी मिळणेही कठीण झाले. प्रकाशकानेही भीतभीतच ५०० प्रती छापल्या ! खपही मोजकाच ! आणि म्हणून या ग्रंथाची चौथी आवृत्ती दुसऱ्या महायुद्धापूर्वी जरी निघाली तरी एकूण प्रती खपल्या दोन हजारच. युद्धानंतर मात्र परिस्थिती पालटली. तरुण पिढीने हा ग्रंथ उचलून धरला. त्यात त्यांना 'खुल्या'वातावरणाचा अनुभव येत होता. या परिस्थितीचे वर्णन करताना एयर म्हणतात : '... Oxford philosophy before the war was terribly sterile. There were some old men who were interested only in the history of philosophy, interested only in repeating what Plato had said, and in trying to put down anyone who tried to say anytbing new. My book was a huge mine put underneath these people. It seemed to the younger people a liberation-they felt they could breathe-and in that way it had a big historical effect.' [Bryan Magee : Men of Ideas. P. 106]

सुरुंगाची उपमा ज्या ग्रंथाला स्वत: लेखकच देतो अशा ग्रंथात असे कोणते विचार आहेत ज्यामुळे प्रस्थापितांना हादरे बसावेत ?

प्रस्थापित असे कल्पनावादी, अध्यात्मवादी, तत्त्वज्ञाचा असा दावा होता की जे विश्व आपणास दिसते, अथवा दिसू शकते, त्याच्या पलिकडे, किंवा त्याच्या मुळाशी काहीतरी तत्त्व आहे किंवा काहीतरी पदार्थ आहे. असे तत्त्व (अथवा पदार्थ) इंद्रियातीत आहे. परंतु त्याचे ज्ञान मात्र आपणास अंत:प्रज्ञेच्या माध्यमातून होऊ शकते. अशा तत्त्वाला (अथवा पदार्थाला) 'परमेश्वर', 'परमात्मा', किंवा अन्य कोणत्यातरी नावाने संबोधिल्या जाते. या मताला 'अतिभौतिकी दावा' (Metaphysical claim) असे म्हणू या. एयर यांच्या काळी जे 'प्रस्थापित' होते ते या मताचे होते. एयर यांची भूमिका या मताच्या विरोधात होती.

या संदर्भात एयर आणि फादर कोपल्स्टन यांच्यामधील एक संवाद उल्लेखनीय आहे. एकदा कोपल्स्टन एयर यांना उपहासाने असे म्हणाले की तत्त्वज्ञ हा एक असा आंधळा मनुष्य असतो, जो एका काळ्या मांजराचा शोध एका अंधाऱ्या खोलीत घेत असतो. तेथे वास्तविक मांजरच नसते ! थोडक्यात, तत्त्वज्ञ जे काही करत असतो ते निरर्थक असते. यावर एयर यांची प्रतिक्रिया मार्मिक होती. ते म्हणाले की हे तत्त्वज्ञानाविषयी खरे आहे असे क्षणभर मान्य करू या. परंतु यावर कळस म्हणजे धर्मज्ञ तर असा दावा करतो की ती मांजर त्याला गवसली !! म्हणजे वास्तविक जेथे मांजरच नसते तेथे त्याला मांजर गवसली असा धर्मज्ञांचा दावा असतो. या संवादावरून एयर कोणत्या प्रकारच्या 'प्रस्थापितां'च्या विरोधात आहे हे आपल्या लक्षात येऊ शकते. आपला विरोध त्यांनी खालील पद्धतीने दर्शविलेला आहे.

आपल्या ज्ञानाची सुरवात ही अनुभवापासून होते. जो अनुभव आपणास मिळतो तो आपण भाषेच्या साह्याने व्यक्त करीत असतो, त्या विषयी भाषेच्या साह्याने बोलत असतो. भाषेचे माध्यम नसते तर इतरांच्या मनात काय आहे, काय चालू आहे याचा थांगपत्ता आपल्याला लागूच शकला नसता. अर्थात, कदाचित हाव-भावावरून हे आपणास कळू शकले असते; कधीकधी कळतेही. परंतु ते निश्चित, काटेकोर असते असे आपणास म्हणता येणार नाही. भाषेतील शब्द, अभिव्यंजने (expressions), वाक्ये ही जितक्या प्रमाणात निश्चित, काटेकोर अर्थाची असतात, तितक्या प्रमाणात हावभाव नसतात. म्हणूनच प्राधान्य भाषेला आहे. तेव्हा आपले अनुभव आपण भाषेच्या माध्यमातून व्यक्त करीत

असतो, सांगत असतो. ही भाषा म्हणूनच एक अत्यंत प्रभावी माध्यम आहे. या साधनामुळेच आपण एकमेकांशी विचारविनिमय करू शकतो, विचारांची देवाणघेवाण करू शकतो. आणि हे शक्य होते कारण भाषेला निश्चित असा अर्थ असतो. मानवी व्यवहारातील भाषेचे हे महत्त्वाचे स्थान लक्षात घेऊन एयर असा प्रश्न उपस्थित करतात की भाषा अर्थपूर्ण केव्हा होते ? म्हणजे भाषा अर्थपूर्ण आहे हे ठरविण्यासाठी काही निकष आपल्याला सांगता येतील काय ? केवळ व्याकरणाच्या नियमांचे पालन केल्याने भाषा— म्हणजे भाषेतील वाक्य—अर्थपूर्ण ठरणार नाही. उदा. 'प्रेमा तुझा रंग कसा ?' हा प्रश्न अर्थपूर्ण आहे काय ? हे ठरविण्यासाठी केवळ व्याकरणाच्या नियमांचे पालन त्यात झाले आहे काय हे बघणे पुरेसे नाही. कारण या उदाहरणात व्याकरणाचे नियम पाळले असूनही याला काही अर्थ नाही असे म्हणता येईल. मग अर्थपूर्णतेचा दुसरा कोणता निकष आपल्याला सांगता येईल ?

एयर याचे उत्तर असे देतात : अर्थपूर्ण वाक्यांचे वर्गीकरण केल्यास आपणास असे दिसून येते की काही वाक्ये ही स्वतंत्रपणे अर्थपूर्ण असतात तर काही तशी नसतात. उदाहरणार्थ, 'पत्नी ही स्त्री असते' हे वाक्य अर्थपूर्ण आहे. परंतु त्याची अर्थपूर्णता वाक्याच्या 'बाहेर' नसते तर ती त्या वाक्यातच असते. 'पत्नी' या शब्दाच्या अर्थातच 'स्त्री' या शब्दाच्या अर्थाचा अंतर्भाव होतो. म्हणूनच असे वाक्य सर्वदा सत्य असते असे आपण समजतो. 'पत्नी ही स्त्री नाही' असे म्हणण्यात उघडच आत्मविसंगती दिसते. उलट, 'सीता रामाची पत्नी आहे,' हे वाक्य अर्थपूर्ण असून त्याची अर्थपूर्णता वाक्याच्या 'बाहेर' असते. म्हणजे, हे वाक्य अर्थपूर्ण आहे की नाही हे बघण्यासाठी आपल्याला वस्तुस्थितीचा विचार करावा लागेल, वास्तविक सीता रामाची पत्नी आहे किंवा नाही हे बघावे लागेल. या प्रमाणे काही वाक्ये स्वतंत्रपणे अर्थपूर्ण असतात तर काही तशी नसतात. अर्थात हे खरे की स्वतंत्रपणे अर्थपूर्ण असणाऱ्या वाक्यांच्या साह्याने आपणास काही नवीन ज्ञान मिळत नाही; उलट दुसऱ्या प्रकारच्या वाक्यांच्या साह्याने आपणास नवीन ज्ञान मिळत असते. एयर पहिल्या प्रकारच्या वाक्यांना 'विश्लेषक' (Analytic) म्हणतात तर दुसऱ्या प्रकारच्या वाक्यांना 'संश्लेषक' (Synthetic) म्हणतात.

थोडक्यात, संश्लेषक वाक्यांना जो अर्थ प्राप्त होतो तो वस्तुस्थितीशी त्यांचा जो संबंध असतो त्यामुळे प्राप्त होतो. दुसऱ्या शब्दात, एखादे संश्लेषक वाक्य तेव्हाच अर्थपूर्ण होईल जेव्हा त्याच्यासारखी वस्तुस्थिती आहे की नाही हे आपण पाहू शकू. जर एखाद्या तथाकथित संश्लेषक वाक्याच्या संदर्भात आपणास असे आढळले की त्याच्यासारखी—म्हणजे त्याच्या अर्था-सारखी—वस्तुस्थिती आहे की नाही हे आपण पाहू शकत नाही, ठरवू शकत नाही तर मग असे वाक्य हे अर्थपूर्ण न राहता अर्थशून्य राहील असे एयर समजतात. विज्ञानातील वाक्ये ही संश्लेषक असतात तर गणित, तर्कशास्त्र यातील वाक्ये विश्लेषक असतात. परंतु अतिभौतिकी वाक्यांचे काय ? ती विश्लेषक असतात तर गणित, तर्क-शास्त्र यातील वाक्ये विश्लेषक असतात की संश्लेषक ? या प्रश्नाचे उत्तर एयर असे देतात की ती वाक्ये ना विश्लेषक असतात, ना संश्लेषक. आणि म्हणून ती अर्थशून्य असतात. उदा. 'अंतिम सत्य चैतन्यरूप आहे' हे वाक्य विश्लेषक नाही किंवा संश्लेषकही नाही. विश्लेषक नाही कारण या वाक्याची अर्थपूर्णता वाक्यान्तर्गत, 'पत्नी स्त्री असते' या वाक्यासारखी नाही. आणि ते संश्लेषक ही नाही कारण त्या वाक्यासारखी म्हणजे त्याच्या अर्थासारखी—वस्तुस्थिती आहे की नाही हे ठर-विण्यासाठी आपणाजवळ कोणतीही निश्चित पद्धती नाही. अशा परिस्थितीत ते वाक्य अर्थशून्य आहे असेच आपणास म्हणावे लागेल. जे अतिभौतिकी वाक्याविषयी खरे आहे ते धार्मिक वाक्यांविषयी देखील खरे असणार.

एयर यांचे वरील मत अर्थातच धर्म-मार्तंडांना आणि कल्पनावादी प्रस्थापित तत्त्वज्ञांना धक्का देणारेच होते. ज्या तत्त्वांवर आतापर्यंत श्रद्धा ठेवून ज्यांनी जीवन व्यतीत केले त्यांना ती तत्त्वे अर्थशून्य आहेत असे कोणी सांगितल्यास ते

धक्कादायी वाटले नसते तरच नवल ! हे स्पष्टच आहे की एयर यांचे वरील मत हे त्यांच्या वैज्ञानिक दृष्टीचे फलित आहे. विज्ञानात ज्याप्रमाणे अनुभवाशी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे संबंधित असलेल्या विधानांचाच विचार करण्यात येतो त्याप्रमाणे तत्त्वज्ञानातही तो होणे आवश्यक आहे. कारण त्यामुळे विधानांना निश्चिती प्राप्त होते, निःसंदेहता प्राप्त होते. अनुभवातीत, इंद्रियातीत अशा तत्त्वांचा अथवा पदार्थांचा विचार ज्या विधानांमध्ये होतो ती विधाने वैज्ञानिक दृष्टिकोनातून अर्थशून्य ठरतात. म्हणूनच एयर यांच्या तत्त्वज्ञानात्म भूमिकेला 'प्रत्यक्षार्थवाद' (Positivism) अथवा 'अनुभववाद' (Empiricism) म्हणतात. हा प्रत्यक्षार्थवाद 'तार्किक' आहे याचा अर्थ त्या प्रत्यक्षार्थवादाला आधुनिक सांकेतिक तर्कशास्त्राचा आधार दिलेला आहे.

तार्किक प्रत्यक्षार्थवादाची चळवळ एयर यांच्या तारुण्यात जेवढी प्रभावी होती तेवढी ती नंतर राहिली नाही याची कबुली स्वतः एयर यांनीच दिलेली आहे.

'Language, Truth and Logic' हा एयर यांचा ग्रंथ अत्यंत लोकप्रिय झाला असला तरी एयर यांच्या मते त्यांचा 'Problem o Knowledge' हा ग्रंथ अधिक महत्त्वाचा आहे. या ग्रंथात त्यांनी ज्ञानाचे प्रकार, ज्ञानाचे स्वरूप, ज्ञानाचे प्रामाण्य, संशयवाद इत्यादी प्रश्नांचा उहापोह केला आहे. या ग्रंथापूर्वी प्रसिद्ध झालेला एयर यांचा यांचा ग्रंथ होता. "The Foudation of Empirical Konwledge' या ग्रंथात ज्ञानाचा विषय वस्तु असते की संवेदना या प्रश्नाचा विचार एयर यांनी केला आहे. तसेच वस्तुवाची शब्दांचा वापर ज्या वाक्यात आपण करतो त्या वाक्यांचा संबंध इंद्रियानुभव सूचित करणाऱ्या वाक्यांशी असतो काय–आणि असेल तर त्याचे स्वरूप काय असते–या अतिशय महत्त्वाच्या प्रश्नाचीही चर्चा एयर करतात. याशिवाय, त्यांच्या 'The Origins of Pragmatism' या ग्रंथात एयर 'अर्थ'विषयक वर्तनवादी उपपत्तीची मीमांसा करतात. त्यांचा शेवटचा तत्त्वज्ञानात्मक ग्रंथ म्हणजे 'The Central Questions of Philosophy' हा होय. त्यात त्यांची परिपक्व भूमिका आपणास दिसते. सुरवातीच्या काळात जो विचार त्यांनी केला त्यातील जे दोष त्यांना दिसले त्यावर त्यांनीच केलेली आणि नव्याने विचार करण्याचा केलेला प्रयत्न त्यात दिसतो. आयुष्याच्या संध्याकाळी एयर यांनी आत्मचरित्र लिहिण्यास प्रारंभ केला. पहिल्या खंडाला त्यांनी 'Part of my Life' असे नाव दिले आणि दुसऱ्या खंडाला 'More of my life' असे नाव दिले.

त्यांच्या सर्व ग्रंथांमध्ये अनेक प्रश्नांची तात्त्विक चर्चा त्यांनी केली आहे. त्या चर्चेचा तपशील आणि बारकावे देणे केवळ अशक्य आहे. तशी अपेक्षाही अशा टिपणात तोंडओळख करून देणे येवढाच मर्यादित उद्देश या टिपणाचा आहे. उमद्या व्यक्तिमत्त्वाच्या, रसिक मनाच्या आणि अत्यंत प्रभावी लेखन कौशल्य असणाऱ्या या तत्त्वज्ञाला ही विनम्र आदरांजली ! ■

[एयर यांच्या ज्या दोन मुलाखती बी. बी. सी. वर Bryan Magee यांनी घेतल्या त्या अनुक्रमे 'Modern British Philosophy' (पृ. ४८–६५) आणि 'Men of Ideas' (पृ. ९४–१०९) या मॅगीने संपादित केलेल्या ग्रंथात प्रसिद्ध झाल्या आहेत. जिज्ञासूंनी त्या पहाव्यात.]

लेखकांना विनंती

साहित्य पाठविताना त्यावर संपूर्ण नाव व संपूर्ण पत्ता लिहिणे आवश्यक आहे. नाव व पत्ता लिहिलेले आणि पुरेसे पोस्टेज लावलेले पाकीट लेखनासोबत असेल तरच साहित्य परत पाठविणे शक्य होईल.

[[[[[संग्राह्य]]]]]

आपल्या स्मरणात अशा काही गोष्टी असतात की ज्या आपल्या वाचनात आलेल्या असतात, ठाऊक असतात व त्यांचे मूल्य हे वर्तमानातही जाणवत असते. असे काही संग्राह्य, मूल्य असलेले लेखन, त्याची संग्राह्यता, अभ्यसनीयता व उपयोजितता, वर्तमानातील वाचकांच्या देखील ध्यानी असावी या हेतूने त्यांचेपर्यंत पोहचवण्याचा हा एक उपक्रम. सुधीर बेडेकर यांच्या मार्च १९७१ च्या 'सत्यकथे'च्या अंकात प्रकाशित 'हजार हातांचा ऑक्टोपस' या लेखाच्या स्मरणाने [सत्य-कथेच्या सौजन्याने] या उपक्रमास सुरुवात करीत आहोत.

हजार हातांचा ऑक्टोपस

[सौजन्य : सत्यकथा, मार्च/१९७१]

: सुधीर बेडेकर

आजकाल काही शब्द भलतेच स्वस्त झाले आहेत. उदाहरणार्थ, 'प्रस्थापित' आणि 'क्रांती.' ते इतक्या ठिकाणी, इतक्या तऱ्हेने आणि इतक्या वेळा वापरले जात आहेत की त्यांना धारच उरलेली नाही. जेव्हा सत्तास्थानावरचे मंत्री क्रांतीविषयी बोलायला लागतात तेव्हा त्याला काही अर्थ उरत नाही. या गुळगुळीत गोंधळातून वाट काढायची असेल तर प्रथम 'प्रस्थापित' म्हणजे नेमका काय प्रकार आहे हे समजून घेतले पाहिजे. तरच समाजव्यवस्था आहे तशी टिकवून ठेवण्याची प्रक्रिया कशी चालू आहे ते कळू शकेल व त्याविषयी काही करता येईल.

आणि हा गोंधळ होण्याचे कारण म्हणजे 'प्रस्थापित' नावाची कुठली तरी न दिसणारी, हाती न लागणारी अमूर्त वस्तू आहे, अशी भावना. "भांडवलदार व जमीनदार वर्गाची सत्ता चालणारी, एक पिळवणूक शक्य करणारी यंत्रणा" वगैरे वर्णने त्यामुळेच निकामी ठरतात. जोवर ही यंत्रणा माझ्या रोजच्या जीवनात मला कोणकोणत्या विशिष्ट रूपांमध्ये सामोरी येते हे मला सांगितले जात नाही, तोपर्यंत माझ्यापुरते तरी 'प्रस्थापित' असे काही नसतेच. त्याविरुद्ध काही करण्याची मला जरुरीही भासत नाही. अदृश्य राक्षसाची भीती वाटते, पण त्याबद्दल

आपण काहीच करू शकत नाही. म्हणून व्यक्तीच्या रोजच्या जीवनापर्यंत हे प्रस्थापिताचे घोंगेरडे हात कसे पोहोचत असतात, हे पाहायला हवे. व्यक्तीलाच स्वतःच्या दास्याचा जिवंत अनुभव येऊ शकतो. अन हा आल्याशिवाय या दास्याचे स्वरूप तिला कसे कळणार ? व ती त्यापासून मुक्त कशी होणार ? तो अनुभव तिला आज हरघडी येतो आहेच. फक्त उमजत नाही आहे. तो तिला समजून देण्याचा प्रयत्न ही दास्यमुक्तीच्या लढ्यातली पहिली पायरी असणार, हे सरळ आलेच.

प्रत्येकजण दिवसातला काही वेळ काम करून पैसे कमावतो व उरलेला वेळ इतर गोष्टी करतो, पैसे खर्च करतो. पण काम करताना जो मी असतो तोच इतर वेळीही असतो. म्हणूनच एखादा विद्यार्थी घेतला तर त्याच्या 'कामा'चे स्वरूप अन त्याच्या सांस्कृतिक घडणीचे स्वरूप यांचा एकजीव व्यूह झालेला असतो; तो जगत असतो. किंवा एखाद्या कामगाराचे काम व त्याची राहणी दोन्ही मिळून एक माणूस म्हणून त्याचे आयुष्य असते. साहजिकच माणसाची आर्थिक पिळवणूक करायची तर त्याबरोबरच त्याची सांस्कृतिक गळचेपी व्हायलाच हवी. त्याच्या आवडीनिवडी, मूल्यकल्पना, प्रेमे अन भये–सगळ्यांमधून त्याचे मन असे घडलेले असते की, स्वतःची आर्थिक पिळवणूक तो मुकाट्याने होऊ देतो. शूद्राने शूद्र म्हणून वागायला हवे असेल तर आपण ब्राह्मणा-पेक्षा हीन दर्जाचे आहोत, हे त्याला पटले पाहिजे. स्त्रीचे स्वातंत्र्य हिरावून घ्यायचे असेल तर आपण अबला आहोत, अन पातिव्रत्यच आपल्या आयुष्याचे सार्थक आहे, हे तिच्या मनात ठसले पाहिजे. जिवंत झाले पाहिजे. तिला अमूक रीतीने वागायला या कल्पनांनी भाग पाडायला पाहिजे, सुखद केले पाहिजे. म्हणूनच भांडवलशाही वा सरंजामशाही अर्थव्यवस्थेबरोबरच प्रस्थापिताला सांस्कृतिक–सामाजिक कार्य करणारी यंत्रणाही उभारावी लागते. प्रस्थापिताचा हात जसा माझ्या खिशात जात असतो, तसेच त्याच्या तोंडावरचे स्मितसुद्धा मला भुलवत असते. अर्थव्यवस्थेतली पिळवणुकीची व्यवस्था चट्कन लक्षात येऊ शकते; पण हे सांस्कृतिक स्मित फसवे असते. व्यक्तिस्वातंत्र्याच्या, नीतीच्या, धार्मिकतेच्या, फार काय, सौंदर्याच्या व सत्याच्या कल्पनांमधूनही ते वावरत असते, मोहवत असते, गुलाम करत असते.

सकाळी उठल्याबरोबर वर्तमानपत्र वाचल्या-शिवाय राहाणारा माणूस विरळाच. मुंबईला काय चालले आहे त्यापासून, व्हिएतनाममध्ये अमेरिकेचे सैन्य किती आहे, येथपर्यंत सगळे आपल्याला वर्तमानपत्रे सांगणार. त्या माहिती-वरून मी माझी मते बनवणार, पण जर बातम्या चुकीच्या दिल्या तर ? वा काही बातम्या दिल्याच नाहीत तर...? आणि आज महाराष्ट्रातली इंग्रजी व मराठी वर्तमानपत्रे उच्च वर्गाच्या हातात आहेत. भांडवलदार किंवा लहान जिल्ह्यांच्या गावातले मोठे शेतकरी यांच्या तंत्रा-नुसार ती चालत आहेत. पर्यायाने वर्तमानपत्रांद्वारा माणसाची मने प्रस्थापिताला विरोध न करणारी करण्याचा प्रयत्न त्यातून होत आहे, हे आलेच. एका वृत्तपत्रांच्या जगातील मोठ्या व्यक्तीने भाषणात सांगितले की, ध्येयवादी, सत्यप्रिय वगैरे माणसाने वृत्तपत्र चालवण्याचा काळ आता गेला. अहो, चांगले वृत्तपत्र चालवायचे म्हणजे लाखो रुपयांचे भांडवल हवे. अमेरिकेत एक बातमीदार ठेवायचा म्हणजे वर्षाला वीस हजार रुपये लागतात. मोठा प्रेस हवा ! थोडक्यात ! सत्य–बित्य आता विसरा. आपले दालमिया, जैन, वगैरे लोक आहेतच ! वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके या सगळ्यावर या ना त्या रूपात असे नियंत्रण ठेवले जात असते. लोकांच्या दृष्टीने महत्त्व कोणत्या बातमीला, लेखाला आहे ते 'वस्तुनिष्ठ' दृष्ट्या ठरविले जाते. 'सोबत' सारख्या साप्ताहिकाचा विषारी प्रचार आज आपण पाहातो आहोच. पण एवढ्यानेच भागत नाही. शासन हा प्रस्थापिताचा महत्त्वाचा भाग. जी कामे उच्च वर्गाला प्रत्यक्षपणे करता येत नाहीत ती शासन त्यांच्याकरता करत असतेच. महाराष्ट्र सरकारच्या पब्लिसिटी विभागाच्या जाहिराती कारखानदारांच्या जाहिरातींच्या बरोबरीने मासिकांची मलपृष्ठे सजवत असतात.

निरनिराळ्या सवलतींनी शासन विशिष्ट मासिकांना वा साप्ताहिकांना उचलून धरू शकते वा पाडू शकते. पण कोणी म्हणेल, आर्थिक साहाय्य दिले म्हणून काय झाले ? जर संपादक–लेखक स्वतःशी प्रामाणिक राहातील तर...त्याचे उत्तर पुढे येईलच. सध्या एवढेच की, अगदी मालकीच्या दृष्टीने पाहिले तरी उच्च वर्गाचे हात बहुतांश छापील शब्दांमागे असतातच, मग बातम्यांवर नियंत्रण करून वा प्रसंगी त्या विकृत करूनही; अग्रलेखांमधून व 'साहित्य–शास्त्र–मनोरंजन' विभागांमधल्या लेखांमधून माणसांना आकार दिला जात असतो; त्यांची मने घडवली जात असतात. फार काय, सिनेमाच्या व नोकरीच्या जाहिराती वृत्तपत्रांतूनच मी पाहू शकतो दैनंदिन जीवनाच्या सर्व क्षेत्रात ते शिरत असते. मी टूथ-पेस्ट कोणती वापरावी व पुस्तके कोणती वाचावी, हे त्यातच सांगितलेले असते; 'साम्यवाद हा एक भयंकर राक्षस आहे' हे, आणि 'यशवंतराव प्रतिशिवाजी आहेत' हेही. एवढेच नाही, तर हे सगळे का, कसे–तेही !

एकूण काय, तर प्रस्थापिताविरुद्धचा लढा म्हणजे काहीही न वाचणे !–असेही म्हणणारा एक महाभाग आमच्या ओळखीचा आहे. (तो सध्या फक्त गुलाबाच्या झाडांची जोपासना कशी करावी, एवढ्याचबद्दल वाचन करतो.) पण वर्तमानपत्रे, मासिके वगैरेंचे महत्त्व, वरचे सगळे खरे असूनही, आहेच. आजच्या समाजव्यवस्थेतहे सगळे अपरिहार्य आहे. हे समजून घेऊन त्याचा योग्य वापर करणे म्हणजे लढा. आणि इथेच या यंत्रणांमध्ये वावरणाऱ्या व्यक्तींचा प्रश्न येतो. दुर्दैवाने म्हणा किंवा सुदैवाने, आमचे सगळे विचारवंत, कलावंत वगैरे वगैरे एक तर प्राध्यापक तरी आहेत किंवा मोठमोठ्या परकीय वा इथल्याच संस्थांमधले पदाधिकारी, संपादक असे आहेत. पैसे व प्रतिष्ठा या दोन साधनांनी या लोकांना सहजपणे मिंधे बनवले जात आहे. या सगळ्याची यंत्रणा कशी चालते हे तपासून पाहाणे उद्‌बोधकच नव्हे. तर चीड आणण्याइतके मनोरंजक आहे ! कुठूनही सुरुवात करा–शेवटी एकच चिवट, चिकट वर्तुळ. प्रकाशनसंस्था कशावर चालतात ? टेक्स्टबुकांवर. टेक्स्ट-बुके ठरवली जातात शासनाच्याकडून वा विद्यापीठांकडून. विद्यापीठाला अनुदान देते शासनच. अर्थात, तेथल्या नेमणुकी एखाद्याची 'पात्रता' पाहूनच होतात यात नवल कसले ! लेखक जगतो प्रकाशनसंस्थांच्या आधारावर, किंवा प्राध्यापक म्हणून. वाङ्‌मयीन अथवा इतर निकष ठरवणार हेच लोक. शासनाच्या पारितोषिक कमिट्यांमध्ये जे काही राजकारण चालते ते केवळ अवर्णनीय आहे. एक पंच तेथे दिलेली दोनशे पुस्तके वाचून गेले–सगळ्यांचे मूल्यमापन वगैरे करून, तिथल्या लोकांनी काहीच वाचलेले नव्हते, पण बक्षिसे कोणाला द्यायची ते मात्र इतर सारासार विचार करून आधीच ठरलेले ! त्या विशिष्ट वर्षी जे घडले ते प्रत्येक वर्षी घडत असणारच. एकमेकांना सांभाळून घेतच हे राक्षसी यंत्र चालू ठेवले जात आहे. बाकी सगळे आणि मुख्य म्हणजे माणसे पायदळी तुडवली जात आहेत.

आणि हे सगळे झाले ढोंगी, अप्रामाणिक व्यक्ती म्हणून या सगळ्यांविषयी. पण प्रस्थापित सर्व आपले कार्य कळूनसवरून करत असते, असे मानायची गरज नाही. त्यातले काही आपोआपही होत असते. या माणसांच्या कल्पना, त्यांचे विचार आपोआप एकमेकांसारखे होत असतात. मग आपण सत्य, नीतिमूल्ये, सौंदर्य वगैरेंचा खराखुरा शोध घेत आहोत, स्वतःशी प्रामाणिक आहोत; असेही त्यांना वाटत असते. मराठी विचारवंतांची एकंदर पातळीच इतकी फालतू आहे की हे म्हणणेही थोडे जास्तच आहे. तरी पण जे काही विचार आहेत तेही प्रस्थापिताला पूरक, पोषक असेच असतात.

साहित्याचे घ्या. लोकप्रिय साहित्य कोणते तर तर स्वामी, श्रीमान योगी, मृत्युंजय, दुर्दम्य, वगैरे कादंबऱ्या; अन शेकड्यांनी होणारे नाटकांचे प्रयोग. शिवशाहिरी बोकाळणे, कर्ण, संभाजी, टिळक या ऐतिहासिक विषयांवरील वाङ्‌मय लोकप्रिय होणे, हा केवळ योगायोग नव्हे. इतिहासाची अफू खायला घालून एक तर सध्याच्या परिस्थितीविषयी खऱ्या जाणिवा येण्याला विरोध होतो, व दुसरे म्हणजे आजचे प्रश्न परंपरागत,

बुरसटलेल्या मार्गांनीच सोडवणे कसे शक्य व इष्ट आहे ते सांगितले जाते. शिवसेना वा हिंदुत्ववादी प्रवृत्तींची वाढ आणि या साहित्याची लोकप्रियता यांचे मूळ एकच आहे. नाटकांमधल्या एकत्र कुटुंबाचा व हिंदु–आर्य स्त्रीच्या कल्पनांचा पाठपुरावा असाच आहे. थोडक्यात म्हणजे, भयग्रस्त अन असाहाय्य मध्यमवर्गीय मनाला खोटा दिलासा देऊन स्थिर करणे वा मागची दिशा दाखवणे यातून साधले जात असते. वसंत कानेटकर, पु. ल. देशपांडे, सुधीर फडके इत्यादी नावांमागे त्या प्रेरणा कळत न कळत काम करत असतात. साहित्यातला दुसरा लोकप्रिय प्रांत म्हणजे मनोरंजन करणारी मासिके. कॉलेजातली मुलेमुली, आवराआवर झाल्यावर लोळत वाचणारी गृहिणी, थकून घरी आलेला कारकून, यांना चुरचुरीत, खमंग पण अत्यंत निरुपद्रवी साहित्य पुरवणारी अक्षरशः शेकडो मासिके आज दरमहा बाहेर पडत आहेत. अश्लीलता––पण मध्यमवर्गीय नीतिकल्पनांना मुळात न हादरवणारी; विनोद––पण दुसऱ्यांच्या जिवावर केलेला, कुजका, उथळ; प्रेम––बीम–पण फक्त स्वप्नाळू, सोनेरी केसांचे, निळ्या डोळ्यांचे, मुळीच घाम न येणारे, माती न लागलेले. अप्सरा–रंभांपासून हंस–मोहिनीपर्यंत ही औट घटकेची करमणूकसुद्धा वरील प्रकारचे घातकी कार्य करत असते. माझा संताप आणि स्वतःबद्दल येणारी कीव विसरून जाण्याकरता अॅस्प्रोसारखी मदत करत असते.

आणि अर्थातच–उच्चभ्रू वाङ्मय ! मूठभर लोकांना समजणारे पण तरी तितकेच प्रस्थापित. मला ते माझ्या स्वतःच्या समाजातल्या जगण्याविषयी काही सांगू शकते का ? काही पुढे पाहाणाऱ्या भाववृत्ती माझ्यात आणू शकते का ? नाही. कारण, कला आणि प्रत्यक्ष जीवन यांना या वाङ्मयाने कधीच घटस्फोट घ्यायला लावलेला आहे; आणि हे दोन प्रकारे. एक तर 'काय सांगितले आहे'पेक्षा 'कसे'लाच फक्त महत्त्व देऊन. सौंदर्य म्हणजे शब्दांची कसरत, प्रतिमांचे खेळ, फॉर्म, लय, इत्यादी कल्पना शेवटी हेच करतात. वाङ्मयाला समाजाच्याच काय, व्यक्तीच्याही जीवनापासून दूर नेतात. दुसरीकडे; उत्कटता, अस्सलता, जिवंत अनुभव यांना महत्त्व देणारी विचारसरणी आहे – पण व्यक्तीच्या जिवंतपणाला ! समाजापासून पूर्ण स्वतंत्र झालेल्या, एकाकी व्यक्तीच्या अनुभवाला. त्यामुळे सामाजिक आशय शून्य, आणि पर्यायाने व्यक्तीचेही अपुरे, विपर्यस्त स्वरूपच येथे जाणवू शकते. या वाङ्मयातली दुर्बोधता, अश्लीलता, पोकळपणा अन् गैरलागूपणा हा याच वृत्तींचा परिणाम आहे. माणसाला खच्ची करणारा आहे. एका नजरेत दगड करणारा आहे.

पण याचाही अर्थ आपण सगळ्या साहित्याकडे दुर्लक्ष केले पाहिजे, वा त्याचा तिरस्कार केला पाहिजे असा नव्हे. आशय व फॉर्म, व्यक्तिगतता व सामाजिकता, तसेच कलावंताचे स्वातंत्र्य व त्याची जीवनाशी बांधिलकी (कमिटमेंट) आम्ही जोडीनेच, एकदम मागत राहायला हवे, इतकेच.

याच धर्तीवर विचारांचे क्षेत्रही तपासता येईल. एका वाक्यात बऱ्याचशा वैचारिक लिखाणाचे वर्णन करता येईल : काहीही न सांगता त्यात खूप बोलले जाते. म्हणजेच प्रस्थापिताविरुद्ध काय, कसे, का करावे, ते मी त्यातून कधीच जाणून घेऊ शकत नाही. वस्तुनिष्ठतेच्या, निःपक्षपाती सत्यशोधक दृष्टीच्या नावाखाली कोणतीही ठाम भूमिका घ्यायचे नाकारले जाते. यात पुन्हा अनेक स्तर अन पद्धती. अगदी वरच्या पातळीवर सापेक्षतावादाचा सिद्धांत मान्य असतो ! तुमचेही बरोबर, माझेही बरोबर; किंबहुना बरोबर–चूक ठरवायचे कसे, वगैरे. मग त्याला विटगेनस्टाइनपर्यंत आधार शोधले जातात. जरा खालचे लोक समतोल, वस्तुनिष्ठ विचार करत असतात ! ठामपणे काहीही म्हणणे हा त्यांना बालिश, अज्ञजनांचा उतावीळपणा वाटत असतो. ज्ञान जास्तीत जास्त निरुपयोगी करण्याचा आणखी एक प्रकार म्हणजे ते हवेवर चालवणे. समोरच्या गोष्टींबद्दल चक्क न बोलणे आणि अमूर्त, 'स्वर्गीय' प्रश्नांचा विचार करत राहणे.

विचारवंतांमध्ये आणखी दोन प्रकारचे लोक दिसतात. हे लोक बाजू घेतात; निदान तसे दाखवतात. पण एक तर ते इतके गुळमुळीत बाजू

घेतात की त्यातून हाती काहीच लागत नाही. ' दलितांची उन्नती हेच आपल्या स्वातंत्र्याचे ध्येय आहे ' वगैरे. कॉंग्रेसच्या नेत्यांच्या समाजवादाच्या घोषणा अशा प्रकारच्या असतात. दुसरीकडे इतकी पोथीबद्ध भूमिका घेतली जाते की, प्रत्यक्ष प्रश्नाच्या सोडवणुकीपेक्षा तत्त्वनिष्ठेलाच महत्त्व येते, पूर्वग्रहांनाच प्रत्यक्षता प्राप्त होते ! कट्टर मतांच्या कम्युनिस्टांशी, सर्वोदयवाल्यांशी वा संसदीय लोकशाहीच्या पाठीराख्यांशी चर्चा करून पाहाण्यासारखी आहे; तेथे खरा संवादच अशक्य असतो.

छापील शब्दाखेरीज रेडिओ शिक्षणपद्धती, कुटुंबातली राहाणी इत्यादींमधून जुन्या कल्पना, जुने विचार सतत माणसाला सामोरे येत असतात; आणि सगळ्यांमागे, सगळ्यांमध्ये, सगळ्यांमधून प्रस्थापित उभे असते. त्या सगळ्यांचा येथे विचार करणे अशक्य आहे. धर्माविषयी बोलायचे तर पहाटेच्या रेडिओवरच्या भक्तिगीतांमधून, घरातल्या देवबाप्पामधून; कोवळ्या वयात पहिलीच्या पुस्तकातल्या पहिल्या पानावरच्या ' देवा तुझे किती सुंदर आकाश 'मधून अफू अंगात भिनत जाते. मग जातपात येते. लग्नाच्या वेळी आणि नंतरही नेहमीच तुमच्याबरोबर राहाते; किंवा एकंदर डाव्या विचारसरणीला विरोधही या मार्गामधून फसव्या रीतीने मनांमनांमध्ये निर्माण केला जात असतो. पण लक्षात घेण्याची गोष्ट म्हणजे, ही साधने व छापील शब्द या सगळ्यांचे एकच संपूर्ण एकजीव जाळे माणसाला जखडत असते. कधी त्याला भेडसावून, कधी न कळत—पण नेहमीच गुलाम करू पाहात असते. त्याचे सांस्कृतिक जीवन विशिष्ट तऱ्हेने घडवू पाहात असते. या दास्याचा आर्थिक पिळवणुकीला पूरक म्हणून उपयोग होत असतो. किंबहुना दोन्ही एकत्रित रीत्याच माणसाचे माणूसपण, स्वातंत्र्य, सर्जनशील व्यवहाराची क्षमता नष्ट करत असतात.

प्रस्थापित हा असा आठ सोंडांचा प्रचंड, काळाशार ऑक्टोपस असतो. त्याच्या प्रत्येक सोंडेवर हजारो डोळे असतात आणि त्यांतल्या प्रत्येकातून विळख्यातल्या माणसात काळे विष भिनवले जात असते. त्याला आंधळे व निष्प्रभ केले जात असते. व्यक्तीला प्रत्येक वेळी एकच डोळा सामोरा येतो व डंख करतो. एखादी भिकारीण पाहून त्याला वाईट वाटते, नोकरीच्या अशाश्वतीने हृदय धडधडते, बायको सारख्या साड्या व दागिने मागते म्हणून चीड येते, एखादी कविता वा मॉडर्न आर्टचे चित्र समजत नाही, वा कादंबरी वाचून पोकळ वाटते. आपल्यावर गुंडांचे राज्य आहे हे पाहून संताप येतो. अन स्वत:ची कीव यायला लागते. पण या सगळ्या सुट्या सुट्या घटनांमागे हा ऑक्टोपस वळवळत असतो, फूत्कार सोडत असतो. त्याचे संपूर्ण स्वरूप जाणणे व त्याचा प्रत्येक डोळा विषारी म्हणून ओळखणे म्हणून महत्त्वाचे.

पण आता तुम्ही म्हणाल, मीही अमूर्त गोष्टीविषयी बोलतोय. शेवटी प्रस्थापितही संस्थांचे व त्यांतल्या व्यक्तींचे आहे. अन् प्रत्येक व्यक्ती वाचक म्हणून या प्रेक्षक म्हणून याच जाळ्यात आहे ! जर सगळेच वा जाळ्याचे गुलाम असतील तर प्रश्नच मिटला. दास्यमुक्ती कसली आली आहे ! आणि येथेच पुन्हा एकदा माणसाच्या व्यक्ती म्हणून जगण्याकडे वळावे लागते. या जाळ्यातून स्वत:ची सुटका करून घेणे शक्य असते. अशी खरोखरी सत्यनिष्ठ, स्वतंत्र माणसे आजही आपण समाजात पाहातोच. त्याहीपुढे जाऊन, प्रत्येक माणसाला थोडीशी लाज असतेच, असेही म्हणता यायला फारशी हरकत नसावी. म्हणजेच आज संपूर्ण सांस्कृतिक जीवन वर म्हटल्याप्रमाणे ' खोटे ', ढोंगी, आंधळे झाले आहे हे खरे असले, तरी त्यातही आपल्याला कधी मध्येच एखादी ठिणगी दिसतेही. प्रश्न ती ठिणगी जोपासून वाढवण्याचा आहे. तिचे लाखो सूर्य करण्याचा आहे. थोडक्यात, दास्याला कारणीभूत होणाऱ्या प्रत्येक गोष्टीला विनातडजोड विरोध करणे. मग ती गोष्ट संस्थांमध्ये असेल, त्यातल्या इतर व्यक्तींमध्ये किंवा स्वत:मध्ये. मला आपल्या शर्टला इस्त्री असलीच पाहिजे असे का वाटते ? खरोखरच त्याची जरूर आहे का ? व या प्रश्नाचे उत्तर मी शक्य तेवढ्या स्वतंत्र बुद्धीने विचार करून देतो आहे का ? का प्रतिष्ठेच्या खोट्या

कल्पनांमुळे ? असे मी सतत करत राहिलो तरच प्रस्थापिताविरुद्धचा लढा पूर्ण होईल. आर्थिक क्षेत्रात सहकारी संस्था, राष्ट्रीयीकरण झालेल्या बँका यासारख्या संस्था निर्माण होऊनही काही होत नाही. त्यांच्यातली त्रुटी, त्यांतल्या व्यक्तीं-मधले दोष व त्याचप्रमाणे मी आजवर टाळलेल्या माझ्या स्वतःच्या जबाबदाऱ्या मी ओळखल्या पाहिजेत. व तिन्ही बदलायला सुरुवात केली पाहिजे. याकरता मला माझ्या जुन्या सवयींविरुद्ध लढावे लागेल. तसेच इतर व्यक्ती व संस्थांविरुद्ध. हेच सांस्कृतिक क्रांतीविषयी. शेवटी व्यक्ति-जीवनातले लहान लहान लढे देऊनच हे संपूर्ण प्रस्थापित नष्ट करता येईल;—व त्याचबरोबर, त्याच्यातले चांगले सर्व आत्मसात करून, नव्या स्वतंत्र समाजाची घडण होत जाईल. मार्क्सने माणसाची व्याख्याच ' जग व स्वतः यांना निर्माण करणारा ' अशी केली आहे. त्याची जाणीव जेव्हा त्याला येते, व त्यानुसार तो हा व्यवहार करतो, तेव्हाच तो स्वतंत्र, सृजनशील व जबाबदार होतो; स्वतःला सापडतो.

कोणत्याही एका व्यक्तीकडे लक्षपूर्वक पाहिले असता प्रस्थापिताचा सर्वव्यापी एकसंघपणा विशिष्ट रूपात कळतो. एखादी मुलगी लहान-पणापासून स्त्रीविषयी जे काही ऐकत, पाहात, वाचत असते त्यातून तिच्या मूल्यकल्पना, आवडी-निवडी ठरत जातात. आज आपल्या कुटुंबांमध्ये मुलीला वागणूक वेगळी दिली जाते, संस्कार वेगळे केले जातात आणि या संस्कारांचा मुख्य भाग स्त्रीला हीन दर्जा देण्याचा असतो. एकीकडे शील, पावित्र्य, गृहिणीच्या जबाबदाऱ्या, मातृत्वाची महानता वगैरे वगैरे, आणि दुसरीकडे स्त्री म्हणजे एक वस्तू अन् भोग्य वस्तू आहे ही कल्पना. हे करणाऱ्या अनेक प्रकारच्या साहित्याच्या, नाटक—सिनेमांच्या याद्याच करता येतील. आणि हे सगळे हळूहळू या मुलीच्या आतला एक भाग होत असतो. मग तिलाही आपले शरीर सुंदर दिसावे असे वाटायला लागते. स्त्रियांच्या मासिकातल्या प्रसाधनांच्या जाहिराती, केशभूषा, कादंबऱ्यांतल्या व नाटकांमधल्या स्त्रीच्या प्रतिमा, वर्तमानपत्रां-तल्या बातम्या व त्यावरील लेखन—सगळ्यांतून ती स्वतःला हरवून जात असते. सौंदर्यदिक्षा प्रतिष्ठा तिला नटावला लागते. अन ही प्रतिष्ठा खोटी असते. परतंत्रतेची असते. हवे म्हणून मग ती बाई समाज-कार्य करत नाही, फॅशन म्हणून करते. याउलट जाऊन आपण प्रस्थापिताच्या दृष्टीनेही पाहू शकतो. एका व्यक्तीच्या आतून ऑक्टोपसचे दर्शन घेतले तसे बाहेरून घेऊ शकतो. टाटांसारखा एखादा बडा भांडवलदार, आर्थिक सोडाच, पण किती सांस्कृतिक क्षेत्रांमध्ये हात ठेवून असतो ह्याचा अभ्यास करण्यासारखा आहे. किंवा आपल्याकडे किर्लोस्कर ग्रुपचे व्यवहार बघा. कारखाने, कन्सल्टिंग, सेल्स—एजन्सीज, व हातातल्या बँकांमधून किर्लोस्करांचे आर्थिक साम्राज्य आज केवढे तरी लांबवर पसरलेले आहे. पण कोणी म्हणेल, हा तर त्यांचा धंदाच आहे; धंदे त्यांनी करायचे नाहीत तर कोणी करायचे ? ठीक. पण प्रौढांकरिता 'किर्लोस्कर'; बायकांकरता 'स्त्री', युवकांकरता 'मनोहर' या मासिकांच्या नाड्या कोणाच्या हातात—किर्लोस्कर. चित्रांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन कोणाच्या हस्ते—किर्लोस्कर. महाराष्ट्र कल्चरल सेंटर त्यांचेच. ज्ञान प्रबोधिनीचे पदाधिकारीही तेच. महिला मंडळातही तेच ! अन या सगळ्यांतून अत्यंत फसव्या बुळबुळीत रीतीने तर कधी कधी घृणास्पद दादा-गिरीने सांस्कृतिक जीवनावर पकड मिळवण्याचा पद्धतशीर प्रयत्न चाललेला आहे. या सगळ्याकडे डोळे उघडे ठेवून पाहाण्याची व त्याविरुद्ध लढ-ण्याची गरज आहे. संस्थांविरुद्ध, त्यांतल्या व्यक्तींच्या भंकसविरुद्ध, आणि स्वतःशी ! जागरू-कतेने प्रामाणिक राहून ! कोणतेही सरकार वा राजकीय पक्ष हे करू शकत नाहीत. आजचे आपले शासन वा पक्ष तर नाहीतच, पण एरवीही. सांस्कृतिक क्रांती तळापासून तुम्ही—आम्हीच सुरू केली पाहिजे. रोजच्या आयुष्यातल्या गोष्टींपासून, घरात सत्यनारायण करण्याला विरोध करून, अन कॉलेजात अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तके ठरवण्या-चाही हक्क मागून; संपादकाला आपल्या लेखात काडीचीही ढवळाढवळ करू न देऊन व आंदोलना-तून, प्रत्यक्ष राजकीय लढ्यातून.

कारण प्रश्न असा आहे की, खरोखर

आपल्याला स्वातंत्र्य मिळाले आहे का? १९४७ नंतर पाश्चात्य राष्टांची भांडवली गुंतवणूक कमी न होता वाढली आहे. अजून येथून भरमसाट नफा साम्राज्यवादी राष्ट्रे पिळून घेऊन जात आहेत. प्रत्येकाला रोजगार नाही; व एकंदर आर्थिक जीवन ओढगस्तीचे झाले आहे. त्याच-बरोबर आमचे मानसिक स्वातंत्र्य हिरावून घेतले जात आहे. निर्मितीची शक्ती खच्ची करून माणसांची 'आनंदी चक्रे' करण्याचा प्रयत्न चालू आहे. आम्ही जोवर चांगल्या कलेची, सत्यनिष्ठेची, मूल्यांची कदर करत नाही, आणि त्यांचा व जीवनाचा समन्वय साधत नाही, तोवर आम्ही खऱ्या अर्थी स्वतंत्र होणारच नाही. भांडवलदार व शासन हे न होऊ देण्याकरिता जितका विरोध करतात, तितकाच तथाकथित विचारवंत व कलावंत करत असतात. संपूर्ण विद्रोहातूनच खरे परिवर्तन व खरा आत्मशोध आपण घेऊ शकतो. खऱ्या अर्थी स्वतंत्र होऊ शकतो. सध्या आपल्याकडे फारशा लोकप्रिय नसणाऱ्या एका मोठ्या माणसाच्या शब्दांत सांगायचे, तर 'बंड करणे नेहमीच समर्थनीय असते' हे तत्त्वच सांस्कृतिक बदलाचे व स्वातंत्र्याचे सूत्र आहे. ■

[वाचकांनीही त्यांच्या स्मरणातील, संग्रहातील, नोंदीतील मूळ प्रकाशनाच्या माहितीसह अशा संग्राह्य मजकूराचे कात्रण पाठविल्यास युगवाणीस त्यातील शक्य व स्वीकार्य मजकूर प्रकाशित स्वरूपात वाचकांपर्यंत पोहचवणे आवडेल.]

तिसरे दलित-आदिवासी-ग्रामीण संयुक्त साहित्य संमेलन : साहित्य - स्पर्धा

महाराष्ट्र स्तरावरील हे तिसरे संयुक्त साहित्य संमेलन फेब्रु. १९९० मध्ये लातूर येथे संपन्न लातूर येथे संपन्न होणार आहे. या संमेलनानिमित्त प्रतिवर्षाप्रमाणे साहित्य स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत.

प्रत्येक साहित्य प्रकारात पहिले पारितोषिक १००० रु., दुसरे ५०० रु., तिसरे ३०० रु. या शिवाय उत्तेजनार्थ प्रत्येकी १०० रुपयांची पाच पारितोषिके. स्पर्धेसाठी प्रवेश-फी नाही. साहित्य अप्रकाशित असावे.

निबंधस्पर्धा : "परिवर्तनवादी साहित्याचे वेगळे सौंदर्यशास्त्र असावे काय? ते कोणते"? शब्दमर्यादा : ३००० शब्द.

कथास्पर्धा : विषय, शब्दसंख्या यांचे बंधन नाही. कथा दलित-आदिवासी-ग्रामीण, स्त्री जीवनाचे चित्रण करणाऱ्या असल्यास उत्तमच.

कवितास्पर्धा : विषय, शब्दसंख्या यांचे बंधन नाही. जास्तीत जास्त पाच कविता पाठवाव्यात.

यशस्वी स्पर्धकांना संमेलनात प्रत्यक्ष सहभागी होता येईल. आपले साहित्य-कथा-कविता-निबंध-तीन प्रतीत कागदाच्या एकाच बाजूवर सुवाच्य हस्ताक्षरात अथवा टंकमुद्रित स्वरूपात ३१ डिसें. १९८९ पर्यंत पाठवावे.

आपले साहित्य-प्रा. रामप्रसाद तौर, कार्यवाह, द. आ. ग्रा. संयुक्त साहित्य महासभा, द्वारा : बळीराम पाटील महाविद्यालय, किनवट, जि. नांदेड - पीन ४३१८०४ या पत्त्यावर पाठवावे. पाकिटावर "स्पर्धेसाठी" असा निर्देश असावा.

पारितोषिक प्राप्त साहित्य "सत्यशोधक मार्क्सवादी" मध्ये क्रमशः प्रसिद्ध होईल.

मार्क्सवादी समीक्षा : एक निरीक्षण

स. त्र्यं. कुल्ली

मार्क्सवादी समीक्षाविचार या देशात आज हिंदी भाषेत ज्या व्यापकतेने रुजला त्या प्रमाणात तो मराठीत स्वीकारल्या गेलेला दिसत नाही.

व्यक्तीचे राजकीय-सामाजिक-आर्थिक या व जीवनाच्या इतर संदर्भांचे सांस्कृतिकतेशी असणाऱ्या नात्याकडे कलावंताच्या निर्मिती-प्रक्रियेवर परिणाम साधणारी घटक मूलद्रव्ये म्हणून बघणाऱ्या मार्क्स-वादी समीक्षा विचाराचा मराठीत अद्यापही समीक्षापद्धती म्हणून पुरेसा स्वीकार झालेला नाही. याची काही महत्त्वाची कारणे या समीक्षापद्धतीच्या समीक्षकास असावे लागणारे द्वंद्वात्मक भौतिकवादी तत्त्वज्ञानाचे इतर तत्त्वज्ञानांपासून असणाऱ्या वेगळ्या स्वरूपाचे ज्ञान, मार्क्सवादी तत्त्वचिंतनाची जीवनाच्या सर्वच क्षेत्रांना व्यापू बघणारी समग्रता जाणून घेण्यास लागणारे मन व बौद्धिक वातावरण; तार्किकता, समता व विज्ञाननिष्ठा यांचा मूल्य म्हणून स्वीकार करण्याची तयारी असणारे सामाजिक वास्तव यांचा मराठी समाजात असणारा अभाव यातही दडलेली आहेत.

मुळात मार्क्सवादी तत्त्वचिंतनाचेच येथल्या मातीनुसार व्हावयाचे उपयोजन, प्रसार व स्वीकाराचीच चळवळ क्षीण असल्या-मुळे मार्क्सवादी समीक्षाविचारही मराठीत हिंदीएवढाही आपला प्रभाव अद्यापतरी पाडू शकलेला नाही. मात्र मराठीतही मार्क्सवादी समीक्षाविचार निष्ठापूर्वक रुजविण्याच्या झालेल्या यशस्वी प्रयत्नांची वाढ खुंटली आहे असे नव्हे तर हा येथल्या बदलत्या सामाजिक वास्तवासोबत वाढतच राहणारा समीक्षाविचार ठरू पाहात आहे. या समीक्षाविचारासंबंधातील प्रा. स. त्र्यं. कुल्ली यांचे हे एक निरीक्षण.

: १ :

मार्क्सची आयुष्यभराची धडपड कशासाठी होती ? भांडवलशाही ऐवजी समाजवादाची प्रस्थापना करण्यासाठी; शोषण, दारिद्र्य यातून माणसाची सुटका करून त्याला भौतिक समृद्धी मिळवून देण्यासाठी; पशूच्या पातळीवरील दुःखांपासून मुक्ती मिळवून देऊन मानवाला साजेशी दुःखे भोगण्या-करिता माणसाला सक्षम बनविण्यासाठी. पण भौतिक समृद्धीने युक्त अशी समाजवादी व्यवस्था तरी कशासाठी ? तर भौतिक समृद्धीच्या पायावर नव्या मानवी संस्कृतीची इमारत उभारण्यासाठी; साम्यवादी समाजाच्या निर्मितीसाठी.

भौतिक सुबत्ता, औद्योगीकरण, विज्ञानाच्या साह्याने प्रचंड उत्पादन, त्याचे समान वाटप इथेच मार्क्स का थांबला नाही ? साम्यवादी समजाचे, नव्या मानवी संस्कृतीचे, सर्जनशील-संपूर्ण मानवाचे

स्वप्न तो का बघतो ? कारण तेच त्याचे ध्येय आहे, साध्य आहे. वर्गीय लढा, क्रांती, समाजवादाची स्थापना ही या महान साध्याप्रत पोहोचण्याची केवळ साधने आहेत.

तात्पर्य, परात्मताबाधित मानवाची परात्मता नाहीशी झालेला, नव्या साम्यवादी संस्कृतीतील सर्जनशील–संपूर्ण मानव हे मार्क्सचे महान स्वप्न होते; त्याच्या प्रचंड तात्त्विक व्यूहाचा तो गाभा, केंद्र होते.

१८४४ साली मार्क्सने 'Economic and Philosophical Manuscripts' लिहिली. त्यात परात्मतेचे (Alienation–आत्मदुरावा) विवेचन आहे. आपल्या पीएच. डी. च्या प्रबंधात एके ठिकाणी त्याने लिहिले आहे की विश्वसूर्य अस्ताला गेला आहे आणि म्हणून खाजगी जीवनाच्या पणतीभोवती पतंग भिरभिरत आहे...संबंध जग स्वतःच्या सामर्थ्याने निर्माण करण्यामध्ये ज्याला आनंद लाभत नाही, विश्वनिर्माता ज्याला व्हायचे नाही, तो स्वतःच्याच कातडीच्या आत अनंतकाळ भ्रमण करत राहतो ...'

मार्क्सने 'स्वतःच्या कातडीच्या आत' भ्रमण करत रहाण्याला नकार दिला. त्याला विश्वनिर्माता व्हायचे होते. चिरफाळलेल्या, यातनामय, एकाकी, शून्यवत अवस्थेतून बाहेर पडून सर्व विश्वाशी एकरूप होण्याची, त्याच्याशी सृजनशील संबंध जोडण्याची आकांक्षा त्याच्याठायी होती. एके ठिकाणी तो म्हणतो,–' क्रांतिकारकांची सर्वात मूलभूत घोषणा असते : मी काहीही नाही आणि मला व्हायचे आहे सर्व काही !' (आय ॲम नथिंग, ॲंड आय वॉंट टू बी ऑल)

तरुण मार्क्सवर हेगेलचा प्रभाव होता. हेगेलच्या चिद्वादी तत्त्वज्ञानानुसार या विश्वाचे प्राणतत्त्व म्हणजे शुद्ध चैतन्य होय. एका क्षणी या चैतन्याचे त्याच्या विरोधी स्वरूपाच्या जड भौतिक अवस्थेत रूपांतर झाले; चैतन्याला परात्मरूप प्राप्त झाले. तेव्हापासून या जडरूप चैतन्याचा आपल्या मूळ स्वरूपाच्या पुनःप्राप्तीचा प्रवास सुरू झाला. त्यातील एका टप्प्यावर संज्ञारूप मानव निर्माण झाला. या संज्ञाशक्तीमुळे चैतन्याला आपल्या परात्मतेची जाणीव झाली. या वाटचालीची परिपूर्ती आत्मज्ञ अशा विश्वचैतन्यात होणार आणि म्हणून या विश्वचैतन्याचे व त्याच्या परात्मतेचे स्वरूप जाणून घेणे ही माणसाची परिपूर्ती ठरते.

मार्क्सने हेगेलच्या गूढवादी परात्मभावाला भौतिक व सामाजिक अर्थ दिला. परात्मभावापासून मुक्ती मिळवण्याच्या संघर्षाला मूर्त व प्रत्यक्ष रूप दिले. भांडवलशाही समाजात मानव आपल्या स्वतःपासून, इतर माणसांपासून निसर्गापासून दुरावला. हा दुरावा नष्ट होण्याची व पुन्हा सलग, एकात्म, रसरशीत मानवीपण प्राप्त होण्याची आकांक्षा इतर मानवतावादी विचारवंताप्रमाणे मार्क्समध्येही होती. साम्यवादी समाजाची निर्मिती करून त्यात माणसाने सर्व क्षमतांद्वारे जगाला आपलेसे करणे, विकसित करणे व स्वतः विकसित होणे हा उपाय त्याने सांगितला.

उत्क्रांतीच्या विकासक्रमात निसर्गापासून माणूस तुटला. सृष्टीबरोबरची एकात्मता भंग पावली. निसर्गाबरोबर संघर्षमय, द्वंद्वात्मक नाते निर्माण झाले. निसर्गसृष्टीलाच मानव पारखा झाला. या परात्मभावातून एक व्याकुळता, वेदना उत्पन्न झाली, अस्तित्वाला व्यापू लागली. परात्मतेपासूनची मुक्ती मानवी कृतीची प्रेरणा बनली.

समाज–संस्कृतीच्या विकासात माणसाला ज्ञान–विज्ञान, उदात्त गुण आणि श्रेष्ठ मानवी मूल्ये यांची देणगी मिळाली. हे संचित घेऊन माणसाला विश्वाशी आंतरिक एकात्मता साधायची आहे. परात्मभावाची वेदना हृदयात बाळगत विश्वाशी आंतरिक एकात्मता प्रस्थापित करण्याचे भव्य स्वप्न मार्क्स पाहतो. विश्वाशी नाते जुळवण्यासाठी, मानवी सर्जनशीलतेचा आविष्कार करण्यासाठी, विश्वाची प्रेममय अनुभूती घेण्यासाठी आणि या सर्वांतून आपल्या अस्तित्वाला अर्थ देण्यासाठी मार्क्सला साम्यवादी व्यवस्था हवी आहे.

तात्पर्य, परात्मतावाधित मानवाचे जाणीवसंपन्नतेच्या पातळीवर विश्वाशी आंतरिक ऐक्य प्रस्थापित करण्याचे मार्क्सचे उदात्त ध्येय आहे !

: २ :

साहित्याचे प्रयोजन काय ? माणसाला विश्वाची जी अनुभूती येते तिचा आविष्कार करण्याची अनावर ओढ त्याला असते. जगत असताना त्याला आपल्या अस्तित्वाचा, जीवनाचा, एकूण विश्वाचा जो अनुभव येतो तो व्यक्त करणे, या सर्वांचा अर्थ लावणे, त्यात सुसंगती निर्माण करण्याचा प्रयत्न करणे आणि हे जे सर्व भावते ते व्यक्त करण्याच्या तीव्र इच्छेतून साहित्याची निर्मिती होत असते.

जीवनप्रवाहातील एका तुकड्याभोवती आंतरिक स्वायत्ततेचे, स्वयपूर्णतेचे वर्तुळ लेखक निर्माण करतो. जीवन व्यवहाराच्या धारेतील हा व्यूह असल्याने कलाकृती ही जीवनसंवादी असते. तिची स्वायत्तता जीवनांतर्गत, जीवनसापेक्ष असते. तिची पातळी भावनात्मकतेची, कल्पनेची, सृजनशीलतेची असते. या अर्थाने ती उपयुक्ततेच्या, व्यवहारतेपेक्षा वेगळी आणि वरच्या दर्जाचीही असते. तिच्यामुळे मानवी जाणिवा प्रगल्भ होतात, जीवन संपन्न होते. म्हणून ती आदर्श जीवनाचा भाग असते.

मार्क्सच्या मते उत्पादन आणि सर्जन म्हणजे कलाकृती आणि श्रमनिर्मित इतर वस्तू यांच्यात मूलभूत असा भेद नाही. त्याच्या मते श्रम हे माणसाच्या आत्माविष्काराचे आणि आत्मोपलब्धीचे एकमेव साधन आहे. कलानिर्मितीमधून आत्माविष्कारच घडत असतो. म्हणून कलाव्यापार हा देखील मानवी श्रमाचा एक भाग आहे. सर्जन आणि उत्पादन यातील भेद वरवरचा आहे.

कलेच्या माध्यमातून माणूस एका नव्या वास्तवाची निर्मिती करतो. ही नव्या मानवी वास्तवाची निर्मिती मानवाच्या कलाव्यापाराचे प्राणतत्व आहे. श्रमाच्या माध्यमातून ज्या बाह्य वास्तवाशी आपला संबंध येतो ती वास्तवाची एक पातळी. कलावंताची नवनिर्माणक्षम कल्पनाशक्ती आणि बाह्य वास्तव यांच्या संयोगातून एक नवी कलात्मक वास्तवता कलावंत निर्माण करतो, ही वास्तवाची दुसरी पातळी. आणि या कलाकृतीमधून मानवी जीवनाविषयी जे एक अपूर्व, नवे आकलन निष्पन्न होते ती वास्तवाची तिसरी पातळी. यालाच आपण कलेतील सत्य म्हणतो. यालाच मार्क्स 'ह्यूमन रिॲलिटी' किंवा कलेतील 'मानवी वास्तव' म्हणतो.

मार्क्सवादी समीक्षक जॉर्ज ल्युकासच्या मते साहित्यातील वास्तव म्हणजे दैनंदिन जीवनातील वास्तव नव्हे. तर या व्यक्तिनिष्ठ अनुभवाच्या तळाशी साऱ्या मानवतेला समान असणारे, मानवाला एकमेकांशी जोडणारे एक अदृश्य वास्तव असते. या तळवास्तवाचे किंवा आंतरिक वास्तवाचे कलेत प्रतिबिंब पडते. या आंतरिक वास्तवाच्या कलात्मक आविष्काराने कलेपासून मिळणारा आनंद सार्वकालिक आणि सार्वत्रिक होत असतो. कलेमधून मानवी मूल्यगर्भ अशी नवनिर्मिती होत असते. म्हणूनच श्रेष्ठ साहित्याच्या आस्वादात रसिकाला भावगर्भ मूल्यात्मता जाणवते; मानवी जीवनाचे मूल्यात्म भान येते.

साहित्याच्या श्रेष्ठ–कनिष्ठतेचा निकष कोणता ? साहित्यमूल्य कोणते ? ललित वाङ्मयकृतीचे संघटक तत्त्व कोणते ? समीक्षेतील या मूलभूत प्रश्नांचा विचार मराठीचे श्रेष्ठ कवी, समीक्षक शरच्चंद्र मुक्तिबोधांनी 'सृष्टी, सौंदर्य आणि साहित्यमूल्य' या ग्रंथात करून आपली 'मानुषते'ची अभिनव संकल्पना मांडली आहे. मार्क्संच्या परात्मतेच्या अनुषंगाने त्यांनी ही संकल्पना मांडलेली आहे.

मानव आणि निसर्ग यात मूलतः एकात्मता आहे, आंतरिक नाते आहे. मानवाच्या सृष्टी-विषयीच्या आस्थेतून हे ऐक्यच प्रकट होत असते. हेच माणसाचे आंतरिक असणे (Essence)

मानुषता आहे. माणसाला 'स्व'ची जाणीव होते, अस्तित्वाचे भान येते आणि हे ऐक्य भंगते. मनुष्य निसर्गापासून दुरावतो. हीच परात्मता होय. 'स्व'ची जाणीव होणे हे माणसाचे सर्वोच्च आणि महत्तम दुःख आहे. आपल्या मूळ रूपापासून, निसर्गापासून आपण ढळलो ही मानवाची वेदना आहे. अस्तित्वाचे भान नसलेला मानव निसर्गाशी एकरूप असूनही या अनुभूतीचा आस्वाद घेण्यास अपात्र असतो. समाजविकासाच्या एका टप्प्यावर त्याला जाणीव, संस्कृती, जीवनमूल्ये या गोष्टी प्राप्त होतात. आपल्या अस्मितेची त्याला जाणीव होते आणि सृष्टीपासून तो दुरावतो.

पण मार्क्स इतिहासाला एक दिशा आहे असे मानतो. समाजाची प्रगती अशा दिशेने घडवून आणता येते की जिथे आंतरिक सर्व मूल्यांचे जतन करीत, संपूर्ण जागरूक पातळीवर माणूस सामाजिक मानव बनेल व नैसर्गिक मानुषता असलेला मानव आणि सामाजिक मानव यामध्ये कोणताच भेद उरणार नाही. या आदर्श समाजात–साम्यवादी समाजात–परात्मता नष्ट होऊ शकेल.

मुक्तिबोधांच्या मते 'मानुषता' हे सामाजिक मानवाचे आंतरिक असणे असून ते बदलत्या सामाजिक मूल्यांचे अधिष्ठान आहे. ही मानुषता सदा सर्वकाळी आढळून येते. ती असते म्हणूनच माणूस आपल्या स्वार्थी 'वर्गीय' हितसंबंधांच्या पलीकडे जाऊन 'वर्गातीत' होऊ शकतो, अखिल मानवतेचे प्रतिनिधित्व करू शकतो. ज्याला आपण शाश्वत मानवी मूल्य म्हणतो ती या मानुषतेच्या अधिष्ठानावरील मूल्ये होत. मानुषता म्हणजे केवळ मानवतावाद नव्हे. तो मानुषतेचा विशिष्ट काळातील मूल्यरूप अविष्कार आहे. कारण त्यात फक्त मानवा–मानवातील प्रेम गृहीत धरले आहे. उलट मानुषता ही अनुभूती आहे व ती मानवासह सृष्टीजाताशी एकात्मतेने, आंतरिकतेने निगडित असण्याचे मानसिक सत्य आहे.

मुक्तिबोधांच्या मते मानुषतेची जाणीव हीच, कलाकृतीच्या विविध घटकांमध्ये संगती निर्माण करणारे संघटक तत्त्व आहे, सौदर्यतत्त्व आहे. मानुषता हेच साहित्याच्या श्रेष्ठ–कनिष्ठतेचे मूल्य आहे, साहित्य मूल्य आहे. आणि मानुषता हेच मानव व निसर्ग यांच्या अस्तित्वाचे अधिष्ठान आहे, जीवनमूल्य आहे.

: ३ :

अस्तित्वाची अनुभूती घेणे, विश्वाशी आंतरिक ऐक्य प्रस्थापित करणे आणि अस्तित्वाचा, जीवनाचा अर्थ शोधणे हे मानवी जीविताचे प्रयोजन आहे. साहित्याच्याद्वारे मनुष्य आपल्या अस्तित्वाची अनुभूती घेतो, उत्कट जीवनप्रत्यय घेतो, विश्वाशी संवाद साधतो. या अनुभवांचा आत्माविष्कार लेखक साहित्यातून करतो. एका अर्थाने धर्म, तत्त्वज्ञान यांच्यापेक्षाही साहित्याचे प्रयोजन जास्त मूलभूत आहे. धर्म, तत्त्वज्ञान किंवा विविध विचारप्रणाली बाहेरून मानवी अस्तित्वाकडे पाहतात. तर्कशक्तीला, विवेकाला आवाहन करतात. जीवनसमस्यांची तयार, कोरडी उत्तरे देतात. उलट साहित्य हे आतून मानवी अस्तित्वाचा विचार करते. मानवी मनाशी, भावनेशी त्याचा संबंध असल्याने ते चिंतनशीलतेला आवाहन करते. माणसाच्या आत्म्याला आंतरिक व्यक्तित्वालाच ते हात घालते. मूलभूत जीवनप्रमेयांची तयार उत्तरे देण्यापेक्षा त्या प्रश्नांचा उत्कट प्रत्यय ते आणून देते. म्हणून आजच्या ज्ञान–विज्ञान संस्कारित, धर्मनिरपेक्ष आधुनिक संवेदनशील माणसाच्या चिंतनविश्वात धर्म, अध्यात्म, तत्त्वज्ञान यांची जागा प्राचीन महाकाव्ये, शोकात्म नाटके, जीवनदर्शी कथा कादंबऱ्या, चिंतनशील कविता आणि अंतर्मुख अस्तित्ववादी साहित्य यांनी घेतली आहे. प्रतिभाशाली कलावंत नव्या जाणिवांची निर्मिती करतो; नवे जीवनमार्ग सूचित करतो; नव्या जीवनरूपांचा शोध घेतो आणि अशाप्रकारे मानवी जीवनाच्या कक्षा विस्तारतो.

साहित्याच्याद्वारे माणूस आपल्या माणूसपणाचा, जीवनार्थाचा शोध घेत असल्याने उपयुक्ततावादी, तात्कालिक समस्येच्या निराकरणाच्या दृष्टीने साहित्याकडे पाहणे उचित ठरणार नाही. तर साहित्याचे व्यामिश्र स्वरूप लक्षात घेऊन त्याची समीक्षा करताना व्यापक, लवचिक, बहुआयामी दृष्टिकोन स्वीकारावा लागेल. यादृष्टीने मार्क्सवादी समीक्षा कितपत उपयुक्त आहे, तिचे सामर्थ्य व उणिवा कोणत्या आणि कोणत्या दिशेने तिचा विकास व्हायला हवा याचा विचार करणे आवश्यक आहे.

'समग्रता' हे मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचे महत्त्वाचे वैशिष्टय आहे. सामाजिक–आर्थिक– सांस्कृतिक इत्यादी घटकांचा सुटा विचार न करता मार्क्सवाद एका व्यूहात त्यांचा विचार करतो. साहित्यकृतीचे सामाजिक अंग, तिचे सामाजिक स्वरूप यांचे प्रभावी स्पष्टीकरण करून साहित्येतिहासातील काही महत्त्वाच्या प्रश्नांवर मार्क्सवादी समीक्षा प्रकाश टाकू शकते. साहित्यातील प्रवृत्तींचे स्पष्टीकरण तिच्या आधारे मिळू शकते. साहित्याच्या आकलनासाठी आवश्यक त्या रेखीव संकल्पनांचा व्यूह हे या समीक्षेचे बलस्थान आहे. तिच्या आधारे कलाकृतीमागच्या प्रेरणांचे व हेतूंचे विश्लेषण करता येते. साहित्य केवळ कलावस्तू नसून एक सांस्कृतिक वस्तू कशी आहे, तसेच समाजावर तिचे संभाव्य परिणाम काय होऊ शकतात हेही कळू शकते. कलावंत आणि विश्व, कलावंत आणि कलाकृती, वाङ्मयकृती आणि तिच्यातील सामाजिक वास्तव, साहित्यकृती आणि जीवनमूल्य, साहित्यकृती आणि तिचा काळ या सर्वांचा परस्परसंबंध या पद्धतीत स्पष्ट करता येतो. या पद्धतीने साहित्यात होणारी स्थित्यंतरे, एखाद्या काळात विशिष्ट कलाकृती का निर्माण झाली आणि तिला विशिष्ट स्वरूप का प्राप्त झाले याचा उलगडा होऊ शकतो. कलावंताचे व्यक्तित्व, त्याचे वर्गीय स्थान, त्याच्या जाणिवा आणि जीवनमूल्ये यांचे परावर्तन वाङ्मयकृतीत कसे होते आणि घटना–पात्रे–प्रसंग यांना त्यामुळे विशिष्ट घाट कसा प्राप्त होतो हे कळू शकते. समग्रतेच्या वैशिष्टयामुळे मार्क्सवादी तत्त्वज्ञानाप्रमाणे मार्क्सवादी समीक्षेलाही एक प्रकारचे गांभीर्य, भारदस्तपणा आणि विशाल ऐतिहासिक सामाजिक–सांस्कृतिक परिप्रेक्ष प्राप्त होतो. म्हणजे साहित्यकृतीची निर्मितीप्रक्रिया आणि तिचे आकलन या पद्धतीने उत्तम प्रकारे होऊ शकते. मार्क्सवादी समीक्षेच्या या सामर्थ्याच्या पार्श्वभूमीवर रूपवादी, आकृतिवादी, कलावादी समीक्षा या संदर्भात दुबळी असल्याचे जाणवते.

द्वंद्वात्मक दृष्टिकोन हे मार्क्सवादाचे मुख्य सूत्र. वाङ्मयकृतीतील चैतन्य विविध घटकांच्या द्वंद्वामुळे कसे अवतरते आणि या द्वंद्वामुळे ती आणखी वरच्या पातळीवर कशी जाते हे समजते. वाङ्मयकृतीच्या आकलनात आणि आस्वादात भर पडून आकलन–आस्वादाच्या नव्या वाटा त्यामुळे दिसू शकतात.

मार्क्सची साम्यवादी समाजाची तसेच परात्मतेची संकल्पना यामुळे चिंतनगर्भतेचा आणि जीवनमूल्यांचा आयाम समीक्षेला प्राप्त होऊ शकतो. मानवी जीवनाची मूल्यगर्भता आणि साहित्याची मूल्यगर्भता यांची नाळ जोडल्या जाते. साहित्यकृतीच्या मूल्यमापनाचा निकष त्यातून प्राप्त होतो. क्रांतिकारित्व, समता, विश्वात्मकता, आंतरराष्ट्रीयता, परात्मता; प्रगल्भ मानवतावाद, मानुषता आदी वैचारिक तत्त्वांची प्राप्ती होऊ शकते. त्यातून प्रगल्भ मानवतावादासारखे किंवा मानुषतेसारखे जीवनमूल्य आणि साहित्यमूल्य प्रस्थापित होऊ शकते.

सारांश, वाङ्मयकृतीची निर्मितिप्रक्रिया, तिचे आकलन आणि मूल्यमापन या बाबतीत मार्क्सवादी समीक्षा कलाकृतीला न्याय देऊ शकते.

असे असले तरी तिच्या काही मर्यादाही आहेत. एखाद्या कलाकृतीच्या रचनेचे विश्लेषण या पद्धतीच्या आधारे करता येत नाही. मार्क्सवादी समीक्षा पद्धतीत ही एक महत्त्वाची उणीव आहे असे डॉ. द. भि. कुळकर्णी यांना वाटते. साहित्यकृतीचा विचार तीन अंगांनी करून तो परस्परपूरक ठरला

तर तो साहित्यसिद्धांत होतो. कवीमुखाने (कलावंत), कवितामुखाने (कलाकृती) आणि रसिक-मुखाने. म्हणजे कलाकृतीच्या निर्मितीच्या अंगाने, अस्तित्वाच्या अंगाने व आस्वादाच्या अंगाने. मार्क्सवादी समीक्षक वाङ्मयकृतीच्या निर्मितीचा व आकलनाचा विचार बरोबर करतात. पण रसिकाच्या बाजूने आस्वादाचा विचार खोलवर करीत नाहीत. आस्वादोत्तर प्रश्न असे निर्माण होतात : साहित्यातील सामाजिक जाणिवांचे आकलन व्हावे एवढीच अपेक्षा आहे की त्या भूमिकेशी मतैक्य दर्शवावे अशी अपेक्षा आहे ? तसेच ही सहमती वाचनापुरती असावी की नंतरही तिचा जीवनात स्वीकार करावा ? हे प्रश्न कला समीक्षेतील दोन मूलप्रश्नांशी निगडित आहेत—कलावंताची बांधिलकी व स्वातंत्र्य आणि साहित्याची साधनात्मकता व स्वायत्तता. या प्रश्नांची उत्तरे शोधल्यास मार्क्सवादी समीक्षा अधिक सूक्ष्म होईल.

प्रस्तुत लेखकाच्या मते, कलाकृतीच्या आस्वादाने रसिकाने आपली जाणीव अधिक संपन्न करावी, उदात्त मानवी जीवनमूल्यांचा संस्कार मनात रुजवावा एवढीच अपेक्षा समीक्षकाने बाळगावी. यापुढे जाऊन आशयाच्या कलात्मक प्रत्ययानंतर वैचारिक बांधिलकी स्वीकारायची की कृतिशील बांधिलकी स्वीकारायची हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे. रसिकाला हे स्वातंत्र्य असले पाहिजे त्याप्रमाणे कलावंतालाही ते स्वातंत्र्य असले पाहिजे. कलावंताची बांधिलकी ही मानवी जीवनमूल्यांशी असली पाहिजे. ती विशिष्ट राजकीय पक्षाशी किंवा विचारप्रणालीशी असावी हा दुराग्रह आहे. वास्तवाचे सम्यक आकलन करण्यासाठी किंवा आयुष्याला अर्थपूर्णता देण्यासाठी किंवा अन्य कारणाने त्याने स्वेच्छेने अशी बांधिलकी स्वीकारली तर ती गोष्ट वेगळी. त्याने ती स्वीकारली म्हणून त्याच्या कलानिर्मितीवर अनिष्ट परिणाम होईल असेही नाही. कदाचित त्याचे सामाजिक आकलन अधिक प्रगल्भ होईल. हा प्रश्न अंतिमत: त्याच्यातील कलावंताचा, त्याच्या निर्माणक्षम कल्पनाशक्तीचा आहे. आपण येवढेच म्हणू शकतो की कलावंतावर बांधिलकीची किंवा निर्मितीची सक्ती नसावी.

मराठीत मार्क्सवादी समीक्षेचा वापर मुळातच कमी आहे. शिवाय गं. बा. सरदार, दि. के. बेडेकर, शरच्चंद्र मुक्तिबोध हे सन्माननीय अपवाद वगळता आत्यंतिक समाजनिष्ठ व अर्थनिष्ठ पद्धतीने हा वापर झाला आहे. मार्क्सवादी साहित्यविचार मांडण्याऐवजी मार्क्सवादी दृष्टीने साहित्या-कडे पाहिले गेले आहे. मार्क्सवादातील तयार समीकरणे साहित्याला लावल्या गेली आहेत. साहित्याचे वेगळेपण लक्षात घेऊन साहित्याला न्याय देणारा साहित्यविचार मांडला गेलेला नाही.

मार्क्सवादी समीक्षाविचार पुष्कळदा तात्कालिक राजकीय संदर्भ व साध्यांशी जोडण्यात येतो. त्यामुळे समीक्षेचे जादा राजकीयकरण होते. कलेला साधनाचे स्वरूप आणि राजकारणाला साध्याचे स्वरूप प्राप्त होते. तात्कालिक राजकीय उद्दिष्टांपेक्षा वर्ग–जाती–शोषणरहित संपन्न मानवी संस्कृतीचे व नव्या संपूर्ण मानवाचे ध्येय या दीपस्तंभाच्या प्रकाशात मार्क्सवादी समीक्षा विचाराची वाटचाल व्हायला हवी. केवळ मार्क्सवादी समाजशास्त्राच्या अंगाने नव्हे तर मार्क्सवादातील प्रगल्भ मानवता-वादाच्या अंगाने, मूलत: निर्मितीच्या अंगाने. या अंगाने दि. के. बेडेकर व शरच्चंद्र मुक्तिबोध यांनी साहित्याचा विचार केलेला आहे. मार्क्सवादी समीक्षेचा विकास त्या दिशेने व्हावयास हवा.

प्रा. दिगंबर पाध्ये यांनी मार्क्सवादी समीक्षेच्या विकासाच्या दृष्टीने काही विचार मांडले आहेत. त्यांचा विचार करणे आवश्यक आहे : कोणत्याही एका दृष्टिकोनातून केलेली समीक्षा साहित्यकृतीचे समग्र आकलन करू शकत नाही. प्रत्येक दृष्टिकोनातून केलेल्या समीक्षेमुळे साहित्य-कृतीच्या एखाद्या विशिष्ट अंगाचेच प्रभावीपणे आकलन होत असते. म्हणूनच प्रत्येक दृष्टिकोनातून केलेल्या समीक्षेला एक प्रकारची अपूर्णता असते. साहित्याच्या सर्वांगांचे स्पष्टीकरण करीन अशी प्रतिज्ञा करायला इतर दृष्टिकोनातून केलेल्या समीक्षेला आधारच नसतो; मार्क्सच्या विश्लेषणातील समग्रतेच्या संकल्पनेमुळे मार्क्सवादी समीक्षा अशी प्रतिज्ञा करू शकते, हेच तिचे सामर्थ्य आहे. म्हणूनच आपले अस्तित्व व वेगळेपणा सिद्ध करण्यासाठी इतर दृष्टिकोनांना दूर ठेवून एकांडेपणाने

प्रवास करण्याचे मार्क्सवादी समीक्षेला कारण नाही. उलट रूपवादी, मानसशास्त्रीय, मानववंशशास्त्रीय, संरचनावादी इ. सर्व दृष्टिकोनातून प्राप्त होणाऱ्या कलाविषयक ज्ञानाचा स्वीकार करूनही मार्क्सवादी समीक्षा आपले वैशिष्टय कायम ठेवू शकेल व अधिक प्रभावी ठरेल. ■

संदर्भ :

(१) नवसमीक्षा, 'मार्क्सवादी समीक्षा विचार '/ दिगंबर पाध्ये.

(२) मार्क्सवादी साहित्यविचार / के. रं. शिरवाडकर.

(३) मार्क्सची संपूर्ण मानवाची संकल्पना / अर्न्स्ट फिशर / अनु. सुधीर बेडेकर तात्पर्य; एप्रिल १९८३.

(४) सुप्टी, ' सौंदर्य ' आणि साहित्यमूल्य / शरच्चंद्र मुक्तिबोध.

५२/अ, कर्नाटक संघासमोर,
गोकुलपेठ, नागपूर – १०

मराठी साहित्यात 'नव समीक्षा' युग आता नव्याने सुरू झाले आहे. मराठी वाङ्मयीन समीक्षेचा इतिहास पाहिला तर दर दशकांनी मराठी समीक्षेतील सातत्याने भेडसावणारे आणि उपस्थित होणारे प्रश्न पुन्हा चर्चेला घेतले जातात असे दिसून येते. समीक्षेतील हे नवे प्रवाह नव्या समस्या जन्माला घालणारे आहेत पण त्यात संपूर्णत: नावीन्य असते असेही नाही मग पुन्हा एकदा उत्तरादाखल मुळापासून विचारमंथन सुरू होते. साहित्य म्हणजे काय ? साहित्यात कल्पित आणि वास्तव यांचा कसा मेळ असतो ? साहित्यातील अनुभवाचे स्वरूप कसे असते इ. प्रश्नांची पुन्हा उत्तरे शोधण्याचा प्रयत्न होतो आणि मग या उत्तरात निर्माण झालेल्या समीक्षेतील नव्या प्रश्नांचेही उत्तर आढळते. तेवढ्यावर समाधान मानून प्रश्न तेवढ्यापुरता निकालात काढला जातो.

कालांतराने पुन्हा जेव्हा नवी परिभाषा समीक्षेला अर्थाच्या शोधासह गवसते तेव्हा मागील चर्चा फार मोठा काथ्याकूट ठरतो. याची उदाहरणे द्यायची झाली तर 'साहित्यातील राजकारण', 'साहित्य आणि राज्यपारितोषिके', 'साहित्य आणि अनुदान', 'कलावंताचे स्वातंत्र्य', 'साहित्य आणि आणीबाणी', 'साहित्य आणि सामाजिक बांधिलकी' इत्यादीवरील चर्चा पूर्वी 'कलेकरता कला', 'जीवनाकरता कला', 'कला आणि नीती', 'सत्य, शिव आणि सौंदर्य' या नावाने हेच प्रश्न चर्चिले गेले होते. आता अगदी नव्यांने श्री. वि. वा. शिरवाडकरांनी महाराष्ट्र टाईम्समधून रविवारी प्रसिद्ध होणाऱ्या टिपणवहीतून बांधिलकीऐवजी 'सामिलकी' शब्द सुचविला आहे आणि त्या एका शब्दासरशी सगळाच प्रश्न निकालात निघाला आहे. बांधिलकीवर उगीचच फार मोठे रान माजविले गेले आणि सामिलकीत सगळे मिसळले गेले हे आता लक्षात आल्याखेरीज राहात नाही.

मराठी समीक्षेमध्ये अस्तित्ववाद, मानवशास्त्र, सौंदर्यशास्त्र, भाषाविज्ञान, लोकतंत्रीय दृष्टी या विचारांची भर पडून नवे प्रवाह मूळ धरू लागले. अस्तित्ववाद कलाकृतीतून तपासला जाऊ लागला. माणसाचे एकाकीपण, अन्य माणसाशी असलेले त्याचे नाते सृष्टी आणि जिवांशी संबंध, नास्तिक प्रवृत्तीचा अवलंब आणि प्रखर बुद्धिवादी विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनाचा स्वीकार या गोष्टी त्यात येऊ लागल्या. काहीशी आशयनिष्ठा बळावली, अभिव्यक्तीपेक्षा कलाकृतीतून जन्मणाऱ्या सखोल चिंतनाला महत्त्व प्राप्त झाले.

'आय थिंक माय मदर डाईड यस्टर्डे' सारखी वाक्ये, दि प्लेग, आऊट सायडर, माता द्रौपदी, चक्र, राधेय, वेटिंग फॉर गोदो, दंडकारण्यातील प्रणयिनी, वासनाकांड नक्षत्रांचे देणे, माणूस नावाचे बेट, या साहित्यकृतीचा अस्तित्ववादी सरणीने विचार होऊ लागला आणि मराठी साहित्यात अस्तित्ववादी समीक्षा अस्तित्वात आली. दि. के. बेडेकरांनी अस्तित्ववादाची ओळख मराठी जाणकारांना नव्याने करून दिली. डॉ. रा. शं. वाळिंबे यांनी याचा समीक्षा समाचार घेतला तर डॉ. म. सु. पाटील, डॉ. गंगाधर पाटील यांनी अस्तित्ववाद समीक्षेची बाजू राखली. पाहता पाहता हा प्रवाह क्षीण झाला. एकदम हा विचार करणाऱ्या समीक्षांनीच घटित शास्त्र आणि त्याच्या आधाराने आदिबंधात्मक समीक्षा विचार मांडला. याचा परिणाम म्हणजे अस्तित्ववाद मागे पडला.

या घटनेवरून एक बोध घ्यायचा तो असा की मराठी समीक्षेत पुरतेपणी सांगोपांग सर्वंकष, सर्वस्पर्शी, उपयोजित समीक्षाविचार होण्याच्या आतच त्या उशिराने रुजणाऱ्या आणि लवकर संपणाऱ्या समीक्षाविचारांचे अस्तित्वच संपुष्टात येते. मनसोक्त असा चांगला खल होतोय असे वाटते ना वाटते तेवढ्यातच ते युग संपून नवी पहाट येते. अजूनही अनेकांना हा अस्तित्ववाद समजायच्या आतच संपुष्टात आणला गेला आहे.

आदिबंधात्मक समीक्षा बरीचशी परभृत आहे. 'युंग' या मानसशास्त्रज्ञाने मांडलेल्या सिद्धांताशी तिचे नाते आहे. व्यक्तिगत निश्चेतन आणि सामूहिक निश्चेतनाशी ही समीक्षा संबंधित आहे. पण अनेकांना हे समजून घेणे आपल्या आवाक्याबाहेरचे वाटते. तथापि मराठी समीक्षेत हा नवा प्रवाह अलिकडे प्रा. गंगाधर पाटील, प्रा. डॉ. म. सु. पाटील, प्रभाकर पाध्ये, पु. शि. रेगे, डॉ. उषा देशमुख यांनी रूढ करण्याचा प्रयत्न

नवी समीक्षा, नवे प्रश्न : एक चिंतन

: डॉ. भास्कर गिरधारी

केला आहे. 'सहृदगाथा 'चीप्रस्तावना, अक्षरवाटा, मराठी समीक्षेतील नवे प्रवाह, 'आस्वाद' यात आदिबंधात्मक समीक्षा विचार प्राधान्याने केला आहे. आदिबंधाची कल्पना समजावून घेऊन मिथ, मिथिकल एक्सपिरियन्स या संकल्पनांनी मराठी समीक्षेची जागा व्यापली. तेंडुलकरांच्या 'घाशीराम कोतवालने' या मिथच्या विचाराने चांगलीच चालना दिली होती आणि पौराणिक कादंबऱ्या नाटकांनी त्याचा जाणीवपूर्वक अवलंब केला होता.

'ययाती', कर्ण संबंधातील मराठी ललित साहित्य या दृष्टीने तपासले जाऊ लागले. लोक-साहित्याचाही मूलाकार समजावून घेण्याचा आणि शोधून काढण्याचा प्रयत्न या आदिबंधात्मक समीक्षेने करू घातला. चेतन पातळीवरील रूक्षता आणि बहिर्मुखता लक्षात आली. व्यक्तिगत निश्चेतनाच्या पातळीची वैयक्तिकता जाणवली आणि सामूहिक निश्चेतनातील समष्टी माहात्म्य, वस्तुनिष्ठा, 'इम्पर्सनल इलिमेंट' लक्षात घ्यावी लागली. अनुभवाच्या साधारणी-करणाचे स्वरूप लक्षात आले. हेच 'युनिव्हर्स-लायझेशन' व 'जनरलायझेशन' होय. सखोल, व्यापक आणि समग्रतेवर लक्ष केंद्रित करणारी साहित्यकृतीच केवळ या समीक्षा पद्धतीच्या विश्लेषणाला सामोरी जाऊ शकते. म्हणूनच पु. शि. रेगे, चिं. त्र्यं. खानोलकर, जी. ए. कुलकर्णी या आदिबंधात्मक जाणीवा जागविण्याऱ्या लेख-कांना नव्याने महत्त्व प्राप्त झाले.

मात्र कलाकृती कोणत्याही एका समीक्षा-पद्धतीसाठी कधी अस्तित्वात येत नसते. उलट कलाकृतीच्या मागणीतून व मूल्यमापनातून समीक्षा पद्धतीला जन्म लाभतो. या न्यायाने कलाकृतीतील अनुभव हा सौंदर्य संवोध आहे. सौंदर्य वस्तूच्या आधारानेच काव्यानुभव अवतरत असतो. या विचारसरणीने सौंदर्यशास्त्राकडे लक्ष वेधले गेले. रा. श्री. जोग, बा. सी. मर्ढेकर, वा. ल. कुलकर्णी, प्रभाकर पाध्ये, रा. भा. पाटणकर, मे. पु. रेगे, गंगाधर गाडगीळ, मा. ज. कविमंडन, इत्यादी समीक्षकांनी सौंदर्यशास्त्राचा मराठी समीक्षेला व्यापून टाकणारा (काही वेळेला झाकाळून टाकणारा) अभ्यास सादर केला. त्यामुळे पुन्हा 'सत्यं, शिवम्, सुंदरम' या त्रिपुरीच्या विचाराला चालना मिळाली आणि मराठी समीक्षेतील अनेक प्रश्नोपप्रश्न त्यात सामावलेले असल्याचेही लक्षात आले. 'कलात्मक सत्य', 'कलात्मक शिव' आणि 'कलात्मक सौंदर्य' समजावून घेणे महत्त्वाचे मानले गेले. परंतु सौंदर्यशास्त्राची शुष्क चर्चा मराठी ललित साहित्याच्या पासून फार दूर गेली. तिची परिणती सौंदर्यमीमांसेत झाली. उपाययोजनेच्या दृष्टीने या अभ्यासाचा फारसा अवलंब करता येईल असे आलंबन मराठी साहित्यात गवसेना म्हणून ते थांबले. मधल्या काळात मानसशास्त्राच्या आधाराने संज्ञाप्रवाहांचा विचार होऊ लागला होता. 'स्ट्रीम ऑफ कॉन्शसनेस' तपासले जाऊ लागले होते. सुप्तावस्था, अर्धं जागृत अवस्था, जागृत अवस्था यांचा विचार मनोविश्लेषणात केला गेला आणि व्यक्तिरेखाटनात याच संज्ञाप्रवाह चिंतनाला प्राधान्य दिले गेले. बा. सी. मर्ढेकरांच्या 'तांबडी माती', 'पाणी' 'रात्रीचा दिवस', वसंत कानेटकरांच्या 'घर आणि पंख' या सारख्या कादंबऱ्यांचा विचार या संदर्भात होऊ लागला होता. हाही विचार मराठी समीक्षेत फार काळ टिकलेला दिसत नाही. संज्ञाप्रवाहांची तपासणी वाङ्मयीन निष्कर्षाला फारशी सहाय्य करू शकत नाही हे लक्षात येते.

नवे भाषा विज्ञान भाषेच्या संदर्भात नवा दृष्टिकोन देणारे आहे. शब्दांचा, शब्दातील पदांचा, पदिमांचा, स्वनांचा, स्वनिमांचा, शब्दबंधांचा; उपवाक्यांचा आणि वाक्यांचा सूक्ष्म विचार त्यात अंतर्भूत आहे. त्यामुळे ललित साहित्याच्या व भाषेच्या अभ्यासालाही नवी दिशा लाभली

आहे. त्याला जोडूनच शैलीविज्ञानाने आणखी पुढचा टप्पा गाठला व मराठी समीक्षा शैलीच्या अंगाने होऊ लागली. शैलीमध्येच आशय गुंतलेला असतो. आशयासाठीच शैलीला अस्तित्व प्राप्त झालेले असते, ललित साहित्याच्या भाषेचे असे आगळेपण ललित साहित्य आणि भाषा विज्ञानाच्या नव्या जाणिवेतून डॉ. अशोक केळकर यांनी मांडले तर शैलीविज्ञानाची नवी जाणीव प्रा. मो. द. हातकणंगलेकर डॉ. धोंगडे यांनी मराठी रसिकांना करून दिली. त्या दृष्टीने रणांगण, कोसला, गोतावळा, सात सक्कं त्रेचाळीस या नव्या कादंबऱ्यांच्या भाषेची, कवी आणि नाटककारांच्या भाषेची, संत साहित्याच्या भाषेची नव्याने चर्चा होऊ लागली. रा. श्री. जोग, मर्ढेकर, वा.ल.कुलकर्णी यांनी केलेली केशवसुत, बालकवी, यांच्या कवितेच्या चर्चेपेक्षा ही चर्चा निराळी होती. ' आरती प्रभू ', पु शि. रेगे, ज्ञानेश्वरांची विराणी, तुकारामाचे अभंग याचीही चर्चा स्फुट स्वरूपात का होईना पण नवे समीक्षक शैलीविज्ञानाच्या आधाराने करू लागलें. त्यातच पुन्हा डॉ. रा. चिं. ढेरे यांनी लोकतत्वीय दृष्टी आणली.

मराठी नव समीक्षेने या काही नव्या समस्या निर्माण केलेल्या आहेत आणि आज मराठी रसिकांना प्रश्न पडतो तो हा की आपण नेमक्या कोणत्या समीक्षेचा स्वीकार आणि स्वागत केले पाहिजे. यावेळी त्याला नेमका कोणताच बोध होत नाही व तो अधिकच गुरफटला जातो. साहित्य आणि समीक्षा यांचे नाते परस्परपूरक असते. चांगली समीक्षा लेखकांना त्यांच्या कलाकृतीचा पुनर्विचार करायला भाग पाडते. पुढील लेखनात मार्गदर्शक ठरते आणि चांगली श्रेष्ठ कलाकृतीही समीक्षकांना आवाहन करीत असते, हे त्याने लक्षात घ्यावयास हवे.

समीक्षेचे हे नवे प्रश्न जुन्या–नव्या साहित्यांच्या पुनर्मूल्यांकनातून आणि समीक्षेच्याही समीक्षेतून निर्माण होतात. लेखकाचे व्यक्तिगत जीवन आणि चारित्र्य भोवतालची सांस्कृतिक परिस्थिती आणि केवळ पूर्वकालीन वाङ्मयीन स्थितीगतीच्या संदर्भात कलाकृतीची समीक्षा करण्याची प्रथा आता मागे पडली आहे. कला– कृतीनिष्ठ संरचनात्मक, त्रिकालनिष्ठ, शैलीगत अशी समीक्षा महत्त्वाची गणली जात आहे. समग्र वाङ्मयीन जाणिवा आणि वातावरणाचे भान या समीक्षेत ठेवले जाते. जुन्या अलंकार आणि विभ्रमांच्या पलीकडे जाऊन प्रतिमांचा विचार. आता त्यामुळे स्वीकारला जात असून कवितेच्या ओळी–ओळीतील व एकूणच लेखनातील प्रतिमा समजावून घेणे महत्त्वाचे मानले जात आहे. त्यासाठी शब्दा–शब्दाचा विचार करणे क्रमप्राप्त झाले आहे. या शब्द आणि प्रतिमा आशयाला उजळविणाऱ्या असल्याने कलानिर्मितीप्रक्रिया तपशिलाने समजून घेणे हे देखील त्यामुळे आवश्यक झाले आहे. मात्र ही प्रक्रिया तर बऱ्याच विवेचनानंतरही गूढच राहणारी अशी आहे. पाश्चात्यांच्या लेखनाच्या आधारानेही हे संसूचित करण्याचा, समजावून देण्याचा प्रयत्न वारंवार केला जातो.

संस्कृत, वस्तुनिष्ठ, निष्कर्षात्मक आणि साहित्यशास्त्रीय स्वरूपाची समीक्षा एकीकडे आज उपलब्ध आहे. पण ती नीट समजून घेतली जात नाही. किंबहुना आमच्या आकलनाच्या टप्प्यात नसलेले ते क्षेत्र होऊ पहात आहे. दुसरीकडे इंग्रजीतील बरीचशी व्यक्तिनिष्ठ, स्वतःच्या प्रतिक्रियांना महत्त्व देणारी, अनिश्चितता स्पष्ट करणारी समीक्षा सतत नवे प्रश्न निर्माण करीत आहे. तिची गती आम्हाला न पेलवणारी आहे. आणि या ओढाताणीत मराठी समीक्षा हेळसांडत आहे, फरफटत आहे. तेव्हा संस्कृतचा जुना प्रवाह आणि इंग्रजी समीक्षेचा नवा प्रवाह याची सांगड घालून प्रत्यक्ष कलाकृतींची मागणी आणि गरज हेरणारी मराठी समीक्षा निर्माण होण्याची आपली गरज आहे. त्यासाठी सामर्थ्यसंपन्न लेखकांच्या कसदार कलाकृतींची निर्मिती आवश्यक आहे. कारण त्यामुळेच मूळ समीक्षाविचारालाच स्थैर्य लाभू शकेल. ■

प्राचार्य,
आर्टस, कॉमर्स कॉलेज
जव्हार (जि. : ठाणे)

युगवाणीला खालील विषयांवर टिपणे हवी आहेत. या व्यतिरिक्तही इतर विषयांवर देखील.

---

१. अलौकिकतावाद, लौकिकता आणि रसव्यवस्था
२. वाङ्मयीन अनास्थेची सामाजिक–राजकीय मीमांसा
३. शासन, साहित्यिक आणि बांधिलकी
४. सफदर हाश्मी
५. पथनाटयाचे माध्यम स्वरूप
६. मराठी नियतकालिकांची अस्तंगतता
७. निखळ वाङ्मयीन नियतकालिके
८. लिटिल मॅगझीन : भूमिका, कार्य आणि भविष्य
९. विजय तेंडुलकर
१०. साहित्यातील प्रचार आणि प्रचार-साहित्यातील साहित्य
११. महेश एलकुंचवार
१२. सौ. जयश्री थत्ते–भट
१३. सत्यदेव दुबे
१४. मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्रातील संवाद-संकल्पना
१५. साहित्यातील संवादाचे संवादशास्त्रीय स्वरूप
१६. कलाप्रकारांचे परस्परसंबंध
१७. हुसेन
१८. हेब्बर
१९. रझा
२०. अमृता शेरगिल
२१. स्ट्रक्चरॅलिझम
२२. बिहेविअर स्कूल
२३. मराठी साहित्याचे जागतिक संदर्भातील थिटेपण आणि मोठेपण
२४. अनुवादित मराठी साहित्य
२५. मराठी कवितेची संख्यात्मकता आणि गुणवत्ता
२६. लोकशाहीचा वाङ्मयीन–कलाविषयक अभिरुचीवरील परिणाम
२७. गजल : मराठी आणि मराठी व्यतिरिक्तची
२८. सुरेश भटांची गजल
२९. ग्रंथालय चळवळीचा वाङ्मयीन–कला-विषयक अभिरुची वृद्धीवरील परि-णाम : शक्यता आणि वस्तुस्थिती
३०. ग्रंथाली, ग्रंथलालसा व ग्रंथव्यवहार
३१. ॲन रँड
३२. वर्ड प्रोसेसर आणि भारतीय लेखक
३३. भारतीय लेखक संघटना
३४. वाङ्मयीन पारितोषिके : नकार की स्वीकार
३५. प्रस्तावना : प्रयोजन आणि आन्हिक
३६. मराठी नियतकालिकांचे धोरणहीनत्व
३७. शांताराम
३८. उत्तरकर्तव्योन्मुखतेतील कलाव्यवहार्यता
३९. कविता : स्त्रियांची
४०. क्रांतिकाव्याची भाषा
४१. कलावंताच्या सांस्कृतिक नात्याचे निर्मितीवरील परिणामाचे स्वरूप
४२. पोस्टरी पोएट्री आणि मराठी
४३. कथेतील कथा
४४. आनंद जातेगावकरांची कथा
४५. उद्धव शेळक्यांची कादंबरी
४६. शाहीर अमरशेख
४७. अण्णाभाऊ साठे
४८. बाबूराव बागूल
४९. डॉ. आनंद यादव
५०. प्रभाकर उर्ध्वरेषे
५१. ना. के. बेहेरे
५२. अस्मितादर्श
५३. अक्षर वैदर्भी
५४. समुचित
५५. उगवाई
५६. निकाय आणि दलित साहित्याला वाहिलेल्या इतर नियतकालिकांची वस्तुस्थिती

लेखकाचे कलात्मक व्यक्तिमत्त्व
: जीवन तत्ववादी

" जिथे छायाचित्रणाच्या स्वरूपाचा वास्तववाद पुरस्कारिल्या जातो व जिथे जीवन जे व जसे आहे ते व तसेच प्रतिबिंबित करण्याला वास्तवाचे चित्रण मानल्या जाते तेथे जीवनाचे समग्र क्षेत्रफळ मोजणाऱ्या जीवनदृष्टीच्या लेखकाचा संबंधच येत नाही. अशा ठिकाणी कलावंताच्या भूमिकेचेच अवमूल्यन झालेले असल्याने अशा वास्तव चित्रणाला वाङ्मयपदच प्राप्त होत नाही." अशी भूमिका मांडणारा लेखन, कलात्मकता व लेखकीय व्यक्तिमत्त्वाची या प्रकारे चर्चा करणारा हा मराठीतील एक आगळावेगळा लेख.

लेखक हा संशोधक नसून त्याच्या निरीक्षणांची पुर्ननिर्मिती करणारा, जीवनाची त्याने अनुभवलेली लांबी, रुंदी, उंची, खोली आणि एकूणच जीवनाचे त्याने काढलेले क्षेत्रफळ मांडणारा व हे सर्व मांडणे तो अथवा ती मांडत असले तरी त्याचे स्वरूप स्वनिरपेक्ष, प्रातिनिधिक असेच राखणारा असा काहीसा प्राणी आहे.

जिथे छायाचित्रणाच्या स्वरूपाचा वास्तववाद पुरस्कारिल्या जातो व जिथे जीवन जे व जसे आहे ते व तसेच प्रतिबिंबित करण्यालाच वास्तवाचे चित्रण मानल्या जाते तेथे जीवनाचे समग्र क्षेत्रफळ मोजणाऱ्या जीवनदृष्टीच्या लेखकाचा संबंधच येत नाही. अशा ठिकाणी कलावंताच्या भूमिकेचेच अवमूल्यन झालेले असल्याने अशा वास्तव चित्रणाला वाङ्मयपदच प्राप्त होत नाही. कारण जे जसे आहे ते तसे चित्रित करण्याचा आग्रह म्हणजे त्या असण्याचे व त्या सभोवतालचे विवरण सादर करणे होय. जीवनसदृशता असणाऱ्या अशा प्रतिमा देखील वाङ्मयीन वास्तवाचा (Literary realism) भाग होऊ शकत नाहीत.

रूपनिष्ठ किंवा संरचनात्मक दृष्टीने वाङ्मयाकडे बघण्याची दृष्टी अशाच तत्त्वांवर आधारलेली असते की जिथे निर्मात्याच्या व्यक्तिमत्वाचा विचारच गृहीत धरलेला नसतो. त्या कृतीचा स्वभाव व सौंदर्यमूल्य, गुणवत्ता इ. बाबी संरचनात्मक संबंधांच्या संदर्भातच तपासल्या जाणे या दृष्टीने स्वीकारलेले असते. या प्रकारात लेखकाची भूमिका ही रचनेकरता वेगवेगळ्या पद्धतींची निवड करण्यापुरती अशा मर्यादित स्वरूपातच आणून ठेवली जाते. वाङ्मयाकडे निसर्गाचे, नैसर्गिकतेचे किंवा वास्तवाचे प्रतिबिंब म्हणून बघणारे हे एका मूलभूत सत्याकडे नेहमीच दुर्लक्ष करतात ते हे की वाङ्मय ही निर्मितीप्रक्रियेची निष्पत्ती आहे व त्यासंदर्भात ती इतर कोणत्याही कलाप्रकारांपेक्षा वेगळी असू शकत नाही.

वास्तववादी लेखक, अथवा जीवनवादी लेखक हा रेकॉर्ड प्लेयरसारखा वाजत राहू शकत असेल तर तो मुळात लेखकाचे कलात्मक व्यक्तिमत्व नसलेली व्यक्ती समजावी लागेल.

लेखक हा कॉम्प्युटर किंवा यंत्रमानवाप्रमाणे 'येथले जीवन तेथे' दाखवू शकणारे किंवा प्रस्थापित करू शकणारे क्रांतियंत्र नव्हे की ज्यात शब्द ओतल्यावर ते क्रांतिवादी, जीवनवादी, वास्तववादी होऊन बाहेर पडतील.

लेखक हे एक स्वतंत्र कलात्मक व्यक्तिमत्व आहे आणि वाङ्मयनिर्मितीच्या प्रक्रियेत भाग घेणारे ते एक स्वतंत्र व्यक्तित्व आहे.

वास्तववादी, जीवनवादी कलेचा विकास ही संकल्पना त्यामुळेच लेखक निरपेक्ष अशी स्वायत्त संकल्पना असूच शकत नाही.

निर्मितीक्षम, व निर्मितीप्रक्रियेत गुंतलेल्या व्यक्तींच्या अभिव्यक्तीसोबतच या संकल्पनेचे अस्तित्व गृहीत असणे शक्य आहे. डोस्टोव्हस्की म्हणतो त्या प्रमाणे कलावंताकडून अपेक्षित असतो तो छायाचित्रणात्मक जीवनवाद अथवा वास्तववाद नव्हे किंवा वास्तवाच्या वा जीवनाच्या चित्रणातील यांत्रिक काटेकोरपणाही नव्हे तर याहून वेगळे, काही तरी वेगळे, काहीतरी भव्य, उदात्त.

निर्मितीय

सारखेपणा आणि काटेकोरपणा या बाबी अनावश्यक आहेत असे नव्हे. मात्र तेवढेच पुरेसे नाही. त्या निर्मितीच्या अशा कच्च्या मालाच्या स्वरूपात असायला हव्यात की ज्यातून कलावस्तूची निर्मिती करता यावी. लेखक कलावंताने कॅमेऱ्याचे भिंग होऊन बघणे म्हणजे निर्मिती नव्हे तर त्याने त्या भिंगातून बघणारा माणूस असणे आवश्यक आहे असा डोस्टोव्हस्कीच्या या संबंधातील विधानांचा आशय आहे.

वास्तवाचा शोध घेण्यासाठी धडपडणाऱ्या लेखकाची खरी ताकद ही तो ज्या पद्धतीने जीवनाचे अंत:प्रवाह आकलन करवून घेऊन, पात्रांचे मानवी वर्तन व 'मानसिकता' यांच्याद्वारे उलगडून मांडतो त्यात सामावलेली असते. टॉलस्टॉयने म्हटल्याप्रमाणे एखाद्या नवीन लेखक कलावंताच्या वाङ्मयकृतीचा विचार करताना मुख्य प्रश्न आपण स्वत:ला विचारायला हवा, तो हा की या लेखकाचे मला ठाऊक असलेल्यांपेक्षा वेगळेपण कोणते ? व जीवनाकडे कसे बघावे यातले आपल्याला ठाऊक नसलेले असे नेमके हा काय सांगतो आहे ?" लेखक जुना असल्यास हेच प्रश्न "आता अजून नवीन काय ? या वेळेला जीवनाची कोणती बाजू, कोणता भाग हा उलगडून दाखवणार आहे ?" असे असतील.

खऱ्या कलावंताचे खरे लक्षण मूलत: त्याला त्याचा आतला आवाज असणे हेच आहे. तेव्हाच तो काहीतरी नवीन व दमदार, जिवंत असे सांगू शकेल.

आपल्यापैकी प्रत्येकातच या संदर्भातील प्रचंड शक्ती व कच्चा माल एकवटलेला आहे. त्याचा वापर करणे हे इतरांनी आपल्यासमोर काय तयार करून मांडलेले आहे यापेक्षाही अधिक महत्त्वाचे आहे.

'मी' या शब्दाचा अथवा शब्दकुळाचा लेखनात सतत होणारा वापर हे काही कलात्मक व्यक्तिमत्त्वाचे लक्षण नव्हे. लेखकाचे–कलावंताचे व्यक्तिमत्त्व हे त्याच्या अभिव्यक्तीच्या, निर्मितीच्या विविध अंगांनी फुलत असते. विशेषत: ते त्याचा जीवनविषयक दृष्टीकोन व त्याच्या कलेचे सामाजिक औचित्य यातून सिद्ध होते. चेकॉव्हने म्हटल्याप्रमाणे लेखकाचे स्वत्व हे निव्वळ त्याच्या शैलीत नसून त्याच्या विचार करण्याच्या पद्धतीत, त्याच्या समजुती इ. मधेही पसरलेले असते.

लेखकाचे व्यक्तिगत व्यक्तीत्व आणि 'व्यक्तिवाद' (Individuality) या दोन भिन्न बाबी आहेत हे मात्र आधी ध्यानात घेणे आवश्यक आहे.

फ्राईडने वाङ्मयाचे जे कार्य वर्णिलेले आहे त्यात एक महत्त्वाचे कार्य हे अहंचे आविर्भवन असे मानलेले असून जीवनाचे चित्रीकरणास त्याने त्यात स्थान दिलेलेच नाही. अहंचे हे आविर्भवन समाजाशी होणाऱ्या त्याच्या संयोग–संघर्ष इ. स्वरूपातील महत्त्व व मोठेपण याचे प्रदर्शक म्हणून त्याने मानलेले आहे. या कार्यामुळे वाङ्मय ही निव्वळ जीवनाची अनुकृती न उरता स्वत:च्याच अंत:करणाचा तळ गाठून केलेली कृती ठरते व कलावंताचे अस्सल आणि अनन्यसाधारण स्थान हे त्यामुळेच ठरते, असे सांगितल्या जाते.

मात्र त्याचबरोबर हे देखील तितकेच खरे आहे, की जगाशी संपर्क नसलेल्या अशा पूर्णपणे वैयक्तिक मनोवस्था व अशा जाणीवांवरील अतिरिक्त भर हे निर्मितीशील व्यक्तिमत्त्व व गुणवत्ता यांना मारकच असणारी अशी एक बाब आहे.

व्यक्तीवाद आणि आत्मनिष्ठावाद या दोन्ही प्रवृत्ती समांतरपणे उगवतात आणि तसेच त्यांचे अस्तित्व असते असे समजण्याचे कारण नाही. काही विशिष्ट मर्यादेपर्यंत या एकमेकात मिसळलेल्या बाबी देखील आहेत.

ज्युंग या मानसशास्त्रज्ञाने कलावंताच्या व्यक्तिमत्वाबद्दल असे म्हटले आहे की त्याचे व्यक्तिमत्व असंबद्ध बाबींचा समुच्चय आहे. एकीकडे तो स्वतःचे आयुष्य, दृष्टिकोन, रुची, सवयी, असलेला मनुष्य प्राणी आहे तर दुसरीकडे निर्माता म्हणून तो बिनचेहेऱ्याचा, अनोळखी इसम आहे.

त्याचे हे बिनचेहेरेपण हे तर्कबाह्य मानसिक प्रत्ययाच्या अभिव्यक्तीतून आलेले असते असे मानले जाते.

फ्राईडने निर्मितीच्या व्यक्तिनिष्ठ स्वभावावर भर दिला तर ज्युंगने कलावस्तूतील अबोधतेचा वाटा मान्य करूनही सामाजिक स्रोत महत्त्वाचेच मानले आहेत.

त्याच्या मते कलावंत त्याच्या द्वारे कलेला तिचे हेतू जाणण्याची मुभा देत असतो. कलावंत म्हणून त्याला त्याच्या व्यक्तिगत पातळीवरील व्यक्तित्वापेक्षा निराळे असे अस्तित्व असून त्याचे स्वरूप हे समूह–मानवाचे आहे.

कलावंत आणि माणसाचे व्यक्तिमत्व या ज्युंगच्या मते दोन भिन्न बाबी तर आहेतच परंतु त्याच्या मते त्यात सतत संघर्षही होत असतो. त्याच्या मते लेखकाचे व्यक्तिमत्व त्याच्या लेखनात अभिव्यक्त होतच नाही आणि लेखक हा स्वतःच लेखनकृतीतील बौद्धिक अभिव्यक्तीचे कार्य बनून रहातो. तर्कबाह्य मूलतत्वाचा म्हणूनच निर्मितीशील कलावंत हा बळी आहे असे ज्युंग मानतो.

अस्तित्ववाद्यांच्या मते त्याच्या कृतीच्या संबंधात कलावंत हा तटस्थ; उदासीन असतो. निर्मितीच्या प्रक्रियेत कलावस्तुच्या निर्मितीदरम्यानच तो संपत असतो. नाहीसा होत असतो. अमूर्ततावाद्यांनी विषयाची निश्चिती करणारे, रूपाच्या, आकाराच्या विविध घटकातील परस्परसंबंध म्हणूनही कलेकडे बघितलेले आहे. या प्रकारात कलात्मक व्यक्तित्वाचे औचित्य फारच मर्यादित स्वरुपातच गणल्या जाऊ शकते. विषयाचे सार निर्मात्याच्या निर्मितीशील स्वत्वाशिवाय देखील व्यक्त होत असल्याचे येथे गृहीत असते. मुळात लेखकाची श्रमशक्ती हा माणूस अथवा समाज यांचेकरता खर्ची पडत नसून यापासून वेगळ्या स्वायत्त अशा वास्तवाच्या चित्रीकरणात ती खर्ची पडते.

कलेचे संवादमूल्य व संवादात्मक गुणवत्ता शेवटी कशात दडलेली असते हा खरा प्रश्न या साऱ्या पार्श्वभूमीवर उपस्थित व्हायला हवा.

आधुनिक मानवी ज्ञानविषयक शास्त्रे, माहितीशास्त्र व संवादविज्ञानाने याबाबत बराच विचार केलेला असला तरी वाङ्मयाची संवादात्मक कार्ये मात्र त्यात दुर्लक्षिल्या गेलेली आहेत.

संवादाच्याही पलीकडे कलेचा प्रांत पोहचतो व निःशब्द किंवा 'शब्दाविण संवाद' हाच तो प्रांत नव्हे तर संवादाशिवाय संवाद घडण्याच्या परिस्थितींचाही विचार आधुनिक कलेने केलेला आहे. मात्र टॉलस्टाय जेव्हा कला ही लोकांच्या संवादाचाच एक प्रकार असल्याचे व निर्मात्याचा स्वतःशी व त्या कृतीचा संबंध येणाऱ्यांशी तो घडत असतो असे जे म्हणतो त्याचा अर्थ लेखकाचे त्याच्या वाचकाशी, आस्वादकाशी असलेले नातेच तो स्पष्ट करतो. लेखनकलेचे एक महत्त्वाचे वैशिष्टच वाचकाभिमुखता व लेखनाची परिणामकारकता हेही मानले गेले आहेच. लेखक कोणाकरता लिहितो? या प्रश्नाच्या उत्तरात त्याला स्पष्टपणे काही जाणवले पाहिजे हे गृहीत असते. अक्षर, शब्द हे मूलतः स्वतःच्या समाधानाकरता किंवा सुखाकरता निर्माण झालेली साधनसामग्री नसून, विचार, भावना, अथवा स्वतःतील काहीही दुसऱ्यापर्यंत पोहचविणारे माध्यम म्हणून ते जन्माला आलेले आहेत. शब्दात सारेच मांडता येतेच असे नाही. उलट शब्दाचे स्वरूपच असे आहे की शब्दात जे व्यक्त होते त्यापेक्षा कितीतरी अव्यक्त राहून संपून जाते. शब्दात येत नाही. हे जे शब्दात येत नाही ते

जाणून घेण्याची; आणता येण्याची किमया साधण्याच्या प्रयत्नात लेखकाला त्याच्या निर्मितीच्या क्षमतेच्या कक्षा रुंदावता येऊ शकतात. लेखक-वाचक नाते कालक्रमात नेहमीच बदलत आलेले आहे. लेखक हा अस्तित्वात असलेल्या वाचकापुरतेच लिहित असतो असेही नाही, तो त्याच्या 'आदर्श' वाचकाकरितादेखील लिहित असतो.

पुरोगामी लेखनाची इच्छा वाचकांशी संवाद साधण्याची असते याचा अर्थ अविकसित अशा अभिरुची धारकांना त्याने वाङ्मयाचा पुरवठा करावयाचा असतो किंवा त्यांच्या गरजा भागवायच्या असतात तरच संवाद साधला गेला असे समजायचे असे नसते हे लक्षात घेणे आज नितांत आवश्यक ठरते आहे.

त्याने निर्माण केलेली प्रतिमासृष्टी, प्रतिमांची व्यवस्था, रचना या द्वाराच तो त्यांच्या कल्पना सौंदर्यमूल्ये व जीवनाचे नवे भान मांडत असतो. एका अर्थाने तो त्याच्या वाचकांचा पुढारीच असतो. त्यांचे या बाबतचे तो नेतृत्वच करतो. एवढेच नव्हे तर ज्यांचे नेतृत्व करतो असे वर्तुळही तोच आपल्या कलेने निर्माणही करतो. लेखकाचे त्याच्या काळाशी असलेले नाते व त्याचा कोणत्याही अर्थाने त्या काळातील चळवळी इ. मधील सहभाग त्याला त्याच्या लेखनकृतींना 'कालातीत' राखण्यापासून वंचित करतात असा एक दृढ समज नेहमीच रूढ असतो.

जे असे समज घेऊन 'कालातीत' होण्यासाठी धडपडत असतात असे लेखक-कलावंत स्वतःला 'कालातीत' राखण्याच्या प्रक्रियेत जीवनापासून तुटून, विचार, जाणीवा, आकांक्षांचे, समकालीनत्व घालवून बसतात व या प्रक्रियेत त्यांच्या समकालीनांचेच नव्हे तर नंतरच्याही पिढयांचे त्यांच्याशी नाते प्रस्थापित होण्याच्या शक्यता दुरावतच जातात.

लेखकाकरता खरा धोका समकालीनत्वात गुंतून जाऊन हरवून बसण्याचा नसून जीवनाबाबतची तटस्थता, अलिप्तता निर्माण होण्याचा असतो व जो त्याला निकट असलेल्या जीवनासंबंधी अलिप्त असेल तो स्वतःला 'कालातीत' राखण्याच्या कल्पनेपोटी जे त्याच्यापासून दूर आहे अशा पुढील पिढयांच्या संबंधातही तितकाच नवखा ठरण्याची शक्यताच अधिक.

समकालीन वास्तवाशी असलेले लेखकाचे नाते त्याच्या कालखंडाची परिचित वैशिष्टये रंगविण्याइतके मर्यादित असण्याचे कारण नाही. त्याच्या समकालीनत्वाचा त्याने घेतलेला कलात्मक शोधच आस्वादकाला स्तिमित करीत असतो. असा शोधच पुढील कालखंड व येणाऱ्या पिढयांनाही प्रभावित करीत असल्याने त्याचे हे असे समकालीनत्वच आपोआपच 'कालातीत' ठरू शकते. त्याकरता समकालीन जीवनाकडे जाणीवपूर्वक पाठ फिरवण्याची गरज भासण्याचे कारणच नसते. त्याच्या कृतीची व्युत्पन्नता आणि औचित्य केवळ काळच घासून पुसून मांडत असतो. त्याचे उत्तर निव्वळ काळच देत असतो. सार्त्रने म्हटल्याप्रमाणे भविष्याने लेखकाच्या कृतीबाबत काय म्हणायचे आहे याची काळजी करण्याचे कारण नाही. कारण सार्त्रच्या मते, कला ही मृताशी अथवा जे जन्मलेलेच नाही अशाशी साधलेला संवाद नव्हे. सार्त्र म्हणतो त्या प्रमाणे कलाकृती ही त्या त्या काळाचे केवल, परम तत्व आपल्यासोबतच वाहून नेत असते.

प्रत्यकाच थोर लेखकाने त्याच्या काळाकरिताच लिहिलेले आहे. अगदी महाभारतकार व्यासांनी सुद्धा. याचा अर्थ त्या काळाच्या कोठडीत स्वतःला डांबून घ्यावे असा नव्हे. तर त्या काळाच्या पुढे बघणारी दृष्टी, बदलाच्या प्रेरणा यासहित हे होत असते तेव्हा आपोआपच त्या काळापासून मुक्त असे मनही घडत असतेच. आपआपल्या कालखंडातील जीवनातच खोलवर जाऊन त्याचा तळ गाठणाऱ्यांनाच पुढील अनेक पिढयांशीही संवादित राहू शकण्याची शक्ती प्राप्त झालेली आहे हे विसरुन चालणार नाही. ■

दोन कविता

१

तुझ्या डोळ्यातलं आभाळ
कितीही विस्तीर्ण असलं तरी
ते परकं आहे
रस्त्यांना देखील बांधीलकी असते
ठराविक ठिकाणी न्यायची
पावलं असहाय असतात
भोवतीच्या घरांनी जखडल्या
गेलेल्या रस्त्यानं
घरात राहणारी माणसं
त्यांच्या मनातही एक घर असतं
आणि ते
त्या घराचे राजे असतात
तरीही
प्रत्येक वेळी आपल्याकडं
बदामराणी येतेच असं नाही
दारात लावलेल्या फुलझाडांनी
केव्हा बहरावं, हे आपण ठरवायच नसतं
तू
तुझ्या खिडकीतल्या आभाळाचे
उत्सव साजरे कर
पण आभाळ
हृदयापेक्षा कधीच मोठं नसतं..

२

आभाळी उमलून आले
ते फसवे घन ओलावे
वैशाख जन्मला पोटी
मी सुके श्वास तोलावे

उतरून ठेवू कोठे मी
हा सूर्य तळपता दारी
हे तप्त राज्य रेतीचे
वणव्याच्या झाल्या फेरी

कोणाचे न्यायासन हे
आरोप जबान्या साक्षी
दैवाचे उलटे दावे
प्राणात तडफडे पक्षी

सुधाकर नेर्लेकर
१०२ रास्तापेठ
ईस्राईल गल्ली पुणे, ४११०१

दोस्तांनो

दोस्तांनो, आम्ही एकनिष्ठ स्वामीभक्त कुत्रे
आता गुरूच्या गळ्यात गळा घालून
विद्रोहाचे गीत गाणार आहोत.
एकाने भुंकायला सुरुवात केली की,
आम्ही सारेच भुंकतो
ह्याच तर आमचा एकमेव गुणधर्म
म्हणून आमची जात बदनाम आहे
खरे तर सत्याचे अन्वेषण करणारे आम्ही
मान्यताप्राप्त...काहींना प्रमाणपत्र
आता गळ्यातल्या पट्ट्याबरोबर
डोळ्यावरही पट्टी बांधली आम्ही
आम्ही घरभेदे येईमात्र ' गुरुभक्त '
महात्म्यांचे नाव घेऊन सारेच प्रश्न सुटतात
ओठाचे...पोटाचे...पाठीचे...आणि साठीचे
असे गुरूने पढवल्यापासून
रात्रंदिवस शोध घेतो आहोत
आरत्या गात आहोत
स्वामीवरच भुंकतो आहोत.
एकनिष्ठा जपतो आहोत.

■

अन्वेषण

या कुत्र्यांनी आता स्वामीनिष्ठा जपावी
उंबरठा ओलांडला ज्यांचा
त्यांचेवरच गुरगुरणे सोडून द्यावे
नाही तर मग
खरे कुत्रेही निषेध नोंदवतील
आमच्या जातीत त्यांना राहता येत नाही
म्हणुन....त्यांना पिटाळून लावतील
अशावेळेस...त्यांना ना घर ना घाट राहणार
एखादेवेळी परिटाने जवळ केले तरी
त्यांची गाढवंही दुलत्ती झाडल्याविना
राहणार नाहीत
मग...कुत्र्यांना जिणेही नकोसे होईल
नदीच्या काठाने आयुष्य शोधीत
वण वण भटकतील
आपल्या दुःखावर आपणच
फुंकर घालीत बसतील
मग...मोसम सुद्धा साथ देणार नाही
आणि...
ज्या आकाशाचे ओझे शिरावर वागवले
ते सुद्धा काळवंडून जाईल
मेघमरल्या अंगाने ...

■

झाड

झाडांनी कितीही नाकारले
आम्हाला आमचा इतिहास नाही म्हटले
तरी...झाडं कशी रुजतात
हे कोणालाही सांगावे लागत नाही
आकाशात मेघ दाटून आलेत की
पृथ्वी न्हाती धुती होते
झाडांचे गर्भ घेऊन
हरखून जाते...डोलते—
पूर्वापार असेच चालत आले
हे सर्वमान्य...
तरीही...आम्हाला मातीचा स्पर्श नाही.
असे सांगणे म्हणजे...
' गर्भाविना आम्ही जन्मलो ' म्हणणे
याहून...कोणते दुष्टपण असावे ?
झाडे इतिहासाविना नाहीत
एवढे एक अंतिम सत्य...

ज्योती लांजेवार
रविनगर, नागपूर-१०

विंदा करंदीकर यांच्या 'मृद्गंध' काव्यसंग्रहातील 'कसा मी कळेना' ही कविता आणि मंगेश पाडगांवकर यांच्या 'जिप्सी' या काव्यसंग्रहातील 'कधी पाहतो' ही कविता; या दोन कवितांमध्ये एक विलक्षण साहचर्यसंबंध प्रतीत होतो. या दोन कवितांमध्ये कल्पनेचे भिन्नत्व असून त्या दोहोत असलेली एकत्वाची आगळी-वेगळी जाणीव रसिक मनाला आकृष्ट करते. वस्तुतः या दोन कविताची रचनाशैली वेगळी आहे, कवितांचा घाट वेगळा आहे. शब्दसाज व एकूण बाज वेगळा आहे. या कवितांचे दर्शनी बाह्यरूपही वेगळे आहे. तथापि त्यांचे 'अंतरंग' मात्र बरेचसे 'समरूप' आहे. या दोन्ही कविता 'स्वनिष्ठ' वाटत असल्या तरी, त्या कवितांमधील 'मी' मात्र 'वैश्विक' आहे हा 'मी' एकूण सर्वसामान्य माणसाचे प्रतिनिधित्व करतो.

कधी पाहतो
मी माझ्यातच विचित्र मानव
क्षुद्र अविकसित विद्रुप दानव
अंधारातुन अन चिखलातुन
वृक्षमुळापरि भूविवरातुन
चेटकिणीच्या हातापरि निज शरीर अपुले
क्षुद्र घृणास्पद; फिरे परंतु
मिरवित मिरवित जीवन जंतू
अंधपणातच सरपटणारा
कुढ्या तमातच अन् जगणारा
विचित्र मानव !

कधी पाहतो
मी माझ्यातच विराट मानव
पावलातुनी उमले ज्याच्या उषाच अभिनव !
हिमालयापरि देह जयाचा
मुकुट शिरावर रविकिरणांचा
पवित्र गंगा स्फुरते ज्याच्या वक्षामधुनी
अन् मृत्युंजय मंत्र जयाच्या अधरामधुनी
आकाशाला भिडे जयाचा प्रचंड माथा
हसत उलटतो नक्षत्रांचा प्रकाशगाथा
अमर्त्यतेच्या वाटेवरला जीवनयात्री
रविभाळावर, अमृत गात्री
चिरसंजीवन मंगल नेत्री !
विद्रूप मीही, विराट मीही
साक्षी केवळ आणिक तरिही
या दोघांचा;
भूविवरातील अंधाराचा; आकाशाचा !

कविता : कधी पाहतो
कवी : मंगेश पाडगावकर
काव्यसंग्रह : जिप्सी

कधी येतसे क्षुद्रता कस्पटाची;
कधी वाढता वाढता व्योम व्यापी
कधी धावतो विश्व चुंबावयाला;
कधी आपणाला स्वहस्तेच शापी
कधी याचितो सत्; कधी स्वप्न याची;
कधी धावतो काळ टाकून मागे
कधी वर्षतो अमृताच्या सरी अन्
कधी मृत्युची भावडी भीक मागे.
कधी दैन्यवाणा, निराधार होई;
कधी गूढ, गंभीर, आत्मप्रकाशी.
कधी गर्जतो सागराच्या बळाने;
कधी कापतो बोलता आपणाशी !
कधी आपणा सर्व पिंडात शोधी;
कधी पाहतो आत्मरूपात सारे,
कधी मोजितो आपणाला अनंते
अणूरूप होतो जिथे सूर्य, तारे.
टळेना अहंकार साध्या कृतीचा;
गळेना महापुच्छ स्वार्थी स्मृतींचे;
कधी घेतसे सोंग ते सत्य वाटे !
कधी सत्य ते वाटते सोंग साचे !
कधी संयमी, संशयात्मा, विरागी;
कधी आततायी, कधी मत्तकामी;
असा मी...तसा मी...कसा मी कळेना;
-स्वतःच्या घरी दूरचा पाहुणा मी !

कविता : कसा मी कळेना
कवी : विंदा करंदीकर
काव्यसंग्रह : मृद्गंध

दोन कवी : एक साहचर्य संबंध

: प्रा. अविनाश देशपांडे

परस्परांना छेद देणाऱ्या, विरोधात्मक अशा प्रवृत्तींची घट्ट वीण असलेल्या मानवी व्यक्तिमत्त्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत दोन कवितांमध्ये प्रकर्षाने जाणवतो. एकाच दिशेने समांतर जाणाऱ्या, पण एकाच भावाविष्कारात विराम पावणाऱ्या या दोन लक्षणीय कविता आहेत.

मानवी मनात परस्परभिन्न प्रवृत्तींचे दर्शन घडते. एकाच व्यक्तिच्या ठिकाणी परस्परभिन्न अन् विरोधात्मक अशा भावना / कल्पना साकारताना दिसतात. इष्टानिष्ट, योग्यायोग्य, शिव–अशिव, पवित्र–अपवित्र यांच्या संदर्भात विवेक करणे असंभवनीय वाटू लागते. परिणामी मती संभ्रमित / कुंठित होते. मानवी मन इतके तरल व अनाकलनीय आहे की, स्वत:च्या मनाचे ज्ञान स्वत:लाच स्पष्टत्वाने होत नाही. पारा हस्तगत करण्याचा प्रयत्न विफल ठरावा, तद्वतच मन:प्रवृत्तीचे आकलन करण्याचा प्रयत्न दुष्कर ठरतो. या अनाकलनीय मनाच्या परस्परभिन्न प्रवृत्तींच्या रसायनातून कवी विंदा करंदीकर यांची 'कसा मी कळेना' ही कविता आकार धारण करते. त्यांच्या या कवितेतील एका पद्य पंक्तीत 'असा मी', तर दुसऱ्या पद्यपंक्तीत 'तसा मी'चे सूचन करीत, एक विशिष्ट क्रम सांभाळीत शेवटी 'कसा मी'च्या प्रश्नांकित भावनिक कल्लोळापर्यंत ते पोहोचतात आणि "स्वत:च्या घरी दूरचा पाहुणा मी" अशा साशंकित मनोवस्थेचे हृदयदर्शन घडवितात. त्यांची ही कल्पना मनाला भावतेच.

परस्परभिन्न प्रवृत्तींचे वर्णन करताना विंदा करंदीकर म्हणतात की; माझ्या मनाला कधी कस्पटाची क्षुद्रता येते; मन कधी नीचतेची आत्यंतिक पातळी गाठते तर कधी मनाचे हे क्षुद्रपण कल्पनातीत असते. याउलट हेच मन कधी–कधी उदारतेची परमोच्च सीमा गाठते. मनाचे हे उदारपण चराचराला व्यापून टाकणाऱ्या आकाशालाही व्यापते. मनाची उंची आणि उदारता इतकी उत्तुंग, भव्य–दिव्य असते की, त्यापुढे आकाशाची विशालता अल्प–स्वल्प ठरावी.

कधी धावतो विश्व चुंबावयाला;
कधी आपणाला स्वहस्तेच शापी.

असा स्पृहणीय आणि विदारक अनुभव विशद करताना कवी म्हणतो की, कधी–कधी संपूर्ण जगताबद्दल आत्मियता वाटू लागते. विश्वैक्याची; मानव्याची भावना मनात फुलून येते. समस्त मानवमात्राबद्दल अनुराग वाटतो. अखिल विश्वाबद्दल अलोट सदिच्छा वाटते. मानवाविषयी मित्रीच्या जिव्हाळयाला उधाण येते. याउलट कधी कधी मन इतके कोपायमान होते की, त्यासमोर शिघ्रकोपी दुर्वासांचा राग फिटा पडावा. दुर्वास इतरांना शाप देण्यासाठी प्रसिद्ध आहेत. तथापि माझा क्रोध इतका अनावर होतो की, मी इतरांना शाप तर देतोच पण स्वत:लाही शाप देण्यास कचरत नाही.

कधी–कधी मन सत्याची याचना करते अन् आराधनाही करते; तर कधी–कधी केवळ स्वप्नांची कास धरते; काल्पनिकतेच्या मृगजळामागे धावते. मनाचा वेग इतका प्रचंड असतो की, काळाला मागे टाकते.

कधी वर्षतो अमृताच्या सरी अन्
कधी मृत्युची भावडी भीक मागे

या विरोधात्मक प्रवृत्तीचे दर्शन घडविताना कवी म्हणतात की; कधी मन अमृतवृष्टी करून संजीवक ठरते. इतरांवर अमृतांच्या सरींचा वर्षाव करून, 'जीवदान' देण्यात कृतकृत्यता मानणारे हे मनच कधी कधी स्वत:साठी 'मरणदान' मागते; मृत्युची भीक मागते. हे तर भिन्न प्रवृत्तींचे दोन ध्रुव !!

मन कधी कधी हीन–दीन, लाचार होते. निराधारतेच्या भयाण अंधाऱ्या जाणीवेने ग्रस्त होते, या उलट आपण स्वयंप्रकाशी, गूढ अन् गंभीर असल्याची साक्षही मनाला पटते. कधी

कधी मन सागराच्या सामर्थ्याने गर्जना करते. एकदा मनाला सागरगर्जनेचे सामर्थ्य आपल्या ठिकाणी जाणवते, तर दुसऱ्याच क्षणी ते स्वतःशी संवाद साधताना कंपायमान होते.

कधी आपणा सर्व पिण्डात शोधी
कधी पाहतो आत्मरूपात सारे

हे मानवी मन कधी कधी अखिल प्राणीमात्रात स्वतःचे रूप पाहते; तर कधी स्वतःच्याच रूपात विश्व पाहते. आपण स्वतःच ब्रह्मांडस्वरूपी आहोत असे वाटते. आपल्या या 'अनंतत्त्वाची' जाण झाल्यामुळे मनाला सूर्य-तारे अणुरूप भासतात. क्षुल्लक कृत्यांबद्दल; गोष्टींबद्दलही मनाला अहंकार वाटतो आणि 'स्वार्थी स्मृतींचे महापुच्छ' काही केल्या गळत नाही. कधी तर सोंग / दंभ हेच सत्य असल्याची प्रचिती येते; तर कधी सत्य हेच सोंग / दंभ वाटू लागते.

कधी मन संयमित /संतुलित असते; तर कधी संशयी. कधी मनात वैराग्य फुलून येते, कधी आततायीपणाचे थैमान सुरू असते; कधी-कधी मन काममत्त, संपूर्णतः विकाराधीन झालेले असते.

क्षुद्रता अन् विशालता, कोध्रायमानत्व व अनुराग, दीन-निराधारपण अन् आत्मप्रकाशत्व, स्वयमेवमृगेंद्रत्व व भित्रे अबोलपण, संयमन व आततायीपण, वैराग्य अन् विकारवशता या भिन्न प्रवृत्ती एकाच व्यक्तिमानसात उद्भवतात.

मनाच्या या द्विध्रुवात्मक स्थितीचे वर्णन करताना शेवटी कवी विंदा करंदीकर म्हणतातः -

असा मी...तसा मी...कसा मी कळेना
स्वतःच्या घरी दूरचा पाहुणा मी

या पार्श्वभूमीवर कवी मंगेश पाडगावकर यांच्या 'कधी पाहतो' या कवितेचा विचार मननीय ठरावा. 'कधी पाहतो' या काव्यात मानवी मनातील क्षुद्रता अन् भव्यता कलारूप धारण करून अवतरली आहे. मानवी मनात क्षुद्रता, संकुचितपणा, अज्ञान, कुढीवृत्ती इ. अमंगल अपप्रवृत्ती दिसतात. तद्वतच पावित्र्य, भव्यता, विशालता यांचेही संजीवक दर्शन घडते; हा भाव व्यक्त करणारी आणि परस्परभिन्न प्रवृत्तींचा साक्षात्कार घडविणारी ही कविता आहे.

या कवितेत दोन भाग स्पष्टपण जाणवतात. प्रथम भागात 'विचित्र' माणसाचे वर्णन आलेले असून दुसऱ्या भागात 'विराट' माणसाचे दर्शन घडविले आहे. या दोन भागांचा सारभूत संकलित विचार शेवटच्या चार ओळीत आला आहे.

'कधी पाहतो' मध्ये मानवाची परस्पर-भिन्न अशी दोन रूपे येतात. एक रूप 'विचित्र' मानवाचे व दुसरे 'विराट' मानवाचे ! अर्थात् या कवितेतील 'विद्रूप अन् विराट' या संज्ञा मानवी भिन्न प्रवृत्तींच्या निदर्शक आहेत. या संकल्पना प्रतीकात्मक आहेत.

कधी पाहतो
मी माझ्यातच विचित्र मानव

हा प्रथम भागाचा आरंभ आहे; तर

कधी पाहतो
मी माझ्यातच विराट मानव

हा द्वितीय भागाचा प्रारंभ आहे. शेवटी-

'विद्रूप मीही, विराट मीही'ची ग्वाही आहे.

कविला कधी कधी स्वतःच्याठायी 'विचित्र' मानव भासमान होतो. या 'विचित्र' मानवाचे रूप कसे ?...तर

'क्षुद्र अविकसित विद्रूप दानव'

हा विचित्र मानव क्षुद्र, अज्ञानी, अविकसित व संकुचित वृत्तीचा असतो. त्याचे वास्तव्य असते ते अंधारात आणि चिखलात ! या विचित्र मानवाने 'विद्रूप' अशा दानवाचे रूप धारण केलेले असते. या विचित्र अन् विद्रूप मानवाचे हात चेटकिणीच्या हाताप्रमाणे असतात. चेटकिणीच्या हातून इष्ट; मंगल, कल्याणमय कार्य होण्याची मुळीच शक्यता नसते. तिच्या हातून होईल ते चेटूक, इतरांचे अनिष्ट आणि अकल्याण !

कधी कधी कविला स्वतःचे रूप सरपट-णाऱ्या / वळवळणाऱ्या एखाद्या क्षुल्लक जीवजंतु-प्रमाणे भासते. हा क्षुद्र जीवाणु-

'अंधपणातच सरपटणारा
कुढ्या तमातच अन् जगणारा'-असा असतो. याउलट कविला कधी-कधी आपल्या ठिकाणी 'विराट' मानवाचा साक्षात्कार घडतो,

या विराट मानवाचे आगमन असे शुभसूचक असते की,

'पावलातुनी उमले ज्याच्या उषाच अभिनव'
या विराट मानवाचा देह हिमालयाप्रमाणे शुभ्रधवल नि उत्तुंग असतो. त्याच्या मस्तकी सुर्य किरणांचा तेज:पुंज मुकुट असतो.

'पवित्र गंगा स्फुरते ज्याच्या वक्षामधुनी
अन् मृत्युंजय मंत्र जयाच्या अधरामधुनी'

असा हा महन्मंगल विराट मानव ! त्याच्या हृदयातून पवित्र विचारांची गंगा प्रस्फुरित होते. त्याचे मन म्हणजे पावित्र्याचे, मांगल्याचे, विमलतेचे माहेरघर ! त्याच्या ओठातून मंत्र उद्‌घोषित होतो, तो देखिल कल्याणकारी मृत्युंजयाचा !!

'आकाशाला भिडे जयाचा प्रचंड माथा
हसत उलटतो नक्षत्राचा प्रकाशगाथा'

त्याची गगनचुंबी भव्यता आणि आकाशाला आपल्या तेजाने उजळून टाकणाऱ्या नक्षत्रांना स्थानभ्रष्ट करण्याचे त्याचे सामर्थ्य अलौकिकच नव्हे काय ? कविला स्वत:च्या ठिकाणी भासमान होणारा हा 'विराट मानव अमर्त्यतेच्या वाटेवरला जीवनयात्री' वाटतो. त्याच्या मस्तकावर सूर्य असतो; अर्थात त्याच्या बुद्धीचा प्रकाश सर्वत्र विखुरलेला असतो. त्याच्या गात्रातून अमृत स्रवते. संजीवक अशी मंगलशक्ती त्याच्या नेत्रात साठलेली असते. शेवटी कवी म्हणतो,

विद्रूप मीही, विराट मीही
साक्षी केवळ आणिक तरीही
या दोघांचा;
भूविवरातिल अंधाराचा; आकाशाचा !

'कसा मी कळेना' (विंदा करंदीकर) आणि 'कधी पाहतो' (मंगेश पाडगांवकर) या दोनही कवितांची मध्यवर्ती कल्पना 'मानवी मनातील परस्परभिन्न प्रवृत्तींचे दर्शन' ही होय. 'मानवी मनाचे अनाकलनीयत्व' हा या कवितांचा प्राण आहे.

रेशमी गाठ सैल करतांना ती अधिकाधिक घट्ट होते, त्याचप्रमाणे विंदा करंदीकर 'असा मी...तसा मी...कसा मी कळेना' या विचाराच्या आवर्तनात गुंतून पडलेले भासतात; त्यातूनच ते 'मानवी मन परस्पर भिन्न प्रवृत्तींच्या चक्रात अहर्निश गरगरणारच' याचे संसूचनही करतात.

मंगेश पाडगावकर मात्र एकाच वेळी विद्रुपता आणि विराटता अनुभवतात. एवढेच नव्हे तर, 'मी त्या दोघांचा–भूविवरातील अंधाराचा व आकाशाचा–प्रत्यक्षदर्शी / साक्षी आहे', हे नमूद करून मानवी मनातील भिन्न प्रवृत्तींच्या अपरिहार्यतेची, अटळतेची ग्वाही देतात.

साधर्म्य असलेल्या वर्ण्यविषयाचे भिन्न आविष्करण, हे या दोन कवितांचे लक्षणीय वैशिष्ट्य. 'व्यक्ति' मानसातून 'समष्टीमानसाचा' वेध घेणाऱ्या या दोन समानधर्मी कविता आहेत. ■

द्वारा : श्री. रामचंद्र गाढवे
चिटणवीसपुरा, पोलीस चौकीमागे,
महाल, नागपूर–४४०००२

टिपण

आशा बगे : एक नवे अस्तित्व

: डॉ. श्रीनिवास रामचंद्र सिरास

आशा बगे या वैदर्भीय लेखिकेच्या कादंबरी व कथासंग्रहास दुहेरी राज्य पुरस्कार प्राप्त झाला आहे. इतर पुरस्कारही आहेतच. त्यांच्याबाबतचे युगवाणीस अगोदरच प्राप्त झालेले हे टिपण त्या निमित्ताने प्रकाशित करीत आहोत.

कथालेखिका आशा बगे ह्या एका महत्त्वपूर्ण वळणापाशी येऊन पोहचल्या आहेत. मराठी कथासाहित्यात कथाकार नेहमीच अशा वळणाजवळ येऊन पोहचतात. त्यांचे सिंहावलोकन मग त्यांना बदलाला प्रवृत्त करते आणि मग त्यांच्या कलेचा बाज अगदी अचानकपणे बदलताना दिसतो. जी. ए. कुळकर्णी सारखा कथाकार अशा वळणानंतर पुढे मिथ कथेकडे वळलेला दिसून येतो. आशा बगे या सानिया, गौरी देशपांडे, रोहिणी पटवर्धन यांच्या नामावळीत सहजपणे आल्या आहेत. मात्र त्यांचा वेगळेपणा इतका स्पष्ट आहे की, इतर समकालीनांच्या पेक्षा आशा बगे यांची कथा एकदम निराळे स्पंदन घेऊन उतरल्याची जाणीव त्यांच्या वाचकांना व समीक्षकांना झाल्याशिवाय रहात नाही. त्यातच यंदाच्या राज्य पुरस्काराने त्यांना एकाच वेळी दुहेरी सन्मान लाभलेला असल्याने त्यांच्या लेखनाबद्दलच्या अपेक्षा आपोआपच वाढल्या आहेत. 'झुंबर' ही कादंबरी आणि 'अत्तर' हा दीर्घकथाचा संग्रह या दोन पुस्तकांना यंदाचा राज्य पुरस्कार मिळून त्यांची कला सन्मानित झाली याशिवाय नाशिक येथेही त्यांचा डॉ. अ. वा. वर्टी पुरस्काराने सन्मान झाला आहे. त्यांनी आपल्या कथांमधून कशा कशा पायऱ्या ओलांडल्या आहेत व त्या सध्या कुठल्या स्थानावर येऊन पोहचल्या आहेत याचा विचार कथासाहित्याच्या अभ्यासकाला सहज करता येण्यासारखा आहे.

कादंबरी 'झुंबर' (१९८४) व 'अत्तर' (१९८८) या कथासंग्रहातील कथांच्याशिवाय अद्याप प्रसिद्ध न झालेल्या त्यांच्या 'पूजा' या कथासंग्रहातील व संग्रहीत न झालेल्या अनेक कथा, दीर्घकथा यातून आशा बगे या लेखिकेचे दर्शन हे एका समर्थ लेखिकेचे, आव्हानक कथाविषय निवडून त्याची सुंदर, संवेदनशील मनाने मांडणी करणाऱ्या कलावंत हृदयाचे आहे. त्यांचा 'मारवा' हा कथासंग्रह काही वर्षांपूर्वी प्रसिद्ध झाला तेव्हा त्याही वेळी त्या सन्मान मिळवून गेल्या होत्या. यश जणूकाही त्यांच्या जवळ येण्याला उत्सुक असते. परंतु त्या यशालाही भारी व्हावी अशी वाङ्मयीन समज, कलात्मक शैली आणि विशिष्ट पातळीवरील मानवी मनाचे घडविले जाणारे अंतरंग दर्शन प्रभावीपणे मांडता येणारी देवदत्त प्रतिभा यांचा मेळ जमणे हेच त्यांच्या यशस्वितेचे खरे गमक होते असे दिसुन येते.

'अत्तर'मधे ज्या तऱ्हेने त्यांनी मानवी मनाचे दर्शन घडविले आहे ते सर्वस्वी त्यांची स्वतंत्र व स्वतःची शैली असलेले असेच आहे. या उलट 'झुंवर' या कादंबरीतला विषय हा बराचसा ताणला गेला असला तरीही त्या कादंबरीची रचनाच एवढी आव्हानात्मक आहे की त्यातील कथावस्तूला न्याय देण्यासाठी प्रसंगी लेखिका म्हणून आशा बगे या स्वतःच थोडे सामंजस्य पत्करताना दिसून येतात. 'झुंवर'ची नायिका वसुमती, तिचे पती ऋषीकेश व तिच्याशी जवळीकीने बांधला गेलेला 'राघव' हे तिघेही धंद्याने डॉक्टर आहेत. कादंबरीचा कथाविषय या तिघांच्या समोर एकमेकांच्या संबंधामुळे निर्माण होणाऱ्या भावनिक अडचणींचा आहे. आणि यामधून नायिकेला सापडणारा जीवनविषयक तत्त्वज्ञानाचा रस्ता ही या कादंबरीची खरी कथावस्तु. पण मुळामधेच ही कथावस्तु अडचणीची व आव्हानात्मक अशी आहे. कादंबरीच्या घाटाला आवश्यक तो संघर्ष निर्माण न करणारी व अतिशय वेगळ्या प्रकारची आहे. परंतु लेखिकेने आपल्या संवेदनशील मनाने या एका एका चरित्राला पारखूनच मग त्याचे चित्रण केलेले आहे हे वाचकाला कादंबरी वाचून झाल्यावर जाणवल्याशिवाय रहात नाही.

'झुंबर'मधे एक यातना आहे. ही यातना स्त्रीच्या प्रेमाला मिळणारी पुरुषाची प्रतिसादशून्यता व त्याद्दल स्त्रीची आपला हक्क न मागण्याची सवय जपणे यामधून जन्म घेते. वसुमती आपल्या प्रेमसंबंधाविषयी स्वतःशी विचार करते. शेवटी सर्व स्वानुभव, मग तो प्रेमाचा का असेना; हृषीकेशसारख्या अप्राप्यच राहिलेल्या पुरुषाप्रमाणे तो अनुभव लखलखत्या झुंबराचा अनुभव ठरतो. आणि शेवटी तरी ही झुंबरं विझायचीच असतात हे वसुमती ओळखते. वसुमतीच्या मनाला होणारी ही जाणीव शोकात्मतेच्या काठापर्यंतच येते, ती शोकात्म होत नाही. मात्र ही जाणीव अतिशय महत्त्वाची आहे. कारण यातूनच लेखिकेने उभी केलेली पुरुषपात्रे ही अतिशय परिणाम कारक झालेली आहेत. डॉ. हृषीकेश अधिकारी व डॉ. राघव या महत्त्वाच्या दोन पुरुष पात्रा सोबत नायिका वसुमती जो प्रवास करते तो विशिष्ट अंतर कायम ठेवून केलेला समांतर जीवनप्रवासच असतो. वसुमतीच्या मनातले डॉ. अधिकारींशी लग्नाचे विचार व त्यानंतरच्या दिवसातली वसुमती आणि उत्तरार्धात डॉ. राघवंशी प्रेम आणि जीवन याच्याबद्दल सैद्धातिक बनून चर्चा करणारी वसुमती यांच्यात एक पुरुषसान्निध असूनही दूर अस्तित्वात असलेल्या स्त्रीचे दर्शन लेखिकेने घडविले. दुसरे असे की यामधूनच आशा बगे पुरुष पात्रांचेही मोठ्या कौशल्याने दर्शन घडवितात. वसुमतीचा दहा वर्षाचा मुलगा आदित्य हाही याला अपवाद ठरत नाही.

आशा बगे यांच्या लेखनातील स्त्रीचित्रणाची खुबी इथेच आहे. वसुमतीने केलेला डॉ. राघवचा स्वीकार, तिच्यामधे होणारा सद्सद्विवेक बुद्धीचा संघर्ष व शेवटी राघवकडे जाताना आदित्यला मी सोबत नेऊ का म्हणून सासऱ्यांना विचारणारी वसुमती–शेवटी मात्र आदित्यही हृषीकेशच बनणार, त्यामधे आपला रंग अवशेष म्हणूनही उरणार नाही या वास्तवाची तिला होणारी जाण हे सारे सारे वसुमती व डॉ. हृषीकेश यांच्यामधील विरळ होत होत नाहीशी झालेली ओढ प्रगट करते. या ओढीतूनच तिचा शेवटी डॉ. राघवकडे जाण्याचा निर्णय व त्यापूर्वी घडणारे डॉ. हृषीकेशचे मरण हेही त्या रंगवितात.

इतर कथाकार हे स्त्री व पुरुषांमधले संबंध रंगविताना त्यात नैतिकतेला विशेष वाव देत नाहीत. तर या उलट आशा बगे आपले स्त्री पात्र विशिष्ट नैतिकतेच्या भक्कम पायावर उभारून त्या स्त्री चित्रणाला एक बहुमान मिळवून देतात. स्त्रीची ही स्वतःच्या (Super–

Ego) सश्रद्ध वृत्तींशी चालणारी झुंज आपोआपच पुरुषपात्र परिणामकारक करून जाते. या साठी त्या कुठलेही तांत्रिक ठरणारे मार्ग अवलंबितांना दिसत नाहीत.

'अत्तर' या कथासंग्रहातील 'निवडुंग' ही कथा या संदर्भात अभ्यसनीय ठरते. स्त्रीच्या मनातील पुरुषाबद्दलच्या आकर्षणाची ममत्व भावना ही चटकन उगवते. ती निवडुंगासारखी कुठल्याही जमिनीवर वाढते — कुठल्याही परिस्थितीत जन्म घेऊ शकते हे नायिका गायत्रीने सांगितलेले जीवनविषयक तत्त्वज्ञान—मुळात गायत्री निराश्रित झालेली व आश्रयाला आलेली तरुण, तडफदार पण दुर्दैवी स्त्री. विश्वास हा गायत्रीने आश्रय घेतलेल्या घरातला मुलगा. कमल ही त्याची बायको. त्याच्या अमर्याद मद्यपानाने त्याला दुरावलेली. आणि या एकाकी-पणात विश्वासला वाटणारे गायत्रीबद्दलचे दुःखाची कडा असणारे प्रेम. खरे तर ठोकळ मानाने प्रेम शब्द वापरताच येत नाही. सहजाणीव म्हणणे उचित ठरेल. अशा या गायत्री व विश्वासमधले संबंध किती वेगळे आहेत. या मागे सत्य, मानवता, माणसांचे अस्तित्व, स्त्रीचे ममत्व अशा पातळयांवर केव्हाही गायत्री विश्वासपेक्षा वरचढ ठरण्याचा धोका होताच. पण तसा धोका कुठेच निर्माण न होता फक्त विश्वासचेच चरित्रचित्रण हे जास्तीत जास्त परिणामकारक होत गेले. समांतर प्रवास करणारी स्त्री व अंतर राखणारा पुरुष इथेही तोच आहे. पण हा पुरुष आकांत करीत नाही. गायत्री जेव्हा चिडून विश्वासला तुम्ही भलत्यावेळी झोपायला आलात, असे तो पाळण्यावर झोपायला आला असताना म्हणते— त्याने विश्वास चमकतो. मुस्कटात बसावी तसा तो चमकला हे लेखिकेचे शब्द आहेत. कारण दारू पिणे हे सामान्य नीतिमत्तेच्या पायाला अमान्य आहे. लेखिका हा पाया ढळू न देताच विश्वास रंगविते. आणि शेवटी गायत्रीलाही तिच्या मनामधले दुःखाचे उमाळे दाबून टाकण्या-शिवाय, दुसरा मार्ग शिल्लक उरत नाही. शेवटी तीच विश्वासला म्हणू शकते की, 'एकच गोष्ट खरी आहे. तुमचा अहंकार, स्वतःवरचं प्रेम,' हे यामुळेच. मात्र इथे जणू हे शब्द विश्वास मधल्या पुरुषावर तापलेल्या लोखंडावर घाव पडावा तसे पडतात. तो पुरुष वाकून जातो. अनुतापाने त्याचे मन शुद्ध होते. मात्र त्याचे आकार बदलता येतात ते फक्त गायत्रीसारख्या स्त्रीलाच. जी स्त्री म्हणते मात्र की या भावना तर निवडुंगासारख्या कुठेही उगवतात पुन्हा स्त्रीच्या चित्रणामधून पुरुष प्रभावीपणे समोर उमटून येतो. म्हणूनच गायत्री ते घर सोडून जाताना विश्वासच्या खोलीकडे बघत हात जोडते. आपण जे केले, जो नव्या चांगुलपणाला जन्म दिला त्याला तो नमस्कार असतो. ती साध्या वासनांना महत्त्व देत नाही तर विश्वासचा आकार तिला बदलायचा असतो. मद्यपी म्हणून विश्वासची बदनाम प्रतिमा तिला मिटवायची असते.


स्त्री च्या अशा नानाविध उर्मी लेखिकेच्या 'अत्तर' या कथासंग्रहात पहायला सापडतात. इथे तोच समांतर प्रवास करणारी पद्मा आहे. सासरे घरून गेल्यावर मग तिला जाणवते की त्यांच्या अस्तित्वात आपण किती गुंतलो आहोत. 'झोपाळयावर अभंग कातर' या सारख्या कथेतून कौशल्य व कला यांचा सुंदर संगम घडताना दिसतो. 'अत्तर' या कथेतील जान्हवी ही रावसाहेब व रंगनाथ यांच्या दृढ मैत्रीची साक्षी आहे. पण रंगनाथ व रावसाहेब या पात्रांच्या रेषा इतक्या ठळक आहेत की जान्हवी झाकली जाते. खरी श्रीमंती ही मनाची आणि मैत्रीचे भावबंध हे अत्तरासारखे उडून जाणारे असले तरीही ते मूल्यवान असतात हा लेखिकेचा सिद्धांत. तो आशा बगे अतिशय परिणाम कारक व गडद होणाऱ्या भावनांच्या चित्रणातून मांडतात. पंख्याच्या हवेबरोबर गरम झळा येतात. त्या गरम होतात अत्तराचा

गंध मिसळून येतो. रावसाहेब हे ओळखून असतात की जान्हवीला आपली मैत्री पसंत नाही. म्हणूनच ते जातांना वहिनीसाहेबांना 'विचारलं' म्हणून सांगा असे रंगनाथाला सांगतात. या कथेतील पान वाढणे, जेवणाची तयारी हे सर्व प्रसंग अतिशय प्रतिकात्मक ठरले आहेत. म्हणूनच कथेचा शेवट एकदम हृदयाला भिडतो. जान्हवी विचारत असते 'भात वाढू?' व रंगनाथांचे तिकडे लक्षच नसते. मैत्रीचे भरले ताट कुणी समोरून उचलून नेलेले असते. चहूकडे फक्त गरम हवा पसरलेली असते व त्यातच अत्तराचा गंध मिसळून त्यांच्या चित्ताचे भान हरपत असते.

कथालेखनातील डोळसपणा हे त्यांच्या लेखनाचे महत्वाचे वैशिष्टय मानायला हवे. जेव्हा आशा बगे एखादे विशिष्ट अनुभवविश्व समोर आणतात तेव्हा ते अनुभव वाचकाला साधारण वाटतील असे, नेहमीच्या परिचयातले व घरगुती असेच असतात. तरीपण लेखिकेला त्यामधे काहीतरी सापडायचे असते. जे वाचकाला नेहमीच्या परिचयामुळे जाणवलेच नसते. मग 'महावस्त्र' या कथेतील मोरेश्वर आचारी असो वा 'पाहुणा' या कथेतला नरसय्या हा मजूर. ही सर्वच पात्रे निराळया ठळक व परिणामकारी रेषा घेऊन चित्रकाराच्या चित्रकृती सारखी समोर येऊन साकार होतात. आणि लेखिकेच्या या प्रतिभावान सर्जनाला दाद दिल्या-खेरीज सामान्य अनुभव रोज अनुभवणारा वाचक रहात नाही.

समांतर अंतरावर भेटत जाणारे स्त्री–पुरुष विश्व साकार करताकरताच आशा बगे यांनी कथा क्षेत्रातील व्यक्तिरेखाटनाला एक नवे अस्तित्व दिलेले आहे हे मात्र निःसंशय. ■

मराठी विभाग प्रमुख, डिपार्टमेंट ऑफ मॉडर्न इंडियन लॅंग्वेजेस,
अलिगढ मुस्लिम युनिव्हर्सिटी.
अलिगढ, (उ. प्र.) २०२००१



एकांक

गोष्ट :
राजाची; भिकाऱ्याची; किंवा मेलेल्या कुत्र्याची

दिनकर बेडेकर

[पडदा उघडतो त्यावेळी मिरवणूकीचा आवाज ऐकू येत असतो. स्टेजवर विशेष प्रकाश नाही. नेपथ्यात फक्त एक मखमली सिंहासनवजा खुर्ची.

मिरवणूकीच्या आवाजाच्या पार्श्वभूमीवर एक भिकारी स्टेजवर येतो. अंधारामुळे काहीवेळ चाचपडतो. मग सिंहासन हाती लागताच अंदाजाने त्यावर चढून बसतो. स्थिरस्थावर होतो. मग आपल्या जवळच्या गाठोड्यातून एक पावाचा तुकडा शोधून काढतो व खाऊ लागतो. रणवाद्यांचे आवाज, तोफांचे आवाज ह्यांचा एकच कल्लोळ सुरू आहे. तोफांच्या आवाजाबरोबर राजाचा प्रवेश. तो घाईघाईने येतो. मागोमाग शिपाई येत आहेत अशी त्याची समजूत आहे. राजाच्या प्रवेशाबरोबर बाहेरचे आवाज कमी व्हावेत. फक्त तोफांचे आवाज येत राहतात.

राजा भिकाऱ्याला सिंहासनावर बसलेला पाहून थबकतो.]

राजा : कोण ? कोण बसलंय तिथे ? शिपाई—

[भिकारी राजाचा आवाज ऐकताच मोठ्यानं गळा काढून रडू लागतो.]

राजा : ए – तुला असं रडायला काय झालं ?

भिकारी : मला दु:ख झालं आहे. आणि म्हणून मी—

राजा : आधी तू तिथून खाली उतर.

भिकारी : का ?

राजा : कारण तू जिथे बसलायस ते सिंहासन आहे आणि ते आम्ही मुद्दाम आजच्या प्रसंगासाठी घडवून घेतलंय. एवढंच काय ही राजसभेची नवी इमारतही—

भिकारी : खोटं. ही जागा माझी आहे. माझ्या परिचयाची. मला अजून आठवतं. खूप लहान होतो मी तेव्हा. इथं ह्या माळरानावर अगदी ह्याच ठिकाणी एक दगडी चौथरा होता; आणि मी त्यावर येऊन बसायचो. भोवताली मुलं हुंदडत असायची. सगळीकडे एक वेगळाच उग्रमधुर सुवास भरलेला असायचा वातावरणात. मी तासन्तास त्या मुलांसाठी बसून रहायचो. इथेच. अगदी हीच जागा होती ती. आणि बसल्याबसल्या कधीकधी वेगळेच भास होऊ लागायचे. भोवतालचं जगच बदलून जायचं. तो दगडी चौथरा ह्या मखमली सिंहासनासारखा भासू लागायचा. मग मी चक्रवर्ती राजा असायचो. राजदरबार भरलेला असायचा. लोक आपापली गाऱ्हाणी सांगत असायचे आणि मी नि:पक्षपणे त्यांना न्यायदान करत असायचो. (विराम) माझं खूप आवडतं दिवास्वप्न

होतं हे. अगदी आत्ता आत्तापर्यंत होतं. पण मध्ये शरीर झिजत गेलं तसं स्वप्नही पुसट होत गेलं. पण आता तू म्हणतोस तशी ही राजसभा असेल आणि हे सिंहासन असेल तर मी बरोबर जागीच आलो आहे.

राजा : ते काही नाही. तू आधी खाली उतर नाहीतर--

भिकारी : का ? तुला बसायचंय ? मग ये नं. दोघांनाही बसता येईल इथे.

राजा : मूर्खासारखं बोलू नकोस. मुकाट्यानं खाली उतर. नाहीतर फुकट प्राणाला मुकशील. कोण आहे रे तिकडे--

भिकारी : तिकडे कोणीही नाही. सगळे मिरवणुकीत गेले असतील.

राजा : ठीक आहे. आम्ही स्वतःच तुला-(थांबतो. स्वगत.) पण नाही. आज विजयोत्सवाच्या दिवशी आम्हाला संयमानंच वागलं पाहिजे. नाहीतर आमची जी प्रतिमा लोकांच्या मनात तयार झाली आहे तिला धोका निर्माण होईल. तेव्हा संतापाला लगाम घालून हा वेडपट मनुष्य इथे नेमका कशासाठी आलाय हे जाणून घेणंच जास्त मुत्सद्दीपणाचं ठरेल. (भिकाऱ्याला) कायरे, तुला ठाऊक आहे का हे तोफांचे आवाज कशासाठी आहेत—

भिकारी : माझा प्रिय कुत्रा मेला म्हणून.

राजा : उगीच थिल्लरपणा करू नकोस. नीट उत्तरं दे.

भिकारी : ह्यात थिल्लरपणा काही नाही. म्हातारपणामुळे-जख्ख म्हातारा झाल्यामुळे मेला तो. काल रात्री त्यानं माझ्या छातीवर आपले पंजे ठेवले तेव्हाच मला वाटलं होतं की ह्याचे पाय आज इतके का थरथरतायत ? त्यातून काल रात्री थंडीही खूपच जास्त होती. तरी आम्ही तसेच पडून होतो. आणि सकाळी लक्षात आलं की तो रात्रीच केव्हातरी मरून गेला होता-(पुन्हा गळा काढून रडू लागतो.)

राजा : ए – गप.

(भिकारी एकदम गप्प होतो. विराम.)

भिकारी : मग मी त्याला आपल्या अंगावरून बाजूला ढकललं. आता तो तिथंच पडून आहे. एव्हाना त्याचं प्रेत सडायलाही सुरुवात झाली असेल. आणि त्या प्रेताची दुर्गंधी सगळीकडे पसरली असेल. त्यामुळे आता घरी जायची सोय नाही म्हणून मी इथं येऊन त्याच्यासाठी शोक करत बसलो होतो. पण एवढ्यात तू मधे कडमडलास—

राजा : तू ते प्रेत वेळीच बाहेर का फेकून दिलं नाहीस ?

भिकारी : माझ्या लाडक्या कुत्र्याच्या प्रेताचं मी काय करावं हे सांगणारा तू कोण रे ? तुझा संबंध काय त्याच्याशी ? आणि तुला काही काळीज वगैरे आहे की नाही ? काय मूर्खासारखे प्रश्न विचारतोय. (विराम) तेही सगळे असेच. तुझ्यासारखेच. नको नको ते प्रश्न विचारून भंडावून सोडायचे. मी म्हणतो कशासाठी ? कशासाठी हे सगळं ?

राजा : बरं. बरं. तुला त्रास होत असेल तर त्याबद्दल नाही बोलणार मी. पण दुसरं काही विचारू ?

भिकारी : विचार.

राजा : तुला खायला कोण आणून देतं ?

भिकारी : त्याच्याशी तुला काय करायचंय ?

राजा : ते जर कोणी इथेही आणून देणार असेल तर ठीक. नाहीतर तुला इथून जावं लागेल.

कारण तुझ्यासारख्या भिकारड्यांना इथे सडत पडायची परवानगी नाही. ह्या परिसरात एक साधी किंकाळीसुद्धा आमच्या कानावर येता कामा नये. समजलास ?

भिकारी : म्हणजे मी किंचाळतोय ?

राजा : बघ. आता तूच मूर्खासारखे प्रश्न विचारतोयस आणि तुझा स्वर तर चक्क टिंगलीचा आहे.

भिकारी : असं ? मला नाही वाटत. पण खरंच तसं काही असेल तर मला त्याबद्दल चिंता वाटते.

राजा : मला फालतू बडबड ऐकायची सवय नाही. माझ्या प्रश्नांची सरळ उत्तरं दे. तुला रोज खायला कोण घालतं ?

भिकारी : एखादा मुलगा, त्याची आई कामात गुंतलीय असं पाहून माझ्यासाठी काही तरी घेऊन येतो.

राजा : का ? तुला स्वतःला मुलंबाळं नाहीत ?

भिकारी : आहेत नं. पण ती सगळी मला एकटा सोडून निघून गेली.

राजा : वाटलंच मला. तुझ्यासारख्या म्हाताऱ्याबरोबर कोण रहाणार ?

भिकारी : नाही, तसं नाही. ती एक वेगळीच गोष्ट आहे. म्हणजे त्या वाळूत पुरला गेलेल्या सम्राटाच्या गोष्टीसारखी–त्याचं सैन्यही असंच–

राजा : कोण सम्राट ? कुठली गोष्ट ?

भिकारी : तुला माहित नाही ? अरे काय छान गोष्ट आहे ती. (सरसावून बसतो.) ऐक–तो सम्राट वाळवंटातून जात होता. त्याच्या बरोबरची माणसं म्हणत होती–" महाराज, आपण खूप दूर आलोय आणि इथून पुढे प्रवास फारच कठीण आहे. तेव्हा आपण परत फिरावं." आणि तो त्यांना सतत सांगत राहिला की–नाही. हे आणखी एक राज्य आपण जिंकलंच पाहिजे. आणि ते चालत राहिले. त्यांचे बूट झिजून गेले तरी. तळपायांच्या चामडीची लक्तरं झाली तरीही. नंतर तर गुडघ्यांवर पण ते चालत राहिले. एक दिवस त्यांच्या काफिल्यातला एक ऊंट चक्रीवादळात सापडून त्यांच्या डोळ्यादेखत मेला. चालताचालता एक वस्ती लागली आणि तिथे सम्राटाचा मुलगा ओंजळभर पाण्यासाठी एका खड्डयात पडून मेला. त्यांनी सरकारी प्रथेप्रमाणे सात दिवस शोक केला. तरीही त्यांना दुखाला आवर घालता येईना. म्हणून तिथेच थांबून रहावं लागलं. हळूहळू त्यांचे घोडे मरायला लागले. काफिल्यातल्या स्त्रियांना पुढे जाणं अशक्य वाटू लागलं. शेवटी एक दिवस प्रचंड वादळ आलं. वाळूच्या टेकड्यांखाली त्यांचा संपूर्ण काफिला गाडला गेला आणि मग सारं शांत झालं. आणि सगळ्यात गमतीची गोष्ट म्हणजे तो प्रदेश आपोआपच त्याचा झाला. काय बरं त्या सम्राटाचं नाव–आता आठवत नाहीये नेमकं–

राजा : कुठे ऐकलंस तू हे सगळं ? साफ खोटं आहे हे. खरी गोष्ट पूर्णपणे वेगळी आहे.

भिकारी : (दुर्लक्ष करून) आणि एक काळ असा होता की मी त्याच्यापुढे एखाद्या रांगत्या बाळाएवढा वाटलो असतो इतका तो सामर्थ्यशाली होता. पण मी निघून आलो तिथून, कारण मला त्याच्या सत्तेच्या बंधनात रहायचं नव्हतं.

राजा : कुणाबद्दल वटवट करतोयस तू ?

भिकारी : कुणाहीबद्दल समज. पण मूळ मुद्दा वेगळाच आहे. म्हणजे होतं काय की आकाशात ढगांची गर्दी होते. पण मध्यरात्री पहावं तर मध्येच कधीतरी सारं शांत होऊन गेलेलं

असतं आणि चांदण्या लुकलुकत असतात. काल रात्रीही असाच ढगांचा कडकडाट चालू होता बराच वेळपर्यंत. नाही ? आणि लख्कन वीज चमकायची तेव्हा सगळा आसमंत कसा स्तब्ध होऊन जायचा श्वास रोखून—

राजा : हे जे काही तू सांगतोयस त्याबद्दल मला तर काहीच ठाऊक नाही.

भिकारी : नसणारच. पण मला सांगायचंय ते वेगळं आणि जास्त महत्त्वाचं आहे. काल नदीला पूर आला. आणि काठावरच्या मोडक्यातोडक्या गलिच्छ वस्त्यांमधले काही लोक मेले. त्यांना स्वतःला वाचवायची संधीही मिळाली नाही.

राजा : बरीच माहिती दिसते तुला. रात्री झोपतोस तरी की नाही ?

भिकारी : खूप वाटतं—थोडी विश्रांती घ्यावी असं. पण मी जेव्हा कधी झोपण्यासाठी खडकावर अंग टाकतो तेव्हा नेमकं कुठेतरी नुकतंच जन्माला आलेलं मूल रडायला लागतं; नाहीतर वाऱ्याचा वेग अचानक वाढू लागतो मग कसली झोप अन् काय !

राजा : हे बघ, काल रात्री मीही जागाच होतो. अगदी स्वच्छ चांदणं होतं—वादळ वगैरे काहीही नव्हतं. नदीकाठच्या वस्तीतही कुणी मेलं वगैरे नाही कारण सध्या नदीला पूर येण्याची अजिबात शक्यता नाही. एवढंच काय पण काल कुठल्याही घरात मूल जन्मल्याची नोंदही नाही.

भिकारी : असं ? तर मग तू नक्कीच एक आंधळा किंवा बेफिकीर माणूस आहेस आणि मला बसल्याजागी तुझ्यापेक्षा जास्त गोष्टी कळतात म्हणून तू माझा द्वेष करतोयस. आणि हे सगळं कशासाठी इथे येऊन बसण्यासाठीच नं ? ये. येऊन बस इथे. (खाली उतरतो. राजा सिंहासनावर जाऊन बसतो. भिकारी त्याच्यापासून दूर जमिनीवर बसतो. विराम. भिकारी गाठोड्यात काही तरी शोधतोय)

भिकारी : तू इथे बसण्यासाठी तडफडत होतास हे मघाशीच लक्षात आलं होतं माझ्या.

राजा : खरं म्हणजे ही माझीच जागा—

भिकारी : बसायला मिळालंय नं ? मग निमूटपणे बस. उगीच खोटंनाटं बोलू नकोस.

(काही क्षण विराम)

राजा : तुला आधी कधी पाहिल्याचं आठवत नाही. कुठे रहातोस तू ?

भिकारी : पिकांचं काय होणार आहे ह्या हंगामात काही कळत नाही. पाऊसच पडला नाहीये. सगळी शेतं उन्हाच्या गरम झळांनी होरपळून गेलीयत—

राजा : खरंय. पीक चांगलं नाहीये ह्यावर्षी.

भिकारी : मला आठवतंय—तीस वर्षांपूर्वी एकदा असंच झालं होतं. सगळं पीक प्रखर उन्हामुळे जळून गेलं होतं. आणि नंतर वळिवाचा पाऊस आला. भरीला उंदरांचा सुळसुळाट. उंदरांच्या टोळ्यांनी उरल्यासुरल्या पिकाची नासाडी केली. पीक संपलं तेव्हा त्यांनी खेड्यातल्या लोकांकडे मोर्चा वळवला आणि त्यांच्या शरीरांवर आपली भूक भागवण्याचा प्रयत्न केला आणि फसले. माणसांच्या शरीरातल्या विषाची बाधा होऊन कित्येक उंदीर मेले—

राजा : ही सुद्धा आधीच्या गोष्टीसारखी बनवून सांगितलेली गोष्ट दिसतेय. तीस वर्षांपूर्वी असं कधी झालं होतं ? मला तर काहीच माहित नाही. शिवाय इतिहासातही असा काहीच उल्लेख नाही.

भिकारी : इतिहास ? ह्या नावाची काही वस्तूच अस्तित्वात नाही.

राजा : असं ? मग अलेक्झांडर, सिझर, नेपोलियन, यांचं काय ?

भिकारी : गोष्टी. नुसत्या गोष्टी. कोण हो हा नेपोलियन ? आणि त्यांचं काय ?

राजा : तुला नेपोलियन ठाऊक नाही ? ज्यानं अर्ध्या जगावर आपली सत्ता प्रस्थापित केली आणि शेवटी अतिरिक्त आत्मविश्वासानं ज्याचा बळी घेतला —

भिकारी : (खिजवून हसतो.) फक्त दोघांचाच विश्वास बसेल ह्यावर. एक तो नेपोलियन स्वतः, आणि दुसरा तू.

राजा : असं का म्हणतोस ?

भिकारी : मग काय म्हणू ? खरं सागायचं तर नेपोलियन हा, आयुष्यभर एक अरुंद होडकं हट्टानं बल्हवत राहणारा हेकड मनुष्य होता. आणि त्याचं डोकं एवढं मोठं होतं की त्यामुळे बरोबरच्या इतर नावाड्यांना हातांची हालचालही करता येत नसे. त्याचा त्यांना त्रास व्हायचा आणि ते ओरडायचे. तर हा त्यांच्यावरच चिडायचा. ह्या भांडणात एक दिवस ते होडकं बुडलं. तेव्हा ह्या महापुरुषानं आपल्या घागरीसारख्या डोक्यात हवा भरून घेतली आणि जिबंत राहिला. पुढचं नीट दिसत नव्हतं तरीही साखळदंडांनी जखडलेला होता म्हणून निमुटपणे वल्हं चालवत राहिला. म्हणून बाकीचे बुडाले तरी हा वाचला. पण म्हणून फुशारून जाऊन ह्यानं जगाकडे पाहून तुच्छतेनं मान फिरवली. आणि तसं करताना त्याचं आधीच जड झालेलं डोकं खाली धुळीत पडलं. समजलं ?

राजा : इतकं मूर्खासारखं बोलणं कधीही ऐकलं नाही मी. बाकीच्या गोष्टी पुष्कळच बऱ्या होत्या. बरं ते जाऊ दे. मला असं सांग-राजाबद्दल काय वाटतं तुला ?

भिकारी : राजा ? राजा वगैरे कोणीही नाही. तो आपली लोकांचीच एक समजूत आहे. आणि राजा आहे ह्यावर पूर्ण विश्वास ठेवणाराही एकच माणूस आहे तो म्हणजे स्वतः राजाच. हांऽऽ आता पुष्कळ रथ वगैरे बांधून झाले, ढोल बडवणाऱ्यांचे हात शिवशिवायला लागले की ते युद्ध वगैरेही उभं करतात आणि त्यासाठी शत्रूची शोधाशोध करतात.

राजा : पण आता तर राजानं नुकताच त्याच्या सर्वात मोठ्या शत्रूचा सपशेल पराभव केला म्हणतात—

भिकारी : पराभव ? राजानं चक्क ठार मारलंय त्याला. एका मूर्खानं दुसऱ्या मूर्खाला ठार मारलंय.

राजा : (गंभीरपणे) पण तो फार सामर्थ्यशाली शत्रू होता. खरंच. माझ्यावर विश्वास ठेव.

भिकारी : असं ? माझ्या भातात नियमितपणे खडे मिसळणारा एक माणूस आहे आणि तो माझा शत्रूच आहे. तो सुद्धा स्वतःच्या सामर्थ्याच्या खूप वल्गना करायचाच की ! पण तो जेव्हा कॅन्सरनं मेला तेव्हा त्याला तिरडीवर बांधतांना त्याचा एक हात मोकळाच राहिला आणि हे गडबडीत कुणाच्याच लक्षात आलं नाही. आणि मग स्मशानाकडे नेतांना रस्ताभर तो हात तसाच लोंबकळत राहिला उघडा, रिकामा, असहाय.

राजा : हे असलं खोटंनाटं बडबडत रहायचा तुला कंटाळा नाही येत ?

भिकारी : आकाशात पुन्हा ढग जमू लागलेले दिसतायत. कितीवेळचा पहातोय मी. थांबतच नाहीयेत.

राजा : मूर्खासारखं वरळू नकोस. आकाशात ढग वगैरे काही नाही. स्वच्छ आहे आकाश. सूर्य चमकतोय.

भिकारी : सूर्य ? सूर्य नावाची गोष्टच नाही अस्तित्वात.

राजा : बस. पुरे झालं. तुझं काही एक ऐकायचं नाही मला. तू एक विकृत माणूस आहेस.

भिकारी : माझं जाऊ दे. पण मी तुला खरंच सांगतो—तो एक फार फार चांगला कुत्रा होता. सामान्य गावठी कुत्र्यांसारखा कृतघ्न नव्हता तो. तो माझ्यासाठी मटन आणायचा. आणि रात्री माझ्यावरोबर माझी चिरगुटं पांघरून झोपायचा. गावातल्या लोकांना माझी अडचण व्हायला लागली म्हणून त्यांनी माझ्याविरुद्ध कट रचला. मला पकडायला शिपाई पाठवले तेव्हा ह्या कुत्र्यानं त्या शिपायांना पळवून लावलं—त्याचा योग्य सन्मान झालाच पाहिजे—

राजा : तू हे सगळं मला का सांगतोयस ?

भिकारी : तू गाढव आहे असं मला वाटतं म्हणून.

राजा : असं ? आणखी काय मतं आहेत तुझी माझ्याबद्दल ?

भिकारी : आता सांगायचंच झालं तर तुझा आवाज बायकी आहे. कारण तू भित्रा आहेस. तू सारखे प्रश्न विचारतोस कारण तू क्षूद्र मनाचा आहेस. तू माझ्याविरुद्ध कटकारस्थानं करतोस. कारण तुला आत्मविश्वास नाही. तुझा माझ्या बोलण्यावर विश्वास नाही तरीही तू ते ऐकतोस. कारण तू तसा कमकुवत मनुष्य आहे. माझ्यासारखे अनेक थोर लोक ह्या जगात असताना तू स्वतःची अशी समजूत करून घेतली आहेस की सगळं जग तुझ्या-भोवती गोंडा घोळत फिरतं. आणखी सांगायचंच झालं तर—तू आंधळा आहेस, बहिरा आहेस आणि अत्यंत बेपर्वा आहेस. बस ? तुझ्या उरलेल्या दुर्गुणांची मला अजून माहिती व्हायची आहे.

राजा : माणसाच्या तोंडावर असं वाटेल तसं बोलू नये हे कुणी शिकवलं नाही वाटतं तुला ? आणि तुला खरंच माझ्यात एकही चांगला गुण आढळत नाही ?

भिकारी : मी तसं कुठे म्हटलं ? आता हेच बघ नं—तू शांतपणे बोलतोस म्हणजे तू विवेकी आहेस. तू खूप प्रश्न विचारतोस म्हणजे तुला ज्ञानाची अमर्याद आस आहे. तू प्रत्येक गोष्टीचं नीट परीक्षण करतोस म्हणजे तू चिकित्सक बुद्धीचा आहेस. तू तथाकथित खोटया गोष्टीही ऐकून घेऊ शकतोस म्हणजे तू क्षमाशील आहेस. सगळया वस्तू तुझ्या-भोवती फिरतात असा तुला विश्वास वाटतो. आता इतर अशा अनेक माणसांपेक्षा; तुझा हा विश्वास काही फार जास्त मूर्खपणाचा नाही.

राजा : आणखी ?

भिकारी : झालंच तर—अतीदूरदृष्टीमुळे तुझा गोंधळ उडत नाही. तुझ्याशी ज्या गोष्टींचा संबंध नसतो त्यांचा तू त्रास करून घेत नाहीस. शिवाय तू हे जे सगळं सोंग वठवतोस त्यात तुझ्या ज्ञानामुळे काहीच अडथळा येत नाही. आता तुझ्या उरलेल्या सद्गुणांविषयी ह्याहून जास्त माहिती माझ्यापेक्षा, किंवा इतर कुणाहीपेक्षा तुलाच असणार—

राजा : वा ! हुषार आहेस तू. मी तुझ्यावर फार खूष झालो आहे. तुला काय हवं ते मागून घे.

भिकारी : त्यात नवल नाही. प्रत्येक खुषामतखोराला हे बक्षिस मिळतंच. पण तु जसं मला लगेच हे बक्षिस दिलंस. तसं मी काही तुला देणार नाही.

राजा : जो कोणी माझी सेवा करेल त्या प्रत्येकालाच मी बक्षिस देत असतो. मी मुद्दामच तशी पद्धत पाडलीय.

भिकारी : म्हणजे असं करून तू स्वतःचं महत्त्व वाढवू पहातोस. याचा अर्थ मुळात तू फारच सामान्य अंतःकरणाचा माणूस आहेस.

राजा : तू मघापासून वाटेल तसं बोलतो आहेस आणि मी तुला काहीच शिक्षा करत नाही हा काय सामान्य गुण झाला ?

भिकारी : त्यात काहीही नवल नाही. कारण तू माझं काहीच वाईट करू शकत नाहीस.

राजा : मी तुला जन्मभर अंधारकोठडीत खितपत ठेवू शकतो.

भिकारी : मऊ उबदार अंधार असेल नाही तिथे ? आणि फरशीचा शिरशिरी आणणारा गारवा—

राजा : सूर्यप्रकाशाची तिरीप सुद्धा येत नाही तिथे—

भिकारी : सूर्य वगैरे काही अस्तित्वात नाही हे मी मघाशीच सांगितलंय तुला—तुझी स्मरण-शक्ती अगदीच वाईट दिसते.

राजा : वर्षानुवर्ष दुसऱ्या माणसाचा चेहराही दिसणार नाही. तुला—

भिकारी : दोन वेळा अन्न मिळेल नं नियमित ?

राजा : मी तुला ठार मारू शकतो.

भिकारी : फार चागलं होईल. निदान माझ्या डोळ्यांवर धुवांधार पाऊस कोसळणं थांबेल. माझं शरीर पोखरणारे हे किडे पळून जातील. माझं हे सतत भुकेनं वळवळणारं पोट शांत होईल. आतापर्यंत कधी भोगला नाही असा सर्वोच्च आनंद असेल हा.

राजा : पण मी असलं काहीच करणार नाही. मी ह्यावर विचार करीन.

भिकारी : छान ! पण तू विचारही करतोस हे मात्र कुणाला कळू देऊ नकोस. नाहीतर लोक तुझ्या ह्या कृत्यातूनही अनेक अर्थ काढत बसतील. नाना तर्ककुतर्क होतील.

राजा : माझे लोक असं करतील असं मला वाटत नाही.

भिकारी : तुझे लोक ? ते तर माझ्याही पुढे मान तुकवून उभे असतात. पण मी त्यांच्याकडे लक्षच देत नाही. फक्त त्यांच्या बडबडीचा आणि मूर्खासारख्या प्रश्नांचा मला राग येतो.

राजा : आणि मी ? माझाही राग येतो तुला ?

भिकारी : (कुत्सितपणे) हा प्रश्न म्हणजे मूर्खपणाचा कळस आहे. फारच उद्धट माणूस दिसतोयस तू. अशा माणसाबद्दल मला काडीचाही आदर वाटत नाही. खरं म्हणजे तू कधीच स्वतःचं समाधान करू शकत नाहीस. तितकासा एकांतही तुला असह्य होतो. म्हणून तुला माझ्यासारख्या माणसांकडुन सतत स्वतःची खात्री पटवून घ्यायची असते, प्रत्येक माणसानं तुझ्याशी आदरानं वागावं यासाठीही त्याच्यावर अवलंबून राहतोस तू—

राजा : तू समजतोयस तेवढा कमकुवत नाही मी. मी लोकांवर राज्य करतो म्हणून लोक मला मान देतात.

भिकारी : (उपरोधाने) अच्छा ? म्हणजे जसं लगामाला वाटतं आपली घोड्यावर हुकूमत आहे किंवा चिमणीच्या चोचीला वाटतं आपण ठरवू ती दिशा किंवा नारळाच्या शेंड्याला वाटतं की आपण आपल्याबरोबर झाडालाही आकाशात उंच नेतोय तसंच नं ?

राजा : (विसाळुन) तू अत्यंत दुष्ट माणूस आहेस. आणि मुद्दाम मला हिणवायला इथं आलायस. मला ठाऊक आहे ही बुद्धी तुझी नाही. हे नक्कीच माझ्या कुठल्यातरी शत्रूचं कारस्थान आहे. त्यानंच पाठवलंय तुला. मी मनात आणलं तर माझ्या एका हुकूमासरशी माझी माणसं तुझी खांडोळी करतील. पण मी असं करणार नाही. कारण तुझ्यासारख्या क्षुद्र माणसासाठी मला माझी प्रतिमा डागाळून घ्यायची नाही.

(राजा हे सगळं बोलत असताना भिकारी आपल्या गाठोड्यातून एक बाजा काढून

वाजवत रहातो. राजाचं बोलणं संपल्यावर क्षणभर त्याच्याकडे रोखून पहातो आणि खदखदून हसू लागतो.)

भिकारी : तू आणि तुझी प्रतिमा ! (हसत सुटतो. राजाला काय करावे सुचत नाही, भिकारी हसू आवरतो. मग लोकांकडे पाहून–) ह्या माणसाची आणखी एक गोष्ट माहिती आहे ? तुम्हाला म्हणून सांगतो. हा झोपला की ह्याची बायको ह्याच्या अंगावर ओणवी होऊन ह्याच्या खिशातले पैसे काढून घेते. कधीकधी अचानक् ह्याची झोपमोड होते आणि ह्याला ती दिसते. पण ह्या मूर्खाला वाटतं की आपल्यावरच्या प्रेमामुळे व्याकुळ होऊनच ती असं करतेय. आपल्या चेहऱ्याकडे पाहिल्यावाचून तिला एक क्षणभरही राहवत नाही. आणि ह्या भ्रमात पैसे गेल्याचं दु:ख विसरुन हा तिला क्षमा करत जातो.

राजा : (चिडून) झालं का तुझं पुराण सुरू ? (प्रेक्षकांना) एक शब्दही खरा नाही ह्यातला.

भिकारी : तू आता इथून जाशील तर बरं होईल. गलिच्छ वागायबोलायला लागला आहेस तू आता–

राजा : काय ? काय म्हणालास तू ? मी गलिच्छ वागतोय ? माझा विश्वास बसत नाहीये कानांवर (प्रेक्षकांना) तुम्हाला वाटतं असं ?

(भिकारी त्याच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करून पुन्हा बाजा वाजवू लागतो.)

राजा : का ? तुझ्या वस्तीत कोणी ऐकून घ्यायला तयार नाही वाटतं ? इथं ह्या लोकांपुढे वाजवत बसलायस तो ?

भिकारी : (त्याच्याकडे दुर्लक्ष. प्रेक्षकांना) हे सूर. हे सूर जसजसे तुमच्या रक्तात भिनत जातील तसतसं तुम्हाला आकाश जास्त सुंदर दिसायला लागेल. जमीन पिकांनी रसरसलेली. केवळ एका संगीताच्या तुकड्याच्या जादूमुळे. आणि मग तुम्ही आपल्या आयुष्याला घट्ट चिकटून जगत रहाल. स्वत:ला आणि तुमच्या शेजाऱ्यांनाही क्षमा करावीशी वाटेल तुम्हाला (धून वाजवतो.)

राजा : (त्याला थांबवत) एक शेवटचं विचारतो. खरं उत्तर देशील ? मी तुला डोळ्यासमोरही नको. आणि तरीही तू मला एवढं सगळं का सांगितलंस ?

भिकारी : (सहजपणे) कारण तू मला अहंकारी वाटला नाहीस. माझी बडबड तू ऐकून घेतलीस. मला कसंही माझ्या प्रिय कुत्र्याच्या मृत्यूचं दु:ख विसरायचं होतं–

राजा : (खेदानं) हं. आता तरी मला इथून गेलंच पाहिजे. आयुष्यातला एक सोन्यासारखा दिवस वाया जाणार असं दिसतंय. छे ! मी मुळात थांबायलाच नको होतं. ह्या लोकांना सहानुभूती दाखवल्याचं काहीच फळ मिळत नसतं हेच खरं. पण एक गोष्ट मान्य करावीच लागेल ती म्हणजे ह्याचं धैर्य. केवळ त्यामुळेच तो माझ्याबद्दल वाटेल ते बोलत राहिला आणि मी इतरांना तिष्ठत ठेवून इथे थांबून ऐकत राहिलो.


(राजा घाई घाईने निघून जातो. पुन्हा मिरवणुकीचे आवाज येऊ लागतात. भिकारी आळस देतो. सामान गोळा करतो. उठून उभा रहातो.)

भिकारी : हा तर गेला. दुपार व्हायला आलीय. हवाही चांगली ऊबदार वाटतेय. चला ! तो मुलगा नक्कीच काहीतरी खायला ठेवून गेला असेल. ते इतर कुणाच्या हातात पडण्याआधी घरी पोचलं पाहिजे. (कष्टानं उठतो. जाऊ लागतो.) नगरात काहीतरी

उत्सव वगैरे आहे बहुतेक. ह्या मूर्खही तिकडेच गेला असावा. जाऊ द्या. आपण आता जाऊन पोटपूजा करावी आणि झक्कपैकी झोप काढावी हे उत्तम. आणि एवढं करूनही वेळ उरलाच तर कुत्र्याच्या आठवणी आहेतच. खूप आहेत... (जातो. स्टेज क्षणभर रिकामे. मिरवणुकीचा प्रचंड कोलाहल आणि मग पडदा.) ■

[बर्टोल्ट ब्रेश्त ह्यांच्या ' बेगर अॅंड द डेड डॉग ' या एकांकिकेवर आधारित]

T/1, उत्कर्ष शीतल
३३, अंबाझरी ले आऊट,
नागपूर, ४४००१०



ग्रां थि की

[श्रीवत्स या वार्षिकाने १९८८ च्या अंकात प्रा. सुरेश द्वादशीवार यांची 'हाकुमी' ही कादंबरी प्रथम प्रकाशित करून मराठीला दिली. विदर्भातून प्रकाशित होणाऱ्या प्रा. राम शेवाळकरांच्या या वार्षिकाने पहिल्याच पदार्पणात काही विक्रम प्रस्थापित केले. विदर्भातून प्रकाशित वार्षिकातून प्रकाशित एखाद्या वैदर्भीय लेखकाच्या कादंबरीचे श्रीविद्या सारख्या प्रकाशकांकडून तात्बडतोब पुस्तकरूपात प्रकाशनही होणे हेही त्यातच मोडते.

आपल्या पहिल्याच पदार्पणात सर्वोत्कृष्ट संपादनाची महाराष्ट्रातील प्रतिष्ठित समजली जाणारी १९८८ सालची दोनही पारितोषिके एकाच वर्षी प्राप्त करण्याचा सन्मानही याच वार्षिकास लाभलेला होता.

श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी या वार्षिकांकाचे संपादन केले होते. या वार्षिकांकात प्रकाशित 'हाकुमी' पुस्तकरूपात अवतीर्ण झाल्यावर तिचे वाचन प्रा. मधु जामकरांना 'हाकुमी'च्या लेखकास विस्तृत पत्रच लिहिण्यास प्रवृत्त करते झाले. प्रा. मधु जामकरांचे हे पत्र ही एका अर्थी पहिल्या वाचनातच केल्या गेलेली समीक्षाच झालेली आहे.

'हाकुमी' चे लेखक प्रा. सुरेश द्वादशीवार यांनी हे पत्र युगवाणीस प्रकाशनार्थ उपलब्ध करून दिले या बद्दल त्यांचे आभारी आहोत.]

प्रिय सुरेश द्वादशीवार;

मुकतीच तुमची 'हाकुमी' वाचून हातावेगळी केली. चांगल्या कलाकृतीचे एक लक्षण असे सांगितले जाते की ती जिथे संपते तिथे वाचक पुन्हा आपल्या मनात या कलाकृतीला नव्याने घडविती. 'हाकुमी'ने मला असेच केले. मन करुणाने, रुपीने आणि अनिताने व्यापून गेले. या तिघांचा जो त्रिकोण झाला तो समभुज तर आहेच पण त्याचे क्षेत्रफळ मात्र गणिती नाही. माझ्या मनात या बरोबरच या कादंबरीने काही प्रश्न निर्माण केले आहेत. हे प्रश्न समग्र मानवी जीवनाच्या संदर्भात व एका अभिजात कलाकृतीच्या संदर्भात मला मूलगामी व महत्त्वाचे वाटतात. तेव्हा प्रथम मी याकडेच वळतो.

१. 'हाकुमी' ही रूढार्थाने कादंबरी की दीर्घकथा ? आशयातील प्रेमाचा त्रिकोण पाहून तर ही कादंबरी परंपराप्रिय वाटते. परंतु तिचा शेवट वाचून ती कुठल्याच बंदिस्त वाङ्मयप्रकारात बसत नाही हे कळते. तुमच्या 'हाकुमी'चे वैशिष्टय असे की ती एक घटना, पात्र, संवाद व शैली या तंत्रात एक अंतर्यंत सुसंगती साधणारी कलाकृती आहे. वाचक तिला वाचतो, आस्वादतो आणि आपल्या मनात विचारपूर्वक तिला वसवितो. इथे तिने निर्माण केलेला आकाराचा प्रश्न गौण राहतो. कलाकृतीची चिरयौवनता शिल्लक राहते. म्हणूनच ती समीक्षकास आव्हान देते तर वाचकास आवाहन करते.

२. 'हाकुमी'ने प्रादेशिकतेच्या संदर्भात नव्याने विचार करायला लावले आहे. विदर्भात गो. नी. दांडेकरांची 'पूर्णामायेची लेकरे', उद्धव शेळक्यांची 'धग', मनोहर तल्हार यांची 'माणूस' या

यां कादंबरीने प्रादेशिकतेचा परिसर समृद्ध केला आहे. या पद्धतीने ' हाकुमी ' प्रादेशिक आहे काय ? पडघवली आणि कांदोडी यांची व्यक्तिमत्वे एकच की भिन्न हा देखील विचारार्ह प्रश्न आहे. हाकुमी 'मधील सामूहिकता आणि भौगोलिकता लक्षात घेता ती प्रादेशिक वाटते परंतु केवळ त्यातील बोलीमुळे ती प्रादेशिक संस्कृती जिवंत करते असे नाही. ' हाकुमी 'चे भाग्य हे की ती प्रादेशिकतेतून उगम पावते व सार्वत्रिकतेत अंतर्भूत होते.

३. जी कलाकृती केवळ कलेची प्रांजलता पुन्हा पुन्हा दाखवते ती कुठल्याच वादाला शरण जात नाही. तुमच्या कादंबरीत जो नक्षलवाद डोकावतो तो उग्र असेलही पण त्या वादात विरघळून गेलेला राजय्या मात्र या वादाशिवाय लक्षात राहतो. मराठी कादंबरी कलावाद, जीवनवाद, ध्येय-वाद, गांधीवाद, समाजवाद अशा अनेक वादांनी आक्रस्ताळी झाली, प्रसंगी तिच्यातून येणारा प्रचार नको तेवढा कलाहीन झाला या वादाखाली सारीच पात्रे चेंगरून गेली. ' हाकुमी 'मध्ये नक्षल-वादाच्या निमित्ताने माणूस महत्त्वाचा वाटतो. तुमच्या कन्नाचं जीवनध्येय कोणतं ? तो सांगतो की ' माझ्या दवाखान्यात येणारा प्रत्येक रुग्ण आहे. तो नक्षलवादी आहे की गांधीवादी याच्याशी मला कर्तव्य नाही. आणि हो, तुम्ही तुमची जी माहिती मला सांगाल तेवढीच मला कळणार आहे. त्याची सत्यासत्यता पडताळून पाहणं हे माझे काम नाही. मी तुमचा आजार तेवढा पाहणार.' कन्नाच्या डॉक्टरी व्यवसायाने, माणुसकीने माडिया समाजात नवे परिवर्तन घडविले आणि एका कलापूर्ण जिवंत पात्राने मराठी कादंबरी समृद्ध झाली.

वर मी जे तीन प्रश्न ' हाकुमी 'च्या संदर्भात लक्षात घेतले त्याची उत्तरे देत तुमच्या कादंबरीची पृथगात्मता दाखवली आहे. याच्या मूळाशी एक महत्त्वाचे सूत्र मला दिसले ते हे की तुम्ही या कलाकृतीला जीवनरसात ओथंबून ठेवले आहे. जीवन अधिक अर्थपूर्ण करणे हा तिचा अंतःस्थ हेतू आहे. तुम्ही ' हाकुमी 'त जीवनाच्या प्रवृत्तीचे सरळ, वास्तव व मूलग्राही विश्लेषण केले आहे. आणि हे चित्रण अत्यंत प्रत्ययकारी स्वभावचित्रांच्या द्वारे झाले आहे.

समग्र कादंबरीत कुठलेही भाष्य न ऐकता मनाला जाणवणाऱ्या संवेदना येथे दिसून येतात. याचा परिणाम असा की आपल्या मानवतापूर्ण व केवळ मानवतेनेच भारलेल्या वृत्तीशी वाचक तल्लीन होतो. तो क्षणभर कन्ना होऊन रूपी किंवा अनिताशी लागेबांधे जुळवून घेतो. तुम्ही कन्नाच्या रूपाने एक चालती बोलती, लोभसवाणी व्यक्ती उभी केली आहे. त्याची माडिया समाजाबद्दल ओढ; पुण्यातील वैद्यकीय अध्यापन, सुशिक्षित व सुसंस्कृत असलेला कन्ना आयुष्यभर मूल्ये जपतो त्या मागील त्याचा अंतर्बाह्य संघर्ष, रूपा आणि अनिता यांच्याशी त्यांनी बांधलेले आंतरिक दुवे अशा एक ना अनेक गोष्टींनी त्याला तुम्ही आमच्या मनःचक्षूसमोर उभे केले आहे. या कन्नाचा सबंध जीवनपट इतक्या कुशलपणे आपल्यापुढे येतो की या व्यक्तित्वाबरोबर त्याच्या सर्व संबंधियांच्या मूर्ती आपल्यापुढे स्पष्टपणे वावरू लागतात. रूपा, अनिता आणि कन्ना हे तीन प्रवाह असूनही तो एक त्रिवेणी संगम वाटतो. प्रत्येक प्रवाह स्वतःचे अस्तित्व सांगत दुसऱ्यात मिसळतो. यातील कुठलाच प्रवाह एका वर्गाचे वा विचारसरणीचे प्रतीक नाही. प्रत्येक व्यक्तीला स्वतःचे स्थान आहे, प्रत्येक व्यक्ती जीवनरसाने ओथंबलेली आहे. कोणतीही व्यक्ती केवळ कशाचे तरी साधन नाही. यामुळेच की काय कन्नाच्या जीवनकथेला एवढी वास्तवता व उत्कटता लाभली.

तुमच्या कन्नाचा विचार करताना मला विभावरी शिरूरकरांच्या ' बळी 'मधील आबाची आठवण झाली. सुशिक्षित आबा आपल्या समाजात येऊन परिवर्तन घडवू शकत नाही; ही त्याची शोकांतिका झाली. पण तुमचा कन्ना जीवनमूल्ये सांभाळीत आपल्या समाजाकडे पाहतो. यात भाबडेपणा कुठेच नाही, ना कुठली प्रचारकी पोझ. वस्तुतः तंत्रनिष्ठ होणे, रंजनाला बळी पडणे, जीवनवादी प्रचार करणे किंवा मनोविश्लेषणाच्या कोषात सापडणे असे मोह या निमित्ताने तुमच्यापुढे होते परंतु नेमके त्यांना डावलून तुम्ही एक प्रभावी कलाकृती निर्माण केली. तुम्ही

कथतील प्रमुख पात्राशी तादात्म्य पावल्यामुळे असे झाले; पण ही समरसता एका सिद्धहस्त कलावंताची वाटते. तीत एकाचवेळी तादात्म्यता आणि अलिप्तता दिसते. कल्पना, भावना आणि विचार या त्रिकूटाची मुस तुम्ही इतकी बंदीस्त केली की कथेतील प्रसंग किंवा व्यक्ति यात आपोआप मिसळून जाते. त्यातील माडिया बोली कथेचा ओघवता प्रवाह पुढे नेते–फक्त या बोलीतील मराठी भाषांतर प्रवाहास मागे ओढणारे वाटते. प्रादेशिक कथेत नेहमीच बोली खाली जीवनानुभव दडपून राहतो, त्यास तुमची कथा तरी अपवाद का व्हावी ?

आदिवासींच्या गडचिरोली जिल्ह्याची कादंबरीला जी पार्श्वभूमी आहे, त्यात कांदोडी हे एक प्रभावी पात्र असल्याने समग्र कादंबरी एकसूत्री व बांधीव रहाते. तुमच्या बाबतीत येथे एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो, तो हा की आदिवासी जीवनातील समस्येचा विचार तुमच्या मनात उत्कट स्वरूपात येतो. त्यामुळे तुमच्या कथेत येथील जीवनविशिष्ट मन:शल्ये यथातथ्य रीतीने; सहानुभावाने व प्रयत्नशील भूमिकेवरून चित्रित होतात. कोणी, रामा, जुरु, जमी, मेसी अशा आदिवासी जमातीच्या जीवनाचे जे दर्शन तुम्ही आपल्या कथेतून घडविले आहे ते अतिशय वास्तव आहे. अतिशय सूक्ष्म आहे आणि त्याबरोबरच ते अतिशय भीषण आहे. कन्नाचे हृदयस्पर्शी चित्रण जसे परिणामकारक तितकेच किंबहुना त्याहून जास्त रूपी वाचकाच्या मनाला स्पर्श करून जाते. याचा अर्थ इतर व्यक्तिचित्रे सवंग झाली आहेत, असा नाही, तुमची समग्र कथाच मुळी अथपासून इतिपर्यंत प्रभावी व्यक्तिदर्शनाच्या माध्यमातून वाचका पुढे उभ्या जीवनातील अनोखे धागे उलगडत जाते, त्यातून अस्वस्थता शिल्लक राहते. तिला पुन्हा विचारांची धार मिळते.

तुमची कादंबरी वाचताना ही एक प्रेमकहाणी असल्याचा साक्षात्कार होतो. परंतु ती रुढार्थाने भाबडी प्रेमकहाणी नाही. आपल्या कादंबरीद्वारे सतत प्रणय पंढरीच्या वारीला जाणारे फडके ज्या सढळ हाताने आपली कथा प्रणयाच्या रंजकतेतून रंगवितात तसे येथे होत नाही की हे प्रेम भाबड्या ध्येयवादातून खांडेकरांप्रमाणे धूसर होत नाही. तुमची थोरवी ही की तुम्ही कन्ना, रुपा आणि अनिता यांच्या करुणगंभीर कथेला ललितरम्य प्रणयकथेचे किंवा कल्पनारम्य ध्येयकथेचे अवास्तव वळण न देता त्यांच्या जीवनातील समस्या अत्यंत वस्तुनिष्ठ स्वरूपात सुजाण सहानुभूतीने, सहृदयतेने व अत्यंत संयमाने वाचकापुढे मांडले आहे. जीवनाचे विशेषत: आदिवासी जीवनाचे गहिरे रंग दाखवीत ती वाचकास अंतर्मुख करते. ही अंतर्मुखता पीडिताबद्दल उपेक्षिताबद्दल, जातिवंत जिव्हाळा वाटल्यामुळे येते. ही कथा नाजुक किंवा कठोर होताना आपला अंगभूत संयम ओलांडत नाही. ज्या आदिवासी समाजाचा सर्वांगीण विकास अशक्य करून सोडलेला आहे. त्यांच्या जीवनातील मूलगामी समस्यांचे अत्यंत सहृदयतेने चित्रण करून वाचकांच्या मनात या समस्यांबद्दल सहानुभूती उत्पन्न होते. इथे तुम्ही कृत्रिमतेपेक्षा स्वाभाविकतेकडे, कल्पनारम्यतेपेक्षा वास्तवतेकडे वस्तुनिष्ठपणे येता आणि हे सारे आपल्या प्रतिभेच्या कक्षेत कसलेच दडपण न घेता आलेले असते; कलावंत म्हणून तुमचे हे यश मानावे लागेल. याचा अर्थ 'हाकुमी 'त मर्यादा नाहीत असे नाही. या कथेचा जीव कोवळा व त्रिमकुला आहे. रुपा आणि अनिता यांना तुम्ही वाऱ्यावर सोडताना कन्नाच्या मानाने कमी न्याय दिला आहे. त्याच्या समग्र जीवनाचा, मनोवृत्तीचा विचार करता त्याची मानसिक आंदोलने विचारमग्न करत नाहीत. तो ज्या जीवनाशी समरस होऊन व्यवसाय करू पाहतो त्या जीवनातील सुखदु:खे जाणून घेऊन, समाजाच्या प्रतिक्रियांचे ताण लक्षात येऊन वागत नाही. एकीकडे आदिवासी जीवनचित्रणात वस्तुनिष्ठेची कलात्मक बूज राखण्याचे मन:पूर्वक आणि प्रामाणिक प्रयत्न आणि दुसरीकडे रूपा; अनिता यांचा प्रेमाचे ताण, यात कन्नाची जी कुचंबणा होते तिला तुम्ही हातचे राखून न्याय दिला असे वाटते; कुठे कुठे तुम्ही नक्षलवादाकडे चिकित्सक भूमिकेने पाहता, कुठे निसर्गवर्णनात अधिक उपरेपणाने रंगून जातात. या साऱ्यात तुमचे कलेबाबतचे साहस दिसते मात्र तिच्या संदर्भातील समज आढळून येत नाही. परंतु हे सारे असूनही तुमची कथा

तिच्या अंगभूत मर्यादेत आपले अंगभूत सामर्थ्य ठसठशीत दाखवून देते. एका अनोख्या आदिवासी परिसराकडे तुम्ही तटस्थ व कलात्मक वस्तुनिष्ठेने पाहिले आहे तिच्यात एका नवीन आदिवासी जमातीचा मागासलेपणा नाही. केवळ नक्षलवादी कार्यकर्त्यांचा दहशतवाद नाही. तर सकस, सरस, सजीव आणि म्हणूनच प्रतीतिपूर्ण व्यक्तिदर्शन आहे. ती ज्या प्रश्नांना स्पर्श करते ते जीवनातील असल्याने त्यांची मूलभूतता अटळ अशी जीवनस्पर्शी होते; म्हणूनच 'हाकुमी' जेव्हा वाचकांच्या हाती पडते तेव्हा ती आपल्या अस्वस्थतेची खूणगाठ पक्की करून जाते; तुमचे हे कादंबरीच्या क्षेत्रात शुभागमनाचे प्रसादचिन्ह मानावे लागेल.

आपला

–मधुकर जामकर

। मं । थ । न ।

संपादक, 'युगवाणी'

यांना स. नमस्कार

आपण युगवाणीच्या ए.–मे.–जू ८९ च्या अंकात आपल्या संपादकीयात मराठीतील वाङ्मयीन मासिकांची सद्यस्थिती अचूक शब्दात प्रभावीपणे मांडली आहे. त्याविषयीच्या माझ्या प्रतिक्रिया संक्षिप्तपणे नोंदवीत आहे :

(१) वाङ्मयीन नियतकालिकासंबंधी अनास्था आहे आणि ती थोड्या वाचकांपुरतीच मर्यादित आहेत ही गोष्ट खरी. इतर सामाजिक घटकाला त्यांचे आवाहन वाटेल असे त्यांचे स्वरूप, स्वत्व राखून ठेवणे हे आव्हान आहे. ते स्वीकारणे अटळ आहे. गल्लाभरू मासिकांचा वाचक-वर्ग मोठा आहे यात शंका नाही. त्यातला काही वाङ्मयीन मासिकांकडे वळविता येण्याची शक्यता आहे.

(२) या संदर्भात साहित्य–संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संस्थांवर जबाबदारी तत्त्वत: पडते पण त्यांचे व्यवहार ज्या उपयुक्ततावादी शासकीय दृष्टिकोनातून चालतात त्यातून वाङ्मयीन नियतकालिकांना पुरेसे संरक्षण मिळण्याऐवजी या क्षेत्रातील भोंगळपणाला आणि हातचला-खीलाच उत्तेजन मिळते. आपली सामाजिक–राजकीय नैतिकता याला जबाबदार आहे. तिच्यात अभिरुचीला अग्रक्रम लाभणे कठीण आहे.

(३) समाज परिवर्तनात या नियतकालिकांचे जे काम अपेक्षित आहे ते अन्य जबरदस्त प्रतिगामी शक्तीशी मुकाबला करीत करावे लागणारे काम आहे, ते मंदगतीनेच होणार.

(४) स्थायी निधी तत्त्वत: आवश्यक आहे पण तो पुरेशा प्रमाणात उपलब्ध होणे सोपे नाही. शासनाबरोबर अन्य धनिक संस्थांनी देखील याकडे लक्ष दिले पाहिजे.

(५) सामुदायिक प्रयत्न करणे गरजेचे आहे पण त्याची दिशा काळजीपूर्वक ठरली गेली पाहिजे. या नियतकालिकांच्या संपादकांची एक बैठक सा. सं. मंडळ बोलावू शकते, नव्हे एक शिबिरही घेऊ शकते.

कळावे.

आपला

म. द. हातकणंगलेकर

विश्रामबाग/सांगली

२ नोव्हेंबर १९८९

विदर्भ
साहित्य
संघ
नागपूर

केंद्रीय कार्यवृत्त दि. १ ऑक्टो. ८९ ते ३० डिसें. १९८९

दि. १–१०–८९ रविवार : कविवर्य अण्णाजी त्रोवडे यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या छायाचित्रास हार अर्पण करण्यात आला.

दि. २–१०–८९ सोमवार : राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान स्व. लालबहादुर शास्त्री यांच्या जयंतीप्रित्यर्थ त्यांच्या छायाचित्रास हार अर्पण करून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

दि. ३–१०–८९ बुधवार : मुंबई मराठी साहित्य संघाचे अध्यक्ष व पुणे येथे होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचे उमेदवार श्री. रमेश मंत्री यांच्याशी वि. सा. संघात वाचकांसोबत मनमोकळी चर्चा झाली.

गडकरी सभागृहात संपन्न झालेल्या या चर्चेच्या अध्यक्षस्थानी वि. सा. संघाचे अध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर होते. कार्यक्रमाची भूमिका व प्रास्ताविक श्री. चंद्रकांत कुळकर्णी यांनी केले. श्री. रमेश मंत्री यांचा परिचय प्रा. शेवाळकर यांनी करून दिला. यानंतर रसिकांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना रमेश मंत्री यांनी दिलखुलास व मनमोकळी उत्तरे दिली. चर्चेच्या ओघात त्यांनी विनोद हा स्वतंत्र वाङ्मयप्रकार आहे, असे प्रतिपादन केले. केवळ विनोदी लेखकांचे साहित्य संमेलन आयोजित करण्याच्या आवश्यकतेवरही त्यांनी भर दिला. सांप्रत निर्माण होणारे विनोदी चित्रपट व दूरदर्शन मालिका याबद्दल त्यांनी नापसंती व्यक्त केली. एका प्रश्नाच्या उत्तरात विनोदी लेखकाच्या विषय निवडीस मर्यादा असल्याने ते मागे पडतात; असे मत त्यांनी व्यक्त केले. आपण ३०–४० वर्षे जी साहित्य सेवा केली त्याचे चीज होण्यासाठी आपण निवडणूक लढवीत आहोत असे ते म्हणाले.

गंभीर व विनोदी असे दोन्ही साहित्यप्रकार सारख्याच तोलामोलाने हाताळणाऱ्या या साहित्यिकाची मैफिल खूपच रंगली.

गुरुवार दि. ५–१०–८९ : विदर्भ साहित्य संघातर्फे घेण्यात येणारी कै. श्रीमती इंदिरा खरे आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा दिनांक ५–१०–८९ रोजी वि. सा. संघाच्या गडकरी सभा गृहात घेण्यात आली. स्पर्धेत एकूण वीस विद्यार्थ्यांनी भाग घेतला. स्पर्धेचे विषय पुढीलप्रमाणे होते.

(१) महाभारतातील आवडलेली व्यक्तिरेखा (२) वृत्तपत्रांचे वाचन (३) लता मंगेशकर (४) क्रिकेटचा एक दिवसीय सामना.

स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्वच पण निवडक विद्यार्थ्यांनी संपूर्ण तयारीने आपला विषय मांडला, स्पर्धेचे परीक्षक म्हणून सौ. मीना भगत आणि सौ. शुभा साठे ह्यांनी काम केले.

स्पर्धा अतिशय रंगतदार होऊन पुढील विद्यार्थिनींनी गुणानुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाचे बक्षीस पटकावले. बक्षीस समारंभ डॉ. सौ. नीलिमा कुळकर्णी ह्यांच्या हस्ते झाला. स्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे.

(१) प्रथम क्रमाक : रेणुका उन्हेकर, सोमलवार हायस्कूल, खामला. (२) द्वितीय क्रमांक : वैशाली राहाटे. राजेंद्र हायस्कूल. (३) तृतीय क्रमांक : गौरी मुंजे, भिडे कन्या शाळा.

दि. ७ व ८ ऑक्टोबर १९८९ : शनिवार व रविवार विदर्भ साहित्य संघातर्फे घेण्यात येणाऱ्या कै. ना. के. बेहरे व्याख्यान मालेनिमित्त वि. सा. संघाच्या गडकरी सभागृहात दैनिक केसरीचे संपादक श्री. डॉ. शरदचंद्र गोखले यांची दोन दिवसीय व्याख्यानमाला संपन्न झाली. पहिल्या दिवशी "भारताचा अशांत परिसर" या विषयावर बोलताना डॉ. गोखले यांनी भारतीय शासनाने स्थिर व निश्चित धोरण अवलंबिले आणि त्याला आर्थिक व लष्करी विकासाची साथ मिळाली तर भारत देश महाशक्ती म्हणून उभा राहू शकेल अशी आशा व्यक्त केली. दुसरे दिवशीच्या व्याख्यानाचा विषय "पंडित जवाहरलाल नेहरू" हा होता. सर्वप्रथम पंडित जवाहरलाल नेहरू व ज्यांची जन्मशताब्दी महाराष्ट्रात सुरू होत आहे त्या श्री. शंकरराव किर्लोस्कर या दोघांच्या छायाचित्रास हार अर्पण करण्यात आला. भारतीय समाजवादाचा नमुना पंडित नेहरूंना साधता आला काय याचा परत मूल्यमापनात्मक विचार व्हावा, असे डॉ. गोखले यांनी प्रतिपादन केले. पंडित नेहरू, महात्मा गांधी, सरदार पटेल, यांच्यातील वादाचा परामर्ष देखील त्यांनी आपल्या भाषणात घेतला. दोन्ही दिवस संघाध्यक्ष प्रा. शेवाळकर अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभारप्रदर्शन संघाध्यक्षांनी केले. संचालन श्री. चंद्रकांत कुळकर्णी यांनी केले.

दि. १६ व १७ ऑक्टो. (सोमवार / मंगळवार) १९८९ : विदर्भ साहित्य संघातर्फे दरवर्षी घेण्यात येणारी कै. सौ. विजया देवपुजारी स्मृति महिला एकांकिका स्पर्धा यंदा दि. १६ व १७ ऑक्टोबर १९८९ या दोन दिवशी धनवटे रंग मंदिरात उत्साहाने पार पडली. यंदा या स्पर्धेत एकूण ७ एकांकिका सादर करण्यात आल्या. एकांकिकांची संख्या जरी कमी होती तरी त्यांच्या सादरीकरणाचा स्तर चांगल्या दर्जाचा होता. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. प्रभाकर चांदेकर, सौ. कुंदा प्रधान आणि सौ. प्रतिमा आकरे यांनी सहकार्य दिले. एकांकिकांच्या लेखनाचे परीक्षण सौ. वर्षा रेगे यांनी केले. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रा. राम शेवाळकर यांच्या हस्ते संपन्न झाला. याप्रसंगी परिक्षकांतर्फे प्रा. प्रभाकर चांदेकर यांनी आपले विचार मांडले. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रा. शेवाळकर यांनी सर्व विजेत्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. विदर्भातल्या नाटयचळवळीचे मूळ स्थान म्हणून विदर्भ साहित्य संघ ओळखला जावा यासाठी नागपूर विदर्भातील सर्व नाटयसंस्थांनी साहित्य संघास व परस्परास सहकार्य करण्याचे आव्हानही याप्रसंगी त्यांनी केले. येत्या काही दिवसातच साहित्य संघातर्फे नाट्य कलावंताचा एक मेळावा आयोजित केल्या जाईल अशी घोषणा याप्रसंगी त्यांनी केली. या समारंभास अॅड. श्री. विवेक देवपुजारीही उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. कुमूद पाठक यांनी केले. आभार प्रदर्शन प्रकाश एदलाबादकर यांनी केले. ही स्पर्धा यशस्वी करण्यास श्री. प्रकाश देशपांडे व सौ. सुहासिनी लाडकर यांनी बरेच परिश्रम घेतले.

सोमवार दिनांक २३ व मंगळवार दिनांक २४ ऑक्टोबर १९८९ : विदर्भ साहित्य संघातर्फे दरवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या कै. ए. श्री. पटवर्धन व्याख्यानमालेत यावर्षी मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभाग प्रमुख डॉ. सरोजिनी वैद्य यांची "नाटयछटाकार दिवाकर" या विषयावर अतिशय सुबोध व रसाळ व्याख्याने झाली. पहिल्या दिवशी डॉ. सौ. आशा सावदेकर यांनी डॉ. सौ. वैद्य यांचा परिचय करून दिला. वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रा. राम शेवाळकर यांनी प्रास्ताविक केले.

नाटयछटाकार दिवाकर म्हणजे गद्यामधून प्रगट झालेले केशवसुत आहेत असे मत डॉ. वैद्य

यांनी व्यक्त केले. दिवाकरांचा नाट्यछटा हा साहित्यप्रकार का लोप पावला, याची कारणमीमांसा करताना डॉ. सौ. वैद्य म्हणाल्या की, या नाट्यछटांच्या आकलनात लोकांनी मोठी गफलत करून घेतली. त्यामुळे हा प्रकार पुढे टिकला नाही.

दुसरे दिवशी आपले विचार व्यक्त करताना सौ. वैद्य यांनी दिवाकरांच्या कथा, नाट्यछटा, अनुवादित साहित्य, नाटके, एकांकिका आदी सर्व प्रकारांचा थोडक्यात आढावा घेतला. त्या म्हणाल्या की, या साऱ्यांमध्ये वास्तविकतेबरोबरच उपरोधाचाही सूर लागलेला आहे. स्वतः भोगलेले व पाहिलेले दुःख कलात्मक आनंदात रूपांतरित करण्याचे त्यांचे ध्येय यातून स्पष्ट होते.

दोन्ही दिवस कार्यक्रमांचे संचालन आमंत्रक श्री. चंद्रकांत कुळकर्णी यांनी केले तर संघाध्यक्ष प्रा. राम शेवाळकर यांनी शेवटी आभार मानले. दोन्ही दिवस व्याख्यानाला बराच मोठा श्रोतृवृंद उपस्थित होता.

दि. २ नोव्हेंबर १९८९ : विदर्भातील ख्यातमान साहित्यिक कै. शरदचंद्र मुक्तिबोध यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

दि. ५ नोव्हेंबर १९८९ : नाट्यपरिषद शाखा नागपूर आणि विदर्भ साहित्य संघ यांच्या संयुक्त विद्यमाने येथील धनवटे रंगमंदिरात साजरा करण्यात आला.

प्रारंभी रंगभूषाकार श्री. बाळ मंगळकर यांनी नटराज मूर्तीचे पूजन केले. त्यानंतर रात्रकालीन एकांकिका स्पर्धेत प्रथम पारितोषिक प्राप्त झालेल्या " अनिकेत " या प्र. ल. मयेकर लिखित आणि अशोक मगरकर दिग्दर्शित " अनिकेत " या एकांकिकेचा सर्वांगसुंदर प्रयोग झाला.

रमेश भिशीकर आणि चौधरी यांना स्व. मनोहर पोलकमवार स्मृतीचिन्ह आणि १५१/- रुपयांचे पारितोषिक नाट्यपरिषदेचे कार्याध्यक्ष प्रभाकर दुपारे यांच्या हस्ते वितरित करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विदर्भ साहित्य संघाचे प्रकाश देशपांडे यांनी तर कार्यक्रमाचे आयोजन शेखर वैद्य यांनी केले.

दि. ६ नोव्हेंबर १९८९ : विदर्भ साहित्य संघाचे संस्थापक कै. बळवंत गणेश खापर्डे यांची यावर्षी जन्मशताब्दी सुरू होत आहे. त्यानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

दि. ७ नोव्हेंबर १९८९ : आधुनिक मराठी कवितेचे जनक आणि प्रसिद्ध मराठी कवी केशवसुत यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

दि. ९ नोव्हेंबर १९८९ : सत्ताधारी पक्षावर लेखणीचे कोरडे ओढण्याचे काम वृत्तपत्रांना करावे लागत असूनही कधी कधी त्यांचे कौतुक करण्याचे सुखद कार्य संपादकाला करावे लागते. असा सुखद प्रसंग कै. वसंतराव नाईक यांच्या बाबतीत एकदा आला होता असे उद्गार दै. लोकसत्तेचे संपादक श्री. माधवराव गडकरी यांनी गडकरी सभागृहात काढले.

विदर्भ साहित्य संघातर्फे आयोजित " साहित्य गप्पा " या कार्यक्रमात श्री. गडकरी बोलत होते. अगदी मनमोकळ्या वातावरणात झालेल्या या गप्पात श्री. माधवराव गडकरी यांनी अनेक प्रश्नांना मनमोकळी उत्तरे दिली. राजकारण, समाजकारण, ग्रंथालय समस्या साहित्य अशा अनेक विषयांवर

श्रोत्यांनी माधवरावांवर प्रश्नांचा भडिमार केला. या साऱ्या प्रश्नांची उत्तरे त्यांनी मनमोकळेपणानी दिली.

कार्यक्रमाचे संचालन श्री. चंद्रकांत कुळकर्णी यांनी केले. कार्यक्रमात संघाध्यक्ष श्री. नानासाहेब शेवाळकर, कार्यकारिणी सदस्य, सौ. कुंदा केळापुरे, श्री. योगेश बऱ्हाणपुरे, श्रीपाद जोशी, श्री. प्रकाश एदलाबादकर व इतर साहित्यप्रेमी उपस्थित होते.

कोणत्याही क्षेत्रातून आलेली दडपणे झुगारणाऱ्या, मोहाचे क्षण बाजूला सारणाऱ्या लोकाभिमुख पत्रकारितेचे भवितव्य आजही सुरक्षित आहे असा मूलमंत्र श्री. माधव गडकरी यांनी येथे दिला. विदर्भ साहित्य संघाच्या वतीने आयोजित कै. ग. त्र्यं. माडखोलकर स्मृती व्याख्यानमालेत ते बोलत होते. वि. सा. संघाचे अध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर हे अध्यक्षस्थानी होते.

वृत्तपत्रनिर्मितीच्या तंत्रात आमूलाग्र बदल झाला आहे. माहितीचा व घटनांचा वेग प्रचंड प्रमाणात वाढला आहे. त्याचबरोबर सामाजिक, राजकीय व आर्थिक क्षेत्रांमधून वृत्तपत्रावर येणारी दडपणे वाढली आहेत. प्रलोभनाचे अनेक प्रकार अंमलात आणले जात आहेत आणि या संपूर्ण परिस्थितीत पत्रकारांना काम करावे लागत आहे याकडे त्यांनी श्रोत्यांचे लक्ष वेधले.

एखादा पत्रकार एखाद्या राज्याची निर्मिती करण्यासाठी, त्याचे भावनात्मक ऐक्य कायम राखण्यासाठी, राज्यकर्त्यांना योग्य मार्गावर ठेवण्यासाठी किती प्रभावीपणे कार्य करू शकतो याचा उत्कृष्ट नमूना म्हणजे स्व. भाऊसाहेब माडखोलकर यांची पत्रकारिता होय. या शब्दात त्यांनी स्व. माडखोलकर यांच्या स्मृतीस अभिवादन केले.

प्रारंभी श्री. गडकरी यांनी भाऊसाहेबांच्या छायाचित्राला पुष्पहार अर्पण केला. श्री. चंद्रकांत कुळकर्णी यांना स्वागतपर भाषण केले. प्राचार्य राम शेवाळकर यांनी प्रास्ताविक भाषण करून वक्त्यांचे स्वागत केले तर शेवटी श्री. प्रकाश एदलाबादकर यांनी आभार प्रदर्शन केले.

दि. ११ नोव्हेंबर १९८९ : वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

१४ नोव्हेंबर १९८९ : आधुनिक भारताचे भाग्यविधाते आणि भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जन्मशताब्दीनिमित्त यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

दि. १८ नोव्हेंबर १९८९ : विदर्भ साहित्य संघाचे एक अध्वर्यू आणि भारतीय साहित्यशास्त्राचे अखिल भारतीय कीर्तीचे अभ्यासक आणि संस्कृतचे व्यासंगी पंडित डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांचे दि. १७ नोव्हेंबर १९८९ रोजी दुःखद निधन झाले. या महान व्यासंगी साहित्यिकाच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी एक शोकसभा आयोजित करण्यात आली. या सभेत ग. त्र्यं. देशपांडे यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

दि. २० नोव्हेंबर १९८९ : महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण भारताला ललामभूत असलेल्या आणि गानहिरा या सार्थ नावाने गौरविल्या गेलेल्या गानतपस्विनी हिराबाई बडोदेकर यांच्या स्मृतीस वि. सा. संघाचे कार्याध्यक्ष श्री. वामन तेलंग यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. याप्रसंगी श्री. चंद्रकांत कुळकर्णी यांनी कै. हिराबाईंच्या जीवनावर प्रकाश टाकणारे हृद्य विचार व्यक्त केले.

दि. २० नोव्हेंबर १९८९ : विदर्भातील सुप्रसिद्ध नाटककार व लेखक कै. वि. रा. हुंबर्डे यांचा स्मृतीदिन वि. सा. संघाच्या गडकरी सभागृहात संपन्न झाला. वि. सा. संघाचे कार्याध्यक्ष श्री. वामन तेलंग यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभात विदर्भाचे सुप्रसिद्ध नकलाकार श्रीयुत नाना रेटर यांच्या हस्ते कै. वि. रा. हुंबर्डे यांच्या "श्रीकृष्ण व पराक्रमी पांडव" या पुस्तकाचे प्रकाशन झाले. विदर्भ साहित्य संघ व साहित्य प्रसार केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचे नागभीड येथील प्रा. राजन जयस्वाल यांचे कै. वि. रा. हुंबर्डे यांच्या साहित्यावर प्रकाश टाकणारे प्रभावी भाषण झाले. श्री. नाना रेटर यांनी कै. वि. रा. हुंबर्डे यांच्या आठवणी सांगितल्या. आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री. वामन तेलंग यांनी कै. हुंबर्डे यांच्या अप्रकाशित साहित्यांच्या प्रकाशनासाठी वि. सा. संघ यथाशक्ती मदत करेल असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विनायक हुंबर्डे यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन श्री. प्रकाश एदलाबादकर यांनी केले. आभार प्रदर्शन साहित्य प्रसार केंद्राचे श्री. राजाभाऊ कुळकर्णी यांनी केले.

या कार्यक्रमास कै हुंबर्डे यांच्या पत्नी श्रीमती वत्सलाबाई हुंबर्डे व बराच मोठा रसिकवर्ग उपस्थित होता.

मंगळवार दिनांक २८-११-८९ : दलित साहित्य व ग्रामीण साहित्य या परिवर्तनवादी साहित्य चळवळीशी माझा जवळचा संबंध आहे. या प्रवाहाशिवाय मराठी साहित्याचा विचार हा अपुरा ठरणार आहे असे विचार पुणे येथे होणाऱ्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. यू. म. पठाण यांनी वि. सा. संघाने आयोजित केलेल्या सत्कार समारंभात व्यक्त केले.

अतिशय अटीतटीच्या निवडणूक संग्रामात विजयी झालेले डॉ. पठाण यांचा हा दुसरा सत्कार. पहिला सत्कार पुणे येथे झाला. अध्यक्षस्थानी डॉ. वि. भि. कोलते होते. तसेच प्रमुख अतिथी साहित्य संस्कृती महामंडळाचे अध्यक्ष डॉ. यशवंत मनोहर हे होते.

सत्काराला उत्तर देताना डॉ. पठाण म्हणाले की या आधी माझ्याकडे कुलगुरूसारखे मोठे पद चालून आले, पण मी ते स्वीकारले नाही. कारण मला त्या पदाचे कधीही आकर्षण वाटले नाही. परंतु साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद स्वीकारले कारण हे माझे खरे क्षेत्र आहे.

डॉ. पठाण यांच्या सत्कारप्रसंगी बोलताना साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. यशवंत मनोहर म्हणाले की, डॉ. पठाण हे विदर्भाचे उमेदवार आहेत. आमचे उमेदवार आहे असे सांगून ते म्हणाले की, डॉ. पठाण यांच्या घरी मी अनेकदा गेलो. सांगताना आनंद होतो की, मराठी माणसांच्या घरचे वातावरण त्यांचे घरी आहे.

प्राचीन मराठी साहित्याच्या संदर्भात जसे अनेक प्रश्न, समस्या आहेत तशाच समस्या सर्वाधिक साहित्याच्या संदर्भातही आहेत याकडे डॉ. पठाण यांचे लक्ष वेधून ते म्हणाले की, अनंत काळापासून ते दडपले होते ते आता बंधमुक्तीच्या वाटा चालू लागले आहेत.

प्रारंभी वि. सा. संघाचे अध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर यांनी परिचय करून दिला. डॉ. कोलते यांनी शाल व श्रीफळ देऊन पठाणांचा सत्कार केला. अनेक सामाजिक, सांस्कृतिक संस्थांनी डॉ. पठाण यांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे संचालन प्रकाश एदलाबादकर यांनी केले. याच सभेत विदर्भातील थोर संशोधक डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

गुरुवार दिनांक ३०-११-८९ : नागपुरातील प्रसिद्ध संगीतज्ञ व गायक स्वर्गीय पं. शंकरराव सप्रे यांचा स्मृतीदिन दि. ३०-११-८९ रोजी साजरा झाला. या निमित्त टिळक सभागृहात सुप्रसिद्ध गायक सूरमणी पं. शरद सुतवणे (पुणे) यांचे सुश्राव्य गायन झाले. हारमोनियमवर त्यांची साथ श्री. श्रीराम सप्रे व तबल्यावर श्रीयुत दीपक फडणवीस यांनी केली. या कार्यक्रमास अनेक संगीत प्रेमी उपस्थित होते.

" युगवाणी "

युगवाणी या विदर्भ साहित्य संघाच्या नियतकालिक मुखपत्राच्या १९८९-९२ या कार्यकालाकरिता असलेल्या संपादक मंडळाची प्रथम सभा शुक्रवार दि. १० नोव्हेंबर १९८९ रोजी सायंकाळी ६-३० वाजता अध्यक्षीय कक्षात झाली.

डॉ. वि. स. जोग, डॉ. जयंत परांजपे, डॉ. श्रीकांत तिडके, श्री. कमलाकर धारप व प्रा. शा. वा. स्वान हे संपादक मंडळाचे सदस्य सभेस उपस्थित होते, तर डॉ. मधुकर वाकोडे व डॉ. प्रकाश खरात सभेस उपस्थित राहू शकले नाहीत.

विदर्भ साहित्य संघाचे कार्याध्यक्ष श्री. वामन तेलंग सभेच्या अध्यक्षस्थानी होते.

युगवाणीचे संपादक श्री. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी सभेचे संचालन केले.

युगवाणीच्या प्रत्येकच अंकाला अध्ययन-संशोधन व अभिरुची संबंधाने संग्राह्य मूल्य प्राप्त होईल असे सहकार्य व कार्य या कार्यकालात करण्याचे सर्वसाधारण धोरण संपादक मंडळाने सर्वसाधारणपणे व्यक्त करून युगवाणीचे वर्गणीदार वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याचेही धोरण ठरविले. युगवाणी हे सध्या त्रैमासिक प्रकाशित होत असून हा कालावधी कमी करता यावा व ते किमान द्वैमासिक प्रकाशित व्हावे अशी सूचनाही करण्यात आली.

युगवाणीच्या अनियमिततेवर देखील सांगोपांग चर्चा होऊन अनियमिततेच्या विविध कारणांचा अभ्यासपूर्वक आढावा घेण्यात येऊन या कार्यकालात युगवाणीची नियमितता टिकविण्याच्या प्रयत्नांवर भर देण्याचे ठरविण्यात आले.

सर्वच वाङ्मयीन नियतकालिकांच्या एकूणच सद्यस्थितीतील अनियमितता, त्याची कारणे व सद्यःस्थिती यावर संपादक मंडळात चर्चा होऊन युगवाणीच्या संपादकांनी एप्रिल, मे, जून ८९ च्या संपादकीयात यावर सुचविलेल्या उपाययोजनांना अग्रलेख लिहून पाठिंबा व्यक्त करणाऱ्या दै. लोकमतचे आभार मानण्यात आले.

युगवाणी सारखी नियतकालिके समाजात आपली भूमिका प्रभावीपणे पार पाडत रहावी असे वाटत असल्यास वर्तमानपत्रे, शासन व तत्सम संस्था, विदर्भ साहित्य संघाच्या शाखा व अशा इतर संस्था व संबंधितांनी आपआपल्या परीने वाङ्मयविषयक वातावरण जागते ठेवण्याचे प्रयत्न करावे असे आवाहनही संपादक मंडळाने केले. युगवाणीच्या प्रत्येकच अंकातील काही वैशिष्टचपूर्ण मजकुरावर विदर्भ साहित्य संघाच्या शाखांनी चर्चांचे आयोजन करणे हा वाङ्मयीन उपक्रम म्हणून हाती घ्यावा, संपादक मंडळातील सदस्यांचे अशा उपक्रमात आवश्यक ते सहकार्य मागावे व या प्रकारे युगवाविर्णाषयक वातावरणनिर्मितीची चळवळ करण्याचे कार्य विदर्भ साहित्य संघाच्या साऱ्याच शाखांनी हाती घ्यावे अशी मोलाची सूचना व आवाहनही संपादक मंडळाने केले.

श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालय

दि. २१-१२-८९ गुरुवार, आपल्या उत्कट, सहजसुंदर वक्तृत्वशैलीने साऱ्या महाराष्ट्राला झपाटून टाकणाऱ्या राम शेवाळकरांच्या व्यक्तिमत्वाचे काव्यमय हळूवार असे दर्शन त्यांच्या "देवाचे दिवे" या व्यक्तिचित्रणात्मक नव्या ग्रंथात पाहताना वाचकाला एक वेगळाच आनंद होतो, असे विचार श्री. वसंत सहस्रभोजनी यांनी नवे ग्रंथ नवे समीक्षक या कार्यक्रमात व्यक्त केले. राम शेवाळकरांच्या सहवासात आलेल्या अनेक व्यक्तींशी माझा कोणताही संबंध आला नसतानाही लेखकाच्या सहजसुंदर शैलीमुळे मीही या ग्रंथात आलेल्या व्यक्तींमध्ये गुंतून पडलो. साध्याच माणसांमधील मोठेपण शोधण्याचा एक छंद शेवाळकरांनी जिव्हारी लावून घेतला व त्यातूनच त्यांचे हे उत्कट लेखन निर्माण झाले. बाई, भाऊसाहेब, ओघावेगळे ना. घ., महामानव बाबा आमटे, घाऱ्या डोळचांचा माणूस पु. भा. भावे इ. व्यक्तिचित्रे वाचताना या व्यक्तींना पुन्हापुन्हा भेटण्याचा आनंद शेवाळकर आपल्या लेखनशैलीने देतात हे या पुस्तकाचे मोठे यश.

याच कार्यक्रमात कु. कोकिळा कुऱ्हाटकर यांनी गिरिजा कीर यांच्या "अनोळखी ओळखी" या मुलाखतींवर आधारित ग्रंथाची ओळख वाचकांना करून दिली. समाजातील वेगवेगळया व्यवसायातील कर्तबगार व्यक्तींचे अंतरंग आपल्या यशस्वी मुलाखत तंत्राद्वारे श्रीमती गिरिजा कीर यांनी कसे आत्मसात केले आहे याचे विस्तृत विवेचन कु. कोकिळा कुऱ्हाटकर यांनी केले. सौ. सुनीता सहस्रबुद्धे यांनी "नाटचविचार" या डॉ. अनंत देशमुख यांच्या नव्या समीक्षाग्रंथाचा परिचय उपस्थितांना करून दिला. मराठी नाटचसमीक्षेला नवी दिशा दाखवताना व रंगभूमीविषयक नव्या प्रश्नांना चालना देणारा हा ग्रंथ रंगभूमीच्या अभ्यासकांना निश्चित उपयोगी पडेल, असे नमूद करतानाच ग्रंथातील मुद्रणदोषांबद्दल व व्याकरणविषयक चुकांबद्दल त्यांनी खरपूस टीका केली.

समीक्षणानंतर झालेल्या चर्चेत डॉ. मदन कुळकर्णी, श्री. बाळासाहेब गावली, प्रा. रजनी कोलारकर, सौ. शुभांगी संत, सौ. शुभा साठे, सौ. वीणा सुकळीकर इ. अभ्यासकांनी भाग घेतला.

दि. २४-१२-८९ : तुकाराम काळापासून आजतागायत त्यांच्या अभंगवाणीने लावलेले वेड बहुधा लक्षात घेऊन कित्येक अभ्यासकांनी त्यांच्या अभंगसंहितेकडे लक्ष पुरविले. तसेच तुकाराम कार्याबरोबरच त्यांच्या अभंगसंहितेचेही अध्ययन, निरीक्षण व संकलन करण्यास अनेक अभ्यासकांनी प्रारंभ केला असे विचार डॉ. नीलिमा कुळकर्णी यांनी प्रबंध परिचय या कार्यक्रमात आपल्या "तुकारामाच्या अभंगगाथेच्या संपादन पद्धती-एक चिकित्सक अभ्यास" या प्रबंधाचा परिचय करून देताना काढले. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठातून आजपर्यंत तयार झालेल्या सातशे प्रबंधात संपादन पद्धतीवर संशोधन झालेला हा एकमेव प्रबंध आहे. तुकारामाच्या प्रचलित ४६११ अभंगांपैकी २३९५ अभंग हे अस्सल तुकारामाचे आहेत असा निष्कर्ष सौ. नीलिमा कुळकर्णी यांनी काढलेला आहे. या प्रबंधाचे मार्गदर्शक आहेत डॉ. मधुकर रामदास जोशी.

वरील कार्यक्रमांचे संचालन आमंत्रक चंद्रकांत कुळकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सौ. कुंदा केळापुरे व ग्रंथपाल कु. भारती विचुर्णे यांनी केले.

■

ब्रम्हपूरी

१. स्थानिक, विदर्भ साहित्य संघ शाखा, ब्रम्हपूरीच्या सन १९८९-९० साठी कार्यकारिणी मंडळाची निवड होऊन पुढील पदाधिकाऱ्यांची निवड झाली.

अध्यक्ष – श्री. गोपाळराव शिनखेडे
कार्याध्यक्ष – श्री. बी. जी. रडे
उपाध्यक्ष – श्री. रा. शं. पंडे
सरचिटणीस – श्री. संजय देव
कोषाध्यक्ष – श्री. भा. व्य. कात्यायन

आमंत्रक-परीक्षा समिती-श्री. प्रकाश वैद्य
नाट्य समिती-श्री. अनिल कोडापे
सांस्कृतिक कार्यक्रम समिती-श्री. यशवंत कोकोडे
संवारित सदस्य - श्री. सतीश शिनखेडे, श्री. विजय मुडे

२. दि. २३-१०-८९ सोमवारला रात्री ९-०० वाजता स्थानिक भगिनी मंडळ सभागृह येथे "संगीत-रजनी" चा कार्यक्रम घेण्यात आला. येथील "स्वरांजली"च्या कलावंतानी हा कार्यक्रम सादर केला. शास्त्रीय, नाट्यगीत, सिनेगीत, बासरीवादन, व्हायोलीन तसेच हार्मोनियम इ. च्या गायन वादनाने हा कार्यक्रम विनटलेला होता. एस. डी. ओ, श्री. पायवन, श्री. रातपायले, श्री. मिश्रा व सौ. चिलवूले तसेच श्री. धावेकर, श्री. कुर्वे, बाम्मालापूर गुरुजी व प्रा. सगदेव इत्यादी कलावंतानी हा कार्यक्रम सादर केला.

वि. सा. संघातर्फे सरचिटणीस श्री. संजय देव यांनी प्रास्ताविक व श्री. भा. व्य. कात्यायन यांनी आभार प्रदर्शन केले.

जवाहनगर

१. प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही स्थानिक फॅक्ट्री शाळेतून शालांत परीक्षेत मराठी विषयात सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना मा. महाप्रबंधकांचे हस्ते प्रत्येकी ५१/- रु. चे रोख बक्षिसे प्रदान करण्यात आली.

शाखेच्या या उपक्रमाचे नागरिकांतर्फे स्वागत करण्यात आले. पारितोषिकप्राप्त विद्यार्थी असे.

१. मा. आनंद सुरजलाल कथलेवार ७७% (मार्च ८८)
२. मा. रवि विनायक फुले ७१% (मार्च ८९)

२. विदर्भ साहित्य संघ शाखा जवाहरनगर चा ४ था वर्धापन दिवस दिनांक ३ ऑक्टोबर ८९ रोजी स्थानिक बहुउद्देशिय भवनात उत्साहात साजरा झाला.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून समर्थ महाविद्यालय लाखनीचे प्राचार्य श्री. प्र. दाढी यांना पाचारण करण्यात आले होते. याप्रसंगी नागपूरचे मदन सेनाड आणि वणीचे दलित मित्र गणपत पाटील व कवी कृष्णा लाडसे हे हजर होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. व्ही. डी. मार्डीकर वरिष्ठ वैज्ञानिक आई. ए. ई. भंडारा हे होते.

शाखेचे उपाध्यक्ष श्री. रत्नाकर सालकाडे व सहसचिव श्री. विजय जोशी यांनी उपस्थिताचे स्वागत केले.

दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्‌घाटन करून श्री. दाढी यांनी शारदेला मालार्पण केले. कु. अर्चना लांजे हिने शारदा स्तवन म्हटले.

शाखेचे अध्यक्ष श्री. मधुकर कनेर यांनी प्रास्ताविक केले व शाखा स्थापनेत पुढाकार घेऊन स्वत: साहित्य क्षेत्रात प्रगती करीत असल्याबद्दल सचिव हिरामण लांजेबद्दल गौरवोद्‌गार काढले. श्री. लांजे यानी अहवाल वाचन करून पाहुण्यांचा परीचय करून दिला. अध्यक्ष व सचिवांनी सर्वांची अपेक्षा व्यक्त केली.

आपल्या प्रमुख भाषणात प्राचार्य दाढी यांनी इंग्रजीच्या मराठीवरील आक्रमणाविषयी चिंता व्यक्त केली व साहित्य संस्यांनी यासाठी जागरुक राहावे असे सांगितले. यावेळी श्री मदन सेनाड आणि गणपत पाटील यांचीही भाषणे झाली. श्री. रुपरेषन रोटके यांनी कार्यक्रमाचे संचालन केले.

काव्यानंदने श्रोत्यांना रिझविले.

यानंतर कवी कृष्णा लाडसे वणी यांचा "काव्यानंद" हा कवितेवरील कार्यक्रम झाला. विविध रचना सादर करून त्यांनी दीड तासपर्यंत श्रोत्यांना खिळवून ठेवले.

उपाध्यक्ष श्री. रत्नाकर सालकाडे यांनी सर्वांचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रम सफल व्हावा म्हणून कार्यक्रम प्रमुख श्री. वसंत चत्रे, कोषाध्यक्ष श्री. माधवराव ब्राम्हणकर, रामचंद्र नाकाडे, रुपरेशन रोटके, घनश्याम डोंगरे यांनी परिश्रम घेतले.

लाखनी शाखा

वि. सा. संघ, शाखा लाखनीचा वर्धापन दि. ६–१०–८९ ला पार पडला परंतु हा वर्धापन १२ वा असल्यामुळे एक तपाची वाटचाल म्हणून वर्धापन दिन तीन दिवस पार पडला.

दि. ६–१०–८९ वर्धापन दिन

प्रमुख अतिथी–शिक्षण महर्षी, विचारवंत व सेवक मान. बापुसाहेब लाखनीकर, याप्रीत्यर्थ बाल-चित्रकला प्रदर्शनी भरविण्यात येऊन खालील यशस्वी स्पर्धकांना कै. शंकरराव गभने स्मृती पारितोषिके देण्यात आली.

गट १ ला वर्ग ५ ते ७ (चित्रकला स्पर्धा

१. पृथ्वीराज तुळशीराम हुमने–प्रथम–वरिष्ठ प्रा. शाळा सोमलवाडा
२. किशोर परशराम ब्रम्हणूरकर–द्वितीय–समर्थ विद्यालय लाखनी
३. अतुल अविनाश गीरी–तृतीय–वरिष्ठ प्रा. शाळा सोमलवाडा

गट २ रा वर्ग ८ ते १०

१. किरण राजहंस गोस्वामी–प्रथम-समर्थ विद्यालय लाखनी
२. हुमदेव दवलतराव मेश्राम–द्वितीय–जि. प. वि. पोहरा
३. लिलाधर महादेवराव देशमुख–तृतीय–गोविंद विद्यालय, पालांदूर (पो.)

गट ३ रा वर्ग ११ ते इतर

१. रवीन्द्र दवलतराव मेश्राम–प्रथम जि. प. क. वि. पोहरा.
२. ईश्वर हरिश्चंद्र खंडाईत–द्वितीय–जि. प. क. म. वि. पालांदूर (पौ.)
३. रुपराम मुरलीधर धकाते–तृतीय–गोविंद क. म. वि. पालांदूर
४. जयंत महादेवराव देशमुख–तृतीय–गोविंद क. म. वि. पालांदूर

लाखनी केंद्र–मराठी विषयात सर्वोच्च गुण

वर्ग १०–शालांत परीक्षा कु. हर्षलता हुकराम गायधनी, रा. ल. क. लाखनी
वर्ग १२ वा–उच्च माध्यमिक–आनंद अनील देशपांडे–स. क. म. वि. लाखनी
बी. ए. (वाङ्मयस्नातक) जागेश्वर मनोहर वाघापे–समर्थ म. वि. लाखनी
वरील विद्यार्थ्यांना कै. वसंत हुकरे स्मृती पारितोषिने देण्यात आला.

दिनांक ७–१०–८९ शनिवार

वक्ते–मा. रा. शं. ठोमर, सचिन मानवता प्रतिष्ठान गुरुकुंज मोझरी (अमरावती)
विषय–" राष्ट्रसंताचे साहित्य व सेवा "

दिनांक ८–१०–८९

लोकचंद अंतारामजी किरणापुरे " विजयदिन " प्रमाणपत्र वितरण समारंभ हस्ते–श्री. प्र. वा. जावरकर, सचिव, साने गुरुजी मानव सेवा संघ अमरावती

प्रमुख उपस्थिती–श्री. डॉ. सु. के. शर्मा कोषाध्यक्ष सानेगुरुजी मानव सेवा संघ, अमरावती.

याप्रसंगी–लोकचंद किरणापुरे या हृदय रोगी रुग्णाचे शाखेने २५ हजर रुपये निधी गोळा करून साने गुरुजी मानव सेवा संघाच्या सहकार्याने यशस्वी शस्त्रक्रिया (के. टी. अ. मुंबई) घडवून आणली व प्राण वाचविले. शाखाध्यक्ष–श्री. सु. मो. वारसागडे यांनी पुष्पगुच्छ, श्यामची आई, उपरणे व श्रीफळ देऊन लोकचंदचा सत्कार केला. त्याचप्रमाणे प्र. वा. जफवळकर, डॉ. सु. के. शर्मा, मि. वि. पिंपळे (भिवापूर), श्रीमती आदर्शमान सरस्वतीबाई जावरकर यांच्याही सेवांचा श्रीफळ उपरणे कापड व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

या तिन्ही कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी शाखाध्यक्ष श्री. सु. मो. वारसागडे हे होते. सभासंचालन-सहसचिव श्री. ता. ह. भुरे यांनी केले. सचिव द. सा. बोरकरानी परिचयात्मक प्रास्ताविक करून शाखा प्रगतीच एक तपाचा आढावा सादर केला.

कार्यक्रम विविकानंद सभागृहात संपन्न झाले.

तिरोडा

श्री संत एकनाथांनी आख्यान, काव्य, महत् काव्य, भाष्यग्रंथ, भारूडे, अभंग, चरित्रात्मक लेखन, विराण्या, गवळणी इ. विविध काव्यप्रकारांच्या माध्यमातून वारकरी संप्रदायाचा संदेश समाजाच्या तळागाळातल्या लोकांपर्यंत पोहोचविला. विविध धर्मीविषयीची सहिष्णुतेची भावना त्यांनी जोपासली व धर्मप्रसाराच्या हेतूने केलेले समाजप्रबोधन अत्यंत लक्षणीय ठरले असे उद्गार

मराठवाडा विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख आणि येत्या ६३ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. यु. म. पठाण यांनी शनिवार दि. २ डिसेंबर रोजी तिरोडा येथील विदर्भ साहित्य संघाची कै. लक्ष्मणराव पडोळे व्याख्यानमाला गुंफतांना काढले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक तिरोडा येथील विदर्भ साहित्य संघ शाखेचे अध्यक्ष प्रा. गो. मो. कोलते यांनी केले.

डॉ. यु. म. पठाण यांची अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल वि. सा. संघाध्यक्ष प्रा. गो. मो. कोलते यांनी त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. डॉ. यु. म. पठाण पुढे म्हणाले, संत एकनाथांच्या काळाच्या पार्श्वभूमीवरचा विचार करता त्यांचे हे कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण असून त्यामुळे विघटित व दुभंगलेला समाज संघटित व्हावयास मोलाचे साहाय्य केले. "भागवत" या ग्रंथामध्ये संत एकनाथांनी केलेल्या उदात्त मूल्यांचे विवेचनही डॉ. पठाण यांनी केले. श्री. चंद्रकुमार दुबे नगराध्यक्ष हे दुसरे पुष्प गुंफताना अध्यक्षस्थानी होते. त्यांनी डॉ. यु. म. पठाण यांचे स्वागत केले.

श्री. बी. जी. झरारिया, सचिव, वि. सा. संघ शाखा यांनी संचालन केले. कै. लक्ष्मणराव पडोळे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ श्रीमती कमलाताई पडोळे यांनी व्याख्यानमालेसाठी दोन हजाराची वि. सा. संघ शाखेला देणगी दिली. कै. लक्ष्मणराव पडोळे यांच्या छायाचित्राला डॉ. पठाण यांनी पुष्पहार अर्पण केला. श्री. शंकर हरोडे व श्री. संजीव कोलते सचिव यांनी परिश्रम घेतले.

रामटेक

वि. सा. संघातर्फे दि. २५–२–८९ ला समर्थ विद्यालयाच्या प्रांगणावर सर्व शाळेकरिता एकांकिका स्पर्धेचे आयोजन केले होते. यात समर्थ महाविद्यालयाने सादर केलेली "धंदा" व राष्ट्रीय आदर्श विद्यालयाने सादर केलेली "आलिया भोगासी" ह्या एकांकिका अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांकावर आल्या. स्पर्धेत शाळेला कप व विद्यार्थ्यांना वैयक्तिक बक्षिसे वाटण्यात आली.

तसेच दि. २७–३–८९ ला ठीक सायंकाळी ६–०० वाजता श्री. रामजी महाजन विद्यालय येथे आदरणीय प्राचार्य तांदूळकर साहेब यांच्या अध्यक्षतेखाली श्री संत तुकारामांच्या जीवनावर आधारित "तुकारामजी" हा कार्यक्रम घेण्यात आला. श्री. प्रा. चौधरी हे व्याख्याते म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन व संचालन शाखेचे सचिव श्री. शेषराव येवले यांनी केले. कार्यक्रमात श्री. गजाननराव किमतकर, श्री. पंडे, श्री. तोतडे, श्री. डॉ. विष्णूजी किमतकर, श्री. डॉ. गंधेवार, श्री. येरपुडे व इतर प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होती.

त्याचप्रमाणे दि. १६–१२–८९ रोज शनिवारला ठीक दुपारी २ वाजता कै. दामोदरराव किमतकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ वर्ग ९ ते १२ च्या विद्यार्थ्यांकरिता "निरक्षरता समाजाला कलंक आहे." विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन श्री. समर्थ विद्यालय, रामटेक येथे करण्यात आले. श्री. अशोकराव बर्वे (अध्यक्ष न. प.) यांच्या अध्यक्षतेखाली श्री. येरपुडे व श्री. प्राचार्य पोकळे सर यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाखेचे अध्यक्ष श्री. श्रीरामजी आष्टनकर तर आभार प्रदर्शन श्रीमती सुमतीबाई क्षीरसागर यांनी केले. त्याचप्रमाणे या कार्यक्रमाचे आयोजन व संचालन शाखेचे सचिव श्री. शेषराव येवले यांनी केले. कार्यक्रमाचा संपूर्ण खर्च श्री. गजाननराव

किमतकर गुरुजी यांनी केला. स्पर्धेत एकूण ९ मुलामुलींनी भाग घेतला. त्यापैकी अ गटातून (१) प्रशांत घाणेकर (२) कु. विणा डोंगरे व ब गटातून (१) भूषण वाघे (२) कु. स्मिता वेरुळकर हे स्पर्धक विजयी झालेत. विजयी स्पर्धकांना वैयक्तिक बक्षिस म्हणून कप तर विजयी शाळेला "ढाल" देण्यात आली. कार्यक्रमात अनेक गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

इतर शाखांचे या कार्यालयातील वृत्त अजून हाती आले नाही.

ऑक्टोबर ८९ ते डिसेंबर ८९ या कालावधीतील आजीव सभासदांची यादी

१. श्री. अरुण पाठक, नागपूर, २. डॉ. जय माधवराव देशमुख; नागपूर, ३. श्री. जैमिनी भाऊराव कडू, नागपूर, ४. श्री. शाम पांडुरंग तळखंडकर, परतवाडा, ५. श्री. विजयिनी विजय जोशी, मेहकर, ६. डॉ. विठ्ठल माधवराव पागे, उज्जैन.

सरचिटणीस

'वेटिंग फॉर गोदो' या व इतर विख्यात नाट्यकृतींचे, जागतिक कीर्तीचे थोर नाट्यलेखक सम्युएल बेकेट यांचे पॅरिस येथे शुक्रवार २२ डिसेंबर १९८९ रोजी निधन झाले.

माणसाच्या अस्तित्वाचे एकाकीपण या केंद्रबिंदुभोवती फिरणारा नाट्यविचार हे त्यांचे वैशिष्ट्य. बेकेट हे नाट्यसृष्टीतील एका तत्वज्ञानाचे नांवच झालेले होते.

बेकेटच्या स्मृतीला युगवाणीची ही श्रद्धांजली.

भारतीय व्यंगचित्रकारितेचे पितामह समजल्या जाणाऱ्या 'शंकर' या नांवाने विख्यात असलेल्या श्री. शंकर पिल्ले यांचेही २९ डिसेंबर ८९ रोजी निधन झाले.

भारतीय व्यंगचित्रकारिता, बाल ग्रंथ चळवळ व बालचित्रकारिता यातील त्यांच्या योगदानास भारतात तोड नाही. त्यांच्या स्मृतीला युगवाणीची ही आदरांजली.

अनुक्रमणिका

YUGAVANI/L-22 Regd. News Paper/NGP/341/युगवाणी/ऑ-नो-डि.१९८९/मूल्य १०/-

प्रकाशक : मनोहर म्हैसाळकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, नागपूर. ४४० ०१२
मुद्रक : मधुसूदन पांडुरंग बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर, ४४००१२

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका